
क्रांतीचे रंग

# ।। क्रांतीचे रंग ।।

(क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील गौरवग्रंथ)

संपादक

**प्रा. दिनकर विष्णू पाटील**

सहाय्यक संपादक

**डॉ. जे. बी. शिंदे**

**प्रा. ए. एम. साळोखे**

**श्री. जयसिंगराव सावंत**

**प्रा. जे. के. पवार**

**।। क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील गौरवसमिती, कोल्हापूर ।।**

द्वारा - कमला कॉलेज, ताराराणी विद्यापीठ, राजारामपुरी, कोल्हापूर - ४१६ ००८.

फोन नं. : (ऑ.) (०२३१) ५२२२१६, (नि.) ५२४५२४

॥ क्रांतीचे रंग ॥

(क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील गौरवग्रंथ)

**प्रकाशक**

क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील गौरवग्रंथ समिती, कोल्हापूर.
द्वारा - कमला कॉलेज, ताराराणी विद्यापीठ,
राजारामपुरी, कोल्हापूर - ४१६ ००८.
फोन नं. : (०२३१) ५२२२१६ (ऑ.) ५२४५२४ (नि.)

**अक्षर जुळणी - मुखपृष्ठ - मुद्रक**

जनराज ऑफसेट,
७०, पांजरपोळ औद्योगिक वसाहत,
राजारामपुरी, कोल्हापूर.
फोन नं. : (०२३१) ६९२३०८.

**प्रथम आवृत्ती**

दि. २६ जानेवारी, २००१
प्रजासत्ताक दिन

**किंमत १००/- रुपये**

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादकीय | | |
| १. | एक धगधगता ज्वालामुखी | बॅ. पी. जी. पाटील | १ ते ४ |
| २. | रंगायण | दिनकर द. पाटील | ५ ते ७ |
| ३. | क्रांतिवीर रंगरावदादा पाटील | प्राचार्य पी. बी. पाटील | ८ ते १० |
| ४. | शिगांवचे रंगरावदादा | क्रांतिवीर कै. तांबटकाका | १० |
| ५. | रंगरावदादा आणि ४२ चा लढा | श्रीमती इंदुमती पाटणकर | ११ ते १५ |
| ६. | क्रांतिवीर रंगरावदादा पाटील | श्री. दत्तात्रय लोहार | १५ |
| ७. | स्वातंत्र्य संग्रामातील धगधगती तोफ | श्री. डी. बी. पाटील | १६ ते १७ |
| ८. | स्वातंत्र्याचे राजदूत | श्री. आर. बी. लाड | १७ |
| ९. | झुंझार लोकनेते रंगरावदादा | श्री. धोंडीराम माळी | १८ ते १९ |
| १०. | अहो दादा ! | श्री. आण्णासाहेब डांगे | २० ते २२ |
| ११. | एक क्रांतिवीर | श्री. बाबुराव कोतवाल | २२ |
| १२. | क्रांतिवीर रंगराव पाटील | ॲड. डी. एम. पाटील | २३ ते २४ |
| १३. | क्रांतिवीर रंगरावदादा पाटील | श्री. बाळासाहेब चिवटे | २४ |
| १४. | एक सच्चा मित्र | श्री. के. डी. पाटील | २५ ते २६ |
| १५. | निर्भिड सच्चा कार्यकर्ता | श्री. विमलनाथ शेटे | २७ ते ३० |
| १६. | शिवधडीचे दादा | श्री. एस. बी. शेटे | ३० |
| १७. | स्वातंत्र्य सेनानी | श्री. गणपतराव कोळी | ३१ ते ३२ |
| १८. | पुत्र व्हावा ऐसा ! | श्री. व्ही. टी. पाटील | ३३ ते ३५ |
| १९. | वंदे मातरम् | श्री. रा. वि. पाटील | ३५ |
| २०. | क्रांतिवीर रंगराव पाटील | श्री. बापूसाहेब कुंभोजकर | ३६ ते ३७ |
| २१. | एक निर्लोभ व्यक्तिमत्त्व | प्राचार्य आबासाहेब शिंदे | ३८ ते ४१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २२. | सुदैवी समाजसेवक | प्रा. जे. के. पवार | ४२ ते ४३ |
| २३. | वारणामाईचा प्रभाकर | श्री. रा. वि. सराफदार | ४४ ते ४६ |
| २४. | सातारा प्रतिसरकारचे सैनिक | श्री. पी. जी. फडके | ४६ |
| २५. | क्रांतिसिंहाचे सहकारी | श्री. उत्तम कदम | ४७ ते ४८ |
| २६. | औक्षवंत व्हा ! | श्री. भगवान सावंत | ४८ |
| २७. | एक देशभक्त | श्री. दत्ता जंगम | ४९ |
| २८. | धगधगते नेतृत्व | श्री. राजाराम य. पाटील | ५० ते ५२ |
| २९. | स्वातंत्र्य लढ्यातील कंठमणी | श्री. भगवानराव पाटील | ५३ ते ५४ |
| ३०. | रंगरावदादांच्या सहवासात | श्री. आनंदराव थोरात | ५५ ते ५६ |
| ३१. | समतेचे पुजारी | श्री. सुनील कदम | ५७ ते ५९ |
| ३२. | उगवत्या पिढीचा आदर्श | श्री. शामराव सावंत | ५९ |
| ३३. | माझ्या शब्दात मी | श्री. रंगरावदादा पाटील | ६० ते ६१ |
| ३४. | एक झंझावात | प्रा. दिनकर विष्णू पाटील | ६२ ते ६५ |
| ३५. | फुले, कर्मवीरांच्या वारसदार | श्री. संजय कुंभोजकर | ६६ ते ६८ |
| ३६. | वीरमाता सौ. कल्पनादेवी पाटील | सौ. शकुंतला पाटील | ६९ ते ७० |
| ३७. | मुलुखा वेगळा माणूस | श्री. आकाराम पवार | ७० |
| ३८. | माझे वडील | सौ. सुप्रिया मोहिते | ७१ ते ७४ |
| ३९. | स्वातंत्र्य सैनिक (कविता) | श्री. जे. डी. ढोबळे | ७५ |
| ४०. | वारणेचा वाघ (कविता) | श्री. हरिभाऊ कारके | ७५ |
| ४१. | माझे जीवन : एक यज्ञकुंड (एक मुलाखत) | श्री. रंगरावदादा पाटील | ७६ ते ८१ |
| ४२. | श्री. रंगरावदादांचे विचार / भाषणे | | ८२ ते ८७ |
| ४३. | जीवनपट | | ८८ ते ८९ |
| ४४. | गौरवपत्र | | ९० ते ९२ |
| ४५. | कृतिशील जीवनाला पुरोगामी विचारांचे अधिष्ठान असलेले क्रांतीवीर रंगरावदादा | श्री. ग. प्र. प्रधान | I to IV |

# संपादकीय

**क्रांतिच्या रंगातून .....**

महाराष्ट्रातील थोर क्रांतिकारक आणि सातारा प्रतिसरकारमधील खंदे क्रांतिवीर आणि फर्डे वक्ते क्रांतिवीर श्री. रंगराव विठ्ठलराव पाटील उर्फ दादा यांना २५ डिसेंबर १९९९ या दिवशी ८० वर्षे पूर्ण झाली. सध्या ८१ व्या वर्षात रंगरावदादांनी पदार्पण केलेले आहे. त्यांच्या या वाढदिवसानिमित्त ''क्रांतीचे रंग'' गौरवग्रंथ महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या,मराठी मुलखातील मराठी वाचकांच्या हाती देताना आम्हास आनंद होत आहे. कर्तव्यपूर्तीचे समाधान होत आहे.

क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ४२ च्या लढ्यातील कार्य, राजकीय कार्य, शैक्षणिक कार्य, सहकार क्षेत्रातील कार्य, वैचारिक निष्ठा आणि विचार संपदा नव्या पिढीसमोर ठेवण्यासाठी हा प्रपंच केला आहे. श्री. रंगरावदादांचे स्वच्छ सार्वजनिक जीवन निर्मळ व पुरोगामी लोककल्याणकारी नेतृत्व. सामान्य माणसाला आर्थिक, सामाजिक, राजकीय न्याय मिळावा म्हणून दादांनी योगदान दिले आहे. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचार प्रवाहावर अविचल निष्ठा, असणारे दादा आहेत.

एक थोर क्रांतिवीर, स्पष्ट वक्ता, स्वच्छ चारित्र्यसंपन्न व्यक्मिमत्त्व, पुरोगामी विचाराचे खंदे पुरस्कर्ते म्हणजे श्री. रंगरावदादा पाटील होत. आयुष्याच्या संध्याकाळी समाजाने मनापासून, जिव्हाळ्याने, आपुलकीने, प्रेमाने नागरी सत्कार आयोजित केला आहे. श्री. रंगरावदादांनी जे जे पेरले ते ते उगवलेले आहे. श्री. रंगरावदादांनी आपल्या वाणीने उभा महाराष्ट्र पालथा घातला. खेड्यापाड्यातील सर्वसामान्य माणसं तासन्तास रंगरावदादांचे भाषण ऐकण्यासाठी गर्दी करतात. हेच मराठी मातीचे वैभव आहे.

मी कुंडलच्या क्रांतिसिंह नाना पाटील बोर्डींगमध्ये असताना सन १९७२ साली सांगली जिल्हा परिषदेवर क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचा मोर्चा काढला होता. त्यामध्ये रंगरावदादांचे जे भाषण झाले तेच भाषण माझ्या हृदयावर जसेच्या तसे आजही कोरलेले आहे. माझ्या मनावर त्यांचे व्यक्तिमत्त्व ठसलेले आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील, माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, स्वामी रामानंद भारती, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांचा सहवास त्यांना लाभला. १९४२ चा लढा, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, गोवामुक्ती लढा, महागाई विरोधी आंदोलन, दारुबंदी आंदोलन, विद्यार्थी संघटना, साराबंदीची चळवळ, झेंडा सत्याग्रह, गांधी विवाह पद्धत, शेतकऱ्यांचा मोर्चा अशा एक ना अनेक लढ्यामध्ये रंगरावदादा सक्रीय सहभागी झालेले होते. त्या त्या लढ्यातील त्यांचे कार्य म्हणजे त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा धगधगता इतिहासच ठरला आहे.

काळ्या आईवर निष्ठा ठेवून बळीराजाला न्याय देण्यासाठी अहोरात्र झटणारे व्यक्तिमत्त्व म्हणून साऱ्या मराठी मुलखाला दादा परिचित आहेत.

दादांच्या भव्य नागरी सत्कार समारंभाच्यानिमित्ताने त्यांच्याविषयी गौरवग्रंथ प्रकाशित व्हावा अशी आम्ही इच्छा व्यक्त केली. सुरुवातीला दादांनीच नकार दिला. ''मी काम केले आहे, आजही करीत आहे, परंतु त्या कामाचा डांगोरा मला पिटायचा नाही. माझे काम पुढे चालू रहावे एवढीच अपेक्षा आहे.'' अशा शब्दात दादांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आम्ही ते मान्य केले. मात्र दादांचे कार्य, त्यांचे विचार, आचार भावी पिढीला मार्गदर्शक ठरावेत आणि त्यासाठी ते अक्षर स्वरुपात, ग्रंथ स्वरुपात पुढे यावेत; ही आमची इच्छा दादांनी मान्य केली. त्यासाठी नागरी सत्कार समितीतील सर्वच मान्यवरांनी मार्गदर्शन केले, सहकार्य केले. त्यातूनच हा ग्रंथ साकारला आहे.

हा ग्रंथ म्हणजे दादांच्या आजपर्यंतच्या जीवन कार्याचा थोडक्यात घेतलेला आढावा आहे. तसे पाहिले तर त्यांच्या जीवन-कार्यावर अभ्यासपूर्ण असा सविस्तर ग्रंथच व्हायला हवा होता. तरीसुद्धा नागरी सत्काराच्यानिमित्ताने आम्ही हा गौरवग्रंथ प्रकाशित करीत आहोत.

या ग्रंथात दादांचे सहकारी, मित्र, नातलग, स्नेही, दादांच्या कार्यावर प्रेम करणारे, त्यांच्या कार्याचा अभ्यास करणारे अभ्यासक, दादांच्या नेतृत्वाखाली विविध आंदोलनातून पुढे आलेले युवक नेते आदींचे लेख आहेत. हे लेख म्हणजे दादांच्याकडे विविध दृष्टीकोनातून पाहण्याचाच हा प्रयत्न आहे. दादांच्या सहवासातील सर्वांच्या बोलकया प्रतिक्रियाच यामध्ये व्यक्त केलेल्या आहेत. दादांनी विविध ठिकाणी केलेली भाषणे आणि त्यांची मुलाखतही ग्रंथात आहे. अर्थात हा ग्रंथ म्हणजे दादांचे परिपूर्ण जीवन चारित्र नाही हे पुनश्च कबूल करीत आहोत. मात्र हा ग्रंथ सामाजिक, आर्थिक, राजकीय चळवळीत कार्य करणाऱ्या नव्या पिढीला मार्गदर्शक असाच ठरेल, असा आमचा ठाम विश्वास आहे.

हा गौरवग्रंथ तयार होत असताना प्रा. जे. के. पवार, डॉ. जे. बी. शिंदे, प्रा. आनंदराव साळोखे, प्रा. नेताजी पोवार, श्री. जयसिंगराव सावंत यांनी संपादन सहाय्य मोलाचे केले. तसेच माजी आमदार श्री. बाबूरावजी धारवाडे आणि माजी कुलगुरु प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांनी वेळोवेळी केलेल्या मौलिक सूचना महत्त्वाच्या ठरल्या. तेव्हा त्यांचे तसेच हा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सत्कार समितीतील सर्वच मान्यवरांनी जे मार्गदर्शन केले, अनेकांनी लेख दिले, छायाचित्रे दिली, ग्रंथासाठी विविध प्रकारे आर्थिक सहकार्य केले. त्या सर्वांचे आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक आभार !

प्रा. दिनकर विष्णू पाटील
**संपादक**

'शांताई', ३ अ, जनता बँक कॉलनी,
आपटे नगर ते फुलेवाडी रिंगरोड,
कोल्हापूर-४१६ ०१०.
फोन नं. : (०२३१) ६२०००५

# क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील गौरव समिती, कोल्हापूर.

अध्यक्ष

**नाम. डॉ. पतंगराव कदम**

कार्याध्यक्ष

**माजी आमदार श्री. बाबूराव धारवाडे**

स्वागताध्यक्ष

**श्री. शंकरराव नाथाजीराव नलवडे**

उपाध्यक्ष

**प्रा. एन. डी. पाटील**

नाम. श्री. आर. आर. पाटील

नाम. श्री. जयंतराव पाटील

आम. श्री. आण्णासाहेब डांगे

पद्मश्री. डॉ. डी. वाय्. पाटील

क्रांतिवीर श्री. नागनाथ नायकवडी

खास. श्री. प्रकाशबापू पाटील

खास. श्री. सदाशिवराव मंडलीक

माजी कुलगुरु रा. कृ. कणबरकर

प्राचार्य पी. बी. पाटील

सदस्य

माजी आम. श्री. विलासराव शिंदे

माजी आम. श्री. विश्वासराव पाटील

सचिव

**प्रा. दिनकर विष्णू पाटील**

सहसचिव

**श्री. विमलनाथ शेटे**

खजिनदार

**प्रा. आनंदराव साळोखे**

सदस्य

प्राचार्य डॉ. आबासाहेब शिंदे

प्रा. चंद्रकांत पाटगांवकर

श्री. धोंडीराम माळी

श्री. एच. डी. पाटील (बाबा)

माजी आम. श्री. बाबूराव कोतवाल

श्री. डी. बी. पाटील

श्री. स्वरुपराव बा. पाटील

श्री. एस. के. पाटील (ढवळीकर)

प्राचार्य सी. आर. गोडसे

प्रा. जे. के. पवार

श्री. जयसिंगराव सावंत

ॲड. बी. डी. पाटील

श्री. मानसिंगराव सावंत

प्रा. डॉ. जे. बी. शिंदे

प्रा. नेताजी पोवार

"स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय एकात्मेसाठी माणसाची मने बांधली जात होती. देशातील अज्ञान आणि दारिद्र्य नष्ट करुन सामान्य जनतेला सुखाने जगता यावे म्हणून आमच्यासारख्या हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी जिवाची तमा न बाळगता, जातपात न पाहता, पक्ष गट न करता स्वातंत्र्यासाठी कष्ट घेतले. आमच्या स्वप्नातला भारत फार वेगळा होता. आज भारताचे चित्र पार बदलून गेल्याचे दुःख आम्हा सर्व स्वातंत्र्य सैनिकांना होत आहे. आता २१ व्या शतकातील नवा भारत घडविण्याची जबाबदारी उगवत्या पिढीवर आहे."

-- *क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील*

दिनांक : २५ डिसेंबर २०००


८१ वा वाढदिवस

# स्वातंत्र्य आणि समतेच्या दिंडीतील लक्ष्मी-नारायणाची जोडी




क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील आणि त्यांच्या सुखदुःखात समर्थपणे
साथ देणाऱ्या त्यांच्या धर्मपत्नी सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील


# असे समारंभ
# अशा भेटी - गाठी




कै.बाळकृष्ण काका पाटील यांच्या समवेत श्री. रंगराव दादा.



दिल्ली येथे श्री.यशवंतराव चव्हाण यांचे समवेत सहकाऱ्यांसह मध्यभागी क्रांतिवीर रंगराव दादा पाटील




क्रांतिवीर रंगराव दादा पाटील बोलत असून व्यासपीठावर डावीकडून ज्येष्ठ नेते वसंतराव दादा पाटील व तात्यासाहेब कोरे



एका कार्यक्रमात ज्येष्ठ नेते वसंतराव (दादा) पाटील बोलत असून व्यासपीठावर डावीकडून सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे, क्रांतिवीर रंगराव दादा पाटील


# सभा समारंभ आणि भेटी - गाठी




नवमहाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचे समवेत क्रांतिवीर रंगराव दादा पाटील व अन्य सहकारी




क्रांतिवीर रंगराव दादा पाटील बोलत असून व्यासपीठावर डावीकडून डॉ. एन. डी. पाटील, भाई दाजिबा देसाई व छन्नुसिंग चंदेले, गणपतराव देशमुख



दिल्ली येथे महात्मा गांधी यांच्या समाधीजवळ सहकाऱ्यांसह मध्यभागी क्रांतिवीर रंगराव दादा पाटील




महात्मा गांधी समाधीजवळ क्रांतिवीर रंगराव दादा पाटील व गणपतराव कोळी (माजी आमदार)

# शिगांव येथे दादांच्या वडिलांच्यासह कुटूंबाचा फोटो



क्रांतिवीर रंगराव दादा पाटील यांचे सर्व कुटुंबियांसमवेत असलेले छायाचित्र (वडील श्री. विठ्ठलराव पाटील यांचे सह.

## दादांचे काका




शिक्षणमहर्षी डॉ. व्ही. टी. पाटील उर्फ काकाजी


## दादांच्या काकी



कै. सौ. सरोजिनीदेवी उर्फ कमला विश्वनाथ पाटील




डावीकडून आप्पासाहेब पाटील, स्वामी रामानंद भारती, क्रांतिसिंह नाना पाटील, पांडू मास्तर, बॅ. पी. जी. पाटील, क्रांतिवीर रंगराव दादांच्या कन्येच्या विवाह प्रसंगी




क्रांतिवीर श्री. रंगराव दादांच्या द्वितीय कन्येच्या विवाह समारंभात क्रांतिकुमार पाटील, स्वामी रामानंद भारती, क्रांतिसिंह नाना पाटील, विजयकुमार पाटील


# साथ जन्मांतराची । साथ युगायुगाची ।




क्रांतिवीर श्री. रंगराव दादा पाटील व सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील



क्रांतिवीर श्री. रंगराव दादा पाटील व सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील




क्रांतिवीर श्री. रंगराव दादा पाटील व सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील




क्रांतिवीर श्री. रंगराव दादा पाटील



सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील



क्रांतीवीर श्री. रंगराव दादा पाटील



क्रांतीवीर श्री. रंगराव दादा पाटील



इस्लामपूर शॉपिंग सेंटरचे भूमिपूजन करीत असताना स्वातंत्र्यसेनानी
श्री. रंगराव दादा पाटील व सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील




आमदार जयंत पाटील क्रांतिवीर रंगराव दादा पाटील यांचेकडून सार्वजनिक
व राजकीय वाटचालीचा कानमंत्र तर घेत नाहीत ना ?




कष्टकऱ्यांचा बुलंद आवाज

कार्यक्रम आणि भाषणे
हा दादांचा स्थायी भाव आहे.




व्यर्थ न हो बलिदान !
दादा भाषण करीत असताना

व्यर्थ न बलिदान !




हुतात्मा राजेंद्र रंगराव पाटील

तव स्मरण सतत
स्फुरण दायी ठरो !



हुतात्मा राजेंद्र पाटील यांची अंत्ययात्रा
शिगावातून काढण्यात आली त्याप्रसंगी




क्रांतिवीर श्री. रंगराव दादा पाटील व क्रांतिअग्रणी
जी. डी. (बापू) लाड, हुतात्मा ज्योतीचे स्वागत करताना


दादांचे पुत्र आणि कन्या



मातोश्री, पुत्र, कन्या, यांच्यासमवेत क्रांतिवीर
श्री. रंगराव दादा पाटील व सौ. कल्पनादेवी पाटील




१) हुतात्मा राजेंद्र २) सौ. पाटील ३) श्री. विजयकुमार
४) सौ. निकम ५) प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार ६) सौ. मोहिते




७५ व्या वाढदिवसाप्रसंगी ज्येष्ठ चिरंजीव
प्राचार्य. डॉ. क्रांतिकुमार पाटील व कुटुंबीय



७५ व्या वाढदिवसाप्रसंगी कनिष्ठ चिरंजीव
श्री. विजयकुमार पाटील व कुटुंबीय



७५ व्या वाढदिवसाप्रसंगी सर्व कुटुंबीयांच्या समवेत




७५ व्या वाढदिवसाप्रसंगी जावई श्री. मोहिते व कुटुंबीय



७५ व्या वाढदिवसाप्रसंगी जावई श्री. निकम व कुंटूबीय



७५ व्या वाढदिवसा प्रसंगी जावई डॉ. पाटील व कुंटूबीय.



७५ व्या वाढदिसाप्रसंगी अभिष्टचिंतन करताना
सौ.कल्पना देवी.



कोल्हापूर येथे कल्परंग बंगल्या जवळ.

७५ व्या वाढदिवसा दिवशी च्या दादांच्या भावमुद्रा.






७५ व्या वाढदिवसा प्रसंगी दादा व आई.





## गांधी- विवाह पध्दतीचा अभिनव प्रयोग.



दिनांक १२ मार्च १९४७ श्री. रंगराव दादा पाटील यांचे विवाह प्रसंगीचा फोटो.
श्री. बाळासाहेब देसाई, स्वामी रामानंद भारती, श्री. रंगराव दादा पाटील, सौ. कल्पना देवी पाटील
शिक्षण महर्षी व्ही.टी.पाटील, माजी मुख्य मंत्री वसंतदादा पाटील
मागे उभे – श्री. व सौ. क्रांतिवीर वसगडेकर गुरूजी.

# क्रांतिवीर श्री. रंगरावदादा यांना स्वातंत्र्यातील कामगिरीबद्दल मिळालेले गौरव पत्र

## स्वतन्त्रता रजत जयन्ती समापन

१५-८-१९७२

## गौरव प्रतीक-पत्र

**देश भक्ति के प्रेरणा-स्रोत**

राष्ट्रीय चेतना के आलोक-निर्झर ऐतिहासिक स्वातन्त्र्य सेनानी

श्री रंगराव विठ्ठलराव पाटील की सेवा में

भारतीय स्वतन्त्रता संग्राम में उन के अदम्य साहस, अप्रतिम त्याग एवं बलिदान के

चिर-स्मरणीय योगदान के लिए

अखिल भारतीय स्वतन्त्रता संग्राम सेनानी समिति द्वारा सादर समर्पित

रंगराव पाटील
क्षेत्रीय अधिकारी

(राजा महेन्द्र प्रताप)
प्रधान

मदनमोहन चोपडा
(डा० मदनमोहन चोपड़ा)
महामन्त्री
General
All India Freedom Fig...

# महाराष्ट्र शासनाने श्री. रंगरावदादा यांना प्रदान केलेले सन्मान पत्र

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

## सन्मान पत्र


श्री. रंगराव विठ्ठलराव पाटील शिंगाव यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामांत केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यांत येत आहे.

वसंत नाईक

सचिवालय
मुंबई.
दिनांक १५/८/१९६६.

मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

## सौ. कल्पनादेवी यांना महाराष्ट्र शासनाने दिलेले सन्मानपत्र



सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन


## सन्मान पत्र

श्री. सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील रा. शिगाव ता. वाळवा यांना त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ हे सन्मानपत्र देण्यात येत आहे.

मंत्रालय, मुंबई
दिनांक २९।१०।७४

मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य

## सौ. कल्पनादेवी यांना सांगली जिल्हा परिषदेने दिलेले प्रशस्ति पत्र



सांगली जिल्हा परिषद, सांगली.

१९८२

## प्रशस्ति - पत्र

श्री. सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील, मुख्याध्यापिका
शाळा जि.प. फाळकेवाडी
तालुका वाळवा जिल्हा - सांगली.

यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करून सांगली जिल्ह्याचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत केली आहे. त्यांच्या या महत्वपूर्ण कामगिरी बद्दल सांगली जिल्हा परिषद आज दिनांक ५ सप्टेंबर १९८२ रोजी त्यांना हे प्रशस्तिपत्र देऊन त्यांचा सन्मान करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी. जिल्हा परिषद, सांगली.

अध्यक्ष, जिल्हा परिषद, सांगली.

शिक्षणाधिकारी. जिल्हा परिषद, सांगली.

सभापती. शिक्षण समिती, जि. प. सांगली.

# सौ. कल्पनादेवी पाटील यांना उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल मिळालेले प्रशस्ती पत्र

प्रज्ञा　　　　　　　　शिल　　　　　　　　करुणा



**भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर**

**ज्ञान प्रबोधिनी**

( जिल्हा – सांगली )

(Rej- J. T M. 1278 ( MAHARASHTRA )

## प्रशस्ती–पत्र

आयु. सौ. कल्पनादेवी [illegible] पाटील. आदर्श शिक्षिका पुरस्कार.

राहणार शिगांव.　　तालुका वाळवा　　जिल्हा सांगली.

यांना सामाजिक / शैक्षणिक । कला । क्रीडा । व्यसनमुक्ती । समाजोन्नती या क्षेत्रात सांगली जिल्हयात अत्यंत उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल आपणास प्रशस्तीपत्र देण्यात येते.

हस्ते – मा. सुमीत मलीक I.A.S.
जिल्हाधिकारी, सांगली.

दिनांक : २० सप्टेंबर ९१.

स्थळ : शिगांव.

COLLECTOR, DISTRICT SANGLI
कलेक्टर, जिल्हा सांगली

| प्रा. सुभाष कांबळे | भूपाल धों गोतपागर | प्रतापराव पी भाळे |
|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# क्रांतीवीर श्री. रंगरावदादा पाटील यांच्या विवाहाची निमंत्रण पत्रिका

जय–हिंद

सदर विवाह समारंभास

मंडपाध्यक्ष:—के[illegible] जेधे दे. भ. शंकरराव मोरे

क्रांतिसिंह नाना पाटील

हे उपस्थित रहाणार आहेत.

जय–हिन्द

क्रांतिवीर रंगराव पाटील

व

चि. सौ. कां. वत्सलादेवी

या उभयतांचा विवाह रंगपंचमी या शुभदिनी ता. १२ मार्च १९४७ सकाळीं १० वाजतां होणार आहे. तरी आपण सर्व मित्रमंडळीसह अवश्य यावे.


विवाह स्थळ:—
'आनंद' टॉकीज
सातारा

आपले,
स्वामी रामानंद महाराज
कर्मवीर भाऊराव पाटील


वन्दे मातरम् बुक–पोस्ट

समाज सेवा हेंच आमुचे जीवन

जय सुभाष



## माजी पंतप्रधान कै. इंदिरा गांधी यांच्या हस्ते मिळालेले ताम्रपत्र



# क्रांतिवीर रंगरावदादा पाटील एक धगधगता ज्वालामुखी

**बॅरिस्टर पी. जी. पाटील,** शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरु, महाराष्ट्रातील थोर वक्ते.

क्रांतिवीर भाई रंगराव पाटील यांच्या वयास ८० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त त्यांचे स्नेही-सोबती एक गौरवांक प्रसिद्ध करणार आहेत. त्याकरिता मी एक लेख लिहावा अशी विनंती करणारे पत्र प्रा. दिनकरराव पाटील यांनी मला पाठविले होते. त्यानुसार भाई रंगरावांसंबंधी काही आठवणी मी नोंदवीत आहे.

ऑगस्ट १९४२ मध्ये 'छोडो भारत' आंदोलन सुरु झाले. त्यात आम्ही सर्वजण सर्व थरातील लोक उत्साहाने सामील झालो होतो. मी त्यावेळी सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये ज्यु. बी. ए. च्या वर्गात शिकत होतो. माझे वर्गमित्र (बॅ.) जी. डी. पाटील व श्री. आर. डी. निळकंठ हे माझे कवलापूरचे दोस्त. सर्वजण वर्गमित्र होतो. वसंतदादा भूमिगत झाले. त्यात हे माझे दोस्तही सामील झाले होते. मी मात्र भूमिगत राहूनच कॉलेजसमोर पिकेटींग करुन सर्व वर्ग दीड महिना बंद पाडले व त्यामुळे आम्हा तीन मित्रांना - मी. कै. कुमठेकर व श्री. के. एच. कुलकर्णी (कर्नाटक) यांना येरवडा जेलमध्ये स्थानबद्ध करण्यात आले. वसंतदादा, जी. डी. व निलकंठ यांनी भूमिगत राहून खूप चांगले काम केले. शेवटी त्यांना अटक झाली व दीर्घमुदतीच्या शिक्षा भोगाव्या लागल्या.

वसंतदादांच्या ग्रुपमध्ये भाई रंगराव सामील झाले. मी त्यांना प्रथम पाहिले ते ४३ च्या आरंभी. दादा, पांडू मास्तर, बर्डे मास्तर, जी. डी. निळकंठ इ. फरारी वीर कवलापुरास (माझे गाव) आले असताना ते सर्वजण उत्तर बाजूस ओढ्याच्या कडे असणाऱ्या एका मोठ्या विहिरीत स्नानासाठी जमले होते. जी. डी. व निळकंठ गावठी पिस्तुलाचे बार केकताडाच्या झुडपावर मारीत होते. रंगराव व इतरांनी कोठलीतरी रेल्वे (मालगाडी) पाडली होती व स्टेशनमधून गाडीचे लाल व हिरवे बावटे पळवून आणले होते. ते विहिरीत धूत होते व हे पहा आमचे हातरुमाल म्हणून आम्हास दाखवीत होते. मी विहिरीच्या वरच्या पायरीवर उभा राहून हा देखावा कौतुकाने न्याहाळत होतो.

रंगराव हे मूळचेच धाडशी व कल्पक तरुण. त्यावेळी सर्वजण क्रांतीच्या वाऱ्यावर आरुढ झालेले वीर होते. ते निर्भय व बेडर होते. खानदेशच्या वीर लीलाबाई पाटील यांना भूमिगत असता, पोलिसांनी पकडले व पुण्याच्या ससून इस्पितळात वैद्यकीय उपचारासाठी डांबून ठेवले होते. त्यांना तेथून मुक्त करण्याची धाडशी कामगिरी रंगराव यांचेवर सोपविण्यात आली होती. लीलाबाई काहीतरी निमित्ताने हॉस्पिटलच्या कंपाऊंडबाहेर थोडावेळ आल्याचे पाहून रंगरावांनी त्यांना आपल्या सायकलवरुन डबल सीट बसवून ते तेथून भरधाव निघाले. पोलिसांचा पाठलाग सुरु झाला. पुण्याच्या गल्ल्याबोळातून सायकल हाकीत भाईंनी पोलिसांना गुंगारा दिला व लीलाताईंची अशारीतीने रोमहर्षक

सुटका केली. पुढे त्याच रात्री त्यांना रेल्वेत बसवून दूर पाठवून दिले. इतक्या वर्षांनी ही आठवण झाली म्हणजे माझ्या अंगावर काटा उभा राहतो. शाब्बास भाई रंगराव !

पुढे आणखी एक आठवण. कामेरीच्या चंद्रू पाटलांचा कोणीतरी खून केला. त्यानंतर थोड्याच दिवसात त्याच गावचे आमदार के. डी. पाटील यांचाही खून झाला. यामुळे सर्वत्र खूप खळबळ माजली. इस्लामपूरच्या थिएटरात आचार्य जावडेकरांच्या अध्यक्षतेखाली क्रांतिवीरांचा मोठा मेळावा भरविण्यात आला होता. सर्वजण संतप्त झाले होते. या हरामखोर खुन्यांचा शोध लवकरात लवकर लावून त्यांना अटक झालीच पाहिजे असं सर्वजण ओरडून सांगत होते. भाई रंगरावांचा तर तोलच सुटला होता. रागाने लालबुंद होऊन ते स्टेजवर नाचत होते. त्यांना आवरणे कोणासच जमत नसे. या बिकट प्रसंगातून आचार्यांनीच मार्ग काढला. त्यांनी रंगरावांना धरुन आपल्या शेजारी बसविले व महाप्रयासाने शांत केले. भाई रंगराव म्हणजे खरोखरच एक ज्वलंत ज्वालामुखी.

कर्मवीर भाऊराव आण्णा व हे फरारी स्वातंत्र्यवीर यांच्यामध्ये फार फार जिव्हाळा होता. कर्मवीरांना स्वत: चळवळीत इच्छा असूनही सामील होता येत नव्हते. पण त्यांच्या रयत शिक्षण संस्थेतील अनेक मान्यवर विद्यार्थी या आंदोलनात सक्रिय भाग घेत होते. रंगराव, नागनाथ, कै. वाय. सी. पाटील, कै. बाबूराव कोकाटे, वसंतदादा, पांडू मास्तर, बर्डे मास्तर यांबरोबर आण्णांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. आण्णांच्या संस्थेच्या जिजामाता अध्यापिका विद्यालयात अनेक गुणी व चुणचुणीत मुली प्रशिक्षण घेत होत्या. त्यापैकी एका मुलीबरोबर दादांनी विवाहबद्ध होण्याचे ठरविले. कर्मवीरांनी आशीर्वाद दिले व हा आगळावेगळा विवाह सोहळा कर्मवीरांच्या साक्षीने धनिणीच्या बागेत (शाहू बोर्डिंग हाऊसमध्ये) अगदी साध्या रीतीने क्रांतिसिंह नाना पाटीलांच्या 'गांधीविवाह पद्धतीने' साजरा करण्यात आला. श्री. वाय. सी. पाटील व सुशिलाबाई देशमुख यांचाही विवाह कर्मवीरांच्या उपस्थितीत याचपद्धतीने साजरा झाला होता. दादांच्या विवाहास एक आगळे वैशिष्ट्य होते व त्यांच्या पुरोगामी विचारसरणीस धरुनच होते. दादांचे वैवाहिक जीवन पुढे बहरले व आजही हे उभयता सुखासमाधानाने मार्गक्रमण करीत आहेत ही फार आनंदाची गोष्ट आहे. दादांचे चिरंजीव क्रांतिकुमार हे काही वर्षे आमच्या संस्थेच्या कराड येथील सद्गुरु गाडगे महाराज कॉलेजमध्ये समाजशास्त्राचे प्राध्यापक होते. ते एम. ए. झाल्यावर दादांची व माझी कोल्हापूरच्या शिवाजी चौकात सहज भेट झाली असता त्यांनी चि. क्रांतिकुमारबाबत सांगितले व लगेच त्यांना कराड येथे मी माझे सहकारी म्हणून घेतले. तेथे काही वर्षे काम केल्यावर क्रांतिकुमार कोल्हापुरास गेले व आज ते कमला कॉलेजचे यशस्वी प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत हे पाहून मला फार संतोष होतो.

१९४२ मध्ये इस्लामपूरच्या मामलेदार कचेरीवर देशभक्तांनी खूप मोठा मोर्चा आयोजित केला होता. श्री. पांडू मास्तर कुरळपचे निवृत्तीकाका, कामेरीचे एस. बी. पाटील व रंगरावदादा आदींनी या मोर्चाचे नेतृत्व केले होते. पुढे पोलिसांनी गोळीबार केला व त्यात किर्लोस्करवाडीचे पंडड्या इंजिनिअर ठार झाले. दादा शिकस्तीने वाचले. धोका दिसला की रंगरावदादा सर्वांच्या पुढे आघाडीवर असत व असतातही.

१९७२ साली १९ ऑक्टोबरला आमदार एन्.

डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाववाढीविरुद्ध एक भव्य मोर्चा इस्लामपूरच्या मामलेदार कचेरीवर काढण्यात आला होता. पोलिसांनी एन. डी. पाटील यांना अटक तर केलीच पण त्यांनी त्यांच्यावर लाठ्यांचा वर्षाव केला व नंतर अटक करुन मामलेदार कचेरीत ठेवले. खवळलेल्या मोर्चास काबूत आणण्यासाठी पोलिसांनी त्यांचेवर बेछूट गोळीबार केला व त्यात एन. डी. पाटीलांचे पुतणे सुरेश, रंगराव दादांचे सुपुत्र राजेंद्र व ढगेवाडीचे पैलवान जागीच ठार झाले. दुसरे दिवशी सुरेशला ढवळीत व रंगरावदादांच्या मुलांच्या प्रेतास शिगांवमध्ये दहन करण्यात आले. आम्ही सातारच्या 'रयत'मधील काही प्राध्यापक ढवळी व शिगांवला गेलो होतो. एरवी उग्र वाटणारे एन. डी. पाटील यांनी स्मशानात सुरेश कुठे गेलाय ? म्हणून जो हंबरडा फोडला तो माझ्या कानात आजही घुमत आहे. नंतर एन. डी. व आम्ही काहीजण शिगावला दादांना भेटण्यास गेलो. सर्वजण ओक्साबोक्सी रडत होते. पण रंगराव दादा मात्र डोंगराच्या कड्याप्रमाणे अविचल उभे होते. 'नारायण रडू नकोस. दोन्ही पुत्र हुतात्मे झाले. स्वातंत्र्यदेवीवर त्यांनी प्राण अर्पण केले. मग शोक तो कशाकरता करावयाचा ?' हे रंगरावदादांचे शब्द ऐकून मी अक्षरश: भारावून गेलो. तत्वज्ञान सांगणे फार सोपे असते पण ते जगणे महाकठीण असते. अशावेळी जॉन मिल्टन या आद्य कवीच्या सॅमसन ॲगोनिस्टस या काव्याची आठवण येते. सॅमसन हा भीमकाय योद्धा असतो. शत्रूंचा नाश करुन तो त्या भव्य प्रेक्षागाराच्या इमारतींखाली चिरडून मेला. ही बातमी जेव्हा त्याचे वडील मॅनोडा यांना सांगितली तेव्हा तो धीरोदात्त बाप म्हणाला,

"Nothing is here for tears, nothing to wail

Or knock the breast, no weakness no contempt.

Dispraise or blame, nothing but well aml fair

And what may quiet us in a death so noble"

आणि या काव्याची शेवटची ओळ आहे

And calm of mind all passion spent

[Catharsis of Tragedy म्हणतात ती हीच होय ]

रंगरावदादांचा स्वभाव काहीसा रागीट व चेहरा थोडासा उग्र भासतो. पण फणसाप्रमाणे आत हृदयात गोडवा व माधुर्य असते. हे फक्त जवळच्यानाच जाणवते त्यांचा आवाज भरदार व पल्लेदार आहे. त्यांच्या शब्दांची फेक एक अचूक व नेमकी असते. विरोधकांवर ते शरसंधान करतात तेव्हा ते दयामाया दाखवीत नाहीत. प्रसंगी कटुताही निर्माण होते. गैरसमज होतो. पण तो क्षणात नाहीसा होतो. दोन वर्षापूर्वी कै. बर्डे गुरुजींच्या जयंतीनिमित्त वाटेगावला गेलो असता तेथे दादा भेटले. त्यांचे भाषणही ऐकले. नेहमीप्रमाणेच त्यांनी विरोधकांवर राजकारणी लोकांवर धारदार टीकाही केली. नंतर भेटलो. गोड हसले.

रंगरावदादा हे कै. व्ही. टी. पाटील (काका) यांचे जवळचे नातेवाईक. पण त्यांनी या नात्याचा कधीच गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला नाही हे विशेष. व्ही. टी. काका वारले त्यावेळी मी कोल्हापुरातच होतो. मी व सौ. सुमतिबाई काकांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी त्यांच्या बंगल्यावर गेलो होतो. रंगराव दादांही अर्थात तेथे आले होते. पण ते तेथील संबंधितांशी काही व्यावहारिक बाबींचा मोठमोठ्याने चर्चा करीत असलेले

दिसले. मला ती चर्चा समजली नाही. त्यामुळे काकांचे दर्शन घेऊन आम्ही बाहेर आलो.

मी शिवाजी विद्यापीठात काम करीत असता एकदा शासकीय स्तरावर बिकट प्रश्न निर्माण झाला होता. दादांना ते कसे कळले माहीत नाही. पण त्यांनी परस्पर चर्चा करुन त्या प्रश्नातून मार्ग काढण्यासाठी खूप प्रयत्न केल्याचे मला नंतर तिऱ्हाइताकडून समजले. दादांच्या चांगुलपणाचा मला पुन: एकदा प्रत्यय आला. त्यानंतरही आमच्या अनेक भेटी झाल्या. पण दादांनी याबाबतीत कधी वाच्यता कोणापाशी केली नाही हे विशेष.

इस्लामपूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेत दादा खूप रस घेत असत. कार्यकारी मंडळात काही तीव्र मतभेद निर्माण होत होते. कोर्टकचेऱ्याही झाल्या होत्या. पण सर्व कार्यकर्ते एकत्र बसले, मनमोकळी चर्चा झाली व संस्थेचे काम पूर्ववत सुरळीत सुरु झाले. दादांच्या मनात हे रागलोभ फार काळ टिकत नाहीत. खिलाडू वृत्तीने ते अशाप्रसंगी वागतात व सहकाऱ्यांशी पूर्वीप्रमाणे प्रेमाने व आपुलकीने व्यवहार करतात.

आज ते वयाची ८० वर्षे पूर्ण करीत आहेत. खूप लांबचा पल्ला त्यांनी गाठला आहे. नेत्र पैलतिरी लागले आहेत. तरीपण त्यांना स्वस्थ बसवत नाही. सांगली जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समितीचे अध्यक्ष म्हणून दादांनी व त्यांच्यापूर्वी कुपवाडचे स्वातंत्र्यसेनानी धोंडिराम बापू माळी यांनी खूप चांगले कार्य केले आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांचा भव्य पुतळा सांगलीत उभारण्यात रंगरावांचा हा खूप मोठा सहभाग लाभला आहे.

आज ते एक ज्येष्ठ व श्रेष्ठ स्वातंत्र्यसेनानी म्हणून वावरत असतात. तरुण कार्यकर्त्यात काही मतभेद निर्माण झाले तर दादा तेथे हजर राहतात व गोष्टी सांगेन, युक्तीच्या चार या न्यायाने वातावरण निवळण्यास ते मदत करतात. स्वार्थाचा लवलेश नसल्याने सर्वजण त्यांच्या शब्दांचा आदर करतात.

१९४२ च्या लढ्यात एकवेळ कोल्हापुरात ते ज्या घरी लपले होते तेथे पोलिसांची धाड पडली. दादा तर आत होते. विचलित न होता ते बाहेर आले, पोलिस अधिकाऱ्यांशी त्यांनी गोड शब्दात बातचीत केली. तुम्ही इकडे येण्याची तसदी कशाला घेतलीत? मला निरोप पाठविला असता तर मी आपण होऊन तुमच्या ऑफिसवर आलो नसतो का ? जरा थांबा. मी आंघोळ करुन देवाला फुले वाहतो व तुमच्या स्वाधीन होतो असे म्हणून रंगराव दादा आत गेले व मागील दाराने त्या बोळकांड्यातून पसार झाले. इकडे पोलिस दादांची वाट पहात राहिले. बऱ्याच वेळानंतर त्यांना कळले की, पक्षी पिंजऱ्यातून केव्हाच पसार झाला होता. असे अनेक रोमहर्षक प्रसंग दादांच्या जीवनात घडले आहेत.

दादांच्याप्रमाणे ४२ च्या लढ्यातील शूर वीरांसंबंधी मी शब्दांचे किती बुडबुडे उडवावेत ? इंग्रज लेखक मॅकॉले यांच्या होरॅशस या देशभक्तीपर पोवाड्यातील खालील पंक्ति उद्धृत करुन मी दादांसंबंधी हा लेख आवरता घेतो.

To every man upon this earth
Death cometh soon or late
How can man die better
Than fighting fearful odds,
for the ashes of his fathers
And the temples of his gods ?

जय हिंद ! जय क्रांतिसिंह !! जय महाराष्ट्र !!!

# रंगायण

सुप्रसिद्ध चित्रपट कथालेखक आणि दिग्दर्शक **दिनकर द. पाटील,** मुंबई.

बत्तीस शिराळे हे माझ्या आईचं माहेर, तर शिगांव हे माझ्या काकी भागिरथीबाई आत्माराम यांचं माहेर ! या दोन्ही ठिकाणी आम्ही लहानपणी दिवाळीच्या सुट्टीत आळीपाळीने जात असू. तो बैलगाडीचा प्रवास म्हणजे पर्वणी वाटायची. आता खेडेगांव म्हटल्यावर पाटील-कुलकर्णी हे त्या गावचे राजेच. कारकुनी गादीचा कोपरा म्हणजे बारमाही पिकणारं शेत, असं राम गणेश गडकरी यांनी लिहून ठेवलं आहे, तर पाटील म्हणजे गावचा सर्वेसर्वा ! गावची सत्ता हाती असल्यावर काय ? पाटलाच्या पोराची दादागिरी सदैव चालू असायची.

कोल्हापूरचे ख्यातनाम वकील विश्वनाथ तुकाराम पाटील याचं बालपणही असंच शिगावला दादागिरी करण्यात जायचे, पण त्यांच्या भगिनी श्रीमती भागिरथीबाई यांनी त्यांना आपल्या बेनाडी या गावी आणले आणि आपल्या नजरेखाली भावाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. नंतर ते कोल्हापूरला जाऊन ''बी. ए.'', ''एल. एल. बी.'' होऊन वकील झाले. कोल्हापूरचे नगराध्यक्ष म्हणूनही निवडून आले आणि चांगले आमदारकी, खासदारकीपर्यंत पोचले !

तेव्हाचे नृपती छत्रपती श्री. राजाराम महाराज त्यांना एकदा सहज म्हणाले, ''ज्या ताराराणीचं अन्न मी खातो, त्या राणीचं जर कुणी त्यांच्या पराक्रमाला साजेसं स्मारक उभं केलं तर त्याला मी माझं अर्धं राज्य द्यायला तयार आहे.''

कृतज्ञ छत्रपतींचा हा आदेश शिरसावंद्य मानून मामांनी (मी त्यांना मामा म्हणायचो, ते माझे मेव्हणे लागतात) वकीली सोडली आणि ''ताराराणी विद्यालय'' सुरु केलं. त्याचं रुपांतर आताशा ''ताराराणी विद्यापीठात'' झालं असून, कोल्हापुरातील ती एक आदर्श स्त्री-शिक्षण संस्था ठरली आहे.

मला कधी कधी वाटायचं, मामांच्या प्रमाणे काकींनी आपल्या भावाच्या उनाड पोराला-रंगाला-का बेनाडीला आणलं नाही ? त्याचं कारण एकच असावं, शिगावची वडिलोपार्जित शेतीवाडी सांभाळायची कुणी ? परिणामी रंगाला शिगावला बागडायला मुक्तांगण लाभलं ! त्याची माझी पहिली भेट मला चांगली आठवते. एका दिवाळीला आम्ही शिगावला गेलो असताना, रात्री दिवाळीचं दारुकाम उडवताना मी त्यांना म्हणालो, ''बाहेर कोण थंडी पडली आहे, अंगात एखादा गरम कपडा का घालत नाही?''

त्यांनी उत्तर दिलं, ''मला हेच बरं वाटतं.''

दिवसरात्र ते घरभर उघडेबंब वावरायचे. त्याचवेळी मला वाटलं, ''हे रसायन काही वेगळं आहे.'' लाडावलेला पोर म्हणून त्याची दादागिरी वाढतच गेली. पोरगा वाया जाणार असं सर्वांना वाटायचं. पण दादागिरी बद्दल बर्नार्ड शॉ या इंग्रज नाटककाराने म्हटलं आहे, ''राजकारण हे दादा लोकांचं शेवटचं आश्रयस्थान आहे''

नशीब रंगरावाचं ! अगदी ऐन गरजेला त्यांना हवे ते स्थान सापडले. हिंदुस्थानात त्याच सुमाराला राजकीय स्वातंत्र्याची चळवळ सुरु झाली होती. लोकमान्य टिळकांनी ललकार केला होता, ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क असून तो मी मिळवणारच !''

याचवेळी महात्मा गांधीनींही सत्याग्रहाची मोहीम सुरु करुन, ती भारताच्या पार तळागाळापर्यंत पोचवली. तसा हा संग्राम छत्रपती शिवाजी महाराजांपासून सुरु झाला होता. देशव्यापी यावनी सत्तेला त्यांनी आव्हान दिलं आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्या स्वराज्याच्या रक्षणासाठी संभाजी महाराज यांनी हौतात्म्य पत्करले, तर शिवरायांनी सून ताराराणी यांनी तो संग्राम औरंगजेब बादशहाच्या अंतापर्यंत लढून, हिंदवी स्वराज्य सावरलं !

तो संग्राम नंतरच्या ब्रिटीश अमदानीतही चालू राहिला. दीडशे वर्षांच्या सततच्या लढ्यात अनेक क्रांतिकारक फाशी गेले, काही काळ्या पाण्यावर गेले, तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी पुकार केला, ''तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो.''

साहजिकच, ब्रिटीशांची दडपशाही वाढीला लागली. तेव्हा काही क्रांतिवीरांनी ''प्रतिसरकारची'' स्थापना केली ! क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथ नायकवडी, वसंतदादा पाटील, जी. डी. लाड, यशवंतराव चव्हाण हे त्या लढ्यात आघाडीवर होते. क्रांतिवीर रंगराव पाटील यांचाही त्यात सिंहाचा वाटा होता. खजिना लुटणे, पोलिस चौक्या जाळणे, त्यांची शस्त्रे पळवणे, रेल्वेपुल पाडणे, अशा अनेक प्रकारांनी या क्रांतिवीरांनी ब्रिटीशांना राज्य करणे अशक्य करुन टाकले. परिणामी तितकीच जोराची दडपशाही करुन ब्रिटीशांनी अनेक नेत्यांना तुरुंगात डांबून टाकलं. याचा कळस झाला तो महात्मा गांधीजींच्या ''चलेजाव'' या घोषणेच्यावेळी. याच सुमारास मुंबईला नाविकांचे जे आरमारी बंड झाले, तेव्हा ब्रिटीशांनी ओळखले की, हिंदुस्थानात राज्य करणं आता अशक्य आहे. शेवटी १५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थान स्वकीयांच्या हवाली करुन ब्रिटीश राज्यकर्ते आपल्या देशी परतले.

स्वराज्याच्या या सेतु-बंधनात रंगरावासारख्या क्रांतिवीरांचा खारीचा का असेना वाटा आहे. हे कृतज्ञपणे कबूल केलं पाहिजे. दीडशे वर्षांच्या लढ्यानं देश स्वतंत्र झाला, त्याबरोबर मात्र राजकीय नेत्यांची ध्येयं-धोरणंही बदलली. समतेशिवाय स्वातंत्र्याला अर्थ नाही, हे ओळखून राजकीय नेतेही विधायक कार्याला लागले. त्यासाठी शेतकरी चळवळ, विद्यार्थी चळवळ, कामगार चळवळ, या चळवळींनाही विधायक स्वरुप देण्यासाठी ''विना सहकार नाही उद्धार'' या ध्येयानं अनेक सहकारी संस्था उभ्या राहिल्या. रंगराव पाटील यांनी या कामी दिलेलं सहकार्य उल्लेखनीय आहे. शिक्षण महर्षि व्ही. टी. पाटील यांनी उभारलेल्या ''मौनी विद्यापीठ व ताराराणी विद्यापीठ'' या संस्था भरभराटीला आल्या.

इथं मला एकच इशारा द्यावासा वाटतो, बहुजन समाजाच्या सेवेकरिता उभ्या राहणाऱ्या संस्था बहुजन समाजाच्याच हाती राहिल्या पाहिजेत. नाहीतर जिंकायचं मराठ्यांनी आणि लुबाडायचं पेशव्यांनी. याची ऐतिहासिक पुनरावृत्ती शैक्षणिक क्षेत्रातही व्हायची. मी जातीयवादी नाही, तरी मराठा म्हणवून घेण्याचा मला अभिमान वाटतो. मला प्रामाणिकपणे वाटते की, व्ही. टी. पाटील ही आता व्यक्ती राहिली नाही ती एक प्रभावी संस्था बनली आहे. तरी स्वतःला भूदेव म्हणवणाऱ्या दानवांनी त्यांना शह दिलाच की नाही ?

ठळक उदाहरण ते म्हणजे, गारगोटीचं. मौनी विद्यापीठ हे नावचं सांगते. तिचे संस्थापक व्ही. टी. पाटीलच आहेत. त्यांनी भाबडेपणानं काही ब्राम्हण विद्वानांना मार्गदर्शनाकरिता पाचारण केले, मात्र विद्वान माणूस किती घातकी होऊ शकतो याचा अनुभव तिथं आलाच ! आपल्या बगलबच्च्यांचे बहुमत करुन मालकालाच उपरा ठरवला ! ही खुनशी वृत्ती एवढ्या थराला गेली की, संस्थेच्या वसाहतीला दिलेले ''विश्वनाथ नगर'' हा नामफलकही त्यांनी काढून

टाकला. बापाला बाप न म्हणणारी ही औलाद उद्या त्या विद्यापीठात कसे संस्कार शिकवणार,. हे या घटनेवरुनच सिद्ध झालं आहे.

त्याचवेळी मी मामांना लिहिलं होते, ''आता तरी सावध व्हा आणि ताराराणी विद्यापीठ आपल्याच लोकांच्या हवाली करा.'' त्याचं दृश्यफल म्हणजेच, रंगरावांचे चिरंजीव डॉ. क्रांतिकुमार पाटील हे ताराराणीचे प्राचार्य झाले असून, डॉ. कणबरकरांसारखी अनुंभवी मंडळी संस्थेच्या कार्यकारी मंडळात दाखल झाली आहेत. रंगरावांसारखी सडेतोड बोलणारी मंडळी आता तिथं आहेत. त्यामुळे मी निर्धास्त आहे. रंगरावांच्या राजकीय कार्याएवढंच मला हे त्याचं शैक्षणिक कार्यही महत्त्वाचं वाटतं. असो -

हरेक कर्तृत्ववान पुरुषाच्यामागे एक स्त्री असते असं म्हणतात. ही भूमिका रंगरावांच्या धर्मपत्नी सौ. कल्पनादेवी यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे. वयाच्या ८१ व्या वर्षापर्यंत पत्नीचा सहवास लाभला, हे मी रंगरावाचं भाग्य समजतो. लहानपणी आंघोळ घालताना आई मला आशीर्वाद द्यायची, ''नवरा म्हातारो हो'' वयाच्या अखेरपर्यंत पत्नी लाभावी असा त्याचा अर्थ आहे, हे आज मला समजते. लग्नाच्या बायका या देवा ब्राम्हणांच्या साक्षीने सप्तपदी चालून नव्या घरी येतात. येताना उंबरठ्यावरलं भरलं माप पायानं लवंडून त्या गृहप्रवेश करतात. याचा अर्थ, नव्या सुनबाईच्या पायगुणाने घराला सुखसमृद्धी लाभावी व वाढावी हाच आहे. या व्रताच्या आचरणानेच त्या गृहलक्ष्मी होतात !

दारावर तुळशीपत्र ठेवून राजकीय क्रांतीत उडी घेणारा नवरा सांभाळणे, हे एक असिधाराव्रत आहे. सौ. कल्पनादेवी यांनी ते व्रत धार्मिक व्रतवैकल्याप्रमाणे पार पाडले आहे. त्या वीरकन्या तर आहेतच, त्या वीरपत्नीही ठरल्या आहेत. एका वीरपुत्राची देशकार्यासाठी आहुती देऊन, त्या वीरमाताही बनल्या आहेत ! ''राजेंद्र मोक्ष'' नावाचा त्या घटनेवरचा एक लेख मी ''इस्लामपुरचं हत्याकांड'' या पुस्तकात लिहिला आहे. तर दुसरा मुलगा क्रांतिकुमार ''ताराराणी विद्यापीठाचा'' प्राचार्य आहे. राजकारण आणि शिक्षण या क्षेत्रात कल्पनादेवींनी मुलांच्या रुपानं मोठंच योगदान दिले आहे.

अशा कर्तृत्वसंपन्न दांपत्यांचा - रंगराव व कल्पनादेवी यांचा नागरी सत्कार करवीर नागरिकांतर्फे संपन्न होत आहे हे पाहून कृतकृत्य वाटतं. तळहाती शिर घेऊन समरभूमीवर उतरणारा क्रांतिवीर कसल्याही मोबदल्याची अपेक्षा करीत नाही. याची साक्ष म्हणजे, रंगरावांनी आपल्या देशभक्तीचा वापर करुन कसल्याही अधिकारपदाची अपेक्षा केली नाही, हीच होय ! तरी समाज कृतज्ञ आहे. तो रंगरावांच्या अनमोल कार्याची फेड नाही, तरी दखल म्हणून रंगराव व कल्पनादेवी यांचा सत्कार करीत आहे.

यंदा मी वयाच्या ८५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. रंगरावांचे वय ८१ वर्षे आहे. वयाच्या वडीलकीचा फायदा घेऊन मी उभयतांना आशीर्वाद देतो, ''शतायुषी व्हा, मृत्युंजय आहातच'' भारताच्या राजकीय क्रांतीच्या इतिहासकाराला रंगरावांच्या राजकीय कार्याची नोंद ही करावीच लागेल!

प्रा. दिनकर पाटील यांनी त्याची सुरुवात केलीच आहे. ते प्रसिद्ध करीत असलेल्या ''क्रांतीचे रंग'' हा रंगराव पाटील ''गौरव ग्रंथ'' ही रंगरावांच्या कार्याची ''रियासत-बखर'' म्हणून मला महत्त्वाचा वाटतो.

# क्रांतिवीर रंगरावदादा पाटील

**प्राचार्य पी. बी. पाटील,** माजी आमदार, शांतिनिकेतन लोकविद्यापीठ, सांगली.

क्रांतिवीर रंगरावदादा पाटील म्हणजे एक न विझलेला क्रांतीचा निखारा आहे. वयाच्या ८० व्या वर्षीही ते बोलायला उभे राहिले म्हणजे, व्यक्तिमत्त्वाच्या मुखातून जणू क्रांतीच्या ज्वाला बाहेर पडतात. दादांना क्रांतिवीर रंगरावदादा म्हणण्याऐवजी, ज्वालामुखी रंगरावदादा म्हणणे अधिक शोभून दिसेल.

कृष्णा, वारणा, पंचगंगा नद्यांचा परिसर हा अन्यायाविरुद्ध झुंजणाऱ्या मराठ्यांचा प्रदेश आहे. इथल्या मातीतून, पाण्यातून, श्वासातून असे काही रसायन इथल्या माणसांच्या नसानसातून भिनते की, वारकरी, कष्टकरी गुणसमुच्चयाचा स्वभाव, निसर्गत:च आकाराला येतो. ज्या क्षेत्रात पाऊल टाकतील तिथे काहीतरी विशेष करुन दाखवतीलच.

उसळत्या शक्तीला नीट वाट मिळाली नाही किंवा अडथळे निर्माण झाले की, मग आपसातच झगडे उभा करुन ते पिढ्यान् पिढ्या चालवायलाही कमी केले जात नाही. कुस्तीचा सराव नियमित चालू राहिलाच पाहिजे अशा ''तत्वनिष्ठ''भूमिकेत, ही भाऊबंदकी चालवली जाते. पूर्वीच्या काळी झुंजेचे बैल, बकरे, कोंबडे, शिकारी कुत्री पाळून किंवा घरात एकतरी पैलवान तयार करुन ही झुंजीची हौस भागवून घेतली जायची. परंतु या खेळातून मतभेद निर्माण झाले की, मतभेदातून वैराच्या पातळीवर जाऊन उभे राहायलाही वेळ लागायचा नाही. संशय कल्लोळ, मानापमान, भाऊबंदकी, फंदफितूरी ही नाटके मग इथल्या जीवनाची अविभाज्य अंगे म्हणून चालूच असतात.

सामुदायिक पुरुषार्थाचे भव्यदिव्य स्वप्न, ज्यावेळी त्यांच्या अंत:पटलावर कोरले जाते तेव्हा इथल्या उर्जेचा कारंजा आकाशाला जाऊन भिडतो. असेच एक स्वप्न म. गांधींच्या काँग्रेसने मागच्या पिढीच्या अंत:पटावर गोंदले. संपूर्ण स्वातंत्र्याचे स्वप्न. इंग्रजी राजवटीचा शेवट करण्याचे स्वप्न. ''चलेजाव''ची गर्जना करुन, १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीचा वणवा भडकला आणि कृष्णा, वारणा, पंचगंगा खोऱ्यातील तरुणांच्या अंत:करणात, स्वातंत्र्याच्या आकांक्षेबरोबर क्रांतीच्या ज्वालाही भडकल्या. नाना पाटील, पांडुरंग मास्तर, यशवंतराव चव्हाण, रामानंदस्वामी, किसनवीर, आत्माराम पाटील, अप्पा लाड, बर्डे गुरुजी, जोशी काका, बाबूराव चरणकर, निवृत्ती काका, डॉ. हिंगमिरे, नागनाथ नायकवडी, बाबूराव पाटणकर, शेखकाका, जी. डी. लाड, वसंतराव पाटील, रत्नाप्पा कुंभार, माधवराव बागल, तांबटकाका, हरि बेनाडे, मल्लय्या स्वामी कितीतरं तरुण उठले. त्यात शिगावचे रंगराव पाटील हेही दंड ठोकून उतरले. ''नहीं रखना नहीं रखना, जालिम सरकार नहीं रखना'' असा उद्‌घोष करुन इंग्रजांची राजवट द. महाराष्ट्रातून खणून काढायला, कामाला लागले. आजचा सांगली, सातारा, कोल्हापूरचा परिसर त्यावेळी ब्रिटीश मुलूख आणि संस्थांनी मुलूख म्हणून वेगवेगळ्या राजवटीखाली गुलामींचे जीवन जगत होता. ऑगस्ट क्रांतीची ''चले जाव'' ही रणगर्जना झाल्या दिवसापासून प्रत्यक्ष इंग्रज हा देश सोडून चालता होईपर्यंत, क्रांतीची मशाल विझू न देणारा मुलूख, ऑगस्ट क्रांतीच्या इतिहासात

आघाडीवर राहिला. मुंबईच्या गवालिया टँकवर काँग्रेसने फक्त ठराव पास केला. प्रत्यक्ष चळवळ सुरु केली नव्हती. पण इंग्रज सरकारने त्याचदिवशी रात्री काँग्रेसचे सर्व पुढारी पकडून तुरुंगात डांबले आणि ''ऑपरेशन पेंटलून''ची दडपशाही सुरु केली. त्यामुळे चिडून जाऊन जनतेने ४२ च्या क्रांतीचा उठाव केला. एक प्रकारचा उत्स्फूर्त, निर्णायकी, असंघटित असाच उठाव सुरु झाला. पण सामान्य जनताच त्यात उतरल्यामुळे लढा देशव्यापी झाला. प्रखर झाला. इंग्रजी राजवटीचे सारे दडपण, भीती, झुगारुन देऊन निर्भयपणे लोक उठले. क्रांतिवीर रंगरावदादांच्या सारख्या रगेल आणि जहाल युवकाच्या नेतृत्वाने पेटून उठले. ''आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान! शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण !'' अशी क्रांतीची गीते, रानोमाळ, गावोगाव घुमू लागली.

लोकांचा हा उत्स्फूर्त उठाव तीन महिनेतरी देशभर भडकत राहिला. परंतु त्यानंतर इंग्रजांनी वर्षभरात तो दडपून टाकण्यात यश मिळवले. इंग्रजांच्या त्या दडपेगिरीला पुरुन उरले फक्त तीन जिल्हे ! बंगालमधला मिदनापूर जिल्हा, बिहारचा बालिया जिल्हा आणि महाराष्ट्रातला त्यावेळचा सातारा जिल्हा. या तीन जिल्ह्यापैकी मिदनापूरची क्रांती, दुष्काळाच्या भयंकर आपत्तीमुळे सोडावी लागली तर बालियातील उठाव इंग्रजांनी चार-सहा महिन्यात मोडून काढला. राहिला फक्त सातारा जिल्हा. इथल्या ऑगस्ट क्रांतीचा उठाव जंग जंग पछाडूनही इंग्रजांना शेवटपर्यंत मोडता आला नाही. उलट गावागावातील इंग्रजांचा कारभार नष्ट करुन प्रतिसरकार चालवण्यात सातारा यशस्वी झाला.

गावपातळीवरील सरकारी नोकरांचे राजीनामे घेऊन, गावागावातील इंग्रजी राजवट संपवायला आणि स्वराज्य स्थापन करायला वारणा नदीच्या खोऱ्यात शिराळा पेट्यातून सुरुवात झाली. बिळाशीच्या गणपतराव पाटलांनी पहिला राजीनामा दिला. बघता बघता ही संख्या ८८ वर गेली. तलाठ्यांचेही राजीनामे घेतले. इंग्रजांनी दरोडेखोरांना बरोबर घेऊन भूमिगत क्रांतिकारकांना नष्ट करण्याची मोहीम आखली. क्रांतिकारकांच्या घरच्या लोकांना ठोकून काढले. इस्टेटी जप्त केल्या. क्रांतिकारकांच्या शिबिराला आलेल्या कॉलेज विद्यार्थ्यांचे खून केले. गावावर सामुदायिक दंड बसविले. पोलिस, दरोडेखोर यांच्याबरोबर, क्रांतिकारकांना आमनेसामने लढाया द्याव्या लागल्या. सरकारी खबऱ्यांना पत्र्या लावल्या. काही तलाढ्यांची नाके कापली. काही दरोडेखोरांना तर कडब्याच्या बुचाड्यात घालून जाळून टाकले. प्रतिसरकारला गावागावात गस्त सुरु करावी लागली. भूमिगत क्रांतिकारकांच्या जिवावर सरकारी यंत्रणा आणि दरोडेखोर उठले होते. तीन वर्षे हा संघर्ष चालला होता. प्रतिसरकारची लहान मुलांची वानरसेना गुप्तहेराचं काम करी. आयाबहिणी क्रांतिकारकांना जेवूखाऊ घालीत होत्या. गावागावातील गुंड, सावकार यांचा छळवाद थांबला. घराघरातील जमिनी, बायका यावरुन चाललेले तंटे थांबले. साक्षरतेचे वर्ग सुरु झाले. सेवादले सुरु झाली. तुफान सेना, आझाद सेना या क्रांतिकारकांच्या सेना उभ्या राहिल्या, गावागावात न्यायदान मंडळे आली. क्रांतिकारकांना आतून मदत करणारे औंध, सांगलीचे संस्थानिक यांनी गावागावात प्रजापरिषदेची राज्ये सुरु केली होती. म. गांधीजींच्या ग्रामस्वराज्याची कल्पना यात होती. प्रतिसरकारलाही ग्रामस्वराज्ये चालवायची होती. गावोगावच्या असंख्य तरुणांचा प्रतिसाद होता. पण साऱ्या खटाटोपाला पैशाचे मोठे पाठबळ हवे होते. त्यासाठी छत्रपती शिवरायांचा किस्सा समोर होता. आणि मग धुळ्याचा खजिना लुटीसारखे धाडसी उपक्रम हाती घ्यावे लागले.

हा सारा इतिहास लिहायला, आठवायला किती

सोपे आहे. पण प्रत्यक्ष घडवताना काय काय करावे लागले ? ''जालीम सरकार नही रखना'' आणि प्रतिसरकार उभा करुन चालवणे, तेही सरकारी यंत्रणा, दरोडेखोरांना घेऊन पाठीमागे लागलेली असताना, छत्रपति शिवरायांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करताना, छत्रपति संभाजी महाराजांनी औरंगजेबाच्या भयंकर स्वारीतून आरंभीची चार वर्षे स्वराज्याचे संरक्षण करताना आणि संभाजीराजांच्या क्रूर हत्येनंतर, संताजी-धनाजी व ताराबाई यांनी औरंगजेबच्या मगरमिठीतून स्वराज्य परत घेताना, जे शौर्य धैर्य दाखवले ते अलौकिक शौर्य-धैर्य ४२ च्या ऑगस्ट क्रांतीतील स्वातंत्र्यविरांनी दाखवले आहे. त्या क्रांतीच्या मुशीतून तयार झालेले रंगरावदादांच्यासारखी व्यक्तीमत्त्वे, ही आपल्यापुढे इतिहासाचे साक्षीदार म्हणूनच उभी आहेत.

ते देशभक्तीचे प्रखर दैदिप्यमान राजकारण विसरुन गेले आणि सत्ताबाजीचे स्वार्थी निर्लज्ज राजकारण पसरु लागले. हे पाहून रंगरावदादांच्यासारख्या कर्त्या देशभक्ताच्या मनाला असह्य वेदना होतात. त्या वेदनांच्या झळा त्यांच्या तोंडातून बाहेर पडतात.

स्वातंत्र्यानंतर सत्ताबाजीच्या राजकारणामुळे लोकशाहीचा जो खेळखंडोबा झाला आहे त्याच्या साऱ्या झळा गरीबांना सोसाव्या लागत आहेत. त्या गरीबांना ''अंगभर काम द्या, पोटापुरते अन्न द्या'' म्हणून मोर्चे काढावे लागतात आणि त्या मोर्चावर मस्तवाल राजकारणी आणि जुलमी नोकरशाही गोळीबार करुन १५-१६ वर्षाची मुलेही ठार करतात, याचा दाहक अनुभव क्रांतिवीर रंगरावदादांनी घेतला आहे. इस्लामपूरात निघालेल्या दुष्काळी मोर्चावर, जो राक्षसी गोळीबार मदोन्मत नोकरशाहींनी केला, त्यात रंगरावदादांचा १६ वर्षाचा मुलगा हुतात्मा झाला आहे. स्वातंत्र्यासाठी तळहातावर शीर घेऊन लढलेल्या क्रांतिविराला, स्वातंत्र्यानंतर दुष्काळी परिस्थितीत मोर्चा काढावा लागतो आणि त्यात पोटचा कोवळा मुलगा बळी जातो, या वस्तुस्थितीतून सद्याच्या राजकारणाबद्दल, क्रांतिवीरांची कोणती कोणती प्रतिक्रिया अपेक्षित आहे ? राज्य लोकशाहीचे म्हणायचे आणि सारी सत्ता, संपत्ती, विद्या लोकांपासून दूर, न दिसणाऱ्या अंतरावर ठेवायची, तिथे मूठभरांनीच ती मक्तेदारीने भोगायची आणि श्रम, कष्ट, वेदना मात्र लोकांच्या अंगावर ढकलून द्यायच्या अशी ही व्यवस्था ! या व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवणारावर गोळीबार करायचा ! क्रांतिकारक देशभक्त, शरीराने थकले असले तरी मनातून ''जालीम सरकार नहीं रखना'' ही शापवाणी बाहेर पडणारच अशा साऱ्या देशभक्तांचे प्रवक्ते म्हणजे रंगरावदादा आहेत.

## शिगांवचे रंगरावदादा !

**क्रांतिवीर तांबटकाका,** कुंडल

रंगरावदादांचा व माझा परिचय १९४२ च्या चळवळीपासूनचा आहे. रंगरावदादा हे करारी बाण्याचे, धाडसी आणि बोलणारे फर्डे वक्ते आहेत. रंगरावदादा कुणाचीही भिडभाड न ठेवता बोलतात. जवळच्या माणसालाही ते सोडत नाहीत. तिखट स्वभावाचे परंतू धुतल्या तांदळाप्रमाणे सामाजिक जीवनात दादा काम करतात. म्हणून मला त्यांचा स्वभाव आवडतो.

माझ्या आणि त्यांच्या ऋणानुबंधात कधीही बाधा आली नाही. कुंडलच्या नाना पाटील बोर्डिंगमध्ये अनेकवेळा ते आलेले आहेत.

शब्दांकन : **प्रा. दिनकर पाटील**

# रंगरावदादा आणि ४२ चा लढा

**श्रीमती इंदूमती बाबुजी पाटणकर,** १९४२ च्या चळवळीतील थोर स्वातंत्र्य सेनानी,
कासेगांव,ता. वाळवा, जि. सांगली.

क्रांतिवीर ''रंगरावदादा'' यांच्या गौरव ग्रंथाचं लेखन म्हणजे १९४२ च्या भारताच्या अखेरच्या ''करेंगे या मरेंगे'' या लढ्याचा इतिहास होय !

क्रांतिवीर दादा काय किंवा आणखी कुणाचाही! गौरवग्रंथ ! कोणाही क्रांतिवीराचा, स्वातंत्र्य सैनिकांचा असा तो त्याच्या एकट्याचा जीवनपट नसतोच मुळी! तो असतो समाजक्रांतीचा, राजकीय क्रांतीचा इतिहास! आणि म्हणून जेव्हा मला 'दादांच्या' गौरव ग्रंथासाठी आठवणी पाठविण्याबद्दल प्रा. दिनकर पाटील यांचा, संपादकांच पत्र मिळालं तेव्हा १९४२ च्या क्रांतिकाळात माझं मन केव्हा गढून गेलं हे मला समजलच नाही.

करेंगे या मरेंगे हा क्रांतीचा संदेश महात्मा गांधीच देऊ शकतात ! देऊ शकत होते कारण हा संदेश देण्याची ताकद फक्त महात्मा गांधींच्या मध्येच होती. तसेच ''चले जाव'' ची ऑर्डरही फक्त गांधीजीचं देऊ शकत होते ब्रिटीशांना ! एवढी ताकद त्यांच्या शब्दात होती. कारण त्यांचा तो शब्द म्हणजे भारतियांचा ! भारतियांचा म्हणजे देशातील पोलादी मनगटाच्या कष्टकऱ्यांचा ! कामगारांच्या पददलितांचा ! १५० वर्षे गुलामीत मरत राहिलेल्या शोषित जनतेचा होता. आणि गांधीजींच्या त्या शब्दाने भारताचा कानाकोपरा पेटून उठला. एवढी जबरदस्त ताकद होती. महात्माजींच्या घोषणेत ! त्यांच्या त्या कृतीच्या संदेशात ! जी ॲटम बॉम्बच्या हिंसक अशा शक्तीतही दिसणार नाही.

ॲटम बॉम्बचा प्रत्येक ॲटम हा कृतीशील असतो. त्याचप्रमाणे महात्मा गांधीजींचे सत्याग्रही आंदोलन, अहिंसावादी आंदोलनाचा ॲटम बॉम्ब हा त्या हिंसक ॲटम बॉम्बपेक्षाही मोठा धडाका देणारा आणि ब्रिटिशांचे भारतातील साम्राज्य उडवून लावणारा ! असा हा लढा ! अशी त्याची ताकद होती.

ॲटम बॉम्बमुळे सर्व सृष्टीचं बेचिराख होऊन जाते. परंतु महात्माजींच्या या अहिंसक लढ्याने या ॲटम बॉम्बने मानवतेची हिरवळ शांती निर्माण करणं, स्वातंत्र्य मिळणारं तत्त्व, त्याची ती ताकद होती ! आणि म्हणूनच एका कवीनं म्हटलं होतं मिठाच्या सत्याग्रहाच्यावेळी की -

उचललेस तू मीठ मूठभर ! साम्राज्याचा खचला पाया ! काय नांव या द्यावे विजया नमली सत्ता सरले शोषण !

केवढं वास्तव कवीनं या काव्य चरणामध्ये शब्दानं चित्रित केलं आहे. असे अनेक लढ्याचे ॲटम बॉम्ब महात्माजींनी आपल्या राजकीय आंदोलनाने निर्माण केले. आणि ब्रिटीश साम्राज्याला धक्के दिले.

महात्मा गांधींनी आपल्या लोकाभिमुख आंदोलनाद्वारे माणूसरुपी असे शांततावादी ॲटम बॉम्बचं पीकचं काढलं. माणूस हाच एक ॲटम बॉम्ब! पीक ! माणसाचं पीक ! देश पारतंत्र्याच्यामध्ये आपलं सत्वचं विसरला. ते माणूसपण ! त्या माणूसपणाचं पीक भरघोस येण्याकरिता खूप मेहनत मशागत गांधीजींना करावी लागली. विचारांचं खतपाणी करावं लागलं. आणि अशातऱ्हेने १९२० सालापासून या मशागत केलेल्या या शेतात माणसाचं भरघोस पीक

काढलं. एक एक माणूस जणू इंग्रजी साम्राज्य खिळखिळं करणारा ॲटमबॉम्ब बनला ! त्यापैकीच एक ॲटम बॉम्ब म्हणजे आमचे रंगरावदादा !

क्रांतिवीर रंगराव दादांच्यासारखे हजारो लाखो स्वातंत्र्य सैनिक तळहातावर शीर घेऊन स्वातंत्र्य आंदोलनामध्ये स्वत:ला झोकून देऊन हुतात्मे झाले. छातीवर गोळ्या झेलून रक्ताच्या थारोळ्यामध्ये धारातीर्थी पडले. काही जेलमध्ये ही हक्कासाठी उपोषणं करुन कणाकणाने मृत्युमुखी पडले. या सर्व झंझावातातून वाचलेले चुकून वाचलेले - रंगरावदादांसारखे आम्ही काही !

क्रांतिवीर रंगरावदादा, पांडुरंग मास्तर, बर्डे गुरुजी, नाना पाटील आणि जी. डी. लाड तसेच क्रांतिवीर बाबूजी पाटणकर क्रांतिवीर नागनाथ आण्णा आदी ही सर्व गरीब शेतकऱ्यांची कष्टकऱ्यांची मुलं ! परंतु यांच्यामध्ये या गुलामगिरीविरुद्ध लढण्याची स्फूर्ती, शक्ती, त्याग, सेवा कुणी निर्माण केली ? ही अस्मिता गांधीजींच्या लोकाभिमूख आंदोलनानं !

१९३० सालचं बिळाशीचं बंड, बिळाशीतील जंगल सत्याग्रह, ध्वज सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह, असहकाराची चळवळ, स्वदेशीची चळवळ अशाप्रकारे गांधीजींनी १०-१० वर्षांच्या टप्प्यांनी जनतेला लोकांना पेललं, प्रेरक ठरेल अशा लोकाभिमुख स्वातंत्र्य आंदोलनाची नवी प्रेरणा, सामान्यांच्या जीवनाला स्पर्श करणारे सत्याग्रही राजकारण दिले. त्यामुळेच हजारो-लाखो लोकांनी गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य आंदोलनात स्वत:ला झोकून दिले. गांधीजींनी सार्वजनिक जीवनात देशसेवा, त्याग, समाजसेवा आदि मूल्यांनी भारलेल्या कार्यकर्त्यांची एक पिढीच तयार केली. याच पर्वात सर्वसामान्यांना राजकारण, समाजकारणात काही भूमिका लाभली. आणि त्यामुळे भारतीय ९० टक्के कष्टकरी ज्याचं सामाजिक, राजकीय, आर्थिक शोषण होत होते असा देशातील हा ९० टक्के खेड्यातील माणूस आंदोलनात झोकून देऊन पडला आणि अशा या क्रांतिवीरांनी कष्टकरी, शेतकरी, बलुतेदारी, लोहार, सुतार आदिंनी क्रांती घडविली. सातारा जिल्ह्यामध्ये क्रांतीची केंद्रेही खेडी होती आणि यांनी प्रतिसरकार निर्माण केलं.

''करेंगे या मरेंगे'' हा कृतीचा मंत्र गांधीजींनी १९४२ च्या लढ्यातच का दिला, तर त्यांना खात्री होती की, आज या क्षणी लोकांची तयारी चांगली झाली आहे, लढ्याचं नेतृत्व स्वत: करण्याइतकी हिंम्मत त्यांच्यात आली आहे, स्वातंत्र्यासाठी प्राणार्पणही लोक करु शकतील, आतापर्यंतच्या अनेक लढ्यातून लोकांना लढ्याचं ट्रेनिंग चांगलं मिळाल आहे आणि म्हणून ९ ऑगस्ट १९४२ ला रात्री सर्व नेते पकडले गेल्यानंतर सुद्धा देशभर लढ्याचं सत्र चालू राहिलं. जनतेचे पुढारीपण जनतेने स्वीकारलं म्हणजे ! लोकांची एवढी क्षमता वाढली होती याची खात्री आतापर्यतच्या लढ्यातून, त्या अनेक लढ्याच्या विजयातून महात्माजींना आली होती. म्हणूनच गांधीजींनी हा कृतीचा मंत्र दिला. आतापर्यंतच्या लढ्यात हा कृती मंत्र गांधींनी दिला नव्हता. तेव्हापर्यंत लोकांच्या तयारीची खात्री त्यांना नव्हती. परंतु आता लोकांची तयारी झाली होती आणि इंग्रज जागतिक युद्धाच्या कैचीत सापडले. पकडलं असा अंदाज असा जागतिक परिस्थितीचा अंदाज घेऊनच गांधीजींनी हा संदेश दिला. आणि इंग्रजांना इथून चालते व्हा असे ठणकावून सांगितलं ! केवढा आत्मविश्वास होता पहा महात्माजींना !

साताऱ्यात तर प्रतिसरकार स्थापन झालं. १९४२ च्या भारताच्या स्वातंत्र्याचा संग्राम आणि त्यातील साताऱ्याचं योगदान ! हे भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिलं गेलं आहे.

१५ ऑगस्ट १९४७ ला लौकिकदृष्ट्या स्वातंत्र्य मिळालं. परंतु साताऱ्याचं ते प्रतिसरकार स्थापन करुन १९४२ साली आपली ग्रामराज्ये सुरु केली होती. आपल्या स्वतंत्र भारताचं संविधान तयार करुन घटनेप्रमाणे (घटना तयार करुन) प्रजासत्ताक राज्य सुरु २६ जानेवारी १९५० ! परंतु त्या अगोदरचं १९४२ सालीचं साताऱ्याने प्रतिसरकार स्थापन करुन आदर्श प्रजासत्ताक राज्य सुरु केलं होतं. गावोगावी न्यायदान मंडळ, आदर्श सुसंस्कृत पिढी तयार करण्यासाठी गावोगावी सेवादल, गावोगावी लायब्ऱ्या, थोडक्यात प्रतिसरकार होण्यासाठी जनतेचे, पर्यायी सरकार होण्यासाठी शस्त्रे जमविणे, पैशाच्या खर्चासाठी गाड्या लुटून आंदोलनाचा खर्च भागविणे आदि गोष्टी करुन आंदोलकांचे प्रतिसरकार उभे राहिले नसते. फार तर इंग्रजांना हाकलून लावण्याचा एक अतितीव्र संघर्ष ठरला असता.

प्रतिसरकार होण्यासाठी या बंडवाल्यांनी (इंग्रजांच्यादृष्टीने बंडवाले खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य सैनिक) इतर अनेक गोष्टी केल्या. इंग्रजांच्या कोर्टात जमीनदार, सावकार, गुंड यांच्या इत्यादिंच्या जाचाविरुद्ध न्याय मिळत नव्हता. चळवळ्यांनी गावोगावी जनता न्यायालये भरविण्यास सुरुवात केली. जनतेच्या या न्यायालयात न्याय मिळू लागला. म्हणजे जनताच स्वत:साठी न्याय मिळवून घेऊ लागली. जनतेच्या प्रतिकारात कशाप्रकारे न्याय मिळणार हे याचे चित्र प्रत्यक्षात उभे राहिले.

चळवळवाल्या स्त्री-पुरुषांनी जनतेला त्रास देणाऱ्या दरोडेखोरांचा बंदोबस्त केला, दारुबंदी अंमलात आणली, नवऱ्यांनी टाकलेल्या व सासूसाऱ्यांच्या व नवऱ्याच्या जाचाला त्रासलेल्या स्त्रियांना जनता न्यायालयात न्यायाविरुद्ध आवाज उठवून, अत्याचारावर वचक बसविला.

गावोगावी वाचनालये काढून आधुनिक ज्ञानाची अनेक दारे खेड्यातील समाजासाठी खुली केली. राबणाऱ्या जनतेला अज्ञानात ठेवण्याच्या ब्राम्हणी व इंग्रजी सत्ताधारी डावाला सुरुंग लावला.

गावोगावी सेवादले काढून जनतेची सशक्त ताकद उभी करण्याचा प्रयत्न केला.

बिन हुंड्यांची लग्ने, बिन खर्चाची गांधी लग्ने, करण्याची पद्धत सुरु झाली. सहभोजन, मंदिर प्रवेश यासारखे अस्पृश्यता विरोधी कार्यक्रम घेऊन जातिभेदाविरुद्ध फळी उभारली. हे सर्व केलं. म्हणून १९४२ साली झालेल्या सशस्त्र भूमिगत चळवळीचे इंग्रजी सत्तेला पर्यायी सरकार जनतेचे प्रतिसरकर उभे राहिले.

प्रतिसरकारच्या वरील सर्व उपक्रमात स्त्रियांचा सहभाग होता. गावोगावी, खेडोपाडी राष्ट्र सेवादलाच्या शाखा, न्यायदान मंडळात प्रत्यक्ष न्यायनिवाडा करण्यात स्त्री भूमिगत कार्यकर्त्या जातीने हजर असत.

अशाप्रकारे साताऱ्यामध्ये जनतेचं सरकार स्थापन झाले. १९४७ साली स्वातंत्र्य मिळालं आणि प्रतिसरकार हे आपल्या स्वतंत्र भारतात विलीन झालं. आपलं सरकार आपल्या देशाचं सरकार आपण निर्माण केलं. १९५७ च्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्यापासून ते १९४२ च्या शेवटच्या करेंगे या मरेंगे या आंदोलनापर्यंत अनेक छोट्या-मोठ्या संघटनांनी सशस्त्र उठावानी, काँग्रेस १८८५ साली स्थापन झाली. अर्ज विनंत्यांचे राजकारण झालं. उमाजी नाईक, वासुदेव बळवंत फडके आदिंची स्वातंत्र्यांची बंडे झाली. चापेकर बंधू, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आदिंची सशस्त्र क्रांती ! किती म्हणून प्रवाह या स्वातंत्र्यासाठी बलिदानात वाहून गेले. १९४२ च्या समान काळातच नेताजी सुभाषचंद्र बोस यांची आझाद हिंद सेना ! अशा शेकडो ज्ञात-अज्ञात क्रांतिवीरांनी आपले बलिदान केलं. संसारावर तुळशीपत्र ठेवलं तेव्हा त्याचे फळ म्हणून आपणास मिळालेलं स्वातंत्र्य होय आणि अशाप्रकारे

१९४७ ला स्वातंत्र्य मिळून १९५० ला आपलं हे प्रजासत्ताक चालू झाले.

स्वातंत्र्य मिळेपर्यंत सर्व वैचारिक प्रवाह एकत्र आले होते. परंतु स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशावर देशी भांडवलदाराचं राज्य सुरु झालं. सत्ता देशी भांडवलदारांच्या हाती गेली. गोरे भांडवलदार गेले आणि देशी भांडवलदार आले आणि म्हणून काँग्रेस अंतर्गत स्वातंत्र्य मिळेपर्यंत असलेले कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, कामगार या देशातील ९० टक्के लोकांना खरा न्याय देणाऱ्या सामाजिक बांधिलकीचे, समाजवादी विचारांचे जे पक्ष साम्यवादी विचार प्रवाह स्वतंत्र झाले आणि पुन्हा आपल्या सरकारशीच कष्टकरी जनतेला आपल्या हक्कासाठी लढे उभारणे भाग पडले.

'चले जाव'चं आंदोलन सुरु झालं आणि उठाव झाला तो कष्टकरी जनतेत जास्त प्रमाणात आणि त्यावेळी जास्त प्रमाणात म्हणजे या ९० टक्के लढ्याने हाक दिली होती की, 'या गरीबांनो या झेंडा हाती घ्या! काँग्रेसची हाक तुम्हा हाय हो ! सावकारशाही, ठेवायची नाही, ठेचायची आता हाय हो !' अशी हाक कष्टकऱ्यांना दिली. परंतु हे आता आपलं स्वातंत्र्य आहे. परकीय सत्ता गेली. एवढा बदल झालेला. परंतु आपलं खरं साम्यवादी स्वातंत्र्य नाही. याची प्रचिती लगेच यायला सुरुवात झाली. स्वातंत्र्य, सर्वजाती धर्माच्या लोकांनी, सर्व कष्टकरी विचारांच्या साम्यवादी विचारांच्या प्रवाहानी, काँग्रेसमध्ये सामील होऊन मिळवलं. एकट्या काँग्रेस पक्षाने नव्हे ! आणि जे अभिप्रेम स्वातंत्र्य ते मिळालचं नाही आणि त्यामुळे साम्यवादी विचाराचे प्रवाह काँग्रेस पक्षातून बाहेर पडून पुन्हा कष्टकरी जनतेच्या चळवळी बांधू लागले.

कामगार किसान पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष असे देशपातळीवरील पक्ष, कम्युनिष्ट पक्ष, कष्टकऱ्यांच्या चळवळी बांधू लागले. समाज प्रश्नावर लढ्यासाठी एकत्र येऊ लागले आणि लगेचच दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढ्याला सुरुवात झाली. स्वातंत्र्य मिळाले नंतर ४-५ वर्षामध्येचं !

महागाई विरोधी मोर्चे, १९५१-५२ ची निवडणूक ही सुद्धा एक लढा म्हणून लढविलेली निवडणूक होय.

क्रांतिवीर रंगरावदादा हेही काही या दुसऱ्या स्वातंत्र्यलढ्यात मागे राहिले नाहीत. तेही कष्टकरी विचाराच्या शेतकरी कामगार पक्षात सामील होतेच आणि अशाप्रकारे काही क्रांतिवीर सत्तेच्या राजकारणात न जाता जनतेच्या कष्टकरी जनतेच्या राजकारणाबरोबर राहिले.

स्वातंत्र्याच्यानंतर सत्तेच्या राजकारणामध्ये न जाता जनतेच्या कष्टकरी जनतेच्या राजकारणाबरोबरच राहिलेल्या अनेक कार्यकर्त्यांपैकी 'दादा' एक ! आणि सतत नेहमी, अखंड म्हणूनच दादांचा उल्लेख केला पाहिजे.

१९७२ च्या इस्लामपूर कचेरीवरील महागाई विरोधी काढलेल्या शेतकरी कष्टकऱ्यांच्या मोर्चामध्ये शेतकरी कामगार पक्षाचा निघालेला मोर्चा ! त्यात दादा प्रमुख होते. पक्षाचे कार्यकर्ते म्हणून त्यांचा स्वतःचा १६-१७ वर्षाचा जवान मुलगा त्या मोर्चामध्ये धारातीर्थी पडला. भारताचे स्वातंत्र्य मिळविणाऱ्या एका स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा एका क्रांतिवीराचा मुलगा ! या दुसऱ्या स्वातंत्र्याच्या लढ्यात हुतात्मा झाला ! महाराष्ट्राचे एक विचारवंत, शेतकरी कामगार पक्षाचे नेते प्रा. एन. डी. पाटील यांनीच या मोर्चाचे नेतृत्व केले होते. त्यांचा पुतण्या आणि दोन कार्यकर्ते या मोर्चात हुतात्मा झाले.

क्रांतिवीर दादा स्वतः स्वातंत्र्य सैनिक आहेत. क्रांतिवीर आहेत आणि एका हुतात्म्याचे, एका क्रांतिवीराचे वडील आहेत अशाप्रकारे क्रांतीची आणि सामाजिक बांधिलकीची परंपरा चालविणारे असे हे

कुटुंब आहे. असं हे घराणं !

दादा स्वत: अजूनही आपल्या भाषणात समाजातील प्रस्थापितांच्यावर, समाजद्रोह्यांच्यावर आपल्या स्पष्टोक्तीने मुलूख मैदान अशी विचारांची तोफ डागतात. तिथं कुणाचीही तमा ठेवत नाहीत. आज ८० व्या वर्षीही दादा शरीरानं जरी थकले असले तरी मनाच्या तारुण्याच्या उत्साहाने भ्रष्टाचारावर अत्याचारी कारभारावर कडाडून हल्ला करतात.

अशा या थोर क्रांतिवीरास माझे क्रांतिकारी अभिवादन !

दादांना त्यांच्या मिसेस कल्पनाताईंना व सर्व कुटुंबियांना दीर्घायुरोग्य लाभो ! सुख-समृद्धी लाभो हीच सदिच्छा !

# क्रांतिवीर रंगरावदादा पाटील

**स्वातंत्र्य सैनिक, श्री. दत्तात्रय बळवंत लोहार,** बिळाशी, ता. शिराळा, जि. सांगली.

प्रियमित्र क्रांती सेनानी मुलुख मैदानी तोफ आज वर्षे ८१ पूर्ण करीत आहेस, असो,

दादा तुझा व माझा परिचय येरवडा जेलमध्ये पुसटसा आला. नंतर गणपतराव पाटील, दत्ता सातारकर, आण्णा जोशी, बाबुराव चरणकर, तू आणि मी या सर्वांना नाशिक जेलला पाठवले. तेथे तुझा आणि माझा जो जेलचे खोलीबाहेर अधिक पाण्याचे हौदात जो निवांत ऊन्हात पोरटकी गंमती व मज्जा केल्या, त्या तुला आठवत असतील. तर जीवन हे आयुष्यातील बालपणाचे क्रीडांगण आहे ते तू आणि मी भोगून आज तू ८१ वर्षे पूर्ण केली असून मीही ८८ वर्षे पूर्ण करीत आहे. नाशिकहून सुटलेनंतर तू व आण्णा भटजी मुंबईहून घरी निघून आला. दोघेही अविवाहित होता. मी व दत्तू सातारकर नाशिकला चार दिवस थांबलो.

इ. स. १९४२ पासून तुमा लोकांनी क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर श्री. नागनाथ नायकवडी, क्रांतिवीर कै. वसंतदादा पाटील, फिल्ड मार्शल श्री. जी. डी. लाड, कै. यशवंतराव चव्हाण, कै. बर्डे गुरुजी यांच्याबरोबर शिगावचे क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील हेही आघाडीवर होते.

२५ डिसेंबर २००० रोजी क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील ८१ वर्षे पूर्ण करीत आहेत. यानिमित्ताने त्यांच्या पत्नी सौ. कल्पनादेवी रंगरावदादा पाटील या उभयतांचा नागरी सत्कार, सत्कार समिती, कोल्हापूरच्यावतीने करण्याचे ठरले आहे. याबद्दल धन्यवाद.

यानिमित्ताने उभयतांच्या जीवन कार्यावर एक ''क्रांतीचे रंग'' या नावाचा गौरवग्रंथ प्रकाशित करीत आहात. आपण त्यांच्या संबंधीचे लेख, आठवणी गोळा केल्या, हे एक राष्ट्रीय कार्य केले आहे.

# स्वातंत्र्यसंग्रामातील धगधगती तोफ

**श्री. डी. बी. पाटील**, गोटखिंडी, जि. सांगली, माजी मुख्याध्यापक, महाराष्ट्र हायस्कूल, कोल्हापूर.

अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन मुंबई येथे गोवालिया टँकच्या मैदानावर दिनांक ७ व ८ ऑगस्ट, १९४२ रोजी भरले होते. ७ ऑगस्टला पंडित जवाहरलाल नेहरुंनी वर्ध्याच्या बैठकीत संमत झालेला ठराव चर्चेसाठी मांडला. या ठरावावर अनेक कार्यकर्त्यांनी चर्चा केली. दिनांक ८ ऑगस्ट १९४२ रोजी हा ठराव प्रचंड टाळ्यांच्या गजरात मंजूर झाला आणि महात्मा गांधींनी ''छोडो भारत'' असा आदेश ब्रिटीश सत्तेला दिला. त्यावेळी ''करेंगे या मरेंगे'' ही घोषणाही महात्मा गांधींनी दिली. अधिवेशनात ठराव संमत झाला आणि दिनांक ९ ऑगस्ट १९४२ रोजीच देशातील १४८ नेत्यांना ब्रिटीश सरकारने अटक केली. अधिवेशनात गेलेले कार्यकर्ते ''चले जाव'' व ''करेंगे या मरेंगे''या घोषणा मनाशी बाळगून अत्यंत संतापजनक स्थितीत परत आले.

सातारा जिल्ह्यातील (आजच्या सांगली आणि सातारा या जिल्ह्यांना त्यावेळी सातारा जिल्हा असे नाव होते) अनेक कार्यकर्ते मुंबई येथे झालेल्या अधिवेशनात गेले होते. अशा अनेक कार्यकर्त्यांबरोबर रंगराव दादाही गेले होते. अधिवेशनाहून परत येताच इतर अनेक कार्यकर्त्यांबरोबर रंगराव दादाही दिनांक २४ ऑगस्ट १९४२ रोजी पोलीसांनी पकड वॉरंट काढले. सातारा जिल्ह्यातील सर्व क्रांतिकारकांची बैठक कुंडल या ठिकाणी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली झाली आणि त्या बैठकीत भूमिगत पद्धतीने चळवळ चालविण्याचा निर्णय घेण्यात आला. या चळवळीचा मुख्य उद्देश ब्रिटीश सत्ता खिळीखिळी करणे असाच होता. टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वे मार्ग उखडणे, रेल्वेवर दरोडे घालणे, रेल्वे स्टेशन जाळणे, पोस्टाच्या पेट्या पळविणे, हत्यारे पळविणे, डाक बंगले जाळणे अशाप्रकारच्या कृती करुन पोलीसांना, ब्रिटीश सत्तेला हैराण करण्याचा हेतू काही प्रमाणात यशस्वी झाला. पण या चळवळीमुळे लोकांच्यात फार मोठा विश्वास निर्माण करता आला नाही.

चळवळीबद्दल लोकांचा विश्वास वाढावा, त्यांच्याच निर्भयता निर्माण व्हावी यासाठी १९४३ मध्ये ''प्रतिसरकार'' स्थापनेचा निर्णय भूमिगतांनी कामेरी या ठिकाणी झालेल्या गुप्त सभेत घेतला. या चळवळीस संघटित स्वरुप देण्याचा निर्णयही झाला. या प्रतिसरकारने ग्रामराज्याची कल्पना मान्य केली आणि न्यायदानासाठी गाव, गट व जिल्हा पातळीवर समित्या स्थापन केल्या. सर्व प्रकारचे तंटे बखेडे या संदर्भात न्याय देत असत. त्याचप्रमाणे गावातील सावकार, वतनदार, गावगुंड, फरारी हे जनतेला त्रास देत. अशांचाही बंदोबस्त करण्याची व्यवस्था करण्यात आली. यासाठी तुफान सेना निर्माण करण्यात येऊन जनतेचे न्याय व संरक्षण असे अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न सोडविले गेले. ब्रिटीश शासनाच्या समांतर शासन क्रांतिकारकांनी सातारा जिल्ह्यात उभे केले व यशस्वी केले. या प्रतिसरकारकडून कर्जे माफ करणे, ग्रामसफाई, दारुबंदी, अस्पृश्यता निवारण

अशा प्रकारची विधायक कामेही करण्यात येऊ लागली. त्यामुळे हे प्रतिसरकार लोकांच्या आदरास पात्र ठरले. ''करा अथवा मरा'' या घोषणेची कार्यवाही करण्यासाठी सर्वत्र जनजागृती करणे गरजेचे होते. यासाठी रान उठविण्याच्या कामात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याबरोबर जे काही कार्यकर्ते होते त्यात शिगावचे रंगराव दादा पाटील होते. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे भाषण म्हणजे वीर रसाने भरलेली नदीच होयँ. काही लोकांची भाषणे ऐकली की, झोपी गेलेले जागे होतात. जागे झालेले उभे राहतात. उभे राहिलेले चालू लागतात आणि चालणारे पळू लागतात. वीर रसाने भरलेली भाषणे देणाऱ्यांपैकी मा. रंगरावदादाही होत.

१९४२ चा काळ लक्षात घेतला तर आपल्या हे लक्षात येते की, लोकजागृती करणे किती कठीण होते. आपण पारतंत्र्यात होतो. भाषणावर बंदी, वाहनांच्या सोयी नाहीत, लाऊडस्पीकर नाहीत, प्रचार माध्यमे नाहीत. अशावेळी विविध ठिकाणी असलेल्या संधींचा फायदा करुन घेणे एवढेच चळवळीतील कार्यकर्ते करु शकत असत. विशेषत: देवदर्शनाच्या निमित्ताने लोक एकत्र जमले की, त्यांच्यापुढे भाषणे देण्याची संधी कार्यकर्त्यांना मिळत असे. गोटखिंडी, येडेनिपाणी मालेवाडी या गावांच्यामध्ये डोंगरावर मल्लिकार्जुनाचे मंदिर आहे. श्रावण महिन्यातील सोमवारी अनेक गावचे भाविक देवदर्शनास येत असत (आजही येतात). श्रावणातील शेवटच्या सोमवारी मल्लिकार्जुनाच्या मंदिरास भेट देणाऱ्यांची संख्या फारच मोठी असते. अशा एका शेवटच्या सोमवारी मा. रंगरावा दादांचे भाषण ऐकण्याची मला संधी मिळाली. स्टेज, लाऊडस्पीकर, मंडप इत्यादी सुविधा त्या काळात नव्हत्या. त्यामुळे रंगराव दादा चक्क देवळावर चढले आणि तेथूनच त्यांनी भाषणास सुरुवात केली. ''महात्मा गांधी की जय, नाना पाटील की जय, पंडित नेहरु की जय'' अशा घोषणा सुरुवातीला दिल्या आणि त्याठिकाणी इकडे तिकडे वावरणारा सर्व समाज भाषण ऐकण्यासाठी देवळाच्या सभोवार आला. दादांचा तो पहाडी आवाज, साध्या-साध्या उदाहरणांनी आपला मुद्दा पटवून देण्याची त्यांची हातोटी, परखड व निर्भय विचार यामुळे सर्व सभाच दादामय होत असे. आणि अशी भाषणे ऐकलेली मंडळी घरदार सोडून देत असत व चळवळीत सामील होत. कारण अशा सभांच्यावेळी उपस्थित असणाऱ्या पोलीसांनाही लाखोली वाहिली जात असे. पण दादांना पकडण्याची हिंमत पोलीसांना होत नसे.

अशा पहाडी आवाजाच्या, स्पष्ट वक्त्या, निस्पृह स्वातंत्र्य सैनिकाचा आणि वहिनींचा सत्कार होत असल्याने आम्हास अतिशय आनंद होत आहे. या दोघांना दीर्घ आयुष्य लाभावे व त्यांचे आरोग्य उत्तम रहावे हीच शुभेच्छा !

## स्वातंत्र्याचे राजदूत !

**श्री. आर. बी. लाड,** कुंडल

माझा आणि रंगरावदादा पाटील यांचा परिचय स्वातंत्र्यपूर्व काळापासूनचा आहे. माझ्या सच्च्या वडिलबंधूंचा नागरी सत्कार उभयतांचा होतो आहे याचा आनंद आगळा आणि वेगळा आहे. देशासाठी फकिरी पत्करणाऱ्या आणि स्वातंत्र्याचे राज़दूत असणाऱ्या रंगरावदादांना त्रिवार वंदन !

महात्मा गांधी झिंदाबाद !
सातारा प्रतिसरकार झिदाबाद !
क्रांतिसिंह नाना पाटील झिंदाबाद !
क्रांतिवीर रंगरावदादा झिंदाबाद !!!!

शब्दांकन : **प्रा. दिनकर पाटील**

# झुंझार लोकनेते रंगरावदादा

**श्री. धोंडीराम माळी,** सरचिटणीस, स्वातंत्र्य सेनिक सन्मान समिती, जि. सांगली.

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा अखेरचा लढा जाहीर करुन, ब्रिटीश सत्तेला ''चले जाव''ची नोटीस दिली. भारतीय जनतेला ''करा किंवा मरा'' हा मंत्र दिला.

ब्रिटीश सरकारने दि. ९ ऑगस्ट रोजी महात्मा गांधीजींना आणि कॉंग्रेस वर्कींग कमेटीच्या सर्व सदस्य नेत्यांना अटक करुन अज्ञात स्थळी स्थानबद्ध करुन टाकले. ही घटना साऱ्या भारतभर वाऱ्यासारखी पसरली. जनतेच्या लाडक्या नेत्यांना अटक केल्यामुळे, सर्व भारतीय जनता रस्त्यावर येऊन ब्रिटीश सत्तेविरुद्ध निदर्शने करु लागली. विद्यार्थीवर्ग या गोष्टीत आघाडीवर होता.

ब्रिटीशांनी अत्यंत क्रूरपणाने जनतेची निदर्शने मोडून टाकली. धरपकड, गोळीबार, लाठीहल्ला, मिरवणुकीवर रणगाडे चालवून लढा चिरडून टाकला. जागोजागी मामलेदार कचेरीवर जनतेचे मोर्चे निघाले. अशा मोर्च्यावर गोळीबार करुन अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी यमसदनास पाठविण्यात आले.

स्वातंत्र्याची चळवळ हळूहळू ओसरु लागली. पण तरुण कार्यकर्ते ठिकठिकाणी लहान-लहान ग्रुप करुन संघटित होऊ लागले. आम्हीही सांगली शहराजवळील पद्माळे गावी कै. नामदार वसंतरावदादा पाटील यांच्या मळीत एकत्र आलो. आम्ही त्यावेळी १५-२० तरुण जमलो होतो. त्यात कुरळूपच्या श्री. निवृत्ती काकांच्याबरोबर एक २०-२२ वर्षांचा तरुण आला होता. तेज:पुंज चेहरा, अंगाने सडपातळ, चपळ आणि बोलका असा तो तरुण म्हणजे श्री. रंगरावदादा पाटील, शिगावकर, ''दादा!''

पद्माळ्याच्या मळीत बैठकी घडू लागल्या. विचार विनिमय सुरु झाला. भूमिगत राहून ब्रिटीश सत्तेशी लढा देण्याचा निर्णय पक्का झाला. स्वसंरक्षणाकरिता शस्त्रे हवी होती. कार्यकर्त्यांना सांभाळण्यासाठी, त्यांची देखभाल करण्याकरिता पैसा हवा होता. अन्य साधने हवी होती. ती मिळविण्याकरिता योजना आखल्या जात.

सांगलीचे कार्यकर्ते श्री. भूपाल कत्ते यांच्या सहकार्याने वसंतदादा पाटील, जी. डी. पाटील, इ. सोळा कार्यकर्त्यांनी गोव्यात जाऊन सरकारी खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांना संशय आल्यामुळे आम्हा लोकांना आपला संकल्प पुरा करता आला नाही. या घटनेने रंगराव पाटील अत्यंत निराश झाले.

रेल्वे स्टेशनवर हल्ला करुन रेल्वे स्टेशने जाळून तेथील तिकीट विक्रीची रक्कम लुटावयाची ठरवून नांद्रे विश्रामबाग, आरग, बेडग, सलगर, धुळगांव ही रेल्वे स्टेशने पेटवून दिली. धुळगांव स्टेशनात बंदूक होती. ती रंगराव पाटील यांनी ताब्यात घेतली. स्टेशनवरील रक्कम ताब्यात घेतली. अशारीतीने आमचा ग्रुप संघटित कार्यरत होता. स्वावलंबी होत होता.

मिलटरीमध्ये भरती झालेले लष्करातील सैनिक रजेवर घरी येत होते. त्यांच्याकडून

लष्करातील दारुगोळा मिळत होता. मोटारीच्या टायरस् फोडणाऱ्या केपा मिळाल्या होत्या. त्याची ट्रायल घेण्याची ऊर्मी रंगरावांना आली. त्यांनी चार केपा घेतल्या. एका दगडावर ठेवल्या. दुसऱ्या दगडाने त्यावर प्रहार केला. केप फुटल्या. त्यातील बारीक छऱ्यांनी रंगरावांच्या पायाला, हातावर जखमा होऊन ते स्वत: रक्तबंबाळ झाले. नदीच्या प्रवाहात पाय, हात स्वच्छ धुवून खोबरेल तेलात पाणी मिसळून जखमा स्वच्छ केल्या. अशी अचाट कामे रंगराव धाडसाने करीत असत.

श्री. रंगरावांचे वाचन मोठे असे. भाषण देण्याचे त्यांना वेडच होते. भूमिगत काळात एखाद्या नदीकाठच्या देवळात मोठमोठ्याने भाषण करीत असत. त्यांचा आवाज घुमत असे. पुढील आयुष्यातही अनेक व्याख्यानाद्वारे त्यांनी आपले विचार मांडले आहेत. आपला मुद्दा न सोडता, प्रतिपक्षास तीक्ष्ण चिमटे घेत तास न् तास ते बोलत असत. एवढेच नव्हे तर याबाबतीत त्यांचा हातखंडा असे. पुढील श्रोत्यांना ते डोलत ठेवतात.

स्वातंत्र्याची चळवळ यशस्वी झाल्यानंतर रंगरावांनी विधायक कामात लक्ष घातले. जनतेचे प्रबोधन करणे, देश बांधणीच्या कामात जनतेस संघटित करणे, तरुणांना संघटित करण्याचे त्यांचे काम सदैव सुरुच असते. ते अन्यायाच्याविरुद्ध पोटतिडकीने पेटून उठत. कुणाचाही मुलाहिजा न ठेवता, आपले विचार खंबीरपणे प्रगट करीत असत. आजही तेच करतात.

सरकारच्या चुकीच्या धोरणावर टीका करताना त्यांना स्फुरण चढते. सतत चळवळ करणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. जनतेला भरपूर अन्नधान्य मिळावे, योग्य किमतीत वस्तू मिळाव्यात म्हणून संपूर्ण सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्यामध्ये जागृती निर्माण करुन, इस्लामपूरच्या मामलेदार कचेरीवर त्यांनी प्रचंड मोर्चा काढला होता. पोलिसांनी संधी साधून त्या गोष्टीचा फायदा उठवून, रंगरावांच्या मुलास हेरुन पोलिसांनी गोळी घातली. त्यांचा मुलगा शहीद झाला. रंगराव चवताळून उभे राहिले. मुलाच्या मृत्यूचे दु:ख बाजूला ठेवून सर्व महाराष्ट्रभर दौरा काढून, जनतेवर झालेल्या गोळीबाराचेविरुद्ध जनसंघटन व प्रबोधन सुरु केले. त्यांच्या ठिकठिकाणी हजारो श्रोत्यांच्यासमोर सभा होत असत. रंगराव आपल्या ओघवती भाषेत श्रोत्यांना विचार देत. अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे बळ ते जनतेत निर्माण करीत. अन्यायाच्याविरुद्ध जनतेला उभे करीत असत. रंगराव शे. का. पक्षाचे आधारस्तंभ होते. त्या पक्षातील नेत्यांना त्यांचा विचार कराव लागे, असा त्यांचा पिंड आहे.

रंगराव सत्तेपासून सदैव दूर राहिले. सदैव जनतेत राहून त्यांच्यात वैचारिक जागृती निर्माण करीत राहिले. स्वातंत्र्य संग्रामातील सैनिकांच्या कामात त्यांनी विशेष लक्ष घालून त्यांच्या संसारात आनंद निर्माण करण्याचे मोठे कार्य तडीस नेले आहे.

रंगरावदादा लवकरच ८१ व्या वर्षात पदार्पण करतील. या वयातही त्यांची इच्छाशक्ती मोठी आहे. देशातील भ्रष्टाचार, सत्तेची भांडणे, धनदांडगे, रान दांडगे यांची अरेरावी, नेत्यांच्या ठिकाणचे नैतिक अध:पतन या साऱ्याविरुद्ध ते पेटून उठतात. संधी मिळेल त्या समयास ते त्याविरुद्ध लढण्यास सज्ज असतात. या गुणाबद्दल त्यांच्याबाबत मला सदैव अभिमान वाटत आला आहे.

रंगरावदादांना व सौ. वहिनींना पुरे शंभर वर्षे उत्तम आयुष्य लाभो, शेवटपर्यंत ते आनंदी व सुखी राहोत हीच परमेश्वर चरणी प्रार्थना !

# अहो दादा !

**आमदार श्री. आण्णासाहेब डांगे,** माजी ग्रामीण विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य .

रंगराव दादा म्हटले की, पॅट, मॅनेला, उंच मजबूत शरीरयष्टी, उभारलेले डोक्यावरचे केस, जराशी का होईना वाढलेली दाढी, मागेपुढे असलेले दात व त्यातून निघणारा घोगरा पहाडी आवाज असे रुप डोळ्यासमोर उभे राहते. दादांच्याकडे दुरुनच पाहिलेले-बोललेले बरे. जवळ जावे तर केव्हा आणि कोणत्या निमित्ताने त्यांच्या पोलादी मनगटाचा रट्टा पाठीत अथवा मानेवर बसेल सांगता येत नाही. हा रट्टा दादा अतीव प्रेमाने मारतात. त्यांचे लहानपणाचा काळ वेगळा. त्यांच्या आई-वडिलांनी त्यांना काय खायला घातले होते व कसे जोपासले, वाढविले होते, कोण जाणे. त्यांच्या हे लक्षात येत नाही की, ''आपल्या नंतरच्या पिढ्यांना आपण जे खाल्ले, ज्या पद्धतीने शरीरसंपदा कमावली त्याचा गंधसुद्धा नाही. हायब्रीड ज्वारीची भाकरी व चहातून पोटात जाईल तेवढ्या दूधावर वाढलेल्या मुलांना रट्टा मारताना किती जोराने मारावा ? दादांचा प्रेमाचा रट्टा म्हणजे जीव गोळा होऊन यायची पाळी'' असे प्रेम मला अनेकदा अनुभवायला मिळाले आहे.

माझी आणि दादांची राजकीय वाटचाल वेगवेगळ्या रस्त्यावरची. विचार म्हटले तर दोन टोके. वयमान म्हटले तर त्यांच्या मागच्या पिढीतील आम्ही. असे असताना त्यांचे माझे जमले कसे किंवा का जमते याचे अनेकांना गूढ आहे. दादांचे शिक्षण किती झाले आहे मला माहीत नाही. ते कसे होणार ? त्यांना विचारावे तर तुला माझ्या शिक्षणाचे काय पडलेय म्हणून एखादा रट्टा बसायचा. दादांचा पहाडी आवाज, भाषणातील एक एक शब्द म्हणजे तोफगोळा, ज्वल्ज्जहाल टीका, सडेतोड विचार आणि आचारांशी तादात्म्य पावलेल्या आंतर आत्म्याची दीनदुबळ्या, कष्टकरी जनतेची दैन्य, दु:ख नाहीसे करण्यासाठी होणारी उलघाल, बेडर वृत्ती या गुणांचा माझ्यावर प्रभाव पडला. आमचे मार्ग वेगळे असले तरी ध्येय एक. विचार आणि चिंतन वेगळे असले तरी हुंकार एक होता. वाटायचे या माणसाच्या संगतीत रहावे. पण तो योग येणार कसा ?

१९६८ साली पंडित दीनदयाळजींची हत्या झाली. सर्व पक्षीय श्रद्धांजलीचा कार्यक्रम सांगलीत होता. जनसंघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सांगलीचे कै. बाबा पोतदार दादांना भेटले व त्यांनी शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने श्रद्धांजली वहावी असे बोलणे झाले. दीनदयाळजींच्यासंबंधी दोन शब्द चांगले बोलणे हे शे. का. प. च्यादृष्टीने ''विचारांचा व्यभिचार करणे'' असे मानले जाण्याचा तो काळ होता. परंतु ज्या नेत्यास लोकसभेने श्रद्धांजली वाहिली त्या नेत्याच्या श्रद्धांजली सभेस न जाऊन कसे चालेल हा औपचारिक विचार दादांनी केला असावा व येण्याचे मान्य केले. दोन शब्द बोलायचे म्हणजे काय बोलायचे. दीनदयाळजींच्यासंबंधी माहितीचे पुस्तक असले तर मला द्या अशी मागणी दादांनी बाबांचेकडे केली. त्यावेळी जनसंघात प्रसिद्धी प्रियता नव्हती व दीनदयाळजी संघाचे प्रचारक असल्यामुळे त्यांच्यासंबंधीचे पुस्तक कुठले आणाचे ? जनसंघाच्या विचारांचा आत्मा असलेले दीनदयाळजींचे ''एकात्म मानववाद'' हे छोटेसे चार भाषणांचे पुस्तक बाबांनी त्यांना दिले. दादांनी ते

वाचले व ते पुस्तक परत देताना दादा म्हणाले, ''तुमचा हा एकात्म मानववाद मार्क्सवादापेक्षा डावा दिसतोय. खरच तुमचा पक्ष या विचाराने जाणार असेल तर आम्हास परकेपणा वाटायचे कारण राहणार नाही.'' वरील प्रसंगामुळे दादांच्या मनात जनसंघाविषयी पर्यायाने आम्हा कार्यकर्त्यांविषयी असलेली वैचारिक अढी कमी व्हायला मदत झाली.

१९७२ सालच्या दुष्काळात शे. का. पक्षाचा ऐतिहासिक मोर्चा इस्लामपूर तहशील कचेरीवर निघाला होता. मोर्चा अतिशय शिस्तबद्ध व शांततेने निघाला होता. आता तहशीलदारांना निवेदन द्याचे नि मोर्चाचे विसर्जन करायचे एवढाच भाग बाकी होता. दादांचे भाषण झाले. मा. एन. डी. पाटील भाषण करीत असताना अचानक काय झाले कोणास ठाऊक पूर्व नियोजित कट केला असावा तसा मोर्चावर लाठीमार, गोळीबार केला गेला व चार निरपराध मुलं मारली गेली. त्यात दादांचा कॉलेजमध्ये शिकणारा मुलगा मारला गेला. दादा नि एन. डीं. ना अटक केलेली. मोर्चेकरी व पोलीसात गनिमी काव्याचे युद्ध चाललेले. मी मोर्चा पहाण्यासाठी सुरुवातीपासून काही अंतरावरुन मोर्चाबरोबर होतो. ही आगळीक पाहून कोणाचे डोके भडकणार नाही ? मोर्चेवाल्यांवर होणारा अत्याचार थांबवायला पोलीसांना भाग पाडत मोर्चेवाल्यांना जी मदत करता येईल ती करण्याचे काम मी केले. सरकारचा अत्याचार वेशीवर टांगला. जे हुतात्मे झाले त्यांच्या कुटुंबियांच्या वेदनांशी मी सहवेदना व्यक्त केल्या. यातूनच दादांची व माझी तार जुळली.

दादांच्यासंबंधी माझ्या मनात जो आदर भाव वसतो आहे तो दादा म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामातील धगधगते अग्निकुंड, चिंतनशील, विचारांचा भाष्यकार, अन्याय, अत्याचाराविरुद्ध संघर्षातील अग्रदूत, साक्षेपी टीकाकार, धडाडत्या पहाडी आवाजातील भाषणाने अंत:करणे चेताविणारा वक्ता, धडाडीचा नेता, आदर्श सखा, आदर्श पिता ही त्यांची विविध रुपे मी पाहिली असल्यामुळे आमदार निवासातील माझ्या खोलीवर ते वरचेवर येत, रहात. अनेकवेळा अनेक विषयांवरचे त्यांचे विचार ऐकले, चर्चा केली आणि कळून चुकले आज झकपक कपडे घालून वरवरच्या विचाराने उतावीळपणे नेते व्हायला निघालेले लोक कुठे आणि दादा कुठे ! त्यांनी आयुष्यभर जे राजकारण केले, त्यासाठी जे भोगले, सोसले ही शक्ती, ही हिम्मत त्यांच्यात आली कोठून? त्याचे मला उमगलेले उत्तर आहे. त्यांनी केलेल्या चिंतनातून उराशी जोपासलेल्या ध्येयवादातून, गोरगरिबांच्या उद्धाराच्या आंतरक पोटतिडिकीतून.

निसर्ग अनेक रंग निर्माण करतो. त्यातल्या काही रंगांना भलतेच महत्त्व प्राप्त होते. राज्यमान्यता मिळते. परंतु काही रंगांना नुसतीच उपेक्षा सहन करावी लागते. आणि काही रंग असे असतात की ना त्यांना महत्त्व ना उपेक्षा, कामापुरता उपयोग करायचा आणि काम झाले की, पाठ फिरवायची. दादांच्या आयुष्याचे असे झाले. या रंगाचा वापर ज्याने त्याने कामापुरता केला. हा क्रांतिवीर उपेक्षित राहिला. दादांनीही याची कधी पर्वा केली नाही. जुळवून घ्यायचे दादांच्या स्वभावात नाही. दादांच्या भोवती मित्रपरिवार आहे का ? नाही ! दादांच्याभोवती कार्यकर्त्यांचे कोंडाळे आहे का ? नाही ! दादांची ही अवस्था पाहिल्यावर वाटते ते -

*''ऐ फूल तुझमें कितने गुण हैं !*
*रंग, रुप और बास !!*
*मगर एक ही कमी है !*
*भ्रमर न आवे पास !!''*

निष्काम कर्म योग्याच्या जीवनाची सायंकाळ अशीच असते.

दादा भाग्यवान आहेत, कर्तबगार मुले, मुली, जावई हा गोतावळा आणि निरांजनातील वातीप्रमाणे

जळून संसारगाडा स्वत:च्या प्रकाशात ओढणाऱ्या, अपार कष्ट उपसणाऱ्या बाई सौ. कल्पनादेवींची अजोड साथ, धर्मपत्नीच्यारुपाने त्यांना लाभली आहे. त्यांचे काका कै. व्ही. टी. पाटील यांनी ताराराणीचे रोपटे लावले, वटवृक्षाप्रमाणे वाढविले, आज तो आम्रवृक्ष बहरला आहे. दादा-ताई आनंदात त्यांच्या छायेत आहेत. आणखी काय हवं ! सुख, सुख यापेक्षा वेगळं काय असतं ! मान आहे, सन्मान आहे, कीर्ती आहे. कष्टकरी शेतकऱ्यांसाठी हौतात्म्य पत्करलेल्या राजाची शान आहे. दादा तुमचे सुखीजीवन असे पाहण्याचे भाग्य आम्हास लाभो.

# एक क्रांतिवीर

**स्वातंत्र्य सैनिक, श्री. बाबूराव कोतवाल,** माजी आमदार, कराड, जि. सातारा.

क्रांतिवीर रंगराव पाटील यांच्या वयाला ८० वर्षे पूर्ण होवून ८१ वर्षात पदार्पण करीत आहेत व त्यानिमित्ताने श्री. रंगरावदादा व त्यांच्या पत्नी सौ. कल्पनादेवी यांचा नागरी सत्कार करणार आहोत हे वाचून मला मनस्वी आनंद झाला. आजकाल खरा कार्यकर्ता किंवा क्रांतिकारक हा या ढोंगी समाजात कुठे लुप्त केला जातो आहे हे समजेना. पण ज्यांच्या वयाची वीस वर्षे देखील पूर्ण झाली नाहीत, त्यांच्या वाढदिवसाचे फोटो समाजाचे स्फूर्तिस्थान या शब्दात वर्तमानपत्रात पहाण्याचे मोठे अवघड काम सामान्य नागरिकांच्या नशिबी दुर्दैवाने आले आहे आणि म्हणूनच तुमचे व सत्कार समितीचे मन:पूर्वक आभार मानून शतश: धन्यवाद देतो.

श्री. रंगरावदादा यांच्याशी माझे स्वातंत्र्य लढ्यापासून अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यांच्यासारखा अत्यंत तडफदार धाडशी पण कमालीचा स्पष्टवक्ता मित्र आजच्या जगात मिळणे मुष्किल.

राष्ट्रभक्तीत कुणालाही हार न जाणारे रंगराव, सामान्य आणि दीनदुबळा यासाठीच माझा प्राण आहे व त्यासाठी जीव झोकून देणारे रंगरावदादा हे आजच्या पिढीला खरे आदर्श ठरावेत.

रंगरावदादांच्या विचारांची झेप व शब्दांचे लालित्य त्यांच्या भाषणातून ऐकणाऱ्याला स्फूर्ति देते आणि उत्कंठा वाढवते. त्यावेळी वाटते की खरं म्हणजे रंगराव जर साहित्यिक झाले असते तर क्रांतिकारक देशभक्त नव्हेतर 'क्रांतिकारक साहित्यिक' म्हणून प्रसिद्ध झाले असते.

रंगरावदादांच्या गडगडाट करणाऱ्या, शब्दच्छलात, मानवी आत्म्याची होणारी तडफड जाणवते आणि वाटते की रंगराव ज्या कुशीत जन्माला ती माताच धन्य होय.

सौ. कल्पनादेवी यांचेशी त्यांनी केलेला विवाहदेखील असाच बंडखोर, पण समाजाला शिकवण देणारा होता.

रंगरावदादांच्या संपूर्ण जीवनात त्यांच्या पत्नीने व नंतर मुलांनी जे मानसिक सुख देवून त्यांना कृतकृत्य केले. तेही त्यांचे भाग्यच होय.

या क्रांतिकारक मित्राला माझे मनस्वी प्रणाम !

# क्रांतिवीर रंगराव पाटील

**स्वातंत्र्य सैनिक, ॲड. डी. एम्. पाटील,** कराड, जि. सातारा.

श्री. रंगराव विठ्ठल पाटील हे वाळवे तालुक्यातील शिगावचे. एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म. शिक्षण मराठी सातवी. त्यांचे इंग्रजी पाचवीपर्यंतचे शिक्षण कोल्हापूर व सातारा येथे झाले.

पसूलसचे गोविंद कुऱ्हाडे व मिरजेचे आप्पा ढेरे हे दोन प्राथमिक शिक्षक त्यांचे राजकीय गुरु. कै. दा. न. शिखरे व माधवराव बागल यांच्या विचारांचा त्यांचेवर प्रभाव. चलेजाव आंदोलनाच्यावेळी त्यांचे वय अवघे तेवीस वर्षाचे होते. त्यांचा जन्म १९ डिसेंबर १९१९ चा.

चलेजाव आंदोलन सुरु होताच त्यांनी ता. २४/८/१९४२ रोजी अंकलखोप येथे भाषण केले. त्या भाषणावर त्यांचेविरुद्ध वॉरंट निघाले. त्यांना धुळापाण्णा नवले, निवृत्ती काका, दत्तू सूर्यवंशी, पांडू मास्तर, रामानंद भारती, आप्पा, नाथाजी व जी. डी. लाड यांचा सहवास व मार्गदर्शन लाभले.

त्यांनी या सहकाऱ्यांच्या समवेत १९४२ सालीच कुंडलचा डाक बंगला पेटवून दिला. ते स्व. यशवंतराव चव्हाण यांना भेटले व नंतरच सर्वांनी वसंतदादा ग्रुपची स्थापना केली. लगेच विश्रामबाग स्टेशन जाळण्यात त्यांनी पुढाकार घेतला. तारा तोडणे, फिश प्लेटस् काढणे, कर्नाळचा पूल उडविणे व इस्लामपूरचे टपाल लुटण्याचे त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी बेडग, आरग रेल्वे स्टेशन व निमणी बंगला आणि धुळगावचा डाक बंगला पेटवला. कुपवाडच्या पाटलाला ठोकला व शेतसारा लुटला. त्यांचेवर इस्लामपूर मोर्चाची जबाबदारी होती. ती त्यांनी पार पाडली. त्यांना पकडण्यासाठी ब्रिटीश सरकारने बक्षीस जाहीर केले होते.

भूमिगताना शस्त्रे खरेदीला पैशाची गरज होती. म्हणून त्यांनी बेडगचे बडे सावकार कुलकर्णी यांच्या वाड्यावर धाड घातली. सावकार त्यांचेवर बंदूक रोखली. परंतु त्यांनी शिफायतीने बंदूक हिसकावून घेतली व त्यांची तिजोरी फोडली. तिजोरीत अनेक दस्तऐवज होते. ते जाळून टाकले. कागवाडच्या जिनिंग फॅक्टरीवर वसंतदादा, जी. डी. लाड, धोंडीराम माळी यांचे नेतृत्वाखाली धाड घातली. या धाडीचे वेळी एक बंदूकधारी पोलीस क्रांतिकारकांना सामील होता. फॅक्टरीची तिजोरी फोडली. त्यात पंच्याहत्तर हजार रुपये मिळाले. कुत्री भुंकू लागल्यामुळे गणेशवाडी येथील बँक लुटीचा व इतर अडचणींमुळे रत्नागिरीच्या कस्टम खाताचा पैसा बेळगावजवळ लुटण्याचा प्रयत्न मात्र असफल झाला.

सर्व धाडी सत्र हे रात्रीच्या अंधारात चालत असे. जमलेला पैसा घेऊन पणजी व मडगाव येथून बंदुका, रायफली, रिव्हॉल्व्हर व काडतुसे खरेदी केली.

कोल्हापूरात वसंतदादा, पांडू मास्तर, आण्णा पाडळकर, रंगराव पाटील हे चर्चा करीत असताना पोलीसांनी धाड टाकली. पांडू मास्तरच्या फौजदाराने छातीवर पिस्तूल रोखले. एवढ्यात ते सटकले. वसंतदादांनी पोलीसांना चहा करायच्या कामास लावले व शौच्याला जाऊन येतो असे सांगून वसंतदादाही निसटले व रंगरावही निसटले.

कोल्हापूरात निर्माता, दिग्दर्शक व प्रख्यात नट मा.विनायक, दिग्दर्शक दिनकर द. पाटील व प्रसिद्ध अभिनेत्री रत्नप्रभा यांनी भूमिगतांना आश्रय दिला व

सहाय्य केले.

सांगली तुरुंग फोडून दि. २४ जुलै १९४२ या दिवशी वसंतदादा व त्यांचे चौदा सहकारी बाहेर आले. पण सर्वांना अटक झाली. त्यानंतर दादांचा ग्रुप सुटला व ते पांडू मास्तर, नागनाथ नायकवडी, निवृत्ती काका यांच्या ग्रुपमध्ये गेले. नंतर रंगरावांना पकडून त्यांचेवर पोलीसांनी खटला भरला. त्यात ते निर्दोष सुटले. म्हणून त्यांना ब्रिटीश सरकारने नाशिक कारागृहात ऑक्टोबर १९४४ ते १८ डिसेंबर १९४५ पर्यंत स्थानबद्ध करुन ठेवले.

कारागृहातून सुटल्यानंतर त्यांनी वाळवे तालुक्यात दारुबंदी जारी केली व न्यायदान सुरु केले. सखाराम बारबटे, ज्ञानू कुंभार, शिवा महार वगैरे दरोडेखोर व लुटारुंचा बंदोबस्त करण्यात किंवा ठार करण्यात पुढाकार घेतला. खऱ्या अर्थाने ग्रामराज्याची कल्पना प्रत्यक्षपणे सुरु केली.

सध्याच्या स्थितीबद्दल ते म्हणतात, सत्याचा विपर्यास झाला, राजकारणात गुन्हेगारी शिरली, प्रामाणिकपणा बाजूला राहिला. गुंड तयार झाले. बाई-बाटलीबाज टोळ्या गावोगाव तयार झाल्या.

महात्मा गांधी १९४७ मध्ये म्हणत होते, काँग्रेस पक्ष विसर्जित करा. पण कोणी ऐकले नाही. महात्माजींचा सल्ला योग्य होता, त्यातच स्वातंत्र्य सैनिक प्रवृत्ती पार बिघडली, असे रंगरावदादा परखडपणे आपली मते मांडीत असतात.

# क्रांतिवीर रंगरावदादा पाटील

**श्री. डी. टी. (बाळासाहेब) चिवटे,** मिरज, जि. सांगली,
किसान-लोकनायक वृत्तपत्राचे संपादक, प्रकाशक, मालक.

क्रांतिवीर रंगरावदादांना मी ओळखत आहे. पण त्यांचे सहवासात जाण्याचा योग मला आलेला नाही. माझ्या आयुष्यात त्यांचे दर्शन व भाषण ऐकण्याचा योग मिरज येथे स्वातंत्र्य सैनिकांचा मेळावा भरला त्यावेळी आला होता. कै. क्रांतिवीर नाना पाटील यांचे सहकारी म्हणून रंगरावदादा कार्य करीत होते. त्यापुर्वीपासून मी कै. भाई माधवराव जी. बागल व रत्नाप्पा आण्णा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली इचलकरंजी जहागिरीत कार्य करीत होतो.

दे. भ. क्रांतिवीर रंगरावदादांचे कार्य-ओजस्वी व तेजस्वी भाषणे वृत्तपत्रातून वाचून त्यांच्या कर्तबगारीची जाणी झाली. इस्लामपूरचा त्यांचा मोर्चा. त्यात बळी पडलेल्या मुलाचा मृत्यू त्यावरुन त्यांनी केलेले भाषण मुडद्यालाही चेतना देणे झाले प्रभावी झाले.

त्यांच्या त्यागावर-कर्तबगारी सत्ता भोगणारे पार हरकून गेले होते. त्यांचे त्यावेळचे भाषण म्हणजे समाज जागृती करणारे स्फुलींग ठरले.

पदरचे पैसे देऊन स्वत:चा सत्कार करवून घेणाऱ्या आजच्या पुढाऱ्याच्या जातीचे, क्रांतिवीर रंगरावदादा पुढारी नाहीत. माझा अल्पपरिचय, माझे वयोमान त्यांचेपेक्षा जादा असले तरी त्यांचे थोर क्रांती कार्याबद्दल मी स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांना दिर्घायुरारोग्य व दिर्घायुष्य लाभो अशी परमेश्वर चरणी प्रार्थना !

# एक सच्चा मित्र

**श्री. के. डी. (नाना) पाटील,** अंकलखोप, ता. पलूस, जि. सांगली.

क्रांतिसिंह नाना पाटील यांनी सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारची स्थापना करुन एका वेगळ्या प्रकारच्या तंत्राचा, पुढारीपणाचा आणि विचारांचा आविष्कार घडवून आणला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारमध्ये राहून स्वातंत्र्यासाठी लढा देणाऱ्या अनेक धडाडीच्या सेनानीपैकी क्रांतिवीर रंगरावदादा पाटील हे एक होत. त्यांच्याबद्दल चार शब्द.

क्रांतिवीर रंगरावदादा यांचे आजोळ अंकलखोप येथील. आमच्या भावकीतच आहे. दादा व मी प्राथमिक शाळेत दुसरी व तिसरीपर्यंत शिकत होतो. त्यांची प्रकृती पहिल्यापासूनच सुदृढ, कृती निर्भिड व धाडसी होती. पुढे ते शिक्षणासाठी शिगावला गेले. नंतर ते राजकारणात पडले. आणि गांधी चळवळीत त्यांनी भाग घेतला. १९४२ च्या लढ्यात फरारी होऊन क्रांतिसेनानी वसंतरावदादा पाटील, नागनाथ (आण्णा) नायकवडी, जी. डी. लाड, धोंडीराम माळी, पांडू मास्तर यांच्याबरोबर त्यांनी उडी घेतली. नाना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या सेनानींनी संपूर्ण सातारा जिल्हा ब्रिटीश अंमलाखालून जवळजवळ मुक्त केला. तारा तोडणे, मोर्चे काढणे, पोस्ट ऑफिस लुटणे, रेल्वे स्टेशन जाळणे, रेल्वे लुटणे इत्यादी क्रांतिकार्यात दादांनी भाग घेतला होता. त्याचप्रमाणे प्रत्येक गावातील गुंडांची यादी करुन त्यांना शासन केले. गोरगरिबांची या गुंडांच्या अन्यायातून मुक्तता केली. त्याचप्रमाणे वाळवे तालुक्यातील गुंडांचा बीमोड केला. अनेक गावातून दारुबंदी केल्या. त्यांच्या गावात शिगावला २५ वर्षे दारुबंदी कायम होती. ती दादांच्यामुळेच. दादा पिणाऱ्यांना दादांची इतकी दहशत होती की, दादा दृष्टीस पडताच दारु पिणारा पळून जात असे. अशाप्रकारे गांधीवादातील आदर्श ग्रामराज्य बनविण्यात दादांचा मोठा वाटा होता.

रंगरावदादा अत्यंत स्पष्ट वक्ते होते. स्वाभिमानी व निःस्पृह. त्यामुळे त्यांचे स्वार्थी लोकांशी कधीच पटले नाही. परिणामी स्वातंत्र्यानंतर दादांसारखा एक सच्चा देशभक्त व कार्यकर्ता मागे पडला. पण दादांच्या रक्तातील लढाऊपणा कायम राहिला. त्यांना अन्यायाबद्दल चीड व सत्याची चाड दांडगी म्हणूनच दादांनी स्वातंत्र्यानंतरही सत्याग्रह करणे व इतर कार्यक्रम हाती घेतले. इस्लामपू येथे त्यांनी काढलेल्या एका मोर्चात त्यांचा मुलगा राजेंद्र हा गोळीबारात हुतात्मा झाला. ही अत्यंत दुःखद घटना दादांच्या जिव्हारी लागली. अन्यायाविरुद्धच्या लढ्यात दादांना आपला मुलगा गमावावा लागला.

रंगरावदादा जिल्हा स्वातंत्र्य सैनिकांचे प्रमुख होते. आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्यासाठी ते सतत लढले. दादांच्या या देशसेवा कामात त्यांच्या पत्नी सौ. कल्पनादेवी वहिनी यांचाही मोठा त्याग आहे. मोठे योगदान आहे. त्यांनी प्राथमिक शिक्षिकेची नोकरी करुन घर सांभाळले. मुलांना शिक्षण दिले. त्यांचा

मोठा मुलगा क्रांतिकुमार ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर येथे प्रिन्सिपॉल आहे. त्यांनीही घराण्याचे नाव कमावले आहे. रंगरावदादांच्या लग्नाला घरी विरोध होता. परंतु कर्मवीर भाऊराव आण्णांनी त्यांचे लग्न स्वत: लावून दिले. दादांचे जीवन त्यागाच्या व आचार विचारांच्यादृष्टीने अत्यंत समृद्ध आहे. त्यांची मुले, नातवंडे असे सुखी कुटुंब आहे.

दादांना लौकिकदृष्ट्या मोठी पदे जरी प्राप्त झाली नाहीत तरी त्यांचे जीवन गांधीवादी व आदर्शवत असेच आहे. ओजस्वी व खणखणीत वाणी, स्पष्टवक्तेपणा, धाडशी-करारी व बेडर वृत्ती, नि:स्पृहता, लढाऊपणा इत्यादी त्यांच्या अंगभूत गुणांमुळे रंगरावदादांच्या नावास एक प्रचंड दबदबा आहे. १९४२ च्या लढ्याच्यावेळी वसंतदादा फरारी होते. यावेळी ते कोल्हापूर येथील गंगावेस येथे लपून राहिले होते. मी त्यावेळी कॉलेजला असताना त्यांचे पाहुणे व नातेवाईकांना गुप्तपणे त्यांना भेटण्यासाठी घेऊन जात होतो.

स्वातंत्र्यासाठी लढा देत असताना दादांनी स्वातंत्र्यातील अनेक मधुर स्वप्ने पाहिली होती. पण स्वातंत्र्यानंतर त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला. भारतीय समाजातील विषमता, राजकारणातील संधीसाधूपणा, स्वार्थीपणा, लबाडी, ढोंगबाजी, भ्रष्टाचारीवृत्ती व हुजरेगिरी यामुळे देश आज गांधीजींच्या शिकवणुकीपासून दूरदूर जात असलेला पाहून दादा अनेकदा दु:खी, कष्टी झालेले मी पाहिले आहे. तथापि ते निराश झालेले आहेत असे मात्र मुळीच नाही. आज वयाच्या ८० व्या वर्षीही ते नवा देश उभारण्याच्या कामी नव्या उमेदीने लढा देण्याची मानसिक तयारी दाखवितात.

दादा माझे नातेवाईक आहेत, पण त्यापेक्षा ते माझे एक सच्चे मित्र आहेत. एक सच्चा देशभक्त आहे याचा मला सार्थ अभिमान वाटतो. गेल्या ५० वर्षाहून अधिक काळ आमची मैत्री टिकून आहे याचा मनस्वी आनंद वाटतो.

दादा व दादांच्या कुटुंबियांना दीर्घायुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना. दादांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त त्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा ! शतश: धन्यवाद !

# कार्यकर्त्यांनी नवा मार्ग शोधवा ! - श्री. रंगरावदादा

आम्ही स्वातंत्र्य का मिळवले ? कशासाठी गोळ्या खाल्ल्या ? असे अनेक प्रश्न आम्हा स्वातंत्र्य सैनिकांना भेडसावीत आहेत. निदान सांगली जिल्ह्यातील सर्व स्वातंत्र्य सैनिकांनी एकत्र येवून नव्या पिढीला नवा मार्ग दाखविणेचा प्रयत्न केला पाहिजे. माझ्या सुचनेचा विचार आपण सर्वांनी जरुर करावा.

**मार्ग बदलावा लागेल.**

सन १९४९ साली काँग्रेसने आता कामाची पद्धत बदलली पाहिजे असे म्हणत होतो. अलिकडे वसंतदादांना ते पटल्यामुळे तेही म्हणून लागले आहेत. पक्षात मरगळ आली आहे, कामाची पद्धत बदलली पाहिजे.

आमच्या स्वातंत्र्य सैनिकांची पिढी संपल्यानंतर राष्ट्रप्रेम शिल्लक राहील कां ? याची आम्हाला शंका येते.

(संदर्भ : **दै. अग्रदूत** दि. १९/१०/१९८८.)

# निर्भिड सच्चा कार्यकर्ता

**श्री. विमलनाथ रामचंद्र शेटे,** स्वातंत्र्यसैनिक, वाटेगांव, ता. वाळवा, जि. सांगली.

भाई रंगरावदादा यांचे नाव माहीत नाही असा माणूस सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात सापडणार नाही. स्पष्ट बोलणारा, कोणापुढं अकारण मान न झुकविणारा, सत्याची बाजू घेऊन सतत झगडत राहणारा आणि भल्या भल्यांचे काळे बुरखे फाडून चिंद्या करणारा, एका मोठ्या मनाचा पोलादी माणूस म्हणूनच भाई दादांना आम्ही ओळखतो.

दादांच्या वयाला आज २५ डिसेंबर रोजी ८० वर्षे पूर्ण होऊन ते ८१ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत.

हातात बॅग घेऊन सांगली, कोल्हापूर व साताराच्या डांबरी रस्त्यावरुन दादा झपाझप पावले टाकीत चालू लागले म्हणजे सहज त्यांच्याकडे लक्ष लागते. भरदार शरीराप्रमाणे त्यांना दिलेला पहाडी आवाज आणि ह्या आवाजात त्यांची पल्लेदार भाषणे ऐकताना कोणताही माणूस पेटून उठल्याखेरीज राहिला नाही.

भाई दादा सांगली जिल्ह्यातील ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक आहेत. त्यांच्या बालपणाकडे वळून पाहिले तर त्यांचे संपूर्ण जीवनच स्फूर्तिदायक असेच घडलेले आहे. दि. २५ डिसेंबर १९१९ रोजी भाई रंगराव दादांचा जन्म 'अंकलखोप' या ठिकाणी झाला. त्यांचे संपूर्ण नाव 'रंगराव विठ्ठल पाटील', 'भाई रंगराव दादा' या नावाने महाराष्ट्राला परिचित. ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष कै. व्ही. टी. पाटील त्यांचे चुलते. प्रा. शिक्षण 'शिगाव' येथे पूर्ण झाले आणि मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या वटवृक्षाच्या छायेखाली झाले. विद्यार्थी दशेपासून ह्यांना सार्वजनिक कार्याची आवड लागली. गोरगरिबांची सेवा करण्यात व इतरांना मदत करण्यात दादांना आनंद मिळत असे. दादांचे शिक्षण चळवळ स्वभावामुळे पूर्ण झाले नाही. ह्यांच्या रुपाने 'एक समाज सेवक' समाजाला मिळाला हे मात्र विसरुन चालणार नाही. गरीब व अस्पृश्य समाजावर कोणी अन्याय केला तर ते दादांना कधीही सहज होत नाही. गावातील एका स्पृश्य समाज कंटकाने अस्पृश्य महिलेची छेड काढल्यानंतर त्यास बेदम मार देवून तिची सुटका केली. पुढे काय होणार याची चिंता त्यांनी कधीच केली नाही. समोर डोंगराएवढी संकटे आव्हान देऊन उभी होती. तरी न डगमगता निर्भयपणे सामोरे गेले. 'लाथ मारीन तिथे पाणी काढीन' ही त्यांची हिम्मत होती. म्हणूनच ते आयुष्यभर बेडरवृत्तीने जगले. कोणाची भीडभाड बाळगली नाही. ती त्यांना बाळगण्याचे कारण नाही. स्वत: ते सदाचारी निर्मळ आहेत. कोठेही त्यांचा हात भ्रष्ट झालेला नाही.

म. फुले, लो. टिळक, आगरकर व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा जबरदस्त पगडा मनावर खोलवर रुजलेला आहे. १९४२ च्या 'चले जाव', स्वराज्य प्राप्तीच्या लढ्यात त्यांनी केलेली कामगिरी इतिहासात लिहून ठेवावी अशी तेजस्वी अशीच आहे. क्रांतिसिंह नाना पाटील, रामानंद भारती, वसंतदादा पाटील, बर्डे गुरुजी, पांडू मास्तर, भाई माधवराव बागल, यशवंतराव चव्हाण यांच्या समवेत राहून त्यांनी केलेले काम स्फूर्तिदायक आहे.

प्रतिसरकार स्थापनेतही दादांचा मोठा सहभाग होता. गटवार पद्धतीने प्रतिसरकारची कामे होती. आपआपला गट स्वतंत्र विचाराने काम करीत होता.

दादांचा स्वतंत्र गट होता पण तो सर्व गटांशी संबंध ठेवून, आपल्या स्वतंत्र विचाराने काम करु लागला. काही गटांनी सरकारी कचेरी मोर्चे नेण्यास सुरुवात केली. इस्लामपूर मोर्चाला पाठिंबा मिळविण्यासाठी भाई दादा व त्यांचे सहकारी यांच्यावर काही गावांची जबाबदारी दिली होती. गावोगावी प्रचार करण्यात दादा सर्व आघाड्यांवर होते. पहाडी आवाजात तासन्तास भाषणे ऐकणारी जनता पेटून उठत असे. हजारो लोकांना जागे करुन स्वातंत्र्यासाठी लढा देण्यासाठी भाई दादांनी स्फूर्ति दिली. प्रेरणा दिली. परिवर्तनशील भाषणाच्या ओघाने समाज प्रभावित होऊन राजकीय प्रवाहात आपोआप सामील होई. लहान-थोर-स्त्री-पुरुष कामे बाजूला ठेवून धावत-पळत भाषण ऐकायला येत. ७ सप्टेंबर १९४२ रोजी मल्लिकार्जुन टेकडीवर दादांची सभा झाली. त्याला तोड नाही. मोर्चाचे नियोजन व लोकांचे मनोधैर्य वाढविणे हे दादांच्याशिवाय कोणाला जमले नाही. एवढ्यावरच दादा थांबले नाहीत तर स्वत: त्यांनी सांगली संस्थान हद्दीतील नांद्रे रेल्वे स्टेशन जाळण्यात सहभागी झाले. जेथे संधी मिळेल तेथे धावत जाऊन दादांनी अनेक ठिकाणी सरकारी रेकॉर्ड जाळणे, तारा तोडणे, आगगाड्या पाडणे इत्यादी धाडसाची कामे त्या कठीण प्रसंगी वेगवेगळ्या ठिकाणी स्वयंस्फूर्तीने पार पाडली. प्रतिसरकारने व्यापलेल्या ५०० ते ६०० गावांच्या टापूत अत्यंत मोलाची कामगिरी केली. या भागात प्रतिसरकारचा स्वतंत्रपणे राज्य कारभार सुरु झाल्याने एकंदरीत लोकांचे जीवन वित्त व अब्रू यांचे संरक्षण प्रतिसरकारकडून होऊ लागल्याने त्यास जनतेचा संपूर्ण पाठिंबा मिळू लागला. क्रांतिवीर बर्डे गुरुजी, नाना पाटील, पांडू मास्तर व भाई रंगरावदादा यांनी जी प्रतिसरकारची कामे केली त्याला तत्कालीन सातारा जिल्ह्यात तोड नाही. प्रतिसरकार-ग्राम स्वराज्य हे ह्यावेळचे सूत्र होते. गावोगावी न्यायदान मंडळे स्थापन करणे, हुंडा न घेता लग्ने करणे, दारुबंदी, अस्पृश्यता निवारण इ. विधायक कामे चालू होती. दादांनी तर सामाजिक विषमतेविरुद्ध बंड पुकारले होते. दादा हे सर्व करीत असताना ब्रिटीशांची करडी नजर त्यांच्यावर होती. दादांना काहीवेळा क्रिमिनल गुंडांशीही सामना करावा लागे. परंतु दादांची शरीरयष्टी पाहिल्यानंतर गुंडांना दहशत बसत होती. तरी पण इंग्रज व गुंड यांच्या संयुक्त आघाडी समोर न डगमगता सामोरे गेले. अखेर ब्रिटीशांनी अचानक छापा घालून इस्टेट जप्त केली. आणि दिनांक ११/१०/१९४२ ते २०/११/४५ या मुदतीत त्यांच्यावर वॉरंट बजावण्यात आले व त्यांना जिवंत पकडून देण्यासाठी रु. ५००/- ब्रिटीशांनी बक्षीस जाहीर केले. परंतु ते सापडले नाहीत. पुन्हा त्यांच्यावर पोलीसांनी छापा टाकून दिनांक २४ जुलै १९४५ रोजी अटक करुन आष्टा येथे लॉकअपमध्ये नंतर नाशिक-येरवडा जेलमध्ये ठेवले. १ व २ महिने कारावास भोगला. १८ डिसेंबर १९४६ रोजी सुटका झाली.

दादांचे एक ध्येय होते ब्रिटीश सत्ता खिळखिळी करणे. ह्याशिवाय स्वराज्य प्राप्तीचे ध्येय साकार होणार नाही. तुरुंगात होते तरी जेलमधील नेत्यांबरोबर सतत विचार विनिमय करुन ब्रिटीश सत्ता उखडून काढण्यासाठी आपल्या तेजस्वी विचारांची धार त्यांच्यासमोर मांडीत असत. दादांची तुरुंगातील एक गमतीदार गोष्ट आहे. येरवडा जेलमध्ये राजकीय कैदी म्हणून वेगवेगळ्या बराकी होत्या. एके दिवशी बर्डे गुरुजी बाहेर येऊन सहकाऱ्यांना म्हणाले, रंगा फार तापट आहे. ह्याच्याशी जपून वागा. ह्याला मोकाट बोलण्याची सवय आहे. लेक्याबेट्याशिवाय बोलणं नाही. रंगा, येथे आपण सभा घेऊन धावपळ करुया. गुरुजी बोलले. अध्यक्षस्थानी बर्डे गुरुजी होते. सभा चालू झाली. काही सहकारी बराकीच्या खिडकीतून पहात होते. सर्वांनी तुरुंग फोडून ब्रिटीशांच्या

छावणीवर हल्ला करुया. या गोऱ्यांची थोबाडे रंगवूया. दादा, आवाशाने बोलताच ब्रिटीश पोलीसांचा पहारा असूनही धावपळ सुरु झाली. ह्यातूनही बर्डे गुरुजी व दादांनी एकेका गोऱ्याला पकडून थोबाड रंगविली. या कृत्याबद्दल दोघांना खूप त्रास झाला. बराकीमध्ये कोणाशीही संघर्ष झाला तरी पुन्हा सगळे एका ताटात जेवत. यावरुन दादांच्या तापट स्वभावात तितकेच वात्सल्य-प्रेम-जिव्हाळा दिसून येतो.

सुटका झाल्यानंतर त्यांनी ह्या दिशेने आपली पावले टाकली. दादांची झेपही गरुड झेप होती. ह्याचे विचार व कार्य यात ह्यांनी कधीच फरक केला नाही. दादांची झेप लक्षात घेऊन १९४६ साली त्यांना सातारा जिल्हा काँग्रेस कार्यकारणीवर वाळवा तालुका प्रतिनिधी म्हणून घेण्यात आले. पुढे काँग्रेस पक्षात ऑन. सेक्रेटरी म्हणूनही काम केले. १९४६ ते १९४८ या कालावधीत काँग्रेस संघटना बळकट केली. ह्यांच्या भाषणाने-विचाराने काँग्रेस संघटनेचा पाया मजबूत झाला. म. गांधींचा वध १९४८ साली झाल्यानंतर काँग्रेसमध्ये घटनात्मक बदल झाला. प्रभावी नेतृत्व करणारी मंडळी काँग्रेसमधून बाहेर पडली. दे. भ. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, खाडीलकर, तुळशीदास जाधव, भाई माधवराव बागल, क्रांतिसिंह नाना पाटील व भाई रंगराव दादाही बाहेर पडले. यांच्याबरोबर 'शेतकरी कामगार पक्ष' स्थापन करुन काम करु लागले. समाजातील अन्याय, सावकारशाही, काळाबाजार, भ्रष्टाचार, वशिलेबाजी याविरुद्ध दादांनी घणाघाती हल्ले चढविले. आजही त्यांचे तेच चालू आहे. शे. का. पक्षाच्या नेत्यांनी त्यांना कधीच दूर ठेवले नाही. त्यांची ढाल पुढे करुन सभा जिंकल्या. सत्ता मिळविली. बराचसा कालखंड शे. का. पक्षात गेल्याने 'भाई रंगराव दादा' म्हणून लोकप्रियता मिळवून महाराष्ट्र त्यांना ओळखू लागला. कर्मवीरांच्या पुढाकाराने त्यांचा १९४७ साली त्यांनी आर्थिक दुर्बल घटकातील सातारा येथे 'कल्पनादेवी' या मुलीशी विवाह केला. १९५४ साली गावातील सहकारी संस्थेत लक्ष घालून उत्तम कामगिरी करुन दाखविली. सतत अ वर्गात सोसायटी ठेवून ४ ते ५ लाखाची इमारत उभी केली. कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेमार्फत वाळवे तालुक्यात अनेक ठिकाणी हायस्कूल काढून मुला-मुलींची शिक्षणाची सोय केली. त्यांनी शिक्षण क्षेत्रातील बहुमोल कामगिरी केली. वारणा सह. साखर कारखाना उभारणीतही त्यांचा सिंहाचा वाटा आहे. विविध संस्थांच्या माध्यमातून विधायक कार्याचा डोंगर उभा केला. वारणा कारखान्यात सत्ताधारी शेतकरी सभासद व भ्रष्टाचार यातला संघर्ष अगदी टोकाला गेला होता. त्यावेळी दादांनी एक नैतिक जबाबदारी म्हणून दोघांनाही योग्य न्याय मिळवून दिला.

शे. का. पक्षात एकोपा न होण्याने मतभेद वाढले. दादांना ते आवडले नाही. आणीबाणीनंतर पुन्हा काँग्रेस प्रवेश केला. काँग्रेसला वाहून घेतले. ग्रामीण भाषेत त्यांची वक्तृत्व कला चांगली असल्याने शे. का. पक्षाचे आद्यप्रवर्तक व प्रचारक म्हणून स्वातंत्र्य सैनिक सन्मान समितीवर त्यांची निवड झाली. सदस्य, अध्यक्ष व गौरव समितीचेही काम पाहिले. स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन मिळवून देण्यातही त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

सध्या ते ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष आहेत. दादा ज्या ज्या पदावर गेले, त्या त्या पदाला त्यांनी कधी कमीपणा दिला नाही. उलटपक्षी प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. आयुष्यभर सेवेचे काम केले. पण अद्यापि त्यांचेवर कोणीही भ्रष्टाचाराचा आरोप केला नाही. ते धुतल्या तांदळासारखे स्वच्छ आहेत. हीच त्यांच्या आयुष्यातील मोठी कमाई आहे. स्वच्छ चारित्र्य भ्रष्टाचाराला कायमची मूठमाती देऊन आई-दादांनी आयुष्यभर लाचारी झुगारुन देऊन आपले जीवन

गंगेच्या पाण्याप्रमाणे निर्मळ राखले आहे. बंगले, गाड्या व संपत्ती मिळविण्यात कधीच त्यांना आनंद वाटत नाही. परंतु गरिबांचे अश्रू पुसण्यासाठी धावून जाण्यात आणि भल्या-भल्यांचे खोटे मुखवटे फाडून टाकण्यात त्यांनी धन्यता मानली आहे. आज त्यांच्या ८१ व्या वर्षात त्यांच्या जीवनाची फुलबाग वृद्धिंगत होत जावो आणि शतायुष्यी होवोत अशी परमेश्वर चरणी प्रार्थना आहे.

# शिवधडीचे दादा

• **श्री. एस्. बी. शेटे,** बी. ए. (ऑ.) एलएल. बी., जज्ञ (सेवानिवृत्त), सांगली

रंगरावदादा वयाच्या १४ व्या वर्षी म्हणजे १९४२ साली प्रथम भेटले. ते एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व म्हणूनच! उंच, धष्टपुष्ट शरीरयष्टी, पहाडी आवाज, वक्तृत्वात स्फुल्लिंग प्रखर राष्ट्राभिमान आणि रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग जाणवून देणारे.

नायगारा धबधब्यासारखे ओजस्वी वक्तृत्व, गुलामगिरीविरुद्ध तरुणांना पेटून उठवण्याला कारणीभूत होत राहिले. तासन्तास तुफानी सभा एकामागे एक होत राहात. आम्ही त्यांच्या मागे झपाटल्यासारखे गावोगावी, रानामाळावर, ऊन पावसात, दिवसरात्र भारत मातेचा जयजयकार, वंदे मातरम्, छत्रपती शिवाजी महाराज, म. गांधी, पं.जवाहरलाल नेहरुंचा जयजयकार, सेवा दलाच्या कवायती, गावोगाव दादांचे मार्गदर्शन, स्फूर्ती देई. तेच आमचे हीरो होते. हजारों तरुणांना त्यांनी राष्ट्रसेवेसाठी त्याग करायला प्रवृत्त केले. स्वत:च्या व कुटुंबाच्या सौख्याचा विचारही केला नाही.

क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, दादांच्यामुळे त्यांच्याबरोबर आमच्या सेवादल शाखेवर येत, बोलत. दादा-नागनाथ-एन्. डी. पाटील आदिंचा आमच्या घरी जवळून परिचय-आदर सत्कार व्हायचा.

आमचे बागणीतले घर कै. भीमराव-रघुनाथ-शामराव हवालदार यांचे वडील दत्तात्रय रामचंद्र शिंदे-हवालदार यांच्या शेजारीच. सौ. कल्पनादेवी पूर्वी वत्सलाताई, रघुनाथ माझ्या वयाचा. वत्सला थोडी लहान. अंगापिंडाने मजबूत. उजळ वर्णाची, उठावदार, नीटस् आकर्षक चेहऱ्याची आणि शाळेत हुषार. घरात सौजन्यपूर्ण, आनंदी वातावरण. दादांनी देशभक्तीचे व्रत घेतले तसे रघुनाथच्या बहिणींशी विवाहबद्ध होण्याचा शब्द तडीला नेला. दादांचे घराणे आर्थिक सुबत्ता, कीर्ती, पराक्रम, नावलौकिक त्यांनी आपल्या निर्णयाआड येऊ दिला नाही. हे त्यांच्या मोठ्या मनाचे, दृढनिश्चयाचे द्योतक होते. कर्मवीर भाऊराव पाटील (आण्णा) यांचे वधुवरांना शुभाशिर्वाद लाभले.

ज्ञानेश्वर माऊलीने एका ओवीत म्हटले आहे

*कोंभागी लवलव। सांगे भूमीचे मार्दच॥*
*ते का आचार गौरव। सकुलिनांचे॥*

बियाणे, भूमी, सुपीकता, कोंभाच्या रंग, रुपाचे हालचालीवरुन समजते. खडकावर तेज:पुंज, कसदार, पाणीदार, दाणेदार पीक कसे दिसणार. रंगरावदादा-वत्सलाताईच्याच पोटी शेतकरी मोर्च्यात बळी पडलेला सिंहाचा बछडा जन्मला होता.

*दूध आमुच्या आईचे मनगटात खेळे।*
*या खुशाल रोखा आमुच्या छातीवर भाले॥*

डॉ. प्रा. एन. डी. पाटील यांचे बंधू शंकरराव यांचा ढवळीतला मिसरुड न फुटलेला पुत्रही त्या लढ्यात वीरगती प्राप्त करता झाला. मुला-मुलींनी दादा-ताईंच्या बुद्धिवादी देशसेवेचा वारसा पुढे चालू ठेवलाय.

चि. सौ. वत्सला (सौ. कल्पनादेवी) आपल्या मदतीचा हात केवळ माहेरच्याच नव्हे तर, परिचित-अपरिचितांनाही देत राहिली आहे. माझी आई पार्वतीबाई (आऊ) आणि वडील कै. भाऊराव शेटे व चुलते कै. द. म. शेटे यांचा द. रा. हवालदार यांच्या सर्व मुला-मुलींवर लोभ-माया. ते दररोज सायंकाळ त्यांच्या दुमजली इमारतीच्या कट्ट्यावर बैठक मारायचे. हवालदार शिंदे यांचा मोठा जमीन जुमला, बैल-गाई नव्हे, हजार मेंढरेही होती. सौ. कल्पनाताईंची एक बहीण बडोद्याला मोठ्या घराण्यात दिली होती. ती केंव्हातरी बागणीस यायची. आमचे कोड-कौतुक करायची. माझ्या जावळाला विंचरुन वेण्या घालून तिने काढलेला एक फोटो आमचे घरी साठ वर्षे होता. हिमालयाची सावली वत्सला. तिने दादांना समर्थ साथ दिली. सातारला कर्मवीरांच्या छायेत मी, वसंतराव पाटील (माजी जिल्हा प्रसिद्धी अधिकारी) वगैरे राहिलो. शिकलो. वाढलो. दादा सार्वजनिक कामात, आम्ही नोकरीत. तीस वर्षे जज्ञ म्हणून काम करुन सेवानिवृत्त झाल्यावर आजही दादा बाबांण्णा म्हणून कुठूनही मोठ्याने हाक देतात आणि एरव्ही बहात्तर वर्षे वयाचा टेंभा वाटत असला तरी दादांची नाबाद ऐंशी-बॅट-इन-हँड पाहिल्यावर नम्रतेने दोन्ही कर जुळतात.

# एक स्वातंत्र्य सेनानी

**श्री. गणपतराव कोळी,** स्वातंत्र्यसैनिक व माजी आमदार, तासगांव, जि. सांगली

श्री. रंगराव पाटील हे जहाल पुरोगामी विचारवंत आहेत. १५० वर्षांच्या गुलामगिरीतून भारत स्वतंत्र करण्याचे अखेरचे यशस्वी आंदोलन महात्मा गांधींच्या 'छोडो भारत' या घोषणेने सुरु झाले.

भगतसिंगसारख्या थोर हुतात्म्याच्या त्यागाने आणि महात्मा गांधींच्या आदेशाने प्रेरित होऊन रंगराव दादांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. सातारा जिल्ह्यात क्रांतिकारकाचे बरेच ग्रुप कार्यरत होते. त्यापैकी वसंतदादा पाटील यांच्या ग्रुपमध्ये रंगरावदादा सामील झाले.

कोल्हापूरचे पी. बी. पाटील यांच्या ग्रुपने सांगलीचे विश्रामबाग रेल्वे स्टेशन जाळण्याचा निर्णय घेतला. आमच्याकडे रिव्हाल्व्हर होती. परंतु लांब पल्ल्यांची बंदुक वसंतदादांच्याकडे असल्यामुळे वसंतदादांनी आपल्या सहकार्यांसह विश्राम बाग स्टेशन जाळण्यासाठी यावे असे त्यांना सांगितले. ठरल्यावेळी रात्री २ वाजता वसंतदादा आपल्या दोन सहकार्यांना घेऊन नेमगोंड पाटलाच्या मळ्यात आले. त्यावेळी प्रथमच मी बंदुकधारी रंगराव दादांना पाहिले.

कोल्हापूरचे पी. बी. पाटील, मी, खोत, बाबूलाल स्वरुपचंद शहा, के. के. जोशी, विठ्ठल शिंदे इत्यादी सहकार्यांसह विश्रामबाग स्टेशनंला गराडा घातला. स्टेशनमधेच बाकावर झोपलेल्या गँगमनच्या छातीवर फेटाधारी मिशावाले वसंतदादा भाला लावून उभे राहिले. सांगली शहराकडून पोलिस येण्याची शक्यता असल्यामुळे सांगलीच्या दिशेला बंदूक रोखून हिंदुराव पाटील उभे राहिले आणि आम्ही रेल्वे स्टेशनच्या सर्व भागाचा रॉकेलचे बोळे लावून स्टेशन पेटवून दिले आणि वसंतदादा, रंगराव पाटील पद्माळ्याला निघून गेले. आणि मी सहकाऱ्यांसह बाजूने आमच्या राहण्याच्या गुप्त ठिकाणी पोहचलो. मला जेव्हा जेव्हा रंगरावदादांची आठवण येते, त्यावेळी प्रथम सांगलीकडे बंदुक रोखून धरलेले विश्रामबाग स्टेशन वरील रंगरावदादांची प्रतिमा माझ्या डोळ्यासमोर उभी राहते. रंगरावदादांनी स्वातंत्र्य लढ्यात तळहातावर शिर घेऊन लढले. देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य लढ्यातील रंगरावदादा यांचा त्याग अतिशय ऐतिहासिक महत्त्वाचा आहे. वसंतदादा यांच्याबरोबर भूमिगत बार्शी लाईट रेल्वेची ३ स्टेशन जाळली.

स्वातंत्र्यानंतर रंगरावदादा आणि मी समाजवादी पक्षात काम करु लागलो. त्यांच्या पुरोगामी विचाराचा आणि प्रभावी वक्तृत्वाचा श्रमजीवी जनतेवर मोठा प्रभाव पडत होता.

काही वर्षांनी ते शेतकरी कामगार पक्षात गेले. त्याकाळात शेतकरी कामगार पक्षाने महागाईविरुद्ध मोर्चा आंदोलन सुरु केले होते. इस्लामपूर येथील मोर्चावर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात रंगरावदादांचे चिरंजीव ठार झाले. या घटनेचे महाराष्ट्रभर पडसाद उमटले. त्यांच्या चिरंजीवाचा मृत्यू हा रंगराव दादांच्या जीवनातील एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना होती.

रंगरावदादांचा जन्म अंकलखोप येथे कृष्णानदीच्या काठावर झाला आणि त्याचे पुढील जीवन वारणा नदीच्या काठावर झाले आणि शिगाव

येथे विकसित झाले. कृष्णानदीच्या संथ प्रवाहाचे विधायक विचारधारा आणि वारणा नदीच्या खोऱ्यातील जहाल क्रांतिकारक विचाराचा संगम रंगरावदादांच्या जीवन प्रवासात दिसून येतो. स्वातंत्र्य सैनिकांच्या मेळाव्यात आणि जनतेच्या जाहीर सभेत ते जेव्हा भाषण करीत असतात तेव्हा त्यांचे विचार आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे लोक मंत्रमुग्ध होतात. भारतातील पिळल्या जाणाऱ्या कष्टकरी बहुसंख्य जनतेचं शोषण थांबवून समाजवादी समाज व्यवस्था या देशात आणली पाहिजे हे रंगरावदादांचे विचार लोकांना भारावून टाकतात. सांगली जिल्ह्यात जे अनेक स्वातंत्र्य सैनिक आहेत त्यामध्ये रंगरावदादा हे सर्वात पुरोगामी विचारवंत म्हणून ओळखले जातात.

पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी दिल्ली येथे भारतातील सर्व स्वातंत्र्य सैनिकांचा मेळावा बोलाविला होता. या मेळाव्यास आम्ही उपस्थित होतो. मेळावा संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी सांगली जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांना बरोबर घेऊन मी इंदिरा गांधींना भेटावयास गेलो. रंगरावदादांची इंदिरा गांधीं यांना मी ओळख करुन दिली आणि पुढे सांगितले, ज्या स्वातंत्र्य सैनिक रंगराव दादांनी इंग्रजाशी संघर्ष केला त्याच रंगरावदादांच्या मुलांनी स्वतंत्र भारतात महागाई विरोधी मोर्चा काढला. रंगराव दादांचा चिरंजीव स्वतंत्र भारतातील आपल्या शासनाच्या पोलिसांच्या गोळीबारात ठार झाला. हे ऐकल्यावर इंदिराजींच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्या प्रसंगाने मी रंगरावदादा गहिवरुन गेलो. त्यानंतर थोड्यावेळाने इंदिरा गांधींच्याबरोबर आम्ही फोटो काढून घेतला.

स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाची स्वतंत्र भारतात पोलिस गोळीबारात झालेल्या हत्येची माहिती ऐकून इंदिराजींच्या डोळ्यात अश्रू वाहू लागलेले पाहून कदाचित रंगराव दादांच्या विचारात परिवर्तन झाले असावे आणि त्यांनी पुढे काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर रंगरावदादांनी भारतीय जनतेच्या महागाई, बेकारी, संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न अशा अनेक महत्त्वाच्या प्रश्नावरील जनतेच्या आंदोलनाचे नेतृत्व केले. शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य केले.

रंगराव दादांच्या बरोबरीचे वेगवेगळ्या तालुक्यातील स्वातंत्र्य लढ्यातील काही आम्ही स्वातंत्र्य सैनिक आमदार झालो. परंतु आमच्या पेक्षा थोर पुरोगामी विचारवंत यांना राजकीय क्षेत्रात पुढे संधी मिळाली नाही याची मला खंत वाटते. त्यांना राजकीय क्षेत्रात संधी न मिळाल्याची कारणे आहेत त्यामध्ये त्यांचे पुरोगामी विचार, वक्तृत्व हेच आडवे आले असावे.

रंगरावदादांचा निर्भय स्पष्टवक्तेपणा आजच्या राजकीय नेत्यांना कदाचित अडचणींचा वाटत असेल. त्यामुळे त्यांना आमदार, खासदार अगर इतर महत्त्वाच्या पदाची संधी मिळाली नसावी.

आज देशामध्ये लोकशाही राजवटीत भ्रष्टाचार, हिंसाचार, गुन्हेगारीकरण, आर्थिक विषमता, बेकारी वाढत चाललेली आहे. भाई रंगरावदादा हे वेळोवेळी होणाऱ्या सभेत या गंभीर प्रश्नांच्यावर प्रखर हल्ला करीत असतात.

ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी रंगरावदादा पाटील यांचे भारतीय जनतेला मार्गदर्शन लाभो, हीच सदिच्छा !

# पुत्र व्हावा ऐसा !

## शिक्षणमहर्षी, श्री. व्ही. टी. पाटील उर्फ काकाजी

**कोल्हापूरचे माजी खासदार, एकेकाळचे कोल्हापूरचे काँग्रेसचे नेते, कोल्हापूर संस्थानातील रयत सभेचे नेते, गारगोटीच्या मौनी विद्यापीठाचे संस्थापक, कोल्हापूरच्या ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक आणि अध्यक्ष मा. रावसो व्ही. टी. पाटील यांच्या लेखणीतून उतरलेला हा लेख.**

माझ्या मातोश्री माझ्या वयाच्या दुसऱ्या अगर तिसऱ्या वर्षातच आकस्मिकपणे वारल्या आणि त्यामुळे माझ्या आईचे रंगरुप, गुण काहीही मला आठवत नाहीत. पण मी थोडा मोठा झाल्यावर माझे नातेसंबंधी मी जे जे काही ऐकले त्यामुळे त्यांच्याविषयी माझ्या मनात नितांत आदराच्या आणि भक्तीच्या भावना निर्माण झाल्या. माझे पिताजी तुकाराम पाटील हेही माझ्या वयाच्या ६-७ व्या वर्षी प्लेगने मयत झाले आणि आम्ही सर्व मुले खऱ्याखुऱ्या अर्थाने पोरकी झालो. वडिलांच्याबद्दल मला थोडेफार आठवते आहे. लहानपणापासूनच मी त्यांचा लाडका होतो आणि त्यामुळेच त्यांचे बरेचसे गुण आणि स्वभाव यांचे बारकावे मला आजही आठवतात.

आई आणि वडील यांच्या पश्चात आम्ही तीन भाऊ आणि चार बहिणी यांचा सांभाळ आमचे आजोबा कै. बळवंतराव पाटील आणि आत्या श्रीमती गोजराबाई पाटील यांनीच केला. कै. गोजराबाई पाटील या बालविधवा होत्या आणि त्यांच्या प्रेमळ, सोशीक कृपाछत्राखाली आम्ही वाढू लागलो. आमचे आजोबा कै. बळवंतराव पाटील हे कडक शिस्तीचे, तापट स्वभावाचे आणि कसलेही वावगे न खपणारे अशा कठोर बाण्याचे होते. सर्व गाव त्यांच्या दराऱ्याखाली होता. महात्मा जोतिबा फुले यांच्या शिकवणुकीचा त्यांनी जाणीवपूर्वक वारसा घेतला होता असे म्हणणे धाडसाचे होईल. पण म. फुले यांच्या जीवनातील काही जीवनमूल्ये आपसूकच त्यांच्या आचरणात प्रतिबिंबित झाली होती. ते कडवे सत्यनिष्ठ होते. शिक्षणाबद्दल त्यांना फार आस्था होती. ढोंगाचा त्यांनी मनापासून तिटकारा केला आणि अशा या बाणेदार स्वभावाच्या आणि वर्तनाच्या पिळदार भीमपुरुषाच्या मार्गदर्शनाखाली आम्हा सर्व भावंडांचे शिक्षण आणि संगोपन सुरु झाले.

आमच्या आजोबांची दृष्टी हळूहळू कमी झाली आणि त्यांना वाचनाचा जो नाद होता तो त्यांना पार पाडता येईना म्हणून त्यांनी आपले दोन नातू म्हणजे मी आणि माझे चुलत बंधू रघुनाथराव यांना वेठीला धरले. रोज संध्याकाळी ते आम्हाला आळीपाळीने सक्तीने रामायण, महाभारत वाचावयास लावीत आणि स्वत: ऐकत बसत. वाचनात कुठेही चूक झाली तर चटकन ती चूक त्यांच्या लक्षात येत असे आणि आम्हाला रागावून म्हणत, ''तू वाचतो तसे असणार नाही, असे असेल. पुन्हा वाच'' आणि आजोबा म्हणत ते अगदी बरोबर असे.

गावात गैर काही होऊ नये याकडे ते कटाक्षाने लक्ष पुरवित. समाजाच्या उन्नतीच्या प्रत्येक बाबींमध्ये ते जातीने लक्ष घालीत आणि अशा कृत्याला विरोध करणाऱ्यांचा तो विरोध ते अत्यंत कडव्या धैर्याने व जिद्दीने मोडून काढीत.

आमचे आजोबा कै. बळवंतराव पाटील यांच्या प्रेरणेने शिगाव येथे १९२० च्या सुमारास सत्यशोधक समाजाची एक फार मोठी परिषद झाल्याचे मला आठवते. त्यावेळी माझे वय १९-२० वर्षाचे होते. मी स्वत: त्या परिषदेस हजर होतो. कै. केशवराव जेधे, कै. केशवराव बागडे वगैरे पुढाऱ्यांची भाषणे ऐकून त्याहीवेळी सत्यशोधक समाजाने समाजाच्या उत्थापनाचे आणि बहुजन समाजाची अस्मिता जागी करण्याचे हाती घेतलेले कार्य माझ्या मनात दृढमूल होऊन राहिले.

माझ्या आजोबांच्याकडून मी सामाजिक कार्याचा, बहुजन समाजाच्या शिक्षणाचा आणि त्यातल्या त्यात स्त्री शिक्षणाचा वारसा घेतला आणि त्यांच्या अंगी जन्मत:च असलेल्या बंडखोरीचा वारसा माझे पुतणे आणि त्यांचे पणतू चि. रंगराव पाटील यांनी उचलला. माझ्या आजोबांच्या अंगी असलेले अनेक सद्‌गुण माझे पुतणे चि. रंगराव पाटील यांच्या ठिकाणी प्रकर्षाने मला पहावयास आढळतात. तिखट जीभ, बेडर स्वभाव, अस्खलित वक्तृत्व आणि चिकाटी व जिद्द या गुणांनी चि. रंगराव यांचा पिंड भरलेला आहे.

सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे ते एकेकाळी चिटणीस होते आणि माझ्या आठवणीप्रमाणे त्यावेळी महाराष्ट्राचे आजचे एक मान्यवर नेते व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मान. वसंतरावदादा पाटील त्यांचे परम सहकारी होते. सातारा येथे रंगराव यांचा विवाह ठरण्याच्या संदर्भात दादांच्याच आमंत्रणावरुन मी साताऱ्याला उपस्थित होतो. रंगरावांच्या स्वभावामध्ये तडजोडीला कधीच जागा नाही. त्यांना जे योग्य वाटते व जे योग्य दिसते त्यांचा उच्चार आणि आचार ते नेहमीच सडेतोडपणाने करीत आले आहेत. सत्ताधारी माणसाला अप्रिय बोलणे रुचत नाही. पचत नाही. हा जन्मजात मनुष्यस्वभाव असतो हे ठाऊक असूनही कुणा सत्ताधारी माणसाची मनधरणी करण्यासाठी किंवा त्यांना बरे वाटावे म्हणून रंगराव कधीच तयार नसतात. कोल्हा तो कोल्हा आणि तो लबाड या त्याच्या प्रामाणिक मतामध्ये त्याने कधीच बदल केलेला नाही. त्या प्रमाणेच वाघ हा माणसाची हत्त्या करीत असेल तर त्या सामर्थ्यवान वाघाचे दात काढायला हात चालवायलाही त्यांनी कधीही माघार घेतली नाही. रंगराव यांनी परिस्थितीशी थोडी तडजोड केली असती तर ते महाराष्ट्र मंत्रिमंडळात यापूर्वीच चमकताना दिसले असते. पण त्यांच्या या तत्वनिष्ठ, हट्टी स्वभावामुळे आणि कधीही माघार न घेण्याच्या वृत्तीमुळे त्यांना काँग्रेस पक्ष सोडावा लागला आणि ते तेव्हापासून शेतकरी कामगार पक्षाचे एक निष्ठावान कार्यकर्ते आणि नेते म्हणून काम करीत राहिले आहेत.

१९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत रंगराव यांचे क्रांतिकार्य महशूरच आहे आणि त्यांच्या या क्रांतिकार्याचा व बंडखोर वृत्तीचा वसा घेऊन अगदी लहान वयातच त्यांचा मुलगा राजेंद्र पाटील हा सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्ये आघाडीवर राहून काम करु लागला. कष्टकरी शेतकरी व कामगार हे त्यांचे खास कार्यक्षेत्र होते. या कार्यासच त्याने आपले जीवन समर्पि केले होते. पीक पाण्याच्या आणेवारीवरुन दुष्काळी भाग जाहीर केला जातो. पण वरिष्ठास भिऊन तलाठी लोक पीकपाणी ठराविक आणेवारीपेक्षा कमी आणेवारी लावीत नाहीत, पण यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होतो. या अन्यायाचे परिमार्जन करुन घेण्यासाठी कुमार राजेंद्र व कुमार सुरेश पाटील वगैरेंनी प्राचार्य एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली वाळवा तहशील कचेरीवर संघटित मोर्चा आयोजित केला होता. पण या शांततामय मोर्चावर पोलिसांनी अकारण गोळीबार करुन चार तरुणांची नाहक हत्त्या करुन जालियनवाला बाग या ब्रिटीश कालीन हत्त्याकांडालाही लाजविले बागेसारखे

स्वराज्यात पाशवी हत्याकांड व्हावे हे देशाचे खरे दुर्भाग्य व या हत्त्याकांडात राजेंद्र यास हौतात्म्य पत्करावे लागले अशारीतीने अकाली व कुमार वयात तो हौतात्म्य पत्करुन अमर झाला.

अशा हौतात्म्य पत्करलेल्या वीराचे स्मारक होणे अगत्याचे आहे. नव्हे ते झालेच पाहिजे. जनतेच्या कृतज्ञतेचे ते द्योतक आहे. या पवित्र कार्यास माझ्या कोटी कोटी शुभेच्छा !!

# वंदे मातरम् !!

**श्री. रा. वि. पाटील,** स्वातंत्र्य सैनिक, मु. पो. पलूस, जि. सांगली

१९४३ साली विटे लॉक अपमध्ये क्रांतिवीर रंगरावदादा पाटील, क्रांतिवीर गणपतराव पाटील बिळाशी व मी राजाराम विठोबा पाटील, स्वातंत्र्य संग्राम सैनिक, पलूस असे एकत्र लॉक अपमध्ये होतो.

त्यांचे हाता-पायात साखळदंड होते. मी स्वत: राघू आप्पा लिमये, (मसूर) वि. स. पागे (तासगांव) विधान परिषद अध्यक्ष यांचे विचाराचा गांधीवादी असलेने मला बेड्याच घातल्या नव्हत्या. पण एकूणच लॉक अपमध्ये राहणेचा योग आला होता.

कचेरीत मे. मामलेदार, फौजदार व इतर नागरिक आले की, लॉक अपमधून मोठ-मोठ्याने घोषणा देत व त्यांना काम करणे. असह्य करुन सोडत.

त्यांना विट्याचे विधायक व सामाजिक कार्यकर्ते माननीय शंकररावजी भेटणेस आले असता त्यालाच अटक झाली.

बाहेर सुटून आलेवर माननीय वसंतराव दादा, यशवंतरावजी चव्हाण, बॅ. जी. डी. पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे सहवासात भूमिगत राहून कार्य केले.

१५ ऑगस्ट स्वातंत्र मिळालेवर स्वस्त न राहता सामाजिक, शैक्षणिक कार्यात भाग घेवून माननीय भाऊराव पाटील आण्णा यांचेशी सहकार्य करुन रयत शिक्षण संस्थेतही खूप कार्य केले.

सध्या सांगली जिल्हा स्वातंत्र्य संग्राम सैनिक समितीचे ते अध्यक्ष म्हणून कार्य करीत आहेत.

स्पष्टपणा, मोठा आवाज, निर्भिडपणे अनेक लहान-मोठ्या सभेत भाषणे करुन जनसागर हालवून सोडतात.

अशाप्रकारे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय या सर्व क्षेत्रात निर्भिडपणे काम करीत असलेने माननीय क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांना भरपूर आयुष्य मिळून त्यांचे भावी जीवन सुखमय, मंगल होवून, स्वत:चे व देशाचे प्रगतीचे होवो हीच शुभेच्छा !

# क्रांतिवीर रंगराव पाटील

**श्री. बापूसाहेब कुंभोजकर,** संपादक, दै. अग्रदुत, सांगली.

शिगावचे रंगरावदादा तथा श्री. रंगराव पाटील शिगावकर या क्रांतिवीरानी आपल्या वयाची ८० वर्षे पूर्ण करुन ८१ व्या वर्षाचे झाले हे जरी निसर्गाला मान्य असले तरी इतर कोणीही मान्य करणार नाही. मात्र रंगरावदादा हे नेहमीच खरे बोलत आल्याने तेच स्वत: आपणाला ८१ वे वर्ष लागले असे सांगतात. म्हणून विश्वास ठेवणे भाग आहे !

तरुण मर्दाच्या अंगातली सळसळती रग काय असते हे क्रांतिवीर रंगराव दादांच्या तडफेत आजही पहायला मिळते. ब्रिटीश साम्राज्याच्याविरुद्ध प्राणपणाने लढणारा हा क्रांतिवीर आजही अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी दंड ठोकून उभा आहे. कणखर स्वाभिमान हाच ज्यांचा बाणा आहे असे रंगरावदादा लाचारांच्या तोंडावर थुंकत आले. कुणाला बरे वाटावे म्हणून आयुष्यात एक शब्दसुद्धा न बोललेला माणूस रंगरावदादांच्याशिवाय दुसरा दाखविता येणे कठीण आहे. राज्यकर्त्यांची भाटगिरी करुन भरभक्कम झालेले कितीतरी बहाद्दूर दाखविता येतील, पण आपल्या ओजस्वी वाणीने राज्यकर्त्यांची लक्तरे फाडून त्यांना उघडेनागडे करण्याचे काम रंगरावदादांनी अविरत केलेले आहे. ब्रिटीश साम्राज्याला गेले म्हणून, त्यांच्याच अनुकरणाने चाललेली पिल्लावळ रंगरावदादांनी कधीच मान्य केली नाही. आणि आयुष्यातल्या आज अखेरच्या क्षणापर्यंत ते स्वातंत्र्यपूर्व काळात जसे क्रांतिकारक होते तसेच राहिलेले आहेत ! खऱ्या अर्थाने क्रांतिकारक म्हणवून घ्यायला आजच्या जमान्यात रंगरावदादा इतकी लायक व्यक्ती क्वचितच आढळेल.

हजारोंच्या जनसमुदायापुढे आपले अंत:करण मोकळे करुन बोलताना रंगरावदादा एखाद्या समशेर बहाद्दूरासारखे भासतात. त्यांच्या वीरांनी कितीकांचे तरी शिरकाण होत असलेले जाणवू लागते. त्यांच्या शब्दांशब्दांनी माणसाचे रक्त तापू लागते. भरदार-पल्लेदार आवाज आणि वाणीची कमालीची शुद्धता या ईश्वरदत्त देणगीमुळे ते समुदायाच्या भावना हेलावून सोडतात. या माणसाने आपली वाणी आजवर इतकी पवित्र ठेवलेली आहे की तिने कधीही उपटसुभाची स्तुतिस्तोत्रे गाऊन स्वत:ला डाग लावून घेतलेला नाही.

खरोखरीच, रंगरावदादांनी मनात आणले असते आणि त्यांनी थोडी जरी आपली कडवी जात सोडली असती तर त्यांच्या पायावर अनेक अधिकारपदे झुकत राहिली असती. पण अशी अधिकारपदे ठोकरुन लावून, आपल्या वाणीचा डमरु

कडाडून वाजविणाऱ्या रंगरावांना संहार कालीच्या शिवशंकराचे स्वरुप प्राप्त झालेले आहे. समुद्र मंथनातून निर्माण झालेले अमृत पळविणारे देव अनेक भेटतील. पण विष प्राशन करुन दाखविणारा असा रंगरावदादांच्यासारखा शंभूमहादेव एकदाच भेटत असतो.

रंगरावांनी अक्षरश: विष पचविलेले आहे. ब्रिटीशांच्या बंदुकांच्या पुढे निधडी छाती घेऊन जाणाऱ्या रंगरावदादांना स्वदेशी पोलिसांच्या गोळीबाराने आपल्या पुत्राचा बळी घेतलेला पाहणे नशिबी आले. सांगा, हे दु:ख हे हलाहल पचविणारा, पोलादाच्या काळजाचा बाप रंगरावदादांशिवाय दुसरा कोणी आहे काय ?

जर कुणी असे बाप असतील तर त्याची आणि रंगरावाची कुळी एकच आहे हे बिनधोक समजावे !

रंगरावदादा एक उत्कृष्ट शेती तज्ज्ञ, एक असाधारण व ममतेचा गृहस्थाश्रमी, एक स्नेहभावाने तुडूंब भरलेला मित्र, मानवतेचा झूळझूळता झरा, समाजवादाचा साम्यवादाचा डोळस अभ्यासू, श्रमाला मागेपुढे न पाहणारा घरंदाज, श्रमप्रेमी आणि गोरगरीबांबद्दल खरीखुरी कणवकरुणा असणारा दिलदार माणूस आज रंगरंगोटीला भाळणाऱ्या जगात मागे राहिलेला आहे. वास्तविक नावाने स्वत: ''रंगराव'' असून स्वार्थासाठी कुठलेही रंगढंग न करणारा आपल्या नावाच्याविरोधी वागणारा असा हा कलंदर माणूस बेगडी जगात खरोखरीच मागे राहिलेला आहे.

निसर्गाने त्यांच्यावर ८१ वर्षाचे ओझे लादलेले आहे. आम्हाला रंगरावांच्या आयुष्याचे फार मोठे चीज व्हायला पाहिजे होते असे वाटते. पण रंगरावदादा स्वत: मात्र आनंदी आणि कृतार्थ आहेत. आजच्या हुजऱ्यांच्या पलटणीत आपण कुठेही सहभागी नाही याचा त्यांना पोटभर आनंद आहे. देशप्रेमासाठी कर्तव्य म्हणून जे करायचे होते त्यांनी शिर तळहातावर घेऊन केले. गृहस्थाश्रमी म्हणून जी वात्सलता आणि जो पुरुषार्थ दाखवयाचा होता तोही त्यांनी प्रकट केलेला आहे. लोकांच्यादृष्टीने रंगराव उपेक्षित राहिले. पण स्वत: रंगराव तृप्त आहेत. अजूनही मनगटात पोलादाची काम्ब आहे आणि त्यांच्या धगधगत्या हृदयात त्रिशूलधारी साम्ब आहे !

नव्या तकलादू पिढीला रंगरावदादा ही आग ठाऊकच नाही. कुणी कुठे एखादा या आगीशी आपले नाते सांगणारा निपजलाच तर त्यांचा आंतरअग्नी फुलविण्यासाठी हा रंगराव दादांचा अल्पसा परिचय उपयुक्त ठरावा एवढीच अपेक्षा आहे. रंगरावदादांचे उर्वरित आयुष्य सुखा-समाधानाचे जावे म्हणून कुणी शुभेच्छा देण्याची आणि प्रार्थना करण्याचीही गरज नाही. आपल्याला हवे तसे आयुष्याला आणि यमालासुद्धा वाकवायला रंगरावदादा समर्थ आहेत. मनपूर्वक शुभेच्छा !

(संदर्भ : **दै. अग्रदूत**, दि. १९/१०/१९८२)

# एक निर्लोभ व्यक्तिमत्त्व

**प्राचार्य डॉ. आबासाहेब शिंदे,** डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालय, कोल्हापूर.

१९४२ मधील साताऱ्यात झालेल्या आंदोलनावर संशोधन करण्यास मी १९७० मध्ये सुरुवात केली. त्या वेळेपासून माझा आणि रंगराव पाटील यांचा परिचय झाला. त्यांना प्रथम पाहिल्यावर आपल्या डोळ्यात भरते ते त्यांचे भारदस्त व्यक्तिमत्त्व. बऱ्यापैकी उंची आणि दणकट देहयष्टी. त्यांच्या प्रकृतीला साजेसा त्यांचा खणखणीत आवाज, त्याचे कारण स्वत:ला सत्तेच्या मोहापासून कटाक्षाने व सातत्याने दूर ठेवले आहे. नुसती इच्छा व्यक्त केली असती तरी सत्ता त्यांच्याकडे धावत पळत आली असती. मुळातच रंगराव पाटील एक विधायक, क्रियाशील आणि हुशार कार्यकर्ते होते. १९४२ च्या आंदोलनात ते वसंतदादांच्या गटात कार्यरत होते. असे असतानादेखील व्रत म्हणून ते सत्तेपासून काही योजने दूर राहिले. परंतु ते नुसतेच सत्तेपासून दूर राहिले नाहीत तर बिगर काँग्रेसविरोधी पक्षात जो पक्ष कधीही सत्तेवर येण्याची सुतराम शक्यता नव्हती त्या पक्षातून ते गोरगरीबांचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यरत राहिले. त्या पक्षाशी त्यांनी सत्तेच्या मोहापायी गद्दारी केली नाही. म्हणून मला ते खूप अप्रूप वाटतात. त्यांचा राजसत्ता निर्लोभ हा नक्कीच सध्याच्या पिढीला आदर्श असा आहे. लोकशाहीत सत्ता मिळविण्यासाठी कार्यकर्ते नेहमीच जीव टाकतात आणि राजकीय जीव घेतात. पक्षात प्रवेश केल्याबरोबर कार्यकर्त्यांना सत्तास्थान हवे असते. स्वातंत्र्य आंदोलनात साताऱ्यातील प्रतिसरकारच्या संघटनेतही ते सत्तास्थानापासून अलिप्त असल्याचे आढळते. उभी हयात रंगराव पाटील यांनी ज्या विरोधी पक्षात काम केले तेथेही त्यांनी सत्तास्थान स्वीकारण्यास नकार दिलेला दिसतो.

म. गांधींजी आणि इतर राष्ट्रीय नेत्यांना अटक केल्याची बातमी ९ ऑगस्ट १९४२ मध्ये वणव्यासारखी लोकांत पसरली. त्या बातमीने लोक बिथरले. बेभान झाले. गांधींजींच्यावर लोकांचा जीव होता. देवाप्रमाणे लोकांनी त्यांची पूजा बांधली. आई-वडिलांच्यावर जशी मुले प्रेम करतात तसे गांधीजींवर माया केली. गांधीजी ऋषीतुल्य होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने वातावरण मंतरलेले होते. लोक झपाटलेले व पेटलेले होते. मातृभूमीला स्वतंत्र करावयाच्या ध्यासाने ते पछाडलेले होते. आपल्या प्राणप्रिय नेत्यांच्या धरपकडीची बातमी लोकांपर्यंत धडकल्याबरोबर आपल्या मुलाबाळांचा, कुटुंबाचा व कोणताही व्यवहारी विचार न करता लोक उत्स्फूर्तपणे रस्त्यावर आले. जिल्ह्यातील प्रत्येक जण स्वातंत्र्यसैनिक झाले आणि प्रत्येक गाव स्वातंत्र्य आंदोलनांतला किल्ला बनला. त्यांनी उत्स्फूर्तपणे निदर्शनात्मक व घातपाती कामे आणि गोपनीय प्रचार करावयास सुरुवात केली. उत्स्फूर्त आंदोलनाचा प्रारंभ होण्यापूर्वी गांधीजींनी लोकांच्यापुढे आंदोलन कसे करावयाचे या संबंधीचा कार्यक्रम ठेवला नव्हता, परंतु वेळोवेळी गांधीजींनी आंदोलनासंबंधी विचार मांडले, त्याला अनुसरुन लोकांनी उत्स्फूर्तपणे उठाव केला. सारा देश ढवळून निघाला. ब्रिटीशांविरुद्ध सारी जनता कटिबद्ध झाली आणि ब्रिटीशांच्या प्रतिकावर व बलस्थानावर त्यांनी बेडरपणे हल्ले चढविण्यास सुरुवात केली. गावोगावी स्वातंत्र्यसैनिकांची खडी

फलटण उभी राहिली. कोणाला कोणी सांगितले नाही कि कोणी कोणाच्या विनवण्या केल्या नाहीत. भारत मातेच्या लेकरांनी, भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी न भूतो न भविष्यति अशी महान क्रांती केली. अर्थात ही क्रांती उत्स्फूर्त होती. यात नियोजनाचा अभाव व भावनेचा प्रभाव होता. ९ ऑगस्ट १९४२ पासून ते २६ जानेवारी १९४३ पर्यंत साताऱ्यात १६७ सायंफेऱ्या व प्रभात फेऱ्या काढण्यात आल्या. तसेच १४५ जाहीर सभा घेण्यात आल्या. हे सारे सरकारचा बंदीहुकूम असताना, उघडपणे करण्यात आले. याला कारण म्हणजे गांधीजींनी लोकांना भयमुक्त केले. मातृभूमीचाच केवळ विचार लोकांच्या डोक्यात होता. गावोगावचे लोक पुढे सरसावले, त्यांनी फेऱ्या काढल्या, सभा घेतल्या, ब्रिटीशांच्याविरुद्ध रान उठविले, सारा जिल्हा पेटून उठला. साधारणपणे उत्स्फूर्तपणे पुढे आलेल्या ठळक कार्यकर्त्यांची संख्या पाचशे होती. त्यात रंगराव विठ्ठल पाटील होते.

भारतात सातारा जिल्ह्याचे स्वातंत्र्य आंदोलनाचे खास वैशिष्ट्ये आहे ते म्हणजे १९४२ च्या उत्स्फूर्त स्वातंत्र्य आंदोलनाचे केवळ दोन आठवड्यात नियोजित आंदोलनात रुपांतर करण्यात आले. याबाबतीत ठळकपणे पुढाकार घेतला तो यशवंतराव चव्हाण यांनी. नियोजित आंदोलनाचे ठसठशीत उदाहरण म्हणजे मामलेदार कचेऱ्यांवर शांततेने काढण्यात आलेले उघड मोर्चे. असे एकूण सहा मोर्चे कराड, पाटण, तासगांव, वडूज, इस्लामपूर व शिराळा येथील मामलेदार कचेऱ्यांवर काढण्यात आले. २४ ऑगस्ट १९४२ रोजी यशवंतरावांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून कराड आणि पाटण येथे उघडपणे बंदी हुकूम मोडून शांततेने मोर्चे काढण्यात आले. रंगराव पाटील यांचे तासगांवचा मोर्चा आणि इस्लामपूरचा मोर्चा यात सक्रिय योगदान होते. यासाठी मोर्चाचे या १९४२ च्या आंदोलनात असाधारण महत्त्व आहे. ब्रिटीशांच्या सार्वभौमत्वाला आव्हान समजून सरकारने हे उघड बंड मोडून काढण्यासाठी वडूज व इस्लामपूर मोर्चावर बेछूट गोळीबार केला. वडूजला २३ लोक जखमी झाले व ८ लोक धारातीर्थी पडले. तर इस्लामपूर मोर्चात खूप जणांना खरचटले, पाच जणांना मोठ्या जखमा झाल्या व दोन जण शहीद झाले. इस्लामपूरच्या मोर्चानंतर सातारा जिल्ह्यातील आंदोलन भूमिगत झाले. इस्लामपूर मोर्चाचे काळजीपूर्वक नियोजन करण्यात आले होते. मोर्चाला पाठिंबा मिळविण्यासाठी निरनिराळ्या कार्यकर्त्यात निरनिराळ्या गावाची प्रचारासाठी विभागणी करण्यात आली होती. नाना पाटील यांच्याकडे किर्लोस्करवाडी, बुर्ली, आमणापूर, खेड आणि पुंदी तर गोविंदराव खोत यांच्याकडे पूर्वेकडील गावाची जबाबदारी सोपविण्यात आली होते. पांडू मास्तर, के. डी. पाटील, चंद्रोजी पाटील, दत्तू पाटील, ऊरुणकर, रंगराव पाटील आणि ईश्वरा गुरव यांच्याकडे दक्षिण व पश्चिमेकडील गांवे देण्यात आली होती. इस्लामपूर मोर्चाच्या तीन दिवस आधी म्हणजे ७ सप्टेंबर १९४२ रोजी मल्लिकार्जुन डोंगरावर दुपारी २ ते ४ च्या दरम्यान पांडू मास्तर, निवृत्ती आकाराम पाटील, वसंतदादा पाटील, रंगराव पाटील व के. डी. पाटील यांनी सभा घेतली. या सभेला सुमारे तीन ते साडेतीन हजार लोक उपस्थित होते. त्यांच्यापैकी सुमारे एक हजार लोकांजवळ काठ्या, भाले, कुऱ्हाडी इत्यादी घातक शस्त्रे होती.

साताऱ्यातील सुरुवातीच्या आंदोलनाच्या काळात उत्स्फूर्तपणे एकूण नऊ गट जिल्हाभर काम करत होते. त्या नऊ गटांपैकी वसंतदादा पाटील यांचा सांगली गट सक्रिय होता व त्यात रंगराव पाटील काम करीत होते. त्या दोघांशिवाय त्यांच्याबरोबर नारायण जगदाळे, देवाप्पा कराळे, शामगोंडा पाटील, धोंडीराम माळी, आर. पी. पाटील, जी. डी. पाटील, बाबू पाचोरे,

बाबू जमादार, दत्तू पाटील, बाबा शेट्ये, महादेव खुटाळे, बळवंतराव कोरे, नाना पाटील (शिंदेवाडी), निवृत्ती आकाराम पाटील, ईश्वरा गुरव, हिंदुराव पाटील, वामनराव पाटील, आण्णा पत्रावळे, जयराम बेलवलकर, वसंतराव सावंत, दरगौंडा पाचोरे, महादू गौंडा पाटील, बापू जमादार, मारुती आगलावे, नामदेव कराडकर, कृष्णाजी पांडे आणि इतर असंख्य लोक कार्यरत होते.

सायंफेऱ्या, प्रभातफेऱ्या यांच्याबरोबर गावोगावी कोणत्याही कारणामुळे लोक एकत्र आले की, पुढाकार घेऊन गावचे किंवा बाहेरचे कार्यकर्ते त्या जमावापुढे १९४२ च्या आंदोलनाचा प्रचार करीत. जत्रा, कुस्त्यांचे फड, भंडारा याशिवाय ''काही दिवस'' गांधी जयंती, स्थानिक महत्त्वाच्या घटनांचे दिवस आणि महादेवभाई देसाई यांचा स्मृतीदिन साजरा करत. शहरातील देसाई यांचा स्मृतीदिन साजरा करत. शहरातील सार्वजनिक चौकात किंवा गावातील चावडीसमोर व देवळासमोर सभेचे आयोजन करण्यात येई. सायंफेऱ्या व प्रभातफेऱ्या काढण्यापूर्वी व त्यांच्या विर्सजनापूर्वी त्या ठिकाणी सभा आयोजित करण्यात येत. फेऱ्यांमध्ये भाग घेणाऱ्यांची संख्या साधारण दहापासून दोनशेपर्यंत असावयाची व तितकेच लोक सभेलाही हजर असत. भाग घेणाऱ्यांची संख्या ही सभेचे ठिकाण, सभेची वेळ, सभा सांगणाऱ्या नेत्याच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असे. ब्रिटीशांचा बंदी हुकूम असतानादेखील सभा आयोजनात किंवा त्या पार पाडण्यात कोणत्याही प्रकारची काटछाट करण्यात येत नसे. सारे काही बेडरपणे चालू होते. ज्या गावी सभा घ्यावयाची त्या ठिकाणी बाहेरुन येणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचे नांव सभेचे अध्यक्ष म्हणून गावातील कार्यकर्ता सुचवीत असे. यानंतर गावातील दुसरा कार्यकर्ता त्या सूचनेला अनुमोदन देत असे. सभा सांगणारे वक्ते बऱ्याचवेळेला बाहेरच्या गावचे असत. भाषणे झाल्यावर गावातील कुणीतरी कार्यकर्ता आभार मानीत असे. शेवटी वंदे मातरम् म्हटल्यावर सभा बरखास्त होत असे. वक्त्यांची भाषणे लोक धार्मिक भावनेने तल्लीन होऊन ऐकत असत. रंगराव पाटील यांचे योगदान सभा आयोजन करण्यात, त्या सांगण्यात, प्रभात व सायंफेऱ्या काढण्यात होते.

निदर्शनात्मक कार्यक्रमाबरोबर सातारा जिल्ह्यात घातपाती चळवळ प्रारंभी उत्स्फूर्तपणे जिल्ह्यातून मराठा-सदर्न मराठा रेल्वे जात होती. या रेल्वेला एकूण ६८ वेळा घातपात करण्यात आला. या कामातही रंगराव पाटील मागे नव्हते. रात्री-अपरात्री रेल्वे रुळाच्या सांध्याच्या फिशप्लेटा आणि स्टीलच्या चाव्या काढण्यात येत. नट-बोल्ट काढून टाकण्यात येत. मोठ-मोठाले दगड रुळावर ठेवण्यात येत. रेल्वे टेलिफोनच्या तारा तोडण्यात येत. काही वेळेस साध्या बॉम्बने रेल्वे गाड्या उडवून देण्याचा प्रयत्न करण्यात येत. रेल्वे गाड्या पाडण्यात आल्या. घातपाती चळवहींचा प्रारंभ १२ ऑगस्ट १९४२ पासून सुरु झाला. ब्रिटीश शासनाला खिजवण्यासाठी आणि त्यांच्याविरुद्ध लोकांचे प्रतिरोधाचे चैतन्य प्रोत्साहित करण्यासाठी जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी यशस्वीपणे आठ रेल्वे स्टेशने जाळली. आणि दोन रेल्वे स्टेशनावर हल्ले चढविण्यात आले. सांगली संस्थानाच्या हद्दीतील विश्रामबाग रेल्वे स्टेशन पहाटे साधारण २.३० वाजता १५ नोव्हेंबर १९४२ च्या रात्री जाळण्यात आले. त्यात वसंतदादा पाटील, धोंडीराम माळी, वामनराव पाटील, मोहनराव शिंदे, बाबूलाल स्वरुपचंद शहा, नारायण जगदाळे, हिंदुराव पाटील, रंगराव पाटील, बापूसाहेब जमादार आणि इतर यांनी भाग घेतला होता. २५ नोव्हेंबर १९४२ रोजी वसंतदादा पाटील, धोंडीराम माळी, वामनराव पाटील, मोहनराव शिंदे, बाबूलाल स्वरुपचंद शहा, नारायण जगदाळे, हिंदूराव पाटील, रंगराव पाटील, ईश्वरा

गुरव, बाबूराव पाचोरे, शाम गौंडा पाटील, जी. डी. पाटील आणि इतर यांनी सांगली संस्थानाच हद्दीतील नांद्रे रेल्वे स्टेशन २५ नोव्हेंबर १९४२ रोजी पहाटे जाळून टाकले.

कुंडल गट आणि वसंतदादांचा सांगली गट हे एकत्र आले आणि त्यांनी दहा रेल्वे स्टेशन्स जाळण्याचा निर्धार केला. अरग, अग्रणी, धुळगाव, बेडग आणि सलगरे या रेल्वे स्टेशनांना आग लावण्याची जबाबदारी सांगली गटाने उचलली. या कृतीचे नियोजन वसंतदादा पाटील यांनी केले होते. असे करताना आपल्या गटाचे त्यांनी दोन विभाग पाडले. पहिल्या गटाँत वसंतदादा पाटील, धोंडीराम माळी, वामनराव पाटील, मोहनराव शिंदे, बाबूलाल स्वरुपचंद शहा, नारायण जगदाळे, हिंदूराव पाटील, रंगराव पाटील आणि इतरांचा समावेश होता. यांनी अरग आणि बेडग रेल्वे स्टेशनांना आगी लावल्या. दुसऱ्या विभागात जी. डी. पाटील, बापूसाहेब जमादार, बाबूराव पाचोरे, शामगौंडा पाटील, दत्तू तात्या, वसंत सावंत, जयराम बेलवलकर, बाळू शेटे, महादेव बुटाळे आणि इतरांचा अंतर्भाव होता. ह्यांनी अग्रणी धुळगाव आणि सलगरे रेल्वे स्टेशने जाळली. विशेष म्हणजे ही रेल्वे स्टेशने ज्वारीच्या कडब्याच्या पेंढ्यांनी पहाटे १ वाजल्यापासून ते ५ पर्यंत जाळण्यात आली. या आगीमुळे दहा हजार रुपयांचे नुकसान झाले. कुंडल गटाला मात्र आपण ठरविल्याप्रमाणे पंढपूरच्या बाजूकडील काही रेल्वे स्टेशने जाळता आली नाहीत. याचे कारण आयत्या वेळेला गुन्हेगारांनी या कामात त्यांना अपेक्षित सहकार्य केले नाही.

१४ ऑगस्ट १९४२ ते १८ मे १९४६ या काळात टेलिफोन सेवांना एकूण ७९ वेळा घातपात करण्यात आले. १९४३ मध्ये ५३ वेळा, १९४४ मध्ये १२ वेळा आणि १९४६ मध्ये २ वेळा. टेलिफोनच्या तारा तोडण्यातही रंगराव पाटील यांनी भरपूर रस घेतला होता. उदा. १७-८-४२ रोजी नागनाथ नायकवडी, रंगराव पाटील, अप्पा पाटील व इतरांनी इस्लामपूरच्या बाहेर टेलिफोन कनेक्शन तोडले. सरकारी इमारती वगैरेंना एकूण ३३ वेळा घातपात करण्यात आला. १९४३ मध्ये वीस वेळा, १९४३ मध्ये ७ वेळा आणि १९४४ मध्ये ६ वेळा. या कामातही रंगराव पाटील सक्रिय होते. २२-१०-४२ च्या रात्री वांगी येथील डी. एल. बी. इन्स्पेक्शन बंगल्याला आग लावण्यात आली. हे काम रंगराव पाटील, जी. डी. लाड, नाथा लाड, शंकर लुपणे, रामू पवार, भगवानराव मोरे, एस. पी. पाटील, आप्पा लाड, दौंडकर, लक्ष्मणराव तांबट, शामराव जाधव व इतरांनी केले. तसेच ३१-३-४३ च्या रात्री निमणी येथील सरकारी बंगला जाळण्यात आला. या कामात वसंतदादा पाटील, रंगराव पाटील, शामगौंडा पाटील, बाबू पाचोरे, नारायण जगदाळे, दत्तू तात्या वगैरेंचा सहभाग होता. पोस्ट सेवांना एकूण ५२ वेळा अपघात करण्यात आला. ४२ मध्ये २८ वेळा ४३ मध्ये १८ वेळा, ४४ मध्ये ५ वेळा, ४६ मध्ये १ वेळा. रंगराव पाटील यांनी पोस्ट सेवांना अपघात करण्यात बरेच औत्सुक्य दाखविले. ७-१०-४३ रोजी हिंदुराव पाटील, रंगराव पाटील, बाबू पाचोरे, नारायण जगदाळे आणि शामगौंडा पाटील यांनी दोनशे रुपये असलेली मेल प्यूनची बॅग लुटली.

वसंतदादांना अटक झाल्यावर रंगराव पाटील आमणापूर गट व वाळवा दक्षिण गट यामध्ये वावरतातना आढळतात. आंदोलनातील त्यांच्या सक्रिय सहभागामुळे ब्रिटीश सरकारने त्यांना ५०० रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. त्यांना माझ्या शुभेच्छा !!

# सुदैवी समाजसेवक

**प्रा. जे. के. पवार** (तडसरकर), अर्थशास्त्र विभाग प्रमुख, न्यू कॉलेज, कोल्हापूर.

प्रत्येक माणूस हा स्वत:साठी जगत असतो. ''मी'', ''मला'' आणि ''माझे'' या पलीकडे पाहण्याची त्याची इच्छा नसते. माझे जीवन, माझा संसार या चाकोरीबाहेर तो जगत नाही. त्याची श्रद्धा, भक्ती आणि व्यवहारातील तडजोडी यासाठीच असतात. ''मी'' हा त्याचा केंद्रबिंदू असतो, या केंद्रबिंदूभोवती तो फिरत असतो.

परंतु या चाकोरीबाहेर पडून आपले जीवन समाजपुरुषाच्या चरणी समर्पित करणारी व्यक्ती लाखांमध्ये एखादीच असते. आपल्या समाज बांधवांसाठी व एकूणच मानवतेच्या उद्धारासाठी स्वत:च्या संसाराचा विचार न करता हे युगपुरुष जीवन जगत असतात. यातच त्यांचा थोरपणा व महात्म्य सामावलेले असते. अशा या दुर्लभ व्यक्तींच्या श्रेणीत ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व समाजसेवक क्रांतिवीर रंगरावदादा पाटील (शिगावकर) यांचे स्थान अग्रभागी आहे.

अर्थात असे असले तरी श्री. रंगरावदादा हे सुदैवी समाजसेवक. १९७२ मधील इस्लामपूर येथील पोलीसांच्या बेछूट गोळीबार आणि त्या गोळीबारात चार कोवळ्या तरुण मुलांचे हौतात्म्य झाले. तसे पाहिले तर या जगात कोणीही संपूर्णत: सुखी नाही. जो प्रचंड श्रीमंत आहे, तोही दु:खी आहे तर जो दारिद्रयात जगत आहे, त्याच्या तर पाचवीलाच दु:ख पूजले आहे असे मानले जाते. प्रत्येकांच्या दु:खाचा प्रकार मात्र आगळा-वेगळा आणि असेही म्हणतात की सुख-दु:खांनी आयुष्य भरले असेल तरच जगण्यात, जीवनात खरी मजा आहे. मात्र श्री. रंगरावदादांचे दु:ख हे जगावेगळे आहे, असे दु:ख जगात कोणत्याही जन्मदात्याच्या नशिबी येऊ नये असे म्हणतात. नुकत्याच उमलू लागलेल्या तारुण्यात पदार्पण केलेल्या आणि एखाद्या राजकुमाराला लाजवेल असे देखणेपण लाभलेल्या आपल्याच चिरंजीवाला (चि. राजेंद्रला) आपल्याच खांद्यावरुन वाहून नेण्याचे दुर्भाग्य ज्यांच्या नशिबी आले ते म्हणजे भाई रंगरावदादा आहेत.

दुष्काळग्रस्त जनतेच्या आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य आणि निकडीच्या मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी इस्लामपूर (जि. सांगली) येथे १९ ऑक्टोबर १९७२ रोजी शेतकरी कामगार पक्ष आणि पुरोगामी विद्यार्थी संघटनेद्वारे आयोजित विराट मोर्चावर पोलिसांनी अनावश्यक, बेछूट आणि अतिरेकी गोळीबार केला आणि स्वराज्यातील पोलिसांनी केलेल्या गोळीबारात राजेंद्र पाटील, सुरेश पाटील, दिलीप निलाखे व रंगराव गायकवाड ह्या चार तरुणांना हौतात्म्य प्राप्त झाले. राजेंद्र हा रंगरावदादांचा चिरंजीव! कोवळ्या वयातील ह्या चारही बालकांच्या हत्त्येमुळे, हौतात्म्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रच नव्हे तर स्वतंत्र भारत सुन्न झाला. आपल्या पायातील पारतंत्र्याच्या बेड्या तोडून आपणास स्वतंत्र करण्यामध्ये ज्या ज्या सुपुत्रांनी प्राणाची बाजी लावली त्यापैकी भाई रंगराव पाटील शिगावकर यांच्या कोवळ्या मुलाचा आणि त्याच्या सवंगड्याचे आपल्याच पोलिसांनी पाडलेले मुडदे पाहून भारतमातेनेही अश्रू ढाळले; भाई रंगराव दादांच्या दु:खाची कल्पना या जगात कोणी करु शकणार नाही.

भाई रंगराव दादांना राजकारण, समाजकारण, स्वातंत्र्यासाठीचे किंवा समाजहितासाठीचे आंदोलन

हे काही नवीन नव्हते; त्यांचे आयुष्यच त्यात गेले होते. आजही त्यांचे जीवन समाजासाठीच आहे. आपल्या चिरंजीवाच्या पिंडास कावळ्याने शिवले नाही, म्हणून भाई रंगराव दादांनी वचन दिले. भाईजी म्हणाले, ''राजेंद्रा माझ्या राजकीय जीवनावर तुझ्या हौतात्म्याचे कळस चढविलास. ज्यासाठी तू देह ठेवलास ते कार्य अविरतपणे मी तडीस नेईन व तुझ्या स्मृतिप्रीतर्थ तुझे योग्य स्मारक करेन.'' भाईजींची ही शपथ पूर्ण होताच, लाडक्या राजेंद्रने पिंडाला स्पर्श केला.

आपल्या मुलाची कर्तबगारी पाहायला मिळणे यासारखा आनंद नाही. राजेंद्रने भाईजींच्या समाजकारणाच्या व राजकारणाच्या आजपर्यंतच्या कार्यावर सोन्याचा कळसच चढविला हे मान्यच. त्यामुळे असा पुत्र जन्माला आल्याबद्दल भाईजींचे जीवन कृतकत्य झाले, पावन झाले असे म्हणता येईल. मात्र आपल्याच मुलाच्या पिंडासमोर उभा राहून त्याला आवाहन, विनंती करण्यासारखे दुर्भाग्य भाईजींसारख्या देव माणसाच्या नशिबी यावे याला काय म्हणावे ? भाईजी आज शतकाकडे वाटचाल करीत आहेत. अगदी न थकता, न दमता ते शतक पूर्ण करतीलच. परंतु शकतोत्तर वाटचालही सुरु ठेवतील. असा विश्वास वाटतो. परमेश्वराने मला वाटणारा हा विश्वास खरा ठरवावा ही ईश्वरचरणी नम्र प्रार्थना !

# कार्यकर्त्यांना स्वाभिमानशून्य बनवले

**श्री. रंगरावदादा**

**स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षात राज्यकर्त्यांनी कार्यकर्त्यांना स्वाभिमानशून्य बनविले. भ्रष्टाचाराला खतपाणी घातले. त्यामुळेच आज माणूस माणसाचा शत्रू बनल्याची परिस्थिती निर्माण झाली.**

स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षात देशात अराजकतेची स्थिती निर्माण झाली आहे. स्वातंत्र्य कशासाठी मिळविले असे वाटावे अशीच आजची स्थिती आहे. महात्मा गांधींजींच्या विचारांना राज्यकर्त्यांनी मूठमाती दिली. आजच्या घडीला गांधींजींचे विचार देशाला तारक ठरु शकतील. नव्या पिढीने गांधी विचारांना पुन्हा रुजविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच झाले तरच स्वातंत्र्य मिळविण्यासाठी हालअपेष्टा सहन करणाऱ्यांना स्वातंत्र्य मिळविल्याचे समाधान वाटेल.

सर्वच क्षेत्रात हिंसेवरचा विश्वास वाढतो आहे. त्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर काळातील पिढीने पायानिश्चितीच्या भूमिकेतून आत्मशोध घेण्याची गरज आहे. चंगळवादी संस्कृती आणि वैयक्तिक सामाजिक हिंसेची कारणे शोधून निराकरणासाठी कार्यक्रम व योजना आखाव्या लागतील. स्वातंत्र्यानंतरच्या काळात देशात झालेली स्थितंतरे आणि चळवळ यांचे आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. महात्मा गांधी आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांची नवीन चळवळ उभारावी लागेल.

(संदर्भ : **दै. सकाळ,** दि. १/२/२०००)

# वारणामाईचा प्रभाकर

**श्री. रा. वि. सराफदार,** बागणी, ता. वाळवा, जि. सांगली

कोल्हापूर संस्थानच्या सीमेवर वारणा माई खळखळत होती. पारतंत्र्याचे अश्रू वाहत होते. तिच्या पलीकडे छोटेसे गाव सातारा जिल्ह्यात होते. जिल्ह्यात इंग्रजी अम्मल. इंग्रजाबद्दल त्यांच्या राज्यावर सूर्य मावळत नाही ही जनतेची धारणा. जबरदस्त वचक. इंग्रजांचा शिपाई आला तरी त्याचा तोरा राजासारखा असे. शिक्षणाच्या सोयी नाहीत. नदीला पूर आला की गावास वेढा पडे. गाव बहुतेक कोरडवाहू. अशा गावात विठ्ठलराव व व्ही. टी. पाटील हे बंधू. विठ्ठलराव शेती पहात. माळकरी स्वभाव. दयाळू. अशाच्या पोटी रंगरावदादा यांचा जन्म झाला. व्ही. टींना मूलबाळ नव्हते. घरी दादांच्या जन्माने आनंदी आनंद. दादांच्या माऊली दादांना जवळ घेऊन पहाटे उठत. दळणे दळी, घरी जनावरे, दूध-दूभते, धान्य यांची दात नसे. दुभते मोफत गोरगरीबांना दिले जात असे. दादा लहानपणी हूडच होते. पुन्हा शिक्षण झाले. काँग्रेस चळवळ सुरु झाली. गांधींनी करेंगे या मरेंगे हा संदेश दिला. सातारा जिल्हा क्रांतिविरांनी पेटला. त्याचबरोबर गुंडपुंडही खूपच होते.

१९४२ साली कै. यशवंतराव चव्हाण, क्रांतिसिंह नाना पाटील, बर्डे गुरुजी, रंगरावदादा, जी.डी. लाड, नागनाथआण्णा, पांडू मास्तर, हिंदूराव पाटील, अंकलखोपच्या ताई, किसन अहीर सांगली संस्थानात वसंतदादा, दत्ताजीराव शिंदे, पत्रावळे, जी. डी. पाटील अशा अनेक नररत्नांनी क्रांतीच्या होमकुंडात स्वातंत्र्यासाठी उडी घेतली. सरकारी खजिने लुटले. इमारती पेटवल्या. काहींनी हौतात्म्य पत्करले. जेल फोडले. प्रतिसरकार निर्माण केले. त्यात रंगरावदादा हे सुवर्ण अक्षरातील नांव. यांचा एक निराळाच पोशाख (पॅन्ट, हाप मॅनेला) सर्वजण भूमिगत होऊन भटकत, दारुबंदी करत, इंग्रजाला सामील असलेले व गुंड यांना पत्र्या लावत. दादा आघाडीवर असत. दादागावोगाव सभा घेत. दादांचे भाषण म्हणजे इंग्रजांवर मुलुख मैदान तोफेचा मारा, लोकातून उठाव होई, लोक दादांच्या क्रांतीचा काँग्रेसचा जयजयकार करीत. दादांच्यावर फार मोठा ग्रंथ अपुरा पडेल या छोट्याशा लेखात दादांच्यावर लिहिणे म्हणजे नदीतून पाण्याचा तांब्याभर पाणी घेतल्या सारखेच.

कसबे डिग्रजला दादांची मिरवणूक स्वातंत्र्यापूर्वी काढली होती. दादांचा पोशाख सुभाष बाबूंच्या सैनिकासारखा. अलोट गर्दी मिरवणूकीस होती. प्रत्येकजण गर्दीमुळे शिकस्तीने चालत होता. जणू स्वातंत्र्यदेवीचा दादांच्या जयजयकाराने डिग्रज गर्जत होते. दादांची सभा झाली. कवठेएकंदलाच दादा फरारी झाले होते. पण पकडण्याची सरकारची हिम्मत होत नव्हती. दादा म्हणजे दारु पिकेटींग असे समीकरण पडले होते. दादांनी कोल्हापूर-सातारा-सांगली आदी भागात खूप दारु पिकेटींग केले. दारु दुकाने बंद पाडली. परदेशी कापडाच्या होळ्या केल्या. दादा म्हटले की, गुंडपुंड दारुडे पोलीस, पोलीस अधिकारी चळचळ कापत.

स्वातंत्र्य मिळाले पण काँग्रेस पुढारी स्वार्थ साधू लागले. तळागाळातील जनता तशीच राहू लागली. क्रांतिसिंह नाना पाटील, रंगरावदादा, नागनाथआण्णा, जी. डी. लाड यांनी काँग्रेसची फारकत केली. दादा शे. का. पक्षात गेले. ते

आजतागायत. दादा काँग्रेसमध्ये असते तर मंत्री नव्हे, मुख्यमंत्रीही झाले असते. दारात लक्ष्मी झुलली असती पण दादा हा विरक्तीचा हरी. साऱ्यांवर लाथ मारणारा.

दादांचे काँग्रेसमधील पुढाऱ्यांचे घरोब्याचे संबंध. त्यांचे गावी गेले तर त्यांचेकडेच रहात. पण दादा सभेत उभा राहिले की, कोणाचीही तमा करीत नसत. त्याकाळी सांगलीत वसंतदादा म्हणजे सांगली जिल्हा असे समीकरण होते. काँग्रेसच्याविरुद्ध ब्र काढणेची हिम्मत नव्हती. गांधी वधान्नंतर जाळपोळ झालेमुळे काँग्रेसविरुद्ध कोणी जीभ उचलत नसत. पण अपवाद होते दादा. तुम्हा आम्हा साऱ्यांचे रंगरावदादा.

सांगलीच्या स्टेशन चौकात दादांची सभा म्हणजे अलोट गर्दी. माझ्या समजुतीप्रमाणे नाथ पै नंतर गर्दी होत असे ती दादांच्या सभेला. दादा काँग्रेसवर, भांडवलदारांवर, सरकारी अधिकाऱ्यांच्यावर कठोर आसूड ओढत. त्यात कै. पद्मभूषण पू. वसंतदादा ही सुटत नसत. सभा संपली की, दादा पुन्हा शत्रूवरही प्रेम करीत हे त्यांच्या स्वभावाचे खास वैशिष्ट्य.

दादा सांगलीस गेले की, कै. दत्ताजीराव शिंदे इंजि. हो. गा. कमाडन्ट यांचेकडे आवर्जून जात. बोलतानाही राजकारणाचे आसूड हाणीत.

वडिलांची व चुलत्याची शेती बरीच मोठी. नदीकाठी असे. दादा हाप पॅन्ट घालून शेतात राबत. ऊसाला पाणी देत. आळसाचे व फुकट जगण्याचे पुढारीपण पासून नेहमी विरक्त असत. चुलते व्ही. टी. पाटील यांनी ताराराणी विद्यापीठास सर्व जमीन दिली. दादांची मनाची यात किंचीतही खळखळ झाली नाही. चुलत्याचा निर्णय शिरसामान्य केला. केवढे विशाल अंत:करण. त्यांची शेती माझे शेजारीच. परिस्थितीने काँग्रेस आश्रय मी घेऊन काही प्रगती करी. पण दादा माझी टर उडवत. मला पटत नसे, पण अखेर दादांचेच शब्द खरे ठरले.

वाळवे तालुक्यात एन. डी. पाटील शे. का. पक्षाच्या तिकीटावर उभा रहात. दादा प्रचाराची सर्व बाजू नि:स्वार्थी वृत्तीने करीत. कसबेडिग्रज कवठे पिरान आदी गावात वसंतदादा उमेदवार असत. गावकरी विरोधाची सभा घेऊ देत नसत. दगडफेक करीत पण दादा गेले की, त्या गावातूनही दादांच्या विरुद्ध यशस्वी प्रचार करुन येत.

विलासराव शिंदे जि. प. ला उभे होते. राजाराम बापू प्रचारास आले होते. ते गावात फिरत असता दादांनी त्यांना सळो का पळो केले. मी दादांना थोडी सबूरी घ्या म्हणून सांगितले. 'ऐकतील ते दादा कसले' जाहीर सभेत त्यांनी माझेवर हल्ला केला. निवडणूक नाइलाजाने दु:खी मनाने मलाही दादांच्याविरुद्ध जाहीर बोलावे लागले. नंतर मी लाजलो, दादांपासून दूर राहू शकलो. दादांनी आष्टा स्टँडवर अचानक हाक मारली. खाटकाकडे शेळी जावी तसा गेलो. दादा गहिवरले. रामा माझे संगे बोलत का नाही. अरे राजकारण आणि मैत्री यात फरक आहे. असे म्हणून मला मिठी मारली. ती खाटकाची नव्हे, पंढरीच्या पांडुरंगाची होती.

दादा एस. टी. नेच प्रवास करीत. फक्त ब्रीफकेस हातात असे त्यात पिस्तुल असे. पण त्यांना कधी बाहेर काढावे लागत नसे. ते विजयंता होते. त्यांना एस. टी. चा पास असे. ओळखीच्या माणसाचा त्यांचेबरोबर फुकट प्रवास होई.

दादा फरारी असतानाच कल्पना ताईंच्या घरी रहात. क्रांतिवीर नानासाहेब पाटलांच्या आदेशानुसार दादांनी साध्या पद्धतीने लग्न केले. वडिलधाऱ्यांना रुचले नाही. थोडासा तणाव निर्माण झाला नंतर निवळला.

कल्पनाताई या शिक्षिका होत्या. त्यांनाही दादांचे समाज जागृतीकार्यास सासरचा विरोध होता.

याचा थोडासा त्रास झाला. त्यांनी भाड्याने घर घेऊन स्वतंत्र राहिले. कल्पनाताईंना नोकरी करुन दादा व त्यांच्या कार्यकर्ते यांची उठाठेव करावी लागे. पण त्या आनंदाने करीत. कोणीही घरी जावो, कशाही परिस्थितीत जावो, कल्पना ताईंच्या स्वागताने भारावून जाई. कल्पनाताई म्हणजे दादांच्या गृहमंत्री. त्यांनी मुलांचे शिक्षण केले. त्यांच्यावर सुसंस्कार करुन सर्वांना मार्गी लावले. एवढ्या मोठ्या पुढाऱ्याची पत्नी म्हणून त्यांनी ज्ञान यज्ञात कसूर केली नाही. बदली झाली तरी खळखळ केली नाही. शाळेच्या वेळा चुकवत नसत. बदलीच्या ठिकाणीही माऊली एस. टी. ची वाट पहात उन्हात बसे. दादांच्या शब्दाने बदली रहित झाली असती. पण तो मोह त्यांनी केला नाही. माहेर गरीबीचे म्हणून त्यांना व इतरांना कमी लेखले नाही. दादांची लहर सांभाळणेची तारेवरील कसरत ही कल्पना माऊलीच सांभाळे.

विरक्त व त्यागी दिलदार हृदयाच्या या दांपत्यास शतशः प्रणाम. नागरी सत्कार समितीस धन्यवाद. दादा आणि ताई यांना दीर्घायुष्य व समृद्धी लाभो हीच तुळजा भवानी चरणी नम्र प्रार्थना. जय हिंद !

(संदर्भ : **दै. पुढारी,** दि. २५/१२/१९९५)

# सातारा प्रतिसरकारचे सैनिक

**श्री. पी. जी. फडके,** ओगलेवाडी, ता. कराड, जि. सातारा.

सातारा जिल्ह्यातील प्रति सरकारचे सुप्रसिद्ध स्वातंत्र्य सैनिक, थोर देशभक्त, क्रांतिवीर भाई रंगरावदादा पाटील.

१९ ऑक्टोबर १९७२ रोजी इस्लामपूरच्या मामलेदार कचेरीवर दुष्काळग्रस्तांच्या मोर्च्यावर कै. नाईक राजवटीने अमानुषरीत्या गोळीबार केला असता त्यात बळी पडलेल्या चार हुतात्मा विद्यार्थींपैकी प्रथम क्रमांकाच्या हुतात्मा राजेंद्र पाटील यांचे हे पिता आहेत. भाई रंगराव पाटील स्वातंत्र्य पूर्व काळात काँग्रेसचे व प्रतिसरकारचे भूमिगत नामवंत सैनिकांपैकी एक होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतकरी कामगार संघटनेचे संस्थापक सदस्यांपैकी म्हणून एक प्रमुख जबाबदार कार्यकर्ते रंगरावदादा प्रसिद्धीला आले. सत्तारुढ पक्षात चाललेले गैरव्यवहार, अफरातफर, भ्रष्टाचार आणि लाचलुचपत तसेच शासकीय अधिकाऱ्यांकडून होणारे अन्याय, अत्याचार आणि कार्यकर्त्यातील लाचार प्रवृत्तीविरुद्ध रंगरावदादांनी आजपर्यंत हजारो जाहीर सभातून घणाघाती, कठोर टिका करुन वाभाडे काढले आणि जनता-जनार्दनांसमोर वेशीवर टांगले. कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, छ. शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे, स्वामी रामानंद भारती, महात्मा गांधी यांच्या आदर्शांच्या विचारांचा जबरदस्त पगडा रंगरावदादांच्या मनावर पडला. साम्राज्यवादी, वसाहतवादी, सरमंजामदारी आणि सावकारी या सर्व प्रतिगामी प्रवृत्तीच्या विरुद्ध आयुष्यभर लढले. सार्वजनिक जीवनात सातत्याने अविश्रांत परिश्रम घेऊन राजकीय आणि सामाजिक वाटचाल केली. समाजाचे काम करणे म्हणजे सतीचे वाण आहे. ते रंगरावदादांनी स्विकारले. कै. व्ही. एन. पाटील, बॅ. पी. जी. पाटील आणि श्री. वसंतदादा पाटील यांचेशी त्यांचा विशेष ऋणानुबंध होता. आजपर्यंत त्यांचे धुतल्या तांदळासारखे सार्वजनिक जीवन आहे. सार्वजनिक राजकीय जीवनातील उंची गगनाला गवसणी घालणारी अशी पोलादी डाव्या विचाराच्या थोर पुरुषाला शतायुष्य लाभो हीच नियतीला मनोमन प्रार्थना !

(संदर्भ : **दै. सह्याद्रि एक्सप्रेस** , कराड दि.७/१/१९८७)

# क्रांतिसिंहाचे सहकारी

**श्री. उत्तम कदम,** आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली.

**१९४२ स्वातंत्र्य लढ्यात स्वत:ला झोकून देऊन ज्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी प्रतिसरकारची चळवळ राबवली ते रंगरावदादा पाटील.**

१९३० नंतर खऱ्या अर्थाने भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या नव्या पर्वाला सुरवात झाली. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली देशभर सत्याग्रह व असहकाराची चळवळ वाढू लागली होती. देशभर शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्य लढ्याची चळवळ चालू असताना तत्कालीन दक्षिण सातारा जिल्ह्यात मात्र स्वातंत्र्य चळवळ अधिक आक्रमक बनली होती. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांनी तर दे माय धरणी ठाय करुन सोडले होते. अगदी शाळकरी विद्यार्थ्यापासून युवकांपर्यंत सर्वांना प्रतिसरकार व नाना पाटील यांच्याविषयी एक आत्मियता वाटत होती.

सन १९३०-३१ चा कालावधी असेल. रंगराव दादा पाटील शिगाव (ता. वाळवा) या आपल्या गावी मराठी शाळेत शिकत होते. इतरांप्रमाणे त्यांच्यावरही अगदी विद्यार्थी दशेपासूनच क्रांतिसिंहांच्या विचाराचा पगडा बसला होता. त्यानंतर १९३६ साली ते महाविद्यालयीन शिक्षणासाठी राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे दाखल झाले.

आपल्या उपजतच अमोघ वक्तृत्व शैलीने त्यांनी आपल्या वर्गमित्रांना अक्षरश: भारुन टाकले आणि याचाच परिणाम होऊन १९३७ साली त्यांच्या वर्गातील ४४ पैकी ४० विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली.

१९४२ च्या चले जाव चळवळीत दादांनी आघाडी सांभाळली. तत्कालीन दक्षिण सातारा जिल्ह्यात चलेजाव चळवळ खऱ्या अर्थाने ज्यांनी राबवली त्या क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथआण्णा नायकवडी, वसंतदादा पाटील, स्वामी रामानंद भारती, बर्डे गुरुजी, राघु लिमये यांची नावे आवर्जुन घ्यावी लागतील.

स्वातंत्र्य लढ्यातील कार्यकर्त्यांच्या मागे इंग्रज सरकारचा ससेमिरा लागल्याने अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले. भूमिगत असतानाही दादांनी दक्षिण सातारा परिसर अक्षरश: पिंजून काढला. अमोघ वक्तृत्व असलेल्या दादांनी आपल्या पहाडी आवाजात गावोगाव भाषणे देऊन लोकांना प्रभावित केले. या संपूर्ण कालावधीत प्रचाराची खरी धुरा दादांच्याकडेच होती.

दादांच्या वाढत्या कारवायांनी त्रस्त झालेल्या इंग्रज सरकारने २४ ऑगस्ट १९४२ रोजी दादांच्या नावाने वॉरंट काढून त्यांना जिवंत वा मृत पकडून देणाऱ्यास रोख बक्षिस जाहीर केले. दादा ताब्यात मिळावेत यासाठी त्यांच्या घरच्यांना ताब्यात घेतले. त्याची शिगाव येथील सर्व मालमत्ताही जप्त केली. पण दादा बधले नाहीत. स्वामी रामानंद भारती व आष्टा येथील स्वातंत्र्यसैनिक कै. मारुतीराव गायकवाड यांनी त्यांना बहुमोल मदत केली. स्वातंत्र्यसैनिक कै. गायकवाड मामा यांचे घर तर या काळात भूमिगत कार्यकर्त्यांचे जणू आश्रयस्थानच बनले होते.

भूमिगत असतानाच स्वातंत्र्य लढ्यातील कै. वसंतदादा पाटील व रंगरावदादा पाटील यांनी

प्रतिसरकारशी फारकत घेऊन स्वत:चा नवीन गट निर्माण केला व उद्घाटन म्हणून विश्राम बाग स्टेशन पेटवून दिले. यानंतर एका बेसावध क्षणी इंग्रजांनी छापा टाकून २४ जुलै १९४५ रोजी अटक केली व १८ डिसेंबर १९४६ रोजी पुन्हा बिनशर्त सुटका केली.

स्वातंत्र्य लढ्यात अपार कष्ट भोगलेल्या या स्वातंत्र्य सेनानीने स्वातंत्र्यानंतरही विश्रांती उपभोगली नाही. अथवा स्वातंत्र्य लढ्यातील कार्याचा लाभ घेऊन नेतेगिरीही केली नाही. स्वातंत्र्यानंतर दादांनी त्या काळात ज्वलंत प्रश्न बनलेल्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्यास वाहून घेतले. त्याचप्रमाणे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबरोबर फिरुन गावोगाव शाळा निर्माण केल्या. वाळवा तालुक्यात दादांनी कर्मवीरांच्या साथीने जवळजवळ वीस हायस्कूल चालू केली. याचवेळी दादांचे व्यसनमुक्ती, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निर्मूलन हे सामाजिक कार्य व शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून राजकीय कार्यही चालूच होते.

सन १९७३ मध्ये दिल्लीत स्वातंत्र्य सैनिकांच्या अधिवेशनात भाग घेऊन सर्वसामान्यांची दु:खे त्यांनी शासनाच्या कानी घातली. स्वातंत्र्य सैनिक सन्मान समितीचे अनेक वर्षे ते अध्यक्ष होते. तसेच सध्या अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांवर काम पहात आहेत.

स्वातंत्र्य लढ्यात अनेक हालअपेष्टा भोगलेले दादा सध्याच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीकडे पाहून कष्टी होतात. स्वराज्य मिळाले पण अद्याप त्याचे सुराज्यात निर्माण झालेले नाही. नवयुवकांनी हे कार्य हाती घ्यावे. स्वातंत्र्य लढ्याइतकेच हे कार्यही महत्त्वाचे आहे असे दादांचे मत आहे.

# रंगरावदादा - औक्षवंत व्हा !

**श्री. भगवान सावंत**, सांगली

आयुष्याच्या संध्याकाळपर्यंत आपले आचार-विचार स्पष्ट ठेवणारा. माझ्या माहितीचा जर माणूस कोण असेल तर ते रंगरावदादा आहेत. बोले तैसा चाले त्याची वंदावि पाऊले ! अशा पद्धतीचे असामान्य व्यक्तिमत्त्व म्हणजे रंगरावदादा आहेत.

पहाडी आवाजाचा निर्भिड, सडोतोड अस्सल ग्रामीण बोली भाषेत माईक गरज न भासणारा, अभ्यासू वक्ता म्हणून उभ्या महाराष्ट्राला आणि मराठी मुलुखातील मराठी माणसांना आपले विचार पटवून देणारा वक्ता म्हणजेच रंगरावदादा आहेत. स्वच्छ, चारित्र्य संपन्न व्यक्तिमत्त्व जपणे म्हणजे सामान्य गोष्ट नाही. सत्याचा पाठपुरावा करण्यामध्ये रंगरावदादांनी आयुष्यभर धन्यता मानली. सामान्य लोकांचे प्रश्न घेऊन बोलणे हेच आपले भुषण मानले असा हा पोलादी मनाचा थोर क्रांतिकारक-रंगरावदादा पाटील नव्या पिढीचे प्रेरणा स्थान व्हावेत. शेतकरी, कामगार, शेतमजूर, हमाल, श्रमिक आणि स्त्रिया तसेच विद्यार्थी यांचे प्रश्न घेऊन आयुष्यभर एकांडा शिलेदार लढणारा असा हा माणूस प्रत्येकाला हवाहवासा वाटवा असे जीवन रंगरावदादा जगले आहेत. म्हणूनच दादा-औक्षवंत व्हा !

(संदर्भ : **दै. प्रभात दर्शन** , सांगली दि.८/१/१९८७)

# एक देशभक्त

**श्री. दत्ता जंगम,** कराड, जि. सातारा

सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकारचे सैनिक थोर देशभक्त, क्रांतिवीर भाई रंगराव पाटील तथा रंगरावदादा उर्फ रंगराव विठ्ठल पाटील.

१९ ऑक्टोबर १९७२ रोजी इस्लामपूरच्या मामलेदार कचेरीवर दुष्काळग्रस्तांच्या मोर्चावर केलेल्या अमानुष गोळीबारात बळी पडलेल्या चार हुतात्मा विद्यार्थ्यांपैकी प्रथम क्रमांकाचा हुतात्मा राजेंद्र पाटील यांचे ते पिता आहेत.

भाई रंगराव स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसचे व प्रतिसरकारच्या भूमिगत नामवंत सैनिकांपैकी एक होते. स्वातंत्र्यानंतर शेकापच्या संस्थापक सदस्यांपैकी एक प्रमुख जबाबदार कार्यकर्ते म्हणून त्यांनी काम केले. सत्तारुढ पक्षातील गैरव्यवहार, अफरातफर, भ्रष्टाचार आणि लाचलुचपत तसेच शासकीय अधिकाऱ्यांकडून होणारे अन्याय, अत्याचार आणि कार्यकर्त्यांमधील लाचार प्रवृत्तींविरुद्ध त्यांनी आजपर्यंत हजारो जाहीर सभातून घणाघाती टीका करुन त्यांचे वाभाडे काढून ते जनता जनार्दनासमोर वेशीवर टांगले. आजही सातत्याने त्यांनी आपले हे कार्य पुढे चालू ठेवले आहे. पद्मभूषण कर्मवीर कै. भाऊराव पाटील, कै. क्रांतिसिंह नाना पाटील, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आदर्शाचा, विचारांचा जबरदस्त पगडा त्यांच्या मनावर खोलवर बिंबलेला आढळतो. साम्राज्यवादी, वसाहतवादी, सरंजामदारी, साव-सावकारी यासर्व प्रतिगामी प्रवृत्तींच्या शक्ती आपल्या अज्ञात शत्रूच्याच ठिकाणी ते मानतात.

रंगरावदादांनी आपल्या कार्यक्षेत्रात निःस्पृह, त्यागी, स्वाभिमानी, राष्ट्रवादी कार्यकर्त्यांच्याच निर्मितीचा कारखाना गेल्या ४०-४५ वर्षांच्या सार्वजनिक, राजकीय जीवनात सातत्याने अविश्रांत परिश्रमाने उभा केलेला आहे. राजकीय प्रतिकूल परिस्थितीत काम करणे म्हणजे वादी खेळ नव्हे. विरोधी पक्ष कार्यकर्ता म्हणून जीवन जगणे हे एक सतीचं वाण आहे.

पहाडी आवाजाचा, निर्भिड, सडेतोड, अस्सल, ग्रामीण बोली भाषेत माईकची गरजसुद्धा न भासणारा अभ्यासू वक्ता म्हणून संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र भाई रंगराव पाटील यांना ओळखतो. स्वत: स्वच्छ चारित्र्यसंपन्न पण क्रांतिकारकाचं जीणं जगण्यात भूषण मानणारे म्हणून आज त्यांचा सरकार दरबारी जो नैतिक दबाव व दरारा पहावयास मिळतो तो खासदार, आमदारांमधूनहि पहावयास मिळत नाही. वसंतदादा पाटील, रंगराव दादांचे स्वामी रामानंद भारती, क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ. व्ही. एन. पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, बॅ. पी. जी. पाटील हे आजहि त्यांच्या सार्वजनिक, राजकीय जीवनातील त्यांचे प्रेरणास्थान आहेत. सत्ताधाऱ्यांच्या मोहजालात न गुरफटणारा, पोलादी मनोवृत्तीचा, कणखर, राजकीय प्रतिकार शक्ती लाभलेला, आपल्या सार्वजनिक व राजकीय जीवनातील कर्तृत्वाने गगनाला गवसणी घालणारा अशा या पोलादी डाव्या विचारांच्या थोर पुरुषाला शतायुष्य लाभो हीच नियतीला प्रार्थना!

(संदर्भ : **दै. सागर,** दि. ७/१/१९८७)

# धगधगते नेतृत्व

**स्वातंत्र्य सैनिक, श्री. राजाराम यशवंत पाटील** (बापू), मांगले, सांगली.

ब्रिटीशांनी आपल्या देशावर १५० वर्षे राज्य केले. इंग्रज सरकारने चालवलेली दडपशाही, जुलमी कायदे यामुळे भारतीय जनता होरपळून निघू लागली. यामुळे हिंदुस्थानातील ब्रिटीश सत्तेला मोठा हादरा देणारी घटना सन १८५७ च्या बंडाने घडली. ब्रिटीशांनी सन १८५७ चा उठाव आपल्या सर्व सामर्थ्यानिशी मोडून काढला. यामधूनच भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी जशास तसे या धोरणाचा पुरस्कार करणारा कै. दादाभाई नौरोजी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक अशा क्रांतिकारकांचा गट निर्माण झाला. सन १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचे महानिर्वाण होऊन टिळक युगाचा अस्त झाला व गांधीयुग सुरु झाले आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्याची सूत्रे महात्मा गांधीजींनी आपल्या हाती घेतली. इंग्रज सरकारने हिंदुस्थानात चालवलेली जुलमी राजवट, दडपशाही, दहशतवाद, जुलमी कायदे यांचा अहिंसक मार्गाने प्रतिकार करण्यासाठी गांधीजींनी भारतीय जनतेला आव्हान केले. हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी जे आंदोलन करावयाचे ते शांततेच्या मार्गाने करावयाचे. प्रतिकारही करायचा, अन्याय सहन करायचा नाही. यासाठी तुरुंगात जावे लागले, हाल-अपेष्टा झाल्या तरी आनंदाने सोसायच्या, असे गांधीजींच्या आंदोलनाचे सूत्र होते. त्यांनी...

चंपारण्य सत्याग्रह, अहमदाबाद संघर्ष, बार्डोली सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह, बंगालची फाळणी यामध्ये अपूर्व यश मिळविले होते. पण १९४२ चे आंदोलन वरील आंदोलनापेक्षा वेगळे होते. ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवलिया टँक मैदानावर गांधीजींनी ब्रिटीशांना ''चालते व्हा'' अशी घोषणा केली. ८ ऑगस्टच्या मध्यरात्रीनंतर महात्मा गांधी, पंडित नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद अशा अनेक नेत्यांना सरकारने अटक केली. देशभर अटक सत्र सुरु झाले. त्यावेळी भूमिगत राहून जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, डॉ. राम मनोहर लोहिया, अरुणा असफअली, क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर पांडू मास्तर, क्रांतिवीर बर्डे मास्तर, क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू, कै. वसंतदादा पाटील, कै. यशवंतराव चव्हाण, कै. रामानंद भारती इत्यादींच्या समवेत मान. क्रांतिवीर रंगराव दादा पाटील या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या मुलाने शिक्षणास राम राम ठोकून या आंदोलनात उडी घेतली.

क्रांतिकारकांच्या मार्गदर्शनाखाली मोर्चे काढणे, रेल्वे उखडणे, तारा तोडणे, पोलीस चौक्या, पोस्ट कार्यालये यांना आगी लावणे, सरकारी खजिने लुटणे अशा तऱ्हेने धाडशी कार्यक्रम आखून इंग्रजी सत्तेला हादरे देण्याचे काम केले. सरकारने देशभर दडपशाहीचे धोरण स्वीकारुन हे आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी लाठीमार - गोळीबार झाले. अनेक क्रांतिवीरांना बलिदान करावे लागले. तर अनेकांना फाशी जावे लागले. बिहार व महाराष्ट्र या ठिकाणी प्रतिसरकारे स्थापन झाली. आंदोलनाने हिंसात्मक रुप घेतल्याने सर्वच

...त धगधगत राहिले. स्वातंत्र्य ...रा क्रांतिकारक मृत्यूच्या दारात ...त असताना त्याच्या ओठावर सतत 'गर्जा जयजयकार । अन् वज्राचे छातीवरती घ्या झेलून प्रहारा' अशा प्रकारचे गाणे तासन्तास मुरलेले होते. प्रत्येक क्रांतिकारक भारतमातेच्या मुक्ततेसाठी स्वत:हून या अग्नीकुंडात उडी मारत असे. अशा या अनेक क्रांतिकारकांच्या त्यागातून, बलिदानातून स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास घडलेला आहे. अशा या थोर क्रांतिकारकाच्या परंपरेतील एक शिलेदार म्हणजे क्रांतिवीर रंगरावदादा पाटील होय.

दादांचा पिंडच हा क्रांतिकारकाचा असल्यामुळे आपल्या कणखर व ओजस्वी भाषणाने सर्वांना मंत्रमुग्ध करत. त्यांचा जोश व आवेश यामुळे त्यांचे सहकारी व जनता ही पेटून उठत असे. त्यांचा प्रत्येक शब्द ब्रिटीशांवर घणाघाती प्रहार करीत असे. वक्तृत्व कला ही दादांना मिळालेली देणगी आहे. आजही वय वर्षे ८० असतानासुद्धा त्यांचे भाषण आपणाला धारदार वाटते. मग ऐन तारुण्यातील त्यांचे कतृत्व व वक्तृत्व सर्वांना भुरळ पाडणारे होते. लोक जागृती करण्यासाठी त्यांना या कलेचा फार मोठा फायदा झाला आहे. अशा तऱ्हेने १९४२ च्या सप्टेंबर महिन्यात येडेनिपाणी येथे श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी यात्रा भरते. तेथे कै. क्रांतिवीर पांडू मास्तर व दादांचे भाषण प्रथम ऐकण्याचा योग मला आला. त्यानंतर मात्र जिथे जिथे दादांचे भाषण असे तिथे मी सतत हजेरी लावत होतो. त्यांच्या भाषणामुळे आम्हीसुद्धा या चळवळीकडे आकर्षित झालो. म्हणून स्वातंत्र्य लढ्यासाठी लोकांना जागृत करुन इंग्रजांविरुद्ध पेटून उठण्यासाठी लोकांची मनोभूमिका तयार करण्याचे काम दादांनी केले आहे. आजही त्यांच्या भाषणातील प्रत्येक शब्द मला आठवत आहे.

दादांनी आष्टा, शिगाव, वडगांव या परिसरात चालत जाऊन दारु दुकाने बंद करावयास लावली. तसेच दारु पिणाऱ्यांना चपलाची माळ घालून त्याची गाढवावरुन धिंड काढत. त्यामुळे दारुच्या आहारी गेलेले लोक व्यसनमुक्त होऊन स्वातंत्र्य लढ्यात आकर्षित होत. लोकजागृती करण्यासाठी भूमिगत राहूनच त्यांना काम करावे लागत असे. त्यानंतर क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारमध्ये दादांचा मोठा वाटा आहे. त्यावेळी सातारा जिल्हा व सांगली जिल्हा एकच होता. तेव्हा देशात सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार म्हणून उदयास आले आणि सातारा जिल्ह्याचे नाव दिल्ली पार्लमेंटमध्ये गाजत होते. तेव्हा दादा सातारा जिल्हा काँग्रेसचे चिटणीस होते. त्यामुळे त्यांच्यावर जिल्ह्याची संपूर्ण जबाबदारी होती. हे संपूर्ण काम त्यांना भूमिगत राहूनच करावे लागत. अशा तऱ्हेने ब्रिटीश सत्ताधाऱ्यांविरुद्ध प्रखर लढा देऊन प्रसंगी प्राणाची आहुती देऊन फार मोठ्या प्रयत्नांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. थोडक्यात १८५७ पासून १९४७ पर्यंत स्वातंत्र्य मिळविण्यासाठी असंख्य देशभक्तांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिल्यामुळेच आपण स्वातंत्र्यात वावरत आहोत.

दादांच्या स्वप्नातील भारत स्वतंत्र झाला पण त्यानंतरही दादांना सतत संघर्ष व चळवळ यावर आघाडीवर रहावे लागले. ब्रिटीश गेले, परंतु त्यांची नीती घालविण्यासाठी आजअखेर दादा सतत क्रियाशील आहेत. ज्यांनी स्वातंत्र्यासाठी काहीही योगदान केले नाही, काहीही समर्पण केले नाही, स्वातंत्र्य चळवळीमध्ये भाग घेतला नाही असेच लोक स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राज्यकारभार करु लागले. अशा लोकांना स्वातंत्र्याची किंमत काय आहे ? याची कल्पना कशी येणार ? हे फक्त आयत्या पिठावर रांगोळ्या ओढणारे म्हणून सच्चा देशप्रेमींनी महाराष्ट्रात

उठाव केला. त्यामध्ये कै. केशवराव जेथे, कै. शंकरराव मोरे, कै. तुळशीदास जाधव, कै. भाई माधवराव बागल, कै. क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड, क्रांतिवीर रंगराव दादा अशा थोर मंडळींनी काँग्रेसला रामराम ठोकून शेतकरी कामगार पक्षात सामील झाले. खऱ्या अर्थाने कष्टकरी शेतकरी शेतमजूर कामगार यांना न्याय मिळण्यासाठी शेतकरी चळवळी, कामगार चळवळ, सहकार चळवळ यामध्ये दादांचा सिंहाचा वाटा आहे.

दादा आणि मी १९४२ पासून आजपर्यंत जवळजवळ ५७ वर्षे जिवाभावाचे मित्र म्हणून वागत आलो आहे. दादांच्या भूमिकेत सातत्य आहे ते आपल्या विचारांशी बांधील आहेत. स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊनसुद्धा सत्तेपासून दूर राहणारा, कोणाच्या रागा-लोभाची पर्वा न करणारा, स्वाभिमानाने जीवन जगणारा, दुसऱ्याचे दु:खात सहभागी होणारा व मनाने सोज्वळ व प्रांजल कार्यकर्ता म्ह[illegible] नांव सर्वात अग्रभागी आहे. [illegible] क्रांतिकारकाच्या वयाला ८० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांच्या सर्व कार्यात त्यांची सुविद्य पत्नी सौ. कल्पनादेवी पाटील यांचा मोलाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे त्यांचे एक चिरंजीव ताराराणी विद्यापीठाचे प्राचार्य तर दुसरे चिरंजीव महाराष्ट्र स्टेट शिखर बँकेत काम करत आहेत. दादांचे चुलते कै. व्ही. टी. पाटील यांनी ताराराणी विद्यापीठाची स्थापना केली. त्यांचा सहवास तसेच सर्वसामान्य जनतेचे अलोट प्रेम ही दादांची शिदोरी आहे.

अशा या कणखर बाण्याच्या क्रांतिकारकास, सच्चा राष्ट्रवादी नेत्यास परमेश्वराने दीर्घआरोग्य देऊन स्वातंत्र्य चळवळीतील हा दीपस्तंभ सर्वांना मार्गदर्शन ठरावा ही परमेश्वर चरणी प्रार्थना !

---

**"स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय एकात्मेसाठी माणसाची मने बांधली जात होती. देशातील अज्ञान आणि दारिद्र्य नष्ट करुन सामान्य जनतेला सुखाने जगता यावे म्हणून आमच्यासारख्या हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी जिवाची तमा न बाळगता, जातपात न पाहता, पक्ष गट न करता स्वातंत्र्यासाठी कष्ट घेतले. आमच्या स्वप्नातला भारत फार वेगळा होता. आज भारताचे चित्र पार बदलून गेल्याचे दु:ख आम्हा सर्व स्वातंत्र्य सैनिकांना होत आहे. आता २१ व्या शतकातील नवा भारत घडविण्याची जबाबदारी उगवत्या पिढीवर आहे."**

-- *क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील*

**दिनांक : २५ डिसेंबर २०००**

**८१ वा वाढदिवस**

# स्वातंत्र्य लढ्यातील कंठमणी

**श्री. भगवानराव आ. पाटील**, गुरुजी, राज्यपुरस्कार, स्वातंत्र्य सेनानी, सांगली

मी नुकताच बुधगांवला बदलून आलो होतो. शाळेच्या पटांगणात एक बोर्ड लागला होता, ''आज रात्री आठ वाजता महादेवाच्या देवळापुढे क्रांतिवीर रंगरावदादांचे भाषण.'' यापूर्वी माझी आणि त्यांची भेट नव्हती. परंतु त्यांच्या स्वातंत्र्य लढयातील धाडसाची कामे मी ऐकली होती आणि वर्तमान पत्रातूनही वाचली होती. मलाही त्यांचे भाषण ऐकावयाचे होते आणि प्रत्यक्ष त्यांना पाहावयाचे होते.

रात्री ६ वाजल्यापासून तरुणांचे, नागरिकांचे थवेच्या थवे देवळापुढे जमू लागले. त्याचवेळी संस्थाने विलीन करावीत यासाठी सारे रान पेटले होते. प्रजा परिषदेमार्फत ही सभा घेतली होती आणि त्यात रंगरावदादांचे व्याख्यान होणार होते. त्यामुळे तरुणांना, कार्यकर्त्यांना या सभेचे कमालीचे आकर्षण होते. म्हणून सारा गाव झाडून या व्याख्यानाला हजर होता.

दादांची धडधडती तोफ सुरु झाली. उंचीपुरी शरीरयष्ठी, पोलादी पिळदार आणि मजबूत बांधा, मुसमुसणारे तारुण्य आणि पहाडी आवाज, घणाघाती भाषण सुरु झाले. भाषणात ओज होता. मार्मिकता होती. कुठलाही बंदोबस्त नव्हता. परंतु हजारांची सभा शांतपणे भाषण ऐकत होती. एका उत्कृष्ट शैलीदार आणि प्रभावी भाषणाचा तो एक उत्कृष्ट नमुना होता. तरुणांना क्रांतिसाठी पेटविण्याचे ते एक उत्तम टॉनिक होते आणि त्यांच्या भाषणाने तरुण पेटत होते. त्यावेळेपासून त्यांच्या सभेला हजर राहण्याची संधी मी गमावली नाही.

वारणेच्या काठावरील वाळवे तालुक्यातील शिगावसारख्या खेडेगावात रंगराव दादांच्यारुपाने क्रांतीच्या सुगंधाने आणि कर्तृत्वाच्या सुवासाने फुललेले हे कमळ होते. त्यांनी इंग्रजांविरुद्ध दिलेल्या तेजस्वी लढ्याने सांगली, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्याच्या लढ्यातील ते कंठमणी ठरले होते.

१९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदान अत्यंत प्रभावी होते. रेल्वे स्टेशन जाळणे, तारा तोडणे, पोस्ट लुटणे या त्यांच्या कामामुळे इंग्रजी सरकारची यंत्रणा हैराण झाली. पोलिसांची झोप उडाली. रंगरावदादांना पकडण्यासाठी सरकारने त्यावेळी ५००/- रुपयांचे बक्षीस जाहीर केले. दादा भूमिगत झाले. चेंडू जमिनीवर जोराने आपटला तर अधिक जोराने उशी घेतो, दादांचे तसेच झाले. दादांनी आपला स्वातंत्र्य लढा न दबता अधिक प्रखर केला. पोलिसांचा पाठलाग चालूच होता. घरातील माणसांना पोलिस छळू लागले. पण दादांनी पोलिसांना दाद दिली नाही. दादा आपल्या पराक्रमाने जनतेच्या गळ्यातील ताईत बनले होते. त्यांना ते सर्व प्रकारची मदत करीत होते. शेवटी तुरुंगवासही त्यांनी भोगला. अशा धाडशी क्रांतिकारकांच्या त्यागावर हे स्वातंत्र्याचे मंदिर उभारले आहे. स्वातंत्र्यानंतर आज जे चालले आहे ते पाहून ते संपातपतात. अत्यंत कडक शब्दांत राज्यकर्त्यांचा धिक्कार करतात. सत्ता आणि संपत्तीच्या धुंदीत हे राज्यकर्ते सामान्य समाजाला विसरले आहेत. एवढेच नव्हे तर उलट त्यांना आपला

स्वार्थ साधण्यासाठी वेठीला धरतात. हे सांगताना ते म्हणतात, ''पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा, वेश्येला मणिहार, केशवा अजब तुझे सरकार''. त्यांच्या भाषणात स्पष्टवक्तेपणा आहे. अन्यायाची चीड आहे. आजही या वयात लढ्याची भाषा ते बोलतात. आजही त्यांचे प्रबोधनाचे काम सातत्याने चालू असते.

इस्लामपूरला मोर्चा काढण्यापूर्वी मल्लिकार्जुनाच्या डोंगरावर एक मोठी सभा घेतली होती. त्यात मोर्च्याचे सारे नियोजन केले. त्या नियोजनात व मोर्च्यात दादांचा सिंहाचा वाटा होता. या मोर्चात दादांच्या एका तरुण मुलग्यास पोलिसांनी गोळी घालून ठार केले. त्यानंतरही या पति-पत्नीनी सारे दु:ख गिळून आपले कार्य पुढे सतत चालू ठेवले. प्रतिसरकारच्या कामातही ते सक्रीय होते. त्यांचा स्वतंत्र गट होता व त्यांचा सर्व गटाशी संपर्क होता.

कोणत्याही पुरुषामागे त्यांची समर्थ पत्नी उभी असली तर त्या पुरुषाचे सामर्थ्य अधिक उठून दिसते. १९४७ साली सौ. कल्पनादेवीशी त्यांचा विवाह झाला. दादांनी प्रपंचाकडे दुर्लक्ष करुन आजही सामाजिक कामात ते आपला पूर्ण वेळ देतात. सांगली जिल्हा गौरव समितीचे ते अध्यक्ष होते. स्वातंत्र्य सैनिक सन्मान समितीचे आजही ते अध्यक्ष आहेत. घरची सारी जबाबदारी पत्नी कल्पनादेवींनी सांभाळली. उत्तम गृहिणी म्हणून त्यांचा लौकिक आहे. मी सांगली जिल्हा प्रा. शिक्षक बँकेचा अध्यक्ष असताना त्या माझ्या बँकेत सुपरवायझर मंडळावर सदस्या म्हणून होत्या. त्यामुळे त्यांच्या कामाबद्दल मला आदर वाटतो. त्यांनी आपल्या मुलामुलींची शिक्षणाची सर्व जबाबदारी घेऊन एक चांगली कर्तृत्वसंपन्न पिढी तयार केली. क्रांतिकुमार कमला कॉलेजचे प्राचार्य म्हणून काम पाहतात. विजयकुमारही बँकेत मोठ्या हुद्यावर आहेत. मुलीही आपापला नेटका प्रपंच करत आहेत. हे श्रेय कल्पनादेवींनाच द्यावे लागेल. ही जबाबदारी सौ. कल्पनादेवींनी सांभाळल्यामुळे रंगरावदादांना सामाजिक कामाला अधिक वेळ देता आला. घराणे तसे प्रतिष्ठित, खानदारी आहे. तरीही दादांनी आपल्या पत्नीला पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. पत्नीनेही हे स्वातंत्र्य प्रतिष्ठेने सांभाळले होते. घराला साजेसे घरपण दिले होते.

दादांनी आपल्या वयाची ८० वर्षे पूर्ण करुन ते ८१ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. अशा या क्रांतिकारकाला व त्यांच्या पत्नीला उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो अशी प्रभुचरणी प्रार्थना ....!

# आजची पिढी संस्कारापासून वंचित

**श्री. रंगरावदादा पाटील**

माणसाच्या उपजत अपप्रवृत्ती शिक्षण आणि संस्काराने बदलतात. आजची पिढी संस्कारापासून वंचित होऊ लागलेली आहे. वैज्ञानिक प्रगतीबरोबर आध्यात्मिक प्रगती न झाल्यामुळे माणसाची माणूसकी संपू लागलेली आहे हे प्रगतीचे लक्षण नव्हे, समाधानी प्रवृती जोपर्यंत शिक्षणातून आणि संस्कारातून निर्माण होत नाही, तोपर्यंत प्रगती शक्य नाही. शिक्षणातून माणूस सुसंस्कारित होत नसेल तर शिक्षणाची पुनर्रचना केली पाहिजे. माणूसकी नष्ट करणाऱ्या रुढी आणि परंपरा नष्ट केल्या पाहिजेत.

(संदर्भ : **दै. सत्यवादी,** दि. १८/८/१९८४)

# रंगरावदादांच्या सहवासात

**श्री. आनंदराव डी. थोरात,** वाळवा, माजी मुख्याध्यापक, प्रतिनिधी हायस्कूल, कुंडल, जि. सांगली

आठ ऑगस्ट १९४२ च्या ''छोडो भारत'' आंदोलन स्वातंत्र्य लढ्या सुरु झाला. म. गांधी, पं. नेहरु, स. वल्लभभाई पटेल इ. पुढारी पकडले. परंतु जयप्रकाश नारायणसारे जहाल पुढारी भूमिगत झाले. महाराष्ट्रात साथी अच्युतराव पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली भूमिगत लढा चालू झाला. विशेषत: त्यावेळच्या सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारची स्थापना झाली. त्या प्रतिसरकारचे नेतृत्व क्रांतिसिह नाना पाटील यांच्याकडे होते. जिल्ह्यातील तहशीलदार कचेऱ्यांवर तिरंगी झेंडे फडकले, ग्रामीण भागातील सर्व प्रशासकीय व्यवहार गावागावातील पंचमंडळे व न्यायदान मंडळेख हाताळत असत. तारा तोडणे, रेल्वे रुळ उखडणे, पोस्ट लुटले, बँका लुटणे आणि इंग्रजी राजवट खिळखिळी करणे इ. घातपाती कारवाया भूमिगत कार्यकर्ते पार पाडत असत. भूमिगत आंदोलकांचे विभागवार ग्रुप असत. त्या प्रत्येक ग्रुपवर एकेक ग्रुप लीडर असे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सारे स्वा. सैनिक हालचाल करत. त्यावेळी वाळवा परिसर विभागात क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली आझाद फौजी संघटना काम करत होती. ही संघटना सशस्त्र होती. ही संघटना गावा-गावातील गावगुंडांना, बाया-बापड्यांची अब्रू लुटणाऱ्या टग्यांना, इंग्रज सरकारच्या पोलीस खात्याला बातम्या पुरविणाऱ्या खबऱ्यांना पत्र्या ठोकणे, हातपाय तोडणे अशा शिक्षा करत. नागनाथ आण्णांच्या फौजी संघटनेची प्रचार आघाडीची धुरा सांभाळण्याची जबाबदारी शिगावचे क्रांतिवीर रंगराव दादा पाटील यांचेकडे होती. त्या प्रचारी पथकात मी बालशाहीर म्हणून पोवाडे सादर करत असे. यात माझे दोन साथीदार दत्ता माने आणि किसन थोरात हे मला साथ करत. आमच्या संरक्षणासाठी दोन बंदुकधारी फौजी सैनिक असत. प्रवास रात्रीचा असे, त्यासाठी माझ्या गावच्या रामगौंडा पाटलांची तुफानी बैलगाडी होती.

एका रात्री कर्मवीर आण्णांच्या ऐतवडे गावात आमचा कार्यक्रम आयोजित केला होता. गावातील वडाच्या झाडाच्या पारावर व्यासपीठ उभे होते. त्याकाळी लाऊड स्पीकरची सोय नव्हती. रंगरावदादा भाषणास उभे राहिले. उंची पुरी, धिप्पाड शरीरयष्ठी, रोमरोमात उसळणारे नवजवान रक्त, भेदक व सूचक डोळे, भव्य विशाल कपाळ, लांब धारदार नासिक, घनगंभीर सिंहासारखा आवाज, प्रथम दर्शनीच समोर बसलेल्या श्रोतृवृंदावर छाप पडली.

''भारत माता की जय'', ''छत्रपती शिवाजी महाराज की जय'', ''म. गांधी की जय'' अशा घोषणा देऊन त्यांनी आपल्या आक्रमक आणि जहाल तुफानी

भाषेत इंग्रजांच्या जुलमी राजवटीवर त्यांना सहाय्य करणाऱ्या गावोगावच्या हस्तकांवर, तसेच गावोगाव खंडणी वसूल करणाऱ्या टग्यांवर व दरोडे घालणाऱ्या दरोडेखोरांवर जहरी टीका करुन शेवटी ''भारत मात की जय'' अशी गर्जना करुन त्यांनी आपले भाषण बंद केले. त्यानंतर लगेच आमच्या शाहिरी पोवाड्याचा कार्यक्रम सुरु झाला. आमच्या कार्यक्रमात आम्हीही इंग्रजांच्या जुलमी राजवटीवर, गावगुंडांवर तसेच पोलिसांना बातम्या देणाऱ्या खबऱ्यांवर टीकास्त्र सोडले. एव्हाना मध्यरात्र उलटली. कोणीतरी पोलीस खात्याला बातमी दिली. पोलीस गावाच्या वेशीवर आपल्याची बातमी आमच्या जागरुक सैनिकांनी आम्हाला दिली. तात्काळ कार्यक्रम बंद करुन बैलगाडीतून आमचा प्रवास सुरु झाला. काळाकुट्ट अंधार, पांदीचा रस्ता, भोवताली किर्र झाडी, भरधाव वेगाने धावणारे बैल, स्वत: रंगराव दादा गाडी हाकण्यास बसले. पोलीसांनी पाठलाग सुरु केला. दादांनी पहिल्या रस्त्यावरुन दुसऱ्या रस्त्याने गाडी वळविली. तांदुळवाडी-बहादुरवाडी मार्गे शिगाव या दादांच्या शिवारातील एका मळ्यात येऊन पोहोचलो. अशाप्रकारे पोलीसांच्या तावडीतून दादांच्या धाडसामुळे आमची सुटका झाली.

# जिद्द आणि ईर्षा बाळगणारा खरा स्वातंत्र्य सैनिक

श्री. रंगरावदादा

स्वातंत्र्य प्राप्तीसाठी ज्या हेतूने स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणाचे बलिदान केले, यातना भोगल्या आणि तुरुंगवास पत्करला तो हेतू आजही सफल झालेला नाही. हे स्वातंत्र्य आम्ही कां मिळवले ? याचा पश्चातापही होतो आहे. शासनाने स्वातंत्र्य सैनिकांना लाचार बनविण्यासाठीचे पेन्शन योजना चालू केली असे म्हटले तर काही वावगे नाही. आर्थिक अमिषामुळे स्वातंत्र्य संग्राम संघटनेत फूट पडली.

**जिद्द व ईर्षा पाहिजे**

मान हलत असताना लाचार न बनता, मनात जिद्द आणि ईर्षा बाळगून समाज सुधारणेचे कार्य जो करीत असतो तोच खरा स्वातंत्र्य सैनिक. आजच्या अनेक स्वातंत्र्य सैनिकांबद्दल न बोलणे शहाणपणाचे ठरेल. जुन्या स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन न देता त्यांच्या मुलाबाळांना मोफत सक्तीचे प्राथमिक व दुय्यम शाळांमधील शिक्षण द्यावे आणि त्या मुलांना अग्रहक्काने शासकीय नोकऱ्या द्याव्यात अशी विनंती मी काही वर्षापूर्वी स्व. वसंतदादांच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाकडे केली होती पण ती यशस्वी झाली नाही.

**संधी साधू नेते**

आजचे अनेक संधीसाधू नेते, म. फुले, आगरकर, शाहू महाराज यांचा आदर्श समाजपुढे मांडीत असतात. थोरामोठ्यांच्या गौरवामागे या बनेल नेत्यांची सतत काळी कृत्ये चालू असतात. उपदेश करतात, पण त्याप्रमाणे ही मंडळी अजिबात वागत नाहीत. या लोकांना दुरुस्त करेणसाठी त्यांची पूजा हातात घेऊनच केली पाहिजे. म. गांधी आणि नेहरुंचा आदर्श अंत:करणात ठेऊन नवभारत घडविण्यासाठी पुन्हा एकदा सर्व सच्च्या स्वातंत्र्य सैनिकांनी उरलेले आयुष्य देशाला अर्पण करावे.

(संदर्भ : **दै. अग्रदूत,** दि. १७/११/१९९१)

# समतेचे पुजारी

**श्री. सुनील कदम**, ता. वाळवा, जि. सांगली

माणूस हा सुखाचा सोबती आहे, असे म्हणतात. सर्वसाधारणत: आयुष्यभर त्याची धडपड केवळ सुखाकरिताच चाललेली असते. आयुष्याच्या वाटचालीत प्रत्येकालाच हे सुख लाभते, असे नाही. कारण ''व्यक्ती तितक्या प्रकृती'' या उक्तीप्रमाणे प्रत्येकाच्या सुखाच्या कल्पनाही वेगवेगळ्या असतात. कुणाला भौतिक समृद्धता म्हणजे सुख वाटते, तर कुणाला भौतिक समृद्धतेऐवजी लौकिक आणि कीर्ती संपादन करण्यातच जीवनाची इतिकर्तव्यता वाटते. कोण अध्यात्मिक साधनेत सुख पाहील, तर आणखी कुणाला सुखाचा आणखी एखादा अभिनव मार्ग गवसेल, ते सांगता येत नाही.

पण जी काही अशी माणसे आहेत की, जी आयुष्यभर एखाद्या ध्येयपथावर वाटचाल करुन आपल्या ध्येयाप्रत पोहोचली आहेत. अशी माणसे म्हणजे आगीतून तावून सुलाखून निघालेल्या सोन्यासारखीच भासतात. आगीतून तावून सुलाखून निघालेल्या सोन्याला जशी एक प्रकारची झळाळी आणि संपन्नता या माणसांच्या आयुष्याला लाभलेली असते. आणि म्हणूनच अशा लोकांच्या जीवनाचा मागोवा आणि अभ्यास प्रेरणादायी ठरत आलेला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात आपला देश इंग्रजांच्या पारतंत्र्यात असताना देशाला इंग्रजाच्या जोखडातून सोडवून स्वातंत्र्य मिळवून देणे, या एकाच उद्देशाने देशातील अनेक युवकांना अक्षरश: झपाटून टाकले होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे, हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय बनले होते. व्यवहारी जगाच्या दृष्टीकोनातून सुखाचा मार्ग वेगळा असला, तरी भारतमातेच्या या सुपुत्रांच्यादृष्टीने हाच सुखाचा मार्ग होता आणि या मार्गाने जाऊन अनेकांनी देशासाठी बलिदान पत्करले, तरीसुद्ध मागे उरलेल्यांनी डगमगून न जाता याच वाटेने जाण्यात जीवनाची इतिकर्तव्यता मानली. अशा काही ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानींपैकी एक म्हणजे शिगाव (ता. वाळवा) येथील क्रांतिवीर रंगरावदादा पाटील. प्रतिसरकारच्या लढ्यात क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी, क्रांतिअग्रणी जी. डी. लाड, कै. वसंतदादा पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून लढलेल्या रंगरावदादा पाटील यांना अवघा सांगली जिल्हा ''दादा'' या नावानेच ओळखतो.

सव्वासहा फूटाची भरदार शरीरयष्टी आणि दमदार व पहाडी आवाज ही दादांच्या व्यक्तिमत्त्वाला लाभलेली नैसर्गिक देणगी आहे. पारतंत्र्याच्या काळात दादांची ही देहयष्टी नुसती बघूनच इंग्रज शिपायांच्या आणि देशद्रोह्यांच्या उरात धडकी भरत असत. त्यांच्या दमदार आवाजात एक वेगळाच वकूब होता. आज वयाच्या ७९ व्या वर्षीही दादांची शरीरयष्टी भरदारच आहे. याचे कारण शरीराला लहानपणापासून लागलेली व्यायामीच सवय. आजही दादांची दिनचर्या नवयुवकांनाही लाजवेल, अशी आहे.

पहाटे पाच वाजता उठून गावाबाहेर एकांतात आठ ते दहा किलोमीटर फिरायाला जाणे, त्या ठिकाणच थोडा शारीरिक व्यायाम करणे, परत येता-येताच स्वत:च्या शेतीत फेरफटका मारुन, शेतीतल्या कामांची माहिती घेऊन मजूरांना योग्य त्या सूचना देणे, घरी परत येताच स्वत: हातात झाडू घेऊन घराच्या सभोवतालचा सगळा परिसर स्वच्छ करणे, त्यांतर स्वत:ची स्नान, भोजन आदी कर्मे उरकणे.

नियमित वाचन हा दादांच्या दिनचर्येतील एक अविभाज्य भाग आहे. त्यांना कोणत्याही विषयाचे वावडे नाही. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक अथवा धार्मिक कोणत्याही विषयावरचे ते पुस्तक असो, पण दररोज पाच-पन्नास पानांचे वाचन आपल्याकडून झालेच पाहिजे, हा त्यांचा परिपाठ आहे. वाचनाच्या या आवडीमुळे दादांच्या घरात त्यांचे स्वत:चे असे एक छोटेखानी ग्रंथालयाच आहे. लोकांमध्येही वाचनाची ही आवड निर्माण व्हावी, अशी त्यांची रास्त अपेक्षा आहे. चांगल्या विषयांवरची अनेक दुर्मिळ पुस्तके मिळवून ती शाळा, महाविद्यालयातील ग्रंथालयांना भेट देण्याकडे त्यांचा विशेष भर असतो. जेणेकरुन विद्यार्थ्यांना काही चांगले वाचण्याची सवय लागावी.

वयाच्या ८१ व्या वर्षीसुद्धा आपणाला कोणताही अगदी किरकोळसुद्धा आजार नाही, हे दादा अभिमानाने सांगतात. त्याचमुळे ते आजसुद्धा पूर्वीच्याच उत्साहाने आणि जोमाने सामाजिक कार्यात सक्रीय आहेत. मौनी विद्यापीठ, गारगोटीचे ते अध्यक्ष होते, पण काही दिवसांपूर्वीच आपल्या कार्यबाहुल्यामुळे या पदाचा राजीनामा दिला. सध्या ते सांगली जिल्हा स्वातंत्र्यसैनिक सन्मान समितीचे अध्यक्ष आणि कोल्हापूरच्या ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष या पदावर कार्यरत राहून सामाजिक कार्यातील आपला ''खारीचा वाटा'' उचलत आहेत. याखेरीज अन्य काही संस्थांवर पदाधिकारी म्हणून ते कार्यरत आहेत. परिसरातील अनेक सामाजिक, शैक्षणिक व सहकारी संस्थांचे मार्गदर्शक व आधारस्तंभ म्हणून ते परिचित आहेत.

दादांना एकूण सहा अपत्ये, तीन मुले आणि तीन मुली. केवळ मुलगेच नव्हेतर, त्यांच्या मुलीही उच्च विद्याविभूषित आहेत. सर्वात मोठे चिरंजीव क्रांतिकुमार पाटील हे सध्या कोल्हापुरातील कमला कॉलेजचे प्राचार्य आहेत, तर दुसरे चिरंजीव विजय पाटील हे राज्य सहकारी बँकेत उच्चपदस्थ अधिकारी आहेत. दुर्दैवाने दादांचे तिसरे चिरंजीव इस्लामपुरात शेकापने काढलेल्या मोर्चाच्यावेळी पोलिसांनी केलेल्या अत्याचारी गोळीबारात बळी गेले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी छातीवर परकियांच्या गोळया झेललेल्या या स्वातंत्र्यसेनानीचा मुलगा स्वातंत्र्य मिळाल्यावर स्वकियांच्याच गोळीला बळी पडावा, यासारखी दुर्दैवी घटना ती कोणती. दादांच्यादृष्टीने त्यांच्या आजवरच्या जीवनातील ही एक अतिशय क्लेशदायक अशी घटना आहे. दादांच्या तीनही मुली उच्च विद्याविभूषित असून, दादांनी त्यांचे विवाह स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांशीच करुन दिलेले आहेत.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी अवघे आयुष्य स्वातंत्र्य संग्रामात लोटलेला हा स्वातंत्र्य सेनानी देशाच्या सद्य:स्थितीबाबत मात्र आजही असमाधानीच आहे. देशाच्या सद्य:स्थितीबाबत बोलताना

रंगरावदादा पाटील म्हणाले, स्वातंत्र्यासाठी जीवाची बाजी लावताना आम्हा या असल्या स्वातंत्र्याची अपेक्षा नव्हती. इंग्रजाशी टक्कर घेताना केवळ देश त्यांच्या राजवटीतून मुक्त करणे, एवढेच आमचे ध्येय नव्हते, तर मिळालेल्या स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर करणे हेही आमचे ध्येय होते. मिळालेले स्वराज्य हे देशातील सर्वांचे, गोरगरीबांचे, समतेचे आणि संपन्नतेचे असावे, अशी आमची इच्छा होती, पण काय दिसते.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे शब्द केवळ घोषणा फलकावर उरले आहेत. आजचे राजकारणी पदोपदी महात्मा गांधीजींचे नाव घेऊन, आपली ''राजकीय पोळी'' भाजून घेत आहेत. कुठाय ती महात्माजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना ? जर ही संकल्पना साकार होत नसेल, तर या राजकर्त्यांना त्याचे नाव घेण्याचा अधिकारच काय ? आम्हा अभिप्रेत असलेले हे स्वराज्य नव्हे. मूठभर सत्तापिपासू, धनदांडगे, बडे भांडवलदार आणि जातीय व धर्मांध लोकांनी आज या देशाच्या स्वातंत्र्यावर कब्जा मिळवून क्रांतिकारकांनी आपल्या रक्ताचे सिंचन करुन मिळवलेले स्वराज्य बळकावले आहे. 'गोरे गेले आणि काळे आले' एवढाच फरक पडला आहे.

स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर करण्यासाठी आता आणखी एक संघर्ष करावाच लागेल, असे सांगून दादा म्हणाले, वयाच्या मानाने माझे शरीर जरी थकले असले, तरी मन थकलेले नाही. नागरिकांनीही आता उठाव केला पाहिजे, त्यांचीही साथ हवी. नागरिकांनी आता आपणाला काय हवे, हे ठरविण्याची निर्यायक वेळ आली आहे.

युवक हा देशाचा आधारस्तंभ असला तरी हा आधारस्तंभ आता किडत व सडत निघाला आहे. असा सणसणीत टोला दादांनी यावेळी बोलताना लगावला. महाविद्यालयांमध्ये दररोज घडणारी एकतर्फी प्रेमप्रकरणे, वाढती व्यसनाधीनता, दररोजच्या मारामाऱ्या, गुंडगिरी हे सगळे कशाचे द्योतक आहे ? स्वातंत्र्यसैनिकांनी रक्ताचे पाणी करुन परकियांच्या गोळ्या छातीवर झेलून हे स्वराज्य मिळवले आहे, हे युवकांनी जाणून घ्यावे. आपल्या वर्तमान स्वातंत्र्याचे स्वैचारामध्ये रुपांतर करु नये, असा कानमंत्रही यावेळी त्यांनी दिला.

वयाच्या ८१ व्या वर्षीही हा ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी संघर्ष करीतच आहे. यातच या स्वातंत्र्य सैनिकांनी जीवनाची इतिकर्तव्यता आहे.

## उगवत्या पिढीचा आदर्श !

**श्री. शामराव सावंत, कुंडल**

सातारा प्रतिसरकारची राजधानी कुंडल आणि माझे गाव कुंडल असल्यामुळे मला अनेक नामवंत क्रांतिवीरांचे दर्शन घडले. लक्षात राहण्यासारखे क्रांतिवीर हाताच्या बोटावर मोजण्याइतके आहेत. त्यामध्ये श्री. रंगरावदादा यांचा वरचा क्रमांक लागतो.

त्यांची भाषणे ऐकण्याचा योग मला आला. क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिअग्रणी जी. डी. उर्फ बापूसाहेब लाड, भाई दत्ता पवार, प्रा. एन. डी. पाटील, भाई भगवानराव सुर्यवंशी इत्यांदींच्यामुळे रंगरावदादांचे आचार-विचार मला समजले.

शब्दांकन : **प्रा. दिनकर पाटील**

# माझ्या शब्दात मी... !

**श्री. रंगरावदादा पाटील**

**"..... साताराच्या 'प्रतिसरकार'मध्ये राबविली गेलेली ग्रामराज्य ही प्रतिमा आम्ही भावुकतेने उराशी बाळगली होती. ती स्वप्ने ३०-४० वर्षात छिन्नभिन्न झाली आहेत. आयुष्याची सायंकाळ आनंददायी, शीतल, समाधानी होण्याऐवजी भयाण वाटू लागली आहे....."**

भारताच्या तेजोमय स्वातंत्र्य संग्रामातील मी एक सैनिक. आयुष्याच्या सायंकाळच्या प्रवासाला लागलो आहे आणि पूर्वायुष्यातील सैनिक कारकीर्द आठवत आहे. आम्ही ज्या आत्मसमर्पणाच्या भावनेतून लढलो त्या लढ्याच्या स्मृतींना उजाळा देण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

वयाच्या २० व्या वर्षी मी स्वातंत्र्य लढ्यात उतरलो. त्यावेळी कर्मवीर भाऊराव आण्णांकडे सातारा येथे सयाजीराव हायस्कूलमध्ये इंग्रजी ५ वी, ६ वी मध्ये शिकत होते. १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरु झाले आणि या युद्धात इंग्लंडच्या बाजूने भारताला उतरविणे भारतीय नेत्यांच्या मर्जीविरुद्ध भाग पाडले. भारतीय काँग्रेसच्या नेतृत्वाने इंग्रज शासनाविरुद्ध त्यांच्या कृतीसंबंधी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. इंग्रजाविरोधी काँग्रेसच्या लढ्याला धार आली.

माझे प्राथमिक शिक्षक श्री. कुराडे व श्री. ढेरे हे राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षक होते. वाळवा तालुक्यातील शिगाव या माझ्या जन्मगावी मी मराठी शाळेत असताना या शिक्षकांनी जे संस्कार माझ्यावर केले त्यातून माझा राष्ट्रीय वृत्तीचा पिंड तयार झाला होता. त्या बालवयात त्यांनी जातीपाती पलीकडील समाजजीवनाचे बाळकडू दिले. इतकेच नव्हे, तर माझ्यासारख्या सधन व प्रतिष्ठित घराण्यातील विद्यार्थ्याकडून लग्नात हुंडा घेणार नाही आणि गरिबाघरच्या मुलीशी विवाह करेन असे वचन घेतले होते. त्या गुरुजनांना दिलेला शब्द १९४७ मध्ये विवाह करताना पाळला. स्वामी रामानंदमहाराज व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या साक्षीने एकवीस रुपयात गांधी लग्न साजरे झाले. आज असे गुरुजी, असे विद्यार्थी का असू नयेत ? याची मनात खंत वाटते.

या माझ्या राष्ट्रीय वृत्तीमुळे शिक्षणाकडे पाठ फिरवून मी स्वातंत्र्य लढ्यात स्वत:ला झोकून दिले. त्याची मला जबर किंमतही मोजावी लागली. मी मुद्दाम वाचकांपुढे माहिती ठेवू इच्छितो. शिगाव येथील नांगरे-पाटील घराण्यातील मी. रावसाहेब व्ही. टी. पाटील हे माझे चुलते. माझे वडील विठ्ठलराव पाटील व व्ही. टी. पाटील या दोन बंधूंचा मी एकुलता एक वारसदार. ऐशआरामी जीवन जगतो तरी तमा नसावी अशी स्थिती. परंतु स्वातंत्र्य समरात उडी घेताच मला घराचे दरवाजे बंद झाले. त्याची तमा न बाळगता लढ्यात उतरलो.

स्वातंत्र्य समरातील आमचे सर्वोच्च उद्दिष्ट स्वातंत्र्य संपादन करणे हे होते. स्वातंत्र्य समरात लढा देत असता देशाचे स्वातंत्र्य 'याची देही, याचि डोळा' पहायला मिळेल अशी स्थिती नव्हती. कारण आम्ही साताराच्या मंडळींनी ब्रिटीश सत्तेशी तीव्र संघर्ष

सुरु केला होता. सातारा जिल्हाभर ठिकठिकाणी क्रांतिकारकांचे गट संघटित झाले होते व ब्रिटीश सत्तेला या परिसरात शह देण्यात आम्ही यशस्वी झालो होतो. आमचा लढा मोडून काढण्यासाठी ब्रिटीशांनी जंगजंग पछाडले. आम्हा काही प्रमुख कार्यकर्त्यांनो बक्षिसेही लागली होती. कुणास ठाऊक कदाचित बक्षिसाच्या अमिशानेहि आमचा घात झाला असता. आम्ही भाग्यवान खरेच. जे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मी झटलो स्वातंत्र्यात मी माझ्या आयुष्याची संध्याकाळ जगतो आहे याचे मला निश्चित समाधान वाटते. थोडे आसपास डोकावून पाहिले तरी त्याची खात्री पटते. आमच्याबरोबरीने वेगळी चूल मांडलेल्या देशात आनंदी आनंद आहे. शिवाय आम्ही लढून मिळविलेले स्वातंत्र्य पुढच्या पिढीने शेजारी राष्ट्रांची आलेली संकटे टाळून देशाचे स्वातंत्र्य अबाधित जरुर राखले याचे आम्हाला समाधान वाटते.

मात्र स्वातंत्र्य म्हणजे सत्तेतील बदल नव्हे. स्वातंत्र्याबरोबरीनेच स्वतंत्र भारत कसा असेल याची आम्ही स्वप्ने रंगविली होती. किंबहुना आम्ही सातारकर मंडळींनी त्या स्वराज्याची रंगीत तालीमहि घेतली होती. 'प्रतिसरकार'मध्ये राबविली गेलेली 'ग्रामराज्य' ही प्रतिमा आम्ही भावुकतेने उराशी बाळगली होती. ती आमची स्वप्ने स्वराज्याच्या गेल्या ४० वर्षात छिन्नभिन्न झालेली दिसून येत आहेत. त्यामुळे आयुष्याची सायंकाळ आनंददायी, शीतल, समाधानी होण्याऐवजी भयाण वाटू लागली आहे.

स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळातच काँग्रेसने स्वराज्यासंबंधीची स्पष्ट मते मांडली होती. सामान्यजनांच्या आशा-आकांक्षा फुलल्या होत्या. श्रमला प्रतिष्ठा असणारे, सामान्यजनांना सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रतिष्ठा प्राप्त करुन देणारे, जात-पात, श्रीमंत-गरीब यांच्या पलीकडील जाती-पाती विरहित, समतेवर आधारलेले जीवन वाट्याला येईल, असे स्वप्न सामान्य माणसाने उराशी बाळगले होते.

गेल्या ४० वर्षात 'गरिबी हटाओ'चे नारे झाले. गरिबी हटवण्याऐवजी गरीबच अधिक हटला. समाजवादाचा उद्घोष तर आज सर्वच राजकीय पक्ष करु लागले आहेत. पण या समाजवादाची वाट कोणी रोखली आहे समजत नाही. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांचे चारित्र्य किळसवाणे वाटते. आमच्या पुढे उत्तुंग चारित्र्याच्या नेत्यांचे आदर्श होते. आजचे चित्र भयावह आहे. संताप येतो, मन उद्विग्न होते. याचसाठी स्वातंत्र्य मिळविले का, असे वाटते. ज्या गुरुजींना दिलेले वचन मी पाळले, त्या मला माझ्या मुलीच्या लग्नासाठी हजारोंनी रुपये मोजावे लागले. हा स्वातंत्र्यात माझा पराभव नव्हे काय ? 'बोफार्स' सारखी राष्ट्रांच्या संरक्षणाशी निगडीत असणारी प्रकरणे पाहता या पिढीला स्वातंत्र्याचे सोयरसुतकसुद्धा वाटत नाही याची आम्हा स्वातंत्र्यसैनिकांना लाज वाटते. राजकर्तेच भ्रष्ट, सत्तापिपासू बनले तर सामान्य जनांनी कोणाकडे आशेने पहावे.

आमच्या स्वप्नांचा, आकांक्षाचा, हेतूचा आजच्या राजकीय नेतृत्वाने अक्षरश: चोळामोळा केला आहे.

# एक झंझावात

**प्रा. दिनकर विष्णू पाटील,** भोगावती महाविद्यालय, कुरुकली, ता. करवीर, जि. कोलहापूर.

सन १९७१-७२. त्यावेळी महाराष्ट्रभर दुष्काळ पडला होता. भारत-बांगलादेशचे युद्ध चालू होते. मी कुंडलच्या क्रांतिसिंह नाना पाटील विद्यार्थी वसतिगृहात विद्यार्थी म्हणून इयत्ता ९ वीत शिकत होतो.

विद्यार्थ्यांची फी कमी करावी यासाठी सांगली जिल्हा परिषदेवर विद्यार्थ्यांचा मोर्चा क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील-शिगावकर यांच्या नेतृत्वाखाली होता. आम्ही कुंडलच्या बोर्डींगमधील मुलांनी झुणका व भाकरी सकाळी लवकर बांधून घेऊन आलो होतो. क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड आणि क्रांतिवीर कै. लक्ष्मण रावजी ठोंबरे उर्फ दलितमित्र तांबटकाका यांनी श्री. रंगरावदादांच्या मोर्चाला जाण्यास सांगितलेले होते.

मोर्चास विद्यार्थी एस. टी. ने तर काही रेल्वेने सांगली जिल्ह्याच्या ठिकाणी हजर झाले. आम्ही जिल्हा परिषदेच्या जवळपास एका बागेत झाडाखाली भाकरी व झुणक्यावर ताव मारला. पोटभर पाणी प्यालो आणि मोर्चाला नियोजनबद्ध निघालो.

सांगली जिल्हा परिषदेच्या मोठ्या इमारतीच्या मुख्य आवारात उंचावर श्री. रंगरावदादा आपल्या सहकाऱ्यांबरोबर उभा राहिलेले होते. जिल्हा परिषदेमधले सेवक व येणारे-जाणारे लोक दादांना नमस्कार करीत होते. मी याचवेळी दादांना प्रथम पाहिले. चॉकलेटी कलरची पँट, हाप शर्ट, पायात साध्या वाहणा, डोक्याचे केस मागे वळवलेले. दाढी थोडीशी वाढलेले; चेहरा धीर-गंभीर, उंची म्हणाल तर नजरेत भरणारी. तब्बेत सणसणीत अशी मूर्ती मी पाहिली अन् माझेच नव्हेतर सगळ्यांचे लक्ष दादांच्याकडे केंद्रित झालेले होते. सव्वाअकरा वाजता सांगली जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. आप्पासाहेब बिरनाळे आले.

श्री. आप्पासाहेब बिरनाळे ऑफिसमध्ये गेले असतील तेवढ्यात दादांनी दोन सहकारी त्यांच्याकडे पाठवून दिले. अगोदर निवेदन त्यांना दिलेले होतेच. नंतरही निवेदनाची एक प्रत दादांनी दिली. त्यांच्याजवळ दादांनी निरोप पाठवला. तुम्ही वरती बसू नका ! खाली निवेदन स्विकारण्यासाठी ताबडतोब या ! नाहीतर आम्ही विद्यार्थी घेऊन वर येतो ! असं म्हटल्यावर श्री. बिरनाळे खाली आले. दादांना नमस्कार केला. दादा म्हणाले, ''आम्हाला तुमचा नमस्कार नको. ह्या पोरांना न्याय द्या !'' अन् दादा म्हणाले, आम्ही आमची भूमिका तुमच्या समोर मांडत आहोत. ''आजच्या मोर्चाला आलेली खेड्यातील, शेतकऱ्यांची पोरं आणि माझे सहकारी मित्र व बंधू-बहिणींनो'' -

रंगरावदादा एवढे रागावलेले व उग्र रुप दादांनी धारण केलेले होते की, विचारायची सोय न्हाय. दादा म्हणाले, ''आप्पासाहेब तुम्ही कृष्णेचं पाणी, शासनाची गाडी, बंगला हे सगळं फुकट वापरता. तुम्हाला जाणीव होण्याचे कारण नाही .......!'' मुलांच्याकडे हात करुन म्हणाले, .... ह्या पोरांच्यामध्ये उद्याचे महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, लालबहाद्दूर शास्त्री, नेताजी सुभाषचंद्र बोस, रविंद्रनाथ टागोर, हुतात्मा भगतसिंग, बाबूगेनू बसलेले आहेत. यांच्याकडे पहा आणि यांच्या शिक्षणाचा प्रश्न

सोडवा !''

दादांचे भाषण एवढे आवेशपूर्ण व कडक झाले की विचारायची सोय नाही. श्री. बिरनाळे मान खाली घालून शांत उभा होते.

तेव्हापासून श्री. रंगरावदादांचे व्यक्तिमत्त्व माझ्या मनावर ठसले ते आजतागायत. त्यानंतर दादांशी बोललो व भाषणे ऐकली. त्यांचा सहवास लाभला. त्यांची तळमळ, जिव्हाळा, समाजाबद्दलची आच ही वाखाणण्यासारखी आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल आदर वाढला.

कोल्हापूर जिल्ह्यात भोगावती परिसरात राशिवडे व सडोली खालसा येथे १९४२ च्या चळवळीत भूमिगत असताना दादा रहात होते. त्याचबरोबर आप्पाचीवाडी कोल्हापूर येथेही वास्तव्य होते.

मानसिक स्वास्थ महत्त्वाचे आहे. समाधान मिळाले. आर्धी चड्डी, दंडकं घालून ऊसात पाणी पाजले. हे त्यांनी आयुष्यभर केलं. पोरं रांकला लागली म्हणून हे चाललयं.

पणजोबा श्री. तुकाराम बळवंत पाटील हे महात्मा फुले यांचे अनुयायी होते आणि पणजोबांचे वडील श्री. बळवंत रावजी पाटील हे सत्यशोधक समाजाचे काम करीत होते. लोकमान्य टिळकांचा 'केसरी' वाचत होते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कामगिरी सातारा जिल्ह्याची फार मोठी आहे. भारतात तीन जिल्ह्यात प्रतिसरकारे स्थापन झालेली होती. सातारा, मिदनापूर, बांलिया यामध्ये ''सातारा प्रतिसरकार'' हे शेवटपर्यंत टिकून होते. पूर्वीचा दक्षिण सातारा म्हणजे आजचा सांगली ज़िल्हा होय. याच जिल्ह्यात तासगांव तालुक्यात अंकलखोप येथे आपली २५ डिसेंबर १९१९ यादिवशी कृष्णा नदीच्या काठी श्री. रंगरावदादा पाटील यांचा जन्म झाला. जन्मकथेसंबंधी श्री. रंगरावदादा म्हणाले, ''शिगाव, ता. वाळवा येथील श्री. दिगंबर हरी कुलकर्णी यांचेकडून नावरस नांव, वार, वेळ, महिना यावरुन जन्मतारीख काढली. संक्रांतीच्या अगोदर अंकलखोप येथे आजोळी जन्म झाला. हे मार्मीनी सांगितले.''

कै. धुंडाजी काका तांबवे, कै. विठ्ठलराव पाटील-विटा, कै. शंकरराव बोगारकाका-येलूर हे सत्यशोधक चळवळीचे नेते. १९४३ साली अटक झाली. तेव्हा विटा येथील जेलमध्ये होते.

कै. ज्ञानू पाटील भिलवडी, कै. काकासाहेब चोरेकर, चोरे (कराड), कै. आबासाहेब खर्डेकर, खर्डे (अहमदनगर) दानोळी-हातकणंगले हे दादांच्या भाषणावर बेहद्द खूष होते.

लाटवडे, शिगाव, भेंडवडे येथे गांधी लग्ने लावली. श्री. अनंतकुंभार-कुंडल, श्री. धोंडीराम माळी-कुपवाड.

शंकरराव मोरे-जनसत्ता-वृत्तपत्र

सातारचे रणखांबे गुरुजी - जनक्रांती-वृत्तपत्र

व्यंकटराव पवार-नेता-चिवटे, मिरज.

चंद्रकांत निंबाळकर-लघुकथा प्रसिद्ध करीत होते. ते दादा वाचत होते.

सन १९४८ साली सोलापूरला अधिवेशनासाठी श्री. रंगरावदादा पाटील, कर्मवीर आण्णा, व्ही. एन. पाटील, शंकरराव मोरे गेले होते.

१९४८ ला नारायण आष्ट्याला प्राध्यापक होते. गणपतराव शंकरराव आणि नारायण हे तिघे बंधू ढवळीचे, बागणी, ऐतवडे, बुधगांव. या गावाशी ऋणानुबंध तेव्हापासून प्रा. एन. डी. पाटील यांचा संबंध आहे.

कामगार चळवळीत काम केले. मुंबई-वरळी येथे काकासाहेब वाघ, भाऊसाहेब राऊतही होते.

१९४८ साली म. गांधींचा खून झाला. त्यावेळी दादा सातारला होते. बाळासाहेब खेरांना विरोध केला. रयत शिक्षण संस्थेची ग्रँड बंद झाली.

सन १९४६ साली काँग्रेस कमिटीत बर्डे मास्तरांचा पराभव करुन रंगरावदादा निवडून आले. याचवेळी शेतकरी संघटना चालवली. साताराचे व्ही. एन. पाटील यांनी स्वत:च्या प्रपंच्यातील पैसे दादांना खर्चाला दिले.

सन १९४९ ची सभा अहमदनगरची पारनेरमधील सभा फार मोठी होती. कारखानीस, भाऊसाहेब म्हागावकर, सि. प. पगारे, भाई दत्ता देशमुख या सभेला होते. यावेळी विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या घरी जेवले. याचवेळी दत्ता देखमुखांना जेलमध्ये ठेवले. या नगरचे बापूसाहेब भापकर, हिराबाई भापकर, भास्करराव जाधव यांची पुतणी, जिल्हा लोकल बोर्डाची अध्यक्षा होती. संगमनेरचे भाऊसाहेब थोरात दौऱ्यात सहभागी होते.

पाथर्डी, कोपरगांव, अक्रोला, संगमनेर, नगर, खर्डे असा दीड महिना नगरला सभा होत्या.

कर्मवीर भाऊराव पाटील (आण्णा) व ॲड. व्ही. एन. पाटील यांचे आयुष्यभर उपकार फिटणार नाहीत. कर्मवीर आण्णा सामान्य कार्यकर्त्यांची जाण ठेवणारे होते. माझ्या मुलीनं एकदा दाढी ओढली. कर्मवीर म्हणाले, ''महाराष्ट्रात तुझी मुलगी क्रांती करणार.'' कर्मवीर आण्णांचे प्रोत्साहन दांडगे होते.

जून १९४९ ला आष्टाला दादा राहिले.

मुंबईला शिवाजी पार्कलाही सभा झाल्या. क्रांतिसिंह नाना पाटील, बाबूराव सणस, कर्मवीर काकासाहेब वाघ, ॲड. व्ही. एन. पाटील, विठ्ठलराव विखे-पाटील होते.

जेधे मॅन्शन, शुक्रवार पेठ, पुणे, केशवराव जेधे, बाबूराव जेधे, भाऊसाहेब हिरे यांच्या बैठका होत.

भाई वैद्य-पुणे, निखिल चक्रवती, भास्कर दुर्वे नगर यांचे ऋणानुबंध होते.

१८ डिसेंबर १९४५ ला नाशिक जेलमधून सुटले आणि वडगांव दारुबंदी आंदोलन केले.

पहिली अटक झाली, त्यावेळी ५०० रुपयांचे बक्षिस लावले होते. शिगावला सापडले नाहीत. नंतर ५००/- रुपयांचे बक्षिस लावले. जिवंत अथवा मृत. शिगावला छापा. साताराचे डी. एस. पी. गिल्बर्ट आले होते. आष्ट्याला जेलमध्ये आठवडाभर ठेवले होते. त्यावेळी लोकसेवक शं. बा. भोसले होते. त्यानंतर सुटले व बनावट केस घातली व इस्लामपूरला जेलमध्ये ठेवले. त्यावेळी बिळाशीचे श्री. गणपतराव पाटील होते. त्यानंतर विटा येथेही जेलमध्ये होते.

कुंडलमध्ये स्वामी रामानंद भारती, एस. बी. शिंदे, तांबटकाकांचेकडे जेवण्यास आले होते.

सोनकिरे, सोनसळ येथून मी, बाबूराव लाड, नाथाजी लाड, आप्पासाहेब लाड, ताकारीचा डाक बंगला, बांबवडेचा डाक बंगला, वांगीचा बंगला पेटविला. आता काय लाचाराचा तांडा झाला आहे. त्यावेळी स्वाभिमानी माणसं होती. ते दारुबंदी आंदोलन संयुक्त महाराष्ट्र आंदोलन-१९५७, गोवा मुक्ती आंदोलन-१९६५ चे अन्नधान्य आंदोलन, १९४२ ची स्वातंत्र्य चळवळ, सत्यशोधक चळवळ, गांधी लग्न चळवळ, १९३५-३६ या आंदोलनात अग्रभागी होते.

विट्यातून तासगाव जेलमध्ये तेथून येरवडा जेलमध्ये तो जेल फोडल्याने नाशिकला हलवले. नाशिक जेलमधून १८ डिसेंबर १९४५ या दिवशी सोडले. येथे जेलमध्ये बिळाशीचे गणपतराव पाटील, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, वि. स. पागे, निखिल चक्रवर्ती, ॲड. भास्कर दुरवे, संगमनेर हे होते. तेच दादांना इंग्रजी शिकवत होते. बॅ. नाथ पै व दादा दोस्त. यांची एका व्यासपिठावर भाषणे झाली.

२४ ऑगस्ट १९४२ ला अंकलखोपला सत्याग्रह केला म्हणून वॉरंट दादांच्यावर निघाले. त्यांना नाशिक जेलमध्ये घातले. सत्याग्रहात जाहीर सभा झाली. त्यात केलेले भाषण असे ''युद्धाला मदत

करु नका, इंग्रजांनो चालते व्हा, स्वराज्यासाठी करु किंवा मरु, तारा तोडा व चावड्या पेटवा'' असे सांगितले.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा सांगली जिल्हा प्रमुख ते होते. गोवा मुक्ती आंदोलन दोडामार्गाने गेले. सरहद्दीवर राऊत व्यक्ती हा माणूस लाख मोलाचा माणूस होता. ही माणसं मोठ्या मनाची होती. ७०० पोलीस शिगावला छापा पडला. त्यातूनही निसटले. आण्णाप्पा पाडळकर, विष्णू नागराळे, दगडू, लता मंगेशकर, ग. दि. माडगुळकर, मास्टर विनायक, दिनकर द. पाटील कोल्हापूरात होते. तेथे आले. याचवेळी वसंतदादा पाटील यांच्यावर पद्ममाळ्यावर छापा पडला. याच काळात अच्युतराव पटवर्धन आणि एस. एम. जोशी यांची भेट झाली.

शिक्षणमहर्षी डॉ. व्ही. टी. पाटील उर्फ काकाजी हे माझ्या वडिलांचे लहान बंधू माझ्या वडिलांना मी तात्या म्हणत असे.

१९ ऑक्टोबर १९७२ इस्लामपूर येथे एस. टी. बंद आंदोलनाचे मी, एन. डी. पाटील नेतृत्व करीत होतो. त्यात माझा मुलगा राजेंद्र हुतात्मा झाला. एन. डी. पाटील यांचा पुतण्या सुरेश हुतात्मा झाला व दिलीप निलाखे, रंगा गायकवाड हुतात्मा झाले. राजेंद्र उरुणकर भाकरी आणून सत्याग्रहींना देत होता. पोलिसांनी नेम धरुन पोरं टिपली. शनिच्या देवळातून ही पोरं मारली. शिगावला लहानापासून थोरांपर्यंत गर्दी झाली.

आताच्या राजकारणात स्वार्थी, हालकट माणसं आहेत. चांगली पतवान, स्पष्ट माणसं नको असतात.

पापावर पांघरुण घालणारा, गोड बोलून खिसा कापणारा मैतर चालतो.

स्वातंत्र्य शाहीर शंकरराव निकम, कॉम्रेड शेखकाका, रयतचे एस. डी. पाटील, श्री. गोविंद मल्हार कुऱ्हाडे गुरुजी-पलूस पैलवान आदमबापू मुल्ला, आर. आर. यादव, शंकरराव मोहिते, डॉ. व्ही. के. घाटे, डॉ. बाबूराव गुरव, तांबटकाका यांचा ऋणानुबंध होता.

जन्म आणि मृत्यू यातील अंतर हीच यथार्थ जीवनाची रेषा आहे.

तोंडावर चांगलं बोलू नये । माघारी चांगलं बोललं पाहिजे ॥

ऑगस्ट १९७३ साली नवी दिल्ली येथे पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भेट घेतली. दादा म्हणाले, ''तुम्ही आम्हाला ताम्रपट दिले, खाली तुमच्या सरकारने मुलांना गोळ्या घालून मृत्यूपट हातात दिला.'' इंदिरा गांधी म्हणाल्या, 'खोली ऐसा होता है, ये तो खतरनाक है' ही सर्व कल्पना तासगांवचे गणपतराव कोळी यांनी इंदिरा गांधींना माहिती दिली.

नदीचं मूळ व ऋषीचं कुळ शोधू नये म्हणतात. पैसे देऊन माणसं विकत घेता येत नाहीत.

कॉम्रेड भगवानराव थोरात येडेमछिंद्र हे मुंबईचे कामगार नेते होते.

खिसा गरम, दुनिया नरम, आम्ही पैसा मिळवत नाही.

ज्याला म्हशीवर बसता येत नाही, तो आमदार होतो आणि गावावरुन ओवाळून टाकलेलं सरपंच होतं. संस्कारातून शिक्षण होत असते.

माणूस जन्माला येताना, ट्या......ट्या.....ट्या.... करत येतो. बालपण आई-वडिलांच्या सहवासात जाते, तरुणपण-फाकड्याचा हिसका दाखवतो आणि म्हातारपण केलेलं सारं भोगण्यात जातं. जाताना काही घेऊन जात नाही.

दादांनी आपले मनं मोकळे केले. असा हा मुलुखवेगळा माणूस म्हणजे एक झंझावत आहे. आयुष्याच्या संध्याकाळीही तीच जिद्द आहे. त्या जिद्दी स्वभावास माझा मानाचा मुजरा !

# फुले कर्मवीरांच्या वारसदार सौ. कल्पनादेवी

**श्री. संजय कुंभोजकर,** पत्रकार, दै. अग्रदूत, सांगली.

**तीन तपाच्या प्रदीर्घ सेवेनंतर शिगाव प्राथमिक मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील या सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या सेवाकालखंडाच्या आलेख ग्रामीण महाराष्ट्रातील महिलांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरावा असा आदर्श आहे. यशस्वी शिक्षिका, आदर्श माता आणि समाज कार्यकर्त्या म्हणून त्यांनी जो आदर्श घालून दिलेला आहे, जे काम उभे केले आहे, ते खचितच गौरवास्पद आहे.**

एका सामान्य परिस्थितीमधील मराठा कुटुंबात बागणी ता. वाळवा येथे १९२७ साली जन्मलेल्या सौ. पाटील यांनी प्राथमिक शिक्षण गावीच पूर्ण केले. मनातून आपण शिक्षिका व्हायचे हे ठरवून टाकलेले पाऊल पण कसे जमावे ? शिक्षिका व्हायचे तर शिक्षिकेचे ट्रेनिंग घेतले पाहिजे आणि ते सातारा शिवाय जवळपास कोठे नाही. तिथे जाऊन स्वखर्चाने हे ट्रेनिंग पूर्ण करण्याची कुटुंबाची आर्थिक कुवत नाही. अशा स्थितीत त्यांनी सातारा गाठले. कर्मवीर आण्णांना आपली ती इच्छा त्यांनी बोलून दाखविली. त्यांनी या बागणीच्या सामान्य मराठा कुटुंबातील मुलगी दत्तक घेतली आणि शिक्षणाची चिंता मिटवली. कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराष्ट्रातील महामानव. हा पुरुषश्रेष्ठ महाराष्ट्रात झाला नसता तर हे लिहिण्यास ही लेखणी उचलली गेली नसती सौ. पाटीलबाई शिक्षिका बनल्या नसत्या. कर्मवीरांनी ज्ञानाची गंगा सामान्यांच्या घरापर्यंत नेली. वाघिणीचे दूध म्हणून ओळखले जाणारे शिक्षण शेळीच्या दुधाइतके स्वस्त करुन खेड्यापाड्यातील गोरगरीब मुलांना मुक्तपणे वाटले. सौ. पाटीलबाईंच्यासारख्या अनेक मुलींना दत्तक घेऊन वाढविले. केवळ शिक्षण देऊन इति कर्तव्यता मानली नाही. कर्मवीरांनी तर या शिक्षित कन्यांचे संसार मांडून देण्याची पित्याची भूमिकाही पार पाडली. सौ. पाटीलबाईंच्याबाबतीत खऱ्या अर्थाने ते वडील बनले. विवाह तर ठरविलाच आणि विवाहातील कन्यादान केले, तेही कर्मवीर आण्णांनी.

**गाजलेला विवाह**

सौ. पाटीलबाईंचा विवाह त्याकाळी गाजला . सौ. पाटीलबाई १९४६ साली सातारा येथे ट्रेनिंगला गेल्या. १९४६ ते १९४९ त्यांनी ट्रेनिंग केले. हा काळ देशाच्या स्वातंत्र्याच्या धामधुमीचा होता. ब्रिटीशांविरोधी प्रत्यक्ष लढ्याचे पर्व संपले होते. स्वातंत्र्य टप्प्यात आले होते. स्वातंत्र्यासाठी उभे राहिलेले प्रतिसरकार, कर्मवीर आण्णा हे एक या सरकारातील मार्गदर्शक.

या चळवळीतील अनेक शिलेदार आण्णांच्या सहवासात आलेले. या चळवळ्या सेनापतींनी विरोध पत्करला. लग्नाला उभे राहिलेले हे क्रांतिकारक, फक्त क्रांतीच करत नव्हते तर क्रांती जगत होते. काही कामाकडे लावून त्यांची जीवने स्थिर करण्याचे काम आण्णा कुशलतेने करीत. ट्रेनिंगला आलेल्या वा त्यांना माहीत असलेल्या अनेक सुशिक्षित तरुण हेरुन आपल्या या चळवळ्या सेनापतींचे प्रपंच उभे करण्याचे कामही आण्णांनी केले. क्रांतिवीर वाय्. सी. पाटील, क्रांतिवीर नागनाथ आण्णा, बॅ. पी. जी. पाटील आणि क्रांतिवीर भाई रंगरावदादा पाटील ही त्यांची काही उदाहरणे. सौ. पाटीलबाई (पूर्वाश्रमीच्या कुमारी

वत्सला शिंदे) या रुपागुणाने चांगल्या मुलीचा विवाह कर्मवीरांनी क्रांतिवीर रंगराव पाटील यांच्या सम्मतीने ठरविला आणि खरोखरच त्या मुलीचे कर्मवीर वडील बनले. आणि तिच्यासाठी सुनिश्चित केलेल्या वराचे काय ? एका खानदानी मराठा कुटुंबातील, ज्या कुटुंबाला ऐतिहासिक आणि लौकिक वारसा असलेल्या, गडगंज एकुलता एक मुलगा. एका पारड्यात मुलाला बसवून दुसऱ्या पारड्यात त्याच्या भारोभार पैसा मोजण्यासाठी चढाओढ कृष्णाकाठच्या वधुपित्यांनी लावलेली. त्यामुळे घरातून वडिलांचा टोस. भाईंच्या लग्नात वडिलांच्या जागी उभे राहिलेले स्वामी रामानंद महाराज, आण्णा आणि स्वामीजी यांनी पुढाकार घेऊन हा विवाह सोहळा १९४७ साली मार्च महिन्यात रंगपंचमीचे मुहूर्तावर पार पाडला.

**यशस्वी गृहिणी**

सौ. पाटीलबाईंनी वैवाहिक जीवनात क्रांती करुनच पाऊल टाकले. माहेर धनसंपन्न नाही तर सर्वार्थाने सासर संपन्न असून त्याचे दरवाजे आपणासाठी बंद. अशा स्थितीत संसार रथाची वाटचाल अत्यंत यशस्वी करणाऱ्या सौ. पाटीलबाईंनी आपल्या जगण्याने आदर्श निर्माण केले. ट्रेनिंग चालू असतानाच १९४८ मध्ये कन्या रत्नाला जन्म दिला. आणि तिचे संगोपन ट्रेनिंगच्या वेळात कर्मवीर आण्णांनी हौसेने केले. तर या काळातील प्रपंचाच्या आर्थिक अडचणी डाव्या चळवळीतील अग्रणी सुप्रसिद्ध वकील श्री. व्ही. एन्. पाटीलसाहेब यांनी सोडविल्या. यांचा उभयंता श्री. व सौ. पाटील कृतज्ञतेने उल्लेख करतात. कारणही तसेच आहे. क्रांतिवीर रंगरावदादा आजवर काँग्रेसमध्ये होते. सातारा जिल्हा काँग्रेसचे ते ऑफिस चिटणीस होते व पार्टी मानधन देत होती. मात्र याच दरम्यान त्यांनी काँग्रेस सोडली व शे. का. पक्षाची स्थापना केली. त्यामुळे आर्थिक तरतूद बंद झाली. पक्ष प्रचारासाठी भाईंच्या पायाला चक्रे जोडलेली. महाराष्ट्रभर आपल्या मुलुखमैदान वक्तृत्वाने शे. का. पक्षाच्या प्रचार करण्यात गुंतलेले. त्यामुळे मुलीचे संगोपन व प्रपंचाचा भार या मंडळींनी उचलला.

**सेवेत रुजू**

पुढे स्थिरस्थावर झाल्यावर ट्रेनिंग पूर्ण करुन सौ. पाटीलबाईंचा आष्टा, ता. वाळवा येथे मुलींच्या शाळेत शिक्षिका म्हणून नेमणूक १९४९ साली झाली. त्यावेळी भाईंजी जिल्हा स्कूल बोर्डाचे सदस्यही होते. शिक्षिकेचा प्रपंच सुरु झाला आणि त्या तुटपुंज्या वेतनावर अत्यंत जिद्दीने संसार रथ ध्येयवादाने आणि जिद्दीने जीवनाच्या खडतर प्रवासास निघाला. १९५३ मध्ये सौ. पाटील या शिगाव येथील मुलींच्या शाळेत बदलून आल्या. त्या आल्या तेव्हा इ. ३ री पर्यंत असणाऱ्या या मुलींच्या शाळेत एकूण २५ मुली हजर होत्या. वर्ग खोल्यांची गैरव्यवस्था, विशेषत: वरिष्ठ मराठा कुटुंबात मुलींच्या शिक्षणासंबंधी अनास्था तर गरीब कुटुंबात मुलींना शिकण्यास पाठविणे अशक्य. मराठा कुटुंबातील स्त्री आणि ती शिक्षिका ही कल्पनाच या मराठा समाजाला त्याकाळी मानवणारी नव्हती. अशा प्रतिकूल परिस्थितीत मुलींना शिक्षणाची गोडी लावून, पालकांची समजूत काढून मुलींना शाळेत दाखल करण्यात प्रवृत्त केले. मुलींची संख्या वाढू लागली आणि मुलींना वर्गखोल्यांची अडचण भासू लागली.

**स्वप्नपूर्ती**

या परिस्थितीवर मोठ्या धैर्याने, चिकाटीने वर्गखोल्या उपलब्ध करुन त्याची डागडूजी करणे, नवीन वर्गखोल्या बांधणे हे काम अत्यंत कौशल्याने सौ. पाटीलबाईंनी पार पाडले. प्रारंभी नाक मुरडणाऱ्या आपल्या कामाने त्यांनी प्रभाव पाडला आणि त्यांचे उत्तम सहकार्य मिळविले. आर्थिक मदतीचा प्रश्न सोडविताना गावकऱ्यांनी तर सहकार्य केलेच, पण

त्यापेक्षा महत्त्वपूर्ण बाब अशी भाईजींनी दारुबंदी आंदोलन वारणा खोऱ्यात सुरु केले होते. या आंदोलनात आजचे एक धडाडीचे शे. का. पक्षनेते प्रा. एन. डी. पाटील यांचे बंधू कै. गणपतराव पाटील सैनिक म्हणून दाखल झाले होते. गावोगावच्या दारु अड्यावर धाडी घालून बंद पाडायचे हे अड्डे चालविणाऱ्यांना दहशत बसावी म्हणून दंड आकारणी करायची. या दंडाची रक्कम विधायक कामासाठी वापरायची. त्या दंडातील रक्कम सौ. पाटीलबाईंच्या वर्गाची समस्या सोडविण्यासही उपयुक्त ठरली. पैसा उभा राहिला. गावात चांगले शैक्षणिक केंद्र उभे राहिले. जिल्ह्यातील एक नामांकित प्राथमिक शाळा म्हणून गौरवास पात्र झाली. जि. प. सांगलीने या कामाचा यथोचित गौरवही पुरस्कार देऊन केला.

भाईजींचे घराणे सर्वार्थाने संपन्न. चुलते रावसो व्ही. टी. पाटीलसाहेब, मौनी विद्यापीठ व ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक, कोल्हापूर जिल्ह्यातील एक जबरदस्त व्यक्तिमत्त्व. वडगांवच्या इतिहासप्रसिद्ध लढाईतील शिगावचे हे चव्हाण घराणे. त्यांच्या कुटुंबातील बळवंतराव पाटील हे सत्यशोधक चळवळीचे पुढारी. १९२० च्या आसपास सत्यशोधकांची मोठी परिषद शिगाव येथे भरल्याचा उल्लेख सापडतो. हा समाजसेवेचा वारसा घेऊन सौ. पाटीलबाई या पेशात उतरल्या. फुले-कर्मवीरांची शिकवण घेऊन शिक्षकीपेशात राबल्या आधी प्रपंच करावा नेटका या उक्तीप्रमाणे या पती-पत्नीनी आपल्या मुला-मुलींना उच्च विद्याविभूषित केले. शिक्षकीपेशाचा हा वसा त्यांचे चिरंजीव प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील व दोन कन्या यांनी पुढे चालविला आहे. स्वत: पाटीलबाई आपल्या नोकरीतच केवळ रममाण झालेले आहेत असे नाही. ताराराणी विद्यापीठाच्या उभारणीत हिरीरिने भाग घेत आहेत. शासनाने त्यांच्या कर्तबगारीची नोंद घेऊन सांगली डिव्हीजन एस. टी. सल्लागार मंडळावर नियुक्ती केली आहे. अनेक सार्वजनिक संस्थांशी त्या निगडीत असून सार्वजनिक क्षेत्रात त्यांनी आपले असे आगळे व्यक्तिमत्त्व निर्माण केले आहे.

**इच्छापूर्ती**

कधीमधी आष्टा, इस्लामपूर, सांगली, एस. टी. स्टँडवर सौ. पाटीलबाई दिसल्या की एखादी लेकुरवाळी स्त्री त्यांच्याजवळ येते. बाई मला ओळखले का ? म्हणते. बाई मी तुमची विद्यार्थीनी अमूक अमूक. पाटीलबाई तिला जवळ घेतात. क्षेमकुशल विचारतात. जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. असे क्षण सौ. पाटीलबाईंच्या वाट्याला वरचेवर येतात. येणार आहे. त्यांच्या जीवनातील हा आनंदाचा झरा अखंड वाहत राहणार आहे.

सौ. पाटीलबाईंच्या जीवनातील कटुतेचे दाहक विषही त्यांनी तितक्याच समर्थपणे पचविले. १९७२ च्या दुष्काळामध्ये इस्लामपूर येथील मोर्चामध्ये त्यांचे लाडके शेंडेफळ हुतात्मा बनले. मातेच्या हृदयाचे आक्रंदन हृदय पिळवटून टाकणारे होते. हुतात्मा राजेंद्रचा वियोगाचा धक्काही त्यांनी पचविला. आणि आयुष्यभर अगदी १९८० सालापर्यंत विरोधी पक्षनेत्याची पत्नी या नात्याने सर्व चटके सहन केले. या सुख-दु:खाच्या ऊन सावलीच्या खेळात मनाचा समतोल ढळू न देता धीरोदात्तपणे आपल्या पुढील सुख-दु:खांना सामोऱ्या जाणाऱ्या पाटीलबाई शिगावच्या मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून सेवा निवृत्त झाल्या. मात्र त्यांच्यातील जातिवंत शिक्षिका अखेरपर्यंत कार्यरत राहील. त्यांच्या उर्वरित आयुष्यात त्यांना दीर्घायुरोग्य लाभो हीच एक प्रार्थना!

(संदर्भ : **दै. अग्रदूत,** दि. ३१/७/१९८५)

# वीरमाता सौ. कल्पनादेवी पाटील

**सौ. शकुंतला दिनकर पाटील,** एम. ए., प्रकाशिका, कीर्ती प्रकाशन, कोलहापूर.

संकटाची मालिका पार करुन विजयाची मालिका तयार करणाऱ्या व्यक्ती असामान्य असतात.

अक्षता पडल्यापासून या माऊलीने सतत संघर्ष केला. मुळातच एका झंझावती व्यक्तीशी विवाह केला. क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील म्हणजे एक वादळ, एक झंझावात, क्रांतिकारक व्यक्तिमत्वाशी अखेरपर्यंत संसार करुन, नोकरी करुन समर्थपणे सावलीप्रमाणे साथ दिली.

सावित्रीबाई फुले, कस्तुरबा गांधी, कमला नेहरु, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, सुशिलाताई बापूजी साळुंखे, वेणुताई यशवंतराव चव्हाण, लक्ष्मीबाई नायकवडी, सौ. कुसुमताई नागनाथ नायकवडी, सौ. विजयाताई गणपतराव लाड, श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम, शारदाबाई गोविंदराव पवार, सौ. हौशाताई भगवानराव मोरे-पाटील, श्रीमती राधाबाई दिनकरराव शिंदे, कै. शांताबाई विष्णू पाटील, लिलाताई उत्तमराव पाटील अशी एक ना अनेक नांवे डोळ्यासमोर येतात. याच मालिकेत आपले स्थान अढळ आहे.

१९४२ ची चळवळ, दारुबंदी आंदोलन, रयत शिक्षण संस्था, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन,. दुध आंदोलन, गोवा मुक्ती लढा, महागाई आंदोलन-इस्लामपूर, मोचा-गोळीबार यामध्ये क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील यांना मनापासून साथ दिली.

आयुष्याच्या संध्याकाळपर्यंत मनाचा तोल न जाता समाजाचे काम करणे ही सामान्य घटना नाही. त्याला जातीचे असावे लागते. कधी कुरकुर नाही की कधी रागलोभ नाही. कर्तव्य मनापासून केले याचे समाधान फार मोठे मिळाले.

आई-वडिल शेती करीत होते. पाच बंधू व पाच बहिणी, वडिल दत्तात्रय रामचंद्र शिंदे, आई भागिरथीबाई दत्तात्रय शिंदे, वाळवा तालुक्यातील बागणी हे माहेर. सातवी शिक्षण झाल्यानंतर ट्रेनिंग कॉलेजला तीन वर्षे काढली. घरात आई-वडिलांचे संस्कार मोलाचे होते.

दि. १५-७-१९२७ या दिवशी बागणी येथे जन्म झाला. १९४३ साली इयत्ता सातवी झाल्या. दि. १२ मार्च १९४७ रोजी सातारा येथे क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांच्याशी शुभविवाह झाला. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या वसतिगृहात राहून १९४७ ते १९४९ पर्यंत ट्रेनिंग कॉलेजचे शिक्षण पूर्ण केले. दि. १९-८-१९४९ रोजी नोकरीची सुरुवात आष्टा, ता. वाळवा येथे झाली. नंतर शिगाव येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून सेवा सुरु केली.

आजोळ कवठेपिरान, ता. मिरज, भोसले यांचे घराणे, तर माहेर बागणी आणि सासर-शिगाव असा तिन्ही ठिकाणचा लौकिक वाढविण्यात या माऊलीने मोलाची भर घातलेली आहे. सावित्रीबाई फुले यांच्या विचाराने-आचाराने आपण काम केले आहे.

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील वसतिगृह सातारा येथील संस्कार आयुष्यभर पुरले. घोशा पद्धत, मुलींना शिकवायचे नाही, चप्पल घालून चावडीवरुन जायचे नाही, याचा आपण त्रास सहन करुन शिक्षणासारखे पवित्र कार्य केले. एक प्रकारची जिद्द मनात ठेवून आयुष्यभर काम केले. मुलांच्याबरोबर मुलींनीही शिक्षण घेतले पाहिजे. त्यासाठी आपण

पडेल ती किंमत दिली. गावातील पालकांना पटवून दिले. शिक्षणाची गोडी लावली. त्यामुळे आपल्या विद्यार्थींनी प्राथमिक शिक्षिका, डॉक्टर, इंजिनिअर, उद्योजक व आदर्श गृहिणी झाल्या.

सांगली जिल्हा परिषदेने आदर्श शिक्षिका म्हणून जिल्हा पुरस्कार १९७६-७७ साली देवून गौरव केला. १९८४-८५ पर्यंत सेवा अशी एकूण ३७ वर्षे सेवा केली.

सातारमधील दिवस आयुष्याला वळण देणारे होते. कर्मवीर भाऊराव पाटील, स्वामी रामानंद भारती, माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, ॲडव्होकेट व्ही. एन. पाटील, क्रांतिवीर किसनवीर, बन्याबापू गोडबोले, नरुभाऊ लिमये इत्यादी मान्यवर लोकांचे घरी येणे-जाणे होते. कारण श्री. रंगरावदादा पाटील जिल्हा सातारा कमिटीचे सेक्रेटरी होते. कुटुंब सांभाळून सामाजिक कार्य करावे लागत होते. खेड्यातील लोकांचा नोकरी न करण्याकडे रोष होता. नोकरी करणे आणि मुलींना शिकवणे हे सहजासहजी लोकांना पचत नव्हते. मुलींच्या शाळेत नोकरी करीत असताना लोक चेष्टा करीत. तरीही आपल्या कार्यापासून सौ. कल्पनादेवी ढळल्या नाहीत. महात्मा फुले व सावित्री फुले यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून उपजिविकेचे साधन म्हणून नोकरी केली नाहीतर सामाजिक सुधारणेसाठी नोकरी पत्करली. सौ. कल्पनादेवी यांनी क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांच्याबरोबर विवाह करुन फार मोठे धाडस केले होते. गांधी लग्न पद्धतीने त्यांचा विवाह झाला.

क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांचे गुरु गोविंद मल्हार कुराडे गुरुजी यांना वचन दिल्याप्रमाणे हुंडा न घेता गांधी लग्न केले. सौ. कल्पनादेवी म्हणतात, ''क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील यांना राजकारणाची आवड आहे, हे राष्ट्रीय कार्य सतीचे वाण म्हणून स्विकारले. नि:स्वार्थी वृत्तीचे आणि मोकळ्या मनाचे असल्यामुळे त्यांनी आयुष्यभर शिक्षणक्षेत्रात काम केले. एका झंझावताशी संसार करुन जहाल प्रवृत्तीबरोबर वादक होऊन त्यांनी त्यांच्या विचारांची-आचारांची पाठराखण केली. सर्व मुलं-मुली पदवीधर व उच्चशिक्षण घेतलेली आहेत. सौ. कल्पनादेवी यांनी आदर्श शिक्षिकेची भूमिका उत्तम प्रकारे पार पाडली. त्यांच्या काही माजी विद्यार्थीनींची नांव सांगता येतील. सौ. सुनंदा आनंदा देसाई, सौ. लिलाताई हंबीरराव पाटील, सौ. लिला रामचंद्र वायचळ, सौ.जोत्स्ना रंगराव पाटील, डॉ. अनघा संतोष कुलकर्णी इत्यादी आहेत.''

सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील म्हणजे एक आदर्श माता, वीरमाता, एक शिक्षिका, पत्नी, गृहिणी, समाजाच्या शिल्पकार आहेत. आयुष्याच्या संध्याकाळी उत्तम आरोग्य लाभो व दीर्घायुष्य लाभो हीच प्रार्थना !

## मुलूखा वेगळा माणूस !

**श्री. आकाराम पवार**, कुंडल

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या रणधुमाळीत श्री. रंगरावदादा यांचा परिचय झाला. तो आजअखेरही ऋणानुबंध आहे. आम्ही पुरोगामी विचाराचे स्वातंत्र्य सैनिक असल्याने आम्हा दोघांची नाळ एकच. आयुष्यभर कष्टकरी वर्गाची बाजू घेतली आणि आम्ही लढलो.

हे करीत असताना जेवढ्या व्यक्ति तेवढे विचार प्रवाह असतात.

परंतु कोणत्याही सभा - समारंभात क्रांतिवीर श्री. रंगरावदादा हे रसायन वेगळेच दिसायचे. त्यामुळे हा माणूस मुलुखावेगळाच आहे.

शब्दांकन : **प्रा. दिनकर पाटील**

# माझे वडील

**सौ. सुप्रिया भानुदास मोहिते,** बिचूद, (भवानीनगर), ता. वाळवा, जि. सांगली.

मी सौ. सुप्रिया भानुदास मोहिते, क्रांतिवीर भाई रंगरावदादा पाटील यांची ज्येष्ठ कन्या. आम्ही सहा भावंडे, आई सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील, प्राथमिक शिक्षिका, वडील १९४२ च्या प्रतिसरकारमील जहाल क्रांतिकारक. माझा जन्म सातारला २४ जानेवारी १९४८ रोजी झाला.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाकडे पाठ फिरवून विद्यार्थीदशेत स्वातंत्र्यलढ्यात वडीलांनी उडी घेतली होती. साहजिकच स्वातंत्र्याचे सुराज्य बनविण्याचे स्वप्न उराशी बाळगलेल्या माझ्या वडीलांनी त्या काळातील सक्रीय राजकारण आणि समाज परिवर्तनाच्या चळवळीतही झोकून दिलेले. प्रस्थापितांच्या विरोधात जावून त्यावेळची जिल्हा काँग्रेस कमिटी कै. स्वामी रामानंद महाराज यांच्या नेतृत्वाखाली ताब्यात घेतली. कै. किसनवीर, कै. वसंत दादा यांच्या सोबतीने जिल्हा काँग्रेसचे सचिवपद सांभाळत सातारा येथे वास्तव्य केले. तेथेच समाजपरिवर्तनाच्या शैक्षणिक चळवळीत कर्मवीर भाऊराव आण्णा यांना साथ करीत राहिले.

स्वातंत्र्य चळवळीत सातारच्या या तरुण क्रांतिकारकांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावा असा इतिहास घडविला. त्या क्रांतिकारकाचा स्फुल्लिंग जागा ठेवून समाजपरिवर्तनात त्यांनी योगदान द्यावे ही कर्मवीरांची भूमिका आणि म्हणूनच कर्मवीरांनी स्वत: पुढाकार घेवून यापैकी अनेकांचे गृहस्थाश्रमी जीवन स्थिर केले. पैकी माझे वडील एक; या तरुणांनी समाजसुधारणेची, समाज बांधणीची पताका सदैव खांद्यावर घेवून समाजउभारणाचे काम करीत रहावे आणि तरुण शिक्षित मुलीशी विवाह करुन प्रपंचाची जबाबदारी या शिक्षित मुलींनी नोकऱ्या करुन सांभाळावी ही कर्मवीरांची भूमिका. याच भूमिकेतून माझ्या वडीलांनाही त्यांनी गृहस्थाश्रमात अडकवून टाकले.

विवाहबद्ध झाले, तरी पायाला सदैव चाके लावलेले माझे वडील राजकीय दौरे व सभा संमेलने यात व्यग्र. विवाहानंतर माझ्या आईंनी प्राथमिक शिक्षिकेचे ट्रेनिंग करावे अशी कर्मवीरांची इच्छा. त्यानुसार आई करु लागल्या. त्या ट्रेनिंगच्या काळातच माझा जन्म झाला. सातारच्या यादोगोपाळ पेठेत कर्मवीर आण्णांच्या शेजारीच आमचे बिऱ्हाड. वडीलांनी चळवळीत उडी घेतली ते मात्र त्यांच्या मूळ घरी (शिगांव) वळून पाहिलेच नाही. त्यामुळे घरचा कडवा विरोध. त्यामुळे माझ्या आई तान्ह्या असणाऱ्या मला कर्मवीरांच्या स्वाधीन करुन ट्रेनिंगला जात. तसे मी फार मोठी भाग्याची. माझे बालपण कर्मवीरांच्या मांडीवर गेले. मी असे ऐकले, कर्मवीर म्हणत, 'अरे! माझ्या दाढीला हात घालण्याची कोणाची हिंम्मत नाही. मात्र ही रंगरावची चिमुरडी चक्क माझे दाढीचे केस ओढते' यातील विनोद बाजूला राहिला. वास्तव मात्र हेच की कर्मवीरांनी माझे बालपण जोपासले. इतकेच नव्हे माझे नामकरणही त्यांनीच केले. माझे मूळचे माहेरचे नांव 'सरोजिनी' हे कर्मवीरांनी ठेवले. कर्मवीर भाऊराव आण्णा आणि कै. व्ही. एन. पाटील यांनी आमचा कौटुंबिक सांभाळ

केला.

या ठिकाणी आणखी एक बाब नमूद करणे आवश्यक आहे. ती म्हणजे माझ्या आई-वडीलांचा विवाह. माझे वडील शिगांवच्या नांगरे पाटील घराण्यातील विठ्ठलराव पाटलांचे एकुलते एक चिरंजीव. विठ्ठलराव आणि बंधू विश्वनाथराव (कै. व्ही. टी. पाटील, कोल्हापूरचे माजी खासदार, मौनी विद्यापीठ व ताराराणी विद्यापीठ यांचे संस्थापक व क्षात्रजगत गुरु यांचे जावई) या दोन्ही भावांमध्ये एकच वंशाचा दिवा. साहजिकच बड्या घरुन सांगून येणाऱ्या तोलामोलाच्या मुलीशी लग्नाचा बार उडवून देण्याची स्वप्ने या बंधुद्वयांनी बांधलेली. मात्र माझ्या क्रांतिकारक वडीलांनी त्यांचा स्वप्नभंग केला. कर्मवीरांच्या मार्गदर्शनानुसार गरीब घरातील शिक्षित मुलीशी त्यांनी विवाह करण्याचा निर्णय घेतला. परिणामी बाप-लेकांची तेढ वाढतच गेली. त्यामुळे वैवाहिक जीवनात गाडी स्थिर होणे राहिले. माझ्या आई-वडीलांचे वैवाहिक जीवन अत्यंत कसोटीचे ठरले. पुढच्या स्थिर जीवन कालखंडातही याची धग आम्हाला बसत राहिली.

स्वातंत्र्यानंरत या सातारच्या क्रांतिकारकांचा काँग्रेसमध्ये निभाव लागला नाही. बहुतांश क्रांतिकारक काँग्रेसमधून बाहेर पडले. शेतकरी कामगार पक्षात साम्यवादी चळवळींसाठी एकवटले. एव्हाना रशियातील साम्यवाद बहरलेला होता. भारतातही त्याचे पडसाद उमटले. शे. का. पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी माझे वडील एक. मात्र गांधींच्या नेतृत्वाने आकाराला आलेल्या काँग्रेसच्या लाटेत व निवडणुकीच्या राजकारणात यासर्व डाव्या चळवळी खुरटल्या. तरीही कार्यकर्ते चिवटपणे झुंज देतच राहिले.

माझ्या आईचे ट्रेनिंग पुर्ण झाले. शिक्षिकेची नेमणूक होण्याचा प्रश्न आला. दरम्यान सातारा जिल्ह्याचे विभाजन झाले. आमचे गांव सांगली जिल्ह्यात. गावाशेजारील मोठी शाळा म्हणून आष्टा येथे नेमणूक घेतली. परिसरात हितसंबंध होतेच. आष्ट्याला आमचे बिऱ्हाड स्थिर झाले. त्यावेळे माझे वडीलांनी वारणाखोऱ्यात दारुबंदी आंदोलन छेडले. त्यात त्यांना बिनीचा सहकारी लाभले ते ढवळीचे. कै. गणपतराव पाटील, या गणपतरावांचा अकाली मृत्यु. त्यामुळे त्यांचे धाकटे बंधू नारायणराव सातवी इयत्ता पूर्ण करुन घरकामाला लागलेले. आष्ट्याशिवाय माध्यमिक शाळा नाही. त्यांनी शिक्षण थांबविलेचे कळताच वडीलांनी त्यांना आष्ट्यास आणले. कर्मवीरांच्या आष्ट्यातील माध्यमिक विद्यालयात हे नारायणराव शिकू लागले. ते आमच्या कुटुंबातीलच एक बनले. ते आमचे मुलांचे मामा. आजही आम्ही मा. एन. डी. पाटील यांना मामाच मानतो. त्यांनी मामाची खरोखरी भूमिका माझ्या जीवनात बजावली. याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

त्याचे कारणही तसेच आहे. आमचे आष्ट्याहून शिगांवला यथावकाश प्रस्थान झाले. आम्ही सर्व लहान-लहान भावंडे शिकणारी. आईचा पगार कुटुंबाचा योगक्षेम चालविण्यास पुरा पडत नव्हताच.

शिगांवला आलेवर चुलत्यांचेकडून शेती वाटून घेतली. ती घेताना पाणस्थळ जमीन चुलत्यांचेकडे राहिली आणि कोरडवाहू जमीन वाट्याला घेवून शेती सुरु केली. राजकारणाच्या धक्काधकीत, विरोधी पक्षाच्या राजकारणात शेतीत फारसे उत्पन्न निघत नव्हते. आमची तशी आर्थिक तंगी. त्यात आम्हा सर्व भावंडांचे शिक्षण. सर्वात मोठी असणारी मी हे सर्व अनुभवीत होते. सोसत होते आणि अशाही स्थितीत आम्ही लहानाचे मोठे होत होतो.

माझ्या वडीलांनी सर्व परंपरा झुगारुन गांधी विवाह केला. त्याचा राग त्यांच्या वडीलांच्या मनात पुरेपुर. त्यात नांगरे खानदानातील सुनेने नोकरी करणे

नामुष्कीचे ही ठाम भावना धरुन वागणारे माझे आजोबा. यथावकाश माझ्या विवाहाचा विचार घरी चालू झाला. वर संशोधन सुरु झाले आणि एका क्रूर सत्याला सामोरे जावे लागले. माझ्या वडीलांना. राजकीय विरोध किती पराकोटीला जातो याचे ज्वलंत उदाहरण.

जिथे जिथे वडील लग्नाची बोलणी करणेस जात तेथे तेथे त्यांचे राजकीय विरोधक पोहोचले व आमच्या ठरु पाहणाऱ्या विवाहात विघ्ने आणली. राजकारणातील एक किळसवाणा प्रकार आम्ही कुटुंबियांनी भोगला. आणि म्हणूनच ज्यांना आम्ही मामा मानले त्या एन. डी. पाटील यांनी आपली सर्व राजकीय, सामाजिक पत पणाला लावून माझ्या लग्नात पुढाकार घेवून निर्विघ्नपणे माझे लग्न लावून दिले. या काळातील कुटुंबाची मानसिकता काय झाली होती हे मी पहात होते. मात्र माझे वडील डगमगले नाहीत. या हिडीस राजकीय शत्रुत्वावरही त्यांनी अत्यंत कणखरपणे मात केली.

डाव्या चळवळीस एक डोळस, समर्थ, सक्षम नेतृत्व प्रदान करण्यामध्ये माझ्या वडीलांचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे. मा. प्रा. एन. डी. पाटील यांची राजकीय वाढ करुन सक्रीय राजकारणात त्यांना पुढे आणण्याचे फार मोठे काम माझ्या वडीलांनी केले आणि वैचारिक पातळीवरील हे वाढलेले प्रचंड उंचीचे नेतृत्व उखडण्यासाठी त्या काळच्या काँग्रेसी नेतृत्वाने हीन पातळीवर जावून प्रयत्न केले. यामध्ये आमची कौटुंबिक घालमेल होत होती.

१९७२ चा महाराष्ट्रातील दुष्काळ. त्या दुष्काळाची जाणीव शासनाला करुन देण्यासाठी वाळवे तहसील कचेरीवर संघटीत केलेल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मोर्चावर काँग्रेसी शासनाच्या पोलीसांनी बेछूट गोळीबार केला, नव्हे तो तसा या पोलिसांकरवी घडविला. त्यात मोर्चाचे नेते असणाऱ्या एन. डींना बेदम मारहाण करुन राजकारणाचे सर्व संकेत पायदळी तुडविण्याचे कुकर्म काँग्रेसी नेत्यांनी केले.

यावेळी आम्ही सर्व भावंडे इस्लामपूर येथे शिक्षणासाठी राहात होतो. तसेच एन. डींचा पुतण्या (शंकरमास्तरांचा मुलगा) हाही इस्लामपूर येथे शिकत होता. नेते मोर्च्यात होते. साहजिकच त्यांची मुले चित्रपटगृहात असणार नाहीत. तीही मोर्चा सहभागी होती आणि ही पर्वणी साधून तालुक्यातील काँग्रेसी नेतृत्वाने कुटील कारस्थान रचले. पोलिसांना हाताशी धरुन एन. डींना व माझ्या वडीलाना राजकीय जीवनातून संपविण्यासाठी पूर्व नियोजनाने माझा लहान बंधू हुतात्मा राजेंद्र आणि एन. डींचा पुतण्या सुरेश यांना या मोर्चावेळी टिपून मारुन शे. का. पक्षाचे नेतृत्व संपविण्यासाठी हिणकस राजकारण खेळले गेले. तालुक्यातील राजकारणामध्ये हिडीस खेळी खेळली. मात्र त्याही संकटात निश्चल राहिलेला स्थितप्रज्ञ पिता कसा असतो हे मी अनुभवले. पाहिले. काळ निघून जातो, स्मृती पाठीमागे उरतात, माझ्या वडीलांची राजकीय पुण्याई एवढी मोठी की, आम्हा उर्वरीत सर्व भावंडांचे शिक्षणही यथावकाश पूर्ण झाले आणि त्यांचे गृहस्थाश्रमी जीवनही सुफलीत झाल्याचे मनोहरी चित्र दिसते. माझे आई-वडीलांनी सर्व संकटांना समर्थपणे तोंड देवून आम्हा भावंडांची जीवन उजळून टाकली. आम्हा कुटुंबियांवर अकृत्रिम प्रेम करणारे एन. डी., दाजीबा देसाई, बॅ. पी. जी. पाटील, वसंतदादा, भाई केशवराव दादा इत्यादींचा महाराष्ट्रातील स्नेह माझ्या माहेराने जोडला तो आम्ही कन्या सासरी नांदतानाही आम्हास उपयोगी पडतो आहे. विस्ताराने लिहिण्याचे हे ठिकाणही नाही.

आज आम्ही सर्व भावंडे उच्च विद्या विभुषित आहोत. सर्वांचे कौटुंबिक जीवन फळा-फुलांनी डवरलेले आहे. त्यांचा सुगंध दरवळत आहे. आई-

वडीलांचा वसा आम्ही आमच्यापरीने जपण्याचा अटोकाट प्रयत्न करतो आहो. आई-वडीलांच्या वृद्धापकाळी त्यांनी जोपासलेल्या निष्ठा जतन करुन त्यांचा वृद्धापकाळ त्यांच्या विचारांची काठी बनण्याचे प्रयत्न आम्ही करत आहोत.

आम्ही सर्व भावंडे आमच्या आई-वडीलांच्या विचारांचा वारसा आपापल्या परीने पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहोत. पैकी माझ्या पाठचे बंधू डॉ. क्रांतिकुमार पाटील ताराराणी विद्यापीठाचे सचिव आणि कमला कॉलेजचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. दुसरे बंधु श्री. विजयकुमार पाटील हे महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बॅंकेत क्लासवन ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. एक भगिनी सौ. सुजाता संभाजीराव निकम हे पतिपत्नी कराड येथे शैक्षणिक सेवेत आहेत. या बहिणीचे सासर इंदोळी, ता. कराड (इंदोलीचे स्वातंत्र्य सैनिक राजाराम निकम हे बहिणीचे श्वसूर) तर धाकटी बहिण १९४२ च्या चळवळीत गाजलेल्या बिळाशी, ता. शिराळा येथे हुतात्मा मारुती पाटील यांच्या घरी नांदत आहे.

धाकट्या बहिणीचे पती डॉ. रंगराव महादेव पाटील हे कोकरुड येथे लोकप्रिय धन्वंतरी आणि मा. शिवाजीराव देशमुख यांचे विश्वासू सहकारी म्हणून कार्यरत आहेत.

अशा माता-पित्यांच्या पोटी जन्म घेण्याचे भाग्य आम्हा भावंडांना मिळाले. आम्ही कृतार्थ आहोत..

# शेतकऱ्यांना पूर्व सूचना द्यावी-श्री. रंगरावदादा

कोणतीही पूर्व सूचना न देता वारणेकाठी पाणी उपसू नये असे फर्मान दि. ८/१२/८१ रोजी इस्लामपूर वीज मंडळाच्या अभियंत्यांनी देऊन शेतकऱ्यांवर कुऱ्हाड उगारली आहे, अशी गंभीर तक्रार शिगावचे रंगराव पाटील यांनी सांगलीच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्यावर जिल्हाधिकारी यांनी तशी सूचना कोल्हापूरहून दिली आहे की, कसे याची त्वरित चौकशी केली जाईल असे आश्वासन दिले.

वारणा नदीकाठच्या अनेक शेतकऱ्यांना सध्या ऊस लागण चालू केली असून त्यांना वेळेत पाणी मिळाले नाही तर लाखो रुपयांचे नुकसान होणार आहे, याकडे लक्ष वेधले. पूर्व सूचना न देणे, सतत वीज खंडित करणे असा प्रकार सतत चालू असल्यामुळे वीज मंडळ आणि शासनाचा शेतकऱ्यांतून तीव्र संताप व्यक्त होत असून आता शेतीला वीज द्या या मागणीसाठी वारणा काठचा शेतकरी रस्त्यावर येईल असाही गंभीर इशारा श्री. रंगराव पाटील यांनी दिला.

(संदर्भ : **दै. अग्रदूत,** दि. ११/१२/१९८१)

## स्वातंत्र्य सैनिक

स्वातंत्र्य सैनिक आहे एक नाव तयाचे रंगराव,
इंग्रजांवरती जयांनी घातले घणाघाती घाव.
आरवूनी स्वातंत्र्य लढ्याचा डाव,
इंग्रजांचा तयांनी केला पाडाव.
इंग्रजांना टाकले टाकले पार ठेचून,
अन् स्वातंत्र्य आणले पूर्ण खेचून.
तिमिरातुनी जयांनी पारतंत्र्यांच्या,
नेले आम्हास तेजाकडे स्वातंत्र्याच्या.
लढा उभारुनी क्रांतीचा,
ध्वज फडकविला स्वातंत्र्याचा.
छेदिले जयांनी पारतंत्र्याचे बंधन,
तयांना आमचे त्रिवार वंदन.

श्री. ढोबळे जे. डी.,
उषाराजे हायस्कूल,
कोल्हापूर

## वारणेचा वाघ

लावून पणाला प्राण प्राणासी खेळत आले
क्रांतीत रंगलेले हे रंगरावदादा ......१
इंग्रजांसी लढता लढता रक्ताची पंचिम केली
रक्तात चिंब झाले हे क्रांतिवीरदादा......२
सडेतोड बोलणारे बेडर वृत्ती ज्यांची
पेटवून सभा अवघी सभा जिंकणारे दादा......३
शेतकरी कामगारांचे सर्वस्वी झाले नेते
गरिबांच्या सुखदु:खासी समरस झाले दादा......४
जनतेच्या कल्याणासाठी झटणारे, दिवसारात्री
सारे आयुष्य आपुले हे वेचणारे दादा ......५
'पंचानना' परि ते मोर्चात अग्रभागी
छातीवर लाठ्या गोळ्या हे झेलणारे दादा......६
राजकारण संधीसाधू भ्रष्टाचार बोकाळलेला
पाहुन संतापणारे हे देशभक्त दादा......७
देशाला तारक एक मंत्र क्रांतिसिंहाचा आज
पर्याय नाही दुसरा असे सांगतात दादा......८
सलउरांत सलते आहे खोलवर कुठेतरी आत
भेटीत मला तरी दिसले तरी खदखदणारे
दादा......९
डरकाळत असाच रहावा हा 'वाघ वारणेचा'
शंभरीला पार करोनी जावेत आमुचे दादा......१०

कवी/शाहीर - *हरिभाऊ कारके*

# माझे जीवन : एक यज्ञकुंड

''ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष, ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी मा. रंगरावदादा पाटील हे इंग्रजांना सळो की पळो करुन सोडणारे देशभक्त म्हणून ओळखले जातात. भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त स्वातंत्र्य मिळविलेल्या सैनिकांचा जाज्वल इतिहास नवीन पिढीला समजावा म्हणून **सांगली आकाशवाणीचे श्री. संजय पाटील यांनी घेतलेली त्यांची मुलाखत** आम्ही येथे प्रकाशित करीत आहोत.

रयत शिक्षण संस्थेबरोबरच ताराराणी विद्यापीठाच्या 'कमला' महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासात त्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाख मोलाचे आहे.''

❑ **प्रश्नकर्ता :** दादा, या भागातले आपण ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी आहात. सांगली, सातारा, कोल्हापूर या भागातील स्वातंत्र्य आंदोलनाचे आपण साक्षीदार आहात आणि स्वातंत्र्य चळवळीतले खंदे कार्यकर्तेही आहात. सदर चळवळ जाणून घेण्यासाठी आपली ही भेट आहे. तेव्हा आपण आपल्या प्रथम आपल्या बालपणाविषयी सांगा !

❑ **दादा :** माझा जन्म 'अंकलखोप' गावी माझ्या आजोळी झाला. आम्ही शाळेत असताना धुळाप्पा नवले वगैरे लोकांचा वावर भागात असल्याने राष्ट्रीय प्रवृत्तींचा आमच्यावर प्रभाव पडला. त्यानंतर 'शिगाव' गावी तेथील शाळेत राष्ट्रीय प्रवृत्तीचे गोविंद मल्हार कुऱ्हाडे नावाच्या शिक्षकाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी आम्हाला पोहणे, मल्लखांब, सिंगल बार, डबल बार हे व्यायाम प्रकार शिकविले. मनावर देशभक्तीचे संस्कार केले. मी इयत्ता ४ थी मध्ये असताना त्यांनी विचारले, 'रंगराव तुमची घरची स्थिती चांगली आहे. तेव्हा लग्न कराल का ?' लग्न म्हणजे काय हे मला माहीत नसतानाही मी होय म्हणून उत्तर दिले आणि बालपणीचे वचन पूर्णही केले.

माझ्या बालपणात नाना पाटील, बर्डे मास्तर, राघु आण्णा लिमये यांच्या प्रभात फेऱ्या निघत असत. आम्ही नांगरे पाटील, पोलिस पाटीलकी आमचेकडे असे. माझे चुलते कोल्हापूरचे व्ही. टी. पाटील प्रजापरिषदेचे विरोधी व संस्थानच्या बाजूला झुकलेले. त्यामुळे आम्ही प्रभात फेरीत दाखल झालो की, घरी हमखास मार बसत असे. याचवेळी भाई माधवराव बागल हे भूमिगत अवस्थेत वाळवे तालुक्याच्या दक्षिण भागात सभा घेत फिरत होते. दा. न. शिखरे हे त्यांच्याबरोबर असत व दोघे प्रजापरिषदेची चळवळ जोमाने चालवीत होते. मी घरातून बाहेर पडलो आणि वाळवे तालुक्याच्या दक्षिण भागात त्यांना मदत करु लागलो. कोल्हापुरात आल्यावर राजाराम हायस्कूलमधील मराठी विषयाचे आर. डी. साटम नावाच्या शिक्षकांच्या सहवासात आलो. त्यांनी संपूर्ण एक वर्षभर आम्हाला काँग्रेसचा इतिहास कथन केला. आमच्या ४ थी 'बी' च्या वर्गातील एकूण ७५ विद्यार्थ्यांपैकी ७० विद्यार्थी १९४२ च्या चळवळीत होते. त्यावेळी आमचे हेड मास्तर एम. आर. देसाई हे होते.

❑ **प्रश्नकर्ता :** म्हणजे त्यावेळचे शिक्षकांचे संस्कारदेखील देशभक्तीपर होते तर ....

❑ **दादा :** हो तर ! पुढे मी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्था, सातारा येथे गेलो. त्याचवेळी १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरु झाले. जर्मनीने पोलंडवर हल्ला केला. त्यावेळचे कलेक्टर

ऑफिस आमचे हायस्कूलच्या पाठीमागेच होते. मी वक्तृत्व कलेत प्रवीण होतो. त्यामुळे कर्मवीरांचा मी लाडका विद्यार्थी होतो. विविध सभेत बोलण्यास ते आम्हाला संधी देत. त्यांच्या या संपर्काने आमच्यावर हळूहळू चांगले संस्कार होऊ लागले.

❑ **प्रश्नकर्ता :** म्हणजे आपण तेथे हॉस्टेलला होता का ?

❑ **दादा :** हो. हॉस्टेललाच होतो. श्रमदानाच्या संस्कारामुळे आमची सर्व कामे आम्ही करीत असू. याच कालावधीत सयाजीराव गायकवाड हायस्कलची कँप एरीयात स्थापना केली. मात्र युद्धाचा भडका जसा उडायला लागला तसे आम्हीही उघडपणे स्वातंत्र्य चळवळीत कार्यरत झालो. घरी येऊन पुन्हा तोच कार्यक्रम सुरु झाला. त्याचवेळी १९४० चा सत्याग्रह सुरु झाला. सेवादलामार्फत प्रभात फेऱ्या, आंदोलन तीव्र झाले.

❑ **प्रश्नकर्ता :** दादा, आपण लहानपणीच या चळवळीत पडला, मग घरातून विरोध वगैरे काही ?

❑ **दादा :** घरचा विरोध होताच. कारण घरी चुलत्यांकडे पोलिस पाटीलकी होती. त्यात मी पाच बहिणींच्यात एकटाच. मात्र व्ही. टी. पाटील यांनी मला विरोध केला नाही. अंकलखोप येथील सत्याग्रहाबद्दल माझ्यावर ब्रिटीश सरकारने वॉरंट काढले. मी भूमिगत होऊन निवृत्ती काकांच्याकडे गेलो. त्याचवेळी इस्लामपूर येथे तहसिलदार कचेरीवर मोर्चा काढण्याचे पांडू मास्तरांनी ठरविले. त्यात मी सहभागी झालो. त्यांच्या आधी तासगावात असाच मोर्चा काढला आणि आम्ही तिरंगा फडकाविला. त्यात वि. स. पागे वगैरे होते. पुढे इस्लामपूरच्या मोर्चाची सर्व जबाबदारी माझ्यावर सोपविली. वडूजच्या मोर्च्यावर पोलिसांनी गोळीबार केला. कवठेपिरान, दुधगाव, बागणी, नागाव, पोखर्णी, बावची या गावांची मुख्यत: जबाबदारी पांडू मास्तरांनी प्रचारासाठी माझ्याकडे दिली.

❑ **प्रश्नकर्ता :** तरी प्रचाराचा भाग कशा प्रकारचा असायचा ?

❑ **दादा :** प्रथम इंग्रजांनी केलेला अन्याय, अत्याचार सांगायचा, मग गांधीजींचा इतिहास, चळवळीचे महत्त्व जाहीर सभांमधून मांडत असू. मग मोर्चाने जाऊन इंग्रजांना 'चले जाव' असे घोषणा देऊन सांगत असू. 'करु किंवा मरु' अशी देशभक्ती पर गीते मोठ्याने म्हणत मोर्चा निघत असे. इस्लामपूरच्या मोर्चात लोक जमण्यापूर्वीच पांडू मास्तर बेभान होऊन मामलेदार कचेरीवर चालून गेले आणि गोळीबार झाला. वाळवे तालुक्यातील येडे-निपाणीला लागून असलेल्या मल्लिकार्जुन डोंगरावर शेवटच्या श्रावण सोमवारी आम्ही सर्व तालुक्यातील मंडळी एकत्र जमलो आणि यामध्ये मोर्चा, आंदोलन याविषयी आमची महत्त्वाची बैठक झाली. याचवेळी पांडू मास्तर, वसंतदादा पाटलांना तेथे घेऊन आले. याचवेळी वसंतदादांची आणि माझी प्रथम भेट झाली आणि आम्ही आयुष्यभरचे मित्र झालो. आघाडीवर लढणाऱ्या नेत्यांसमोर माझे भाषण झाले.

❑ **प्रश्नकर्ता :** पांडू मास्तर, वसंतदादांसारख्या मोठ्यांचा तुम्हाला सहवास लाभला नाही का ?

❑ **दादा :** हो, तर नाना पाटलांचा आणि माझा तर निकटचा परिचय होता. राघु आण्णा लिमये, बर्डे मास्तर, रामानंद भारती यांचा खूप सहवास लाभला. पुढे दुधोंडीला भूमिगत असताना रामानंद भारती यांच्याबरोबर गेलो. तेथे दुधोंडीला शाम जाधव, एस. बी. शिंदे व मी, शिवराम जाधवांच्या घरी राहिलो. त्यांच्या मळ्यात रामानंदजी राहात होते. त्यांनी आम्हाला कुंडलला जाण्याचा सल्ला दिला. आम्ही कुंडल गावी येऊन आमच्या कारवाया करीत असू व पुन: दुधोंडीला येत असू. यावेळी जी. डी. लाड, नाथा लाड यांची वांगीचा डाक बंगला पेटविण्याची योजना

चालली होती. आम्ही सर्वांनी तो बंगला पेटविला. रेल्वेच्या प्लेट काढणे, तारा तोडणे हे उद्योग सुरु होतेच. जनजागरण मोहीमही सुरु होतीच. दुधोंडी, कुंडल, विटा, ताकरी, भिलवडी आदि गावातही राम पवार वगैरे साथीदारांच्या मदतीने कारवाया सुरु होत्याच.

❑ **प्रश्नकर्ता :** विशेष प्रसार माध्यमे नसतानाही ताकारी, भिलवडीसारख्या मागास गावातही चळवळ पोहोचविण्याचे रहस्य काय ?

❑ **दादा :** त्याला कारण म्हणजे महात्मा गांधी ! त्यांच्या वैयक्तिक सत्याग्रह, राष्ट्रीय लढा यामुळे इंग्रजांबद्दल अप्रीती पसरण्यात मदत झाली. गांधीजींच्या आंदोलनात विशेषत: वैयक्तिक आंदोलनात निवडक सैनिक निवडल्याने इतर युवकांच्यातही वीरश्री संचारली आणि ते आंदोलनामधून आपला विरोध प्रकट करु लागले. विरोधी परिस्थितीने पेटलेली माणसं कशालाही जुमानत नाहीत आणि अशीच माणसं आपल्या जीवनात घेतलेला वसा पूर्ण करतात. हा माझा अनुभव आहे. आता हेच पहा ना ! घरात विरोध असतानाही मी या स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली नाही का ?

❑ **प्रश्नकर्ता :** हो, नक्कीच !

❑ **दादा :** पुढे कुंडल येथे राम पवार, यशवंतराव चव्हाण यांची भेट झाली. कोल्हापूर, सांगली अशी मजल मारीत वसंतदादांना आमंत्रण दिले. समवयस्कच काही तरी करु शकू असे मला वाटू लागले. वसंतदादा, दत्ता शिंदे, बाबालाल शाह असा आमचा एक ग्रुप स्थापन केला. त्याची आठवण म्हणून 'विश्राम बाग स्टेशन' पेटवून मुहूर्त केला.

❑ **प्रश्नकर्ता :** पेटवले म्हणजे नेमके काय केले?

❑ **दादा :** रात्री रॉकेल नेऊन्न अचानक हल्ला करुन स्टेशन मास्तरला ताब्यात घेत असू, त्याच्याकडून रेकॉर्ड घ्यायचं आणि रॉकेल ओतून पेटवून द्यायचं दुसरं काय ? आणि भडका उडाला की, तिथून पळ काढायचा. अशा पद्धतीने आम्ही नांद्रे, धुळगाव डाक बंगला, आरग, बेडग, सलगरे आदि स्टेशने पेटविली. डिग्रजचे टपाल ऑफिस लुटले आणि त्याच रात्री तासगावचा डाक बंगला पेटवून दिला. निपाणीचा डाक बंगलाही आम्हीच पेटवला होता.

म्हणजे आपण एकंदर त्यावेळच्या प्रस्थापित इंग्रज सरकारला डिस्टर्ब करत होता तर ?

होय. भूमिगत कार्यकर्त्यांबरोबर कारवाई करण्यास सामान्य जनतेवर अन्याय करण्यास पोलिसांना वेळ मिळू नये हा आमचा उद्देश होता. पोलिसांनी इकडे-तिकडे पळवायचे, त्यांना व्यस्त ठेऊन शासकीय यंत्रणा ठप्प करणे हा हेतू त्यामागे असायचा. इंग्रजांच्या मोटारगाड्या, रेल्वे आदि दळण-वळणाची व्यवस्था मोडकळीस आणत असू. इतकंच नव्हे तर प्रसंगी पूल उडवून देणे आदि कामेही आम्ही पार पाउली आहेत.

याच चळवळीत कोल्हापूरचे एक कार्यकर्ते डी. डी. बराले हे छोटे हातबॉम्ब मोठ्या कौशल्याने बनवत असत. प्रसंगी त्यांचाही आम्ही वापर केला आहे. हातबॉम्ब कसे तयार करायचे हे शिकविण्याकरिता त्यांनी आमच्याकडे एक माणूस पाठविला होता. बाटलीमध्ये दारु भरुन हे बॉम्ब आम्ही तयार करीत असू आणि ते उडतात की नाही याची ट्रायलही घेत असू. पद्माळ्याच्या पद्मा मंदिरावर आम्ही हा बॉम्ब फेकून पाहिला असताना तेथील भिंतीला गेलेला तडा आजही पहावयास मिळेल.

❑ **प्रश्नकर्ता :** दादा, तरी साधारण यावेळी आपलं वय काय होतं ?

❑ **दादा :** त्यावेळी मी २१-२२ वर्षांचा असेन.

❑ **प्रश्नकर्ता :** म्हणजे आपण अगदी ऐन तारुण्यातच होता की?

❑ **दादा :** हो तर आणि त्यावेळी आम्हाला जिवाची अजिबात फिकीर नव्हती. शाळेतील गुरुजींनी आमच्यावर केलेले संस्कार दृढ स्वरुपाचे होते. ते आम्हाला नेहमी सांगत. माणूस जन्माला एकटाच येतो. तो सोबत काही आणीत नाही आणि मेल्यावरही सोबत काही घेऊन जात नाही. जीवन आणि मृत्यू यांच्यामध्ये प्रत्येक माणसाची ओळख म्हणजे त्याचे कर्तृत्व होय. जनहितासाठी हा देह खर्ची पाडणं म्हणजेच जीवन सार्थकी लागणे होय. ही शिकवणूक आमच्या मनात पक्की घर करुन बसली होती.

❑ **प्रश्नकर्ता :** आता असे संस्कारशील शिक्षक नाहीत, होय ना ?

❑ **दादा :** त्यावेळचे सर्व शिक्षक राष्ट्रहिताने झपाटलेले होते आणि हे त्यांच्या चालण्या-बोलण्यातून व्यक्त होत असे. म्हणूनच माझ्यासारखे अनेक विद्यार्थी स्वातंत्र्य संग्रामामध्ये ओढले गेले.

❑ **प्रश्नकर्ता :** दादा मला आणखी एका गोष्टीचं फार मोठं कौतुक वाटतं आणि ते म्हणजे त्यावेळची ग्रामीण जनता जिवावर उदार होऊन, तुम्हाला लपवण्यात, जेवू घालण्यात मदत करी, हे मोठं धाडसाचं नाही का ?

❑ **दादा :** एवढेच नव्हे तर ही ग्रामीण जनता पोलिसांच्या बातम्याही आम्हाला देई. आम्हाला पकडण्यासाठी पोलिसांनी वेढा दिला तर प्रसंगी धाडसाने आम्हाला लपवून ठेवत. प्रसंगी त्यांनी मारही खाल्ला आहे. पण पोलिसांना आमचा ठाव-ठिकाणा लागू दिला नाही. 'शिगाव' गावी अक्षयतृतीयेचे दिवशी माझ्या एका मित्राच्या बहिणीचे लग्न होते. आम्ही काहीजण त्या लग्नात सामील झालो होतो. ही बातमी पोलिसांनी मिळाली आणि त्यांनी संबंध गावाला वेढा घातला. त्यावेळी मला पकडून देणाऱ्यास बक्षीसही जाहीर झाले होते. सातारचा त्यावेळचा डी. एस. पी. गिलबर्ट हा स्वत: सातशेहे पोलिस घेऊन जातीने हजर राहिला. रात्र होताच आम्ही आमच्या जवळच्या बंदुका लोड करुन चोर वाटेने गावाबाहेर पडलो. पोलिसांना कळताच त्यांनी आमचा पाठलाग केला. पण आम्ही त्यांच्यावर अचानक गोळीबार सुरु केला. धनदाट अंधारामुळे त्यांना आमचा अंदाज आला नाही. आणि आम्ही तेथून पलायन करण्यात यशस्वी झालो.

मराठमोळ्या राकट जनतेचं हे वैशिष्ट्य की रात्री-अपरात्री आम्ही एखाद्याच्या घरात आसऱ्याला गेलो तर पहिला प्रश्न असे 'पोरांनो जेवलायसा का नाही ?' आग्रह करुन वाढत असत. आमची चळवळ यशस्वी झाली ती अशा आया-बहिणी, माय-बापांच्यामुळेच. त्यांनादेखील ही जाणीव होती की, गांधी बाबांनी इंग्रजांविरुद्ध पुकारलेल्या लढ्यामध्ये आम्ही काम करीत आहोत. त्यांच्या या अलोट प्रेमामागे त्यांची ही जाणीव काम करीत होती की, महात्मा गांधींच्या आदेशानुसारच आम्ही पोरं आपलं घरदार सोडून रानो-माळ भटकत आहोत. आम्हाला मदत करणं म्हणजे गांधीबाबांना मदत करणं असं ती समजत होती. सामान्य जनतेचं गांधीबाबांच्या वरचं त्यांचे हे अलोट प्रेम, श्रद्धा यामुळेच या जनतेचं आम्हाला सहकार्य मिळत होतें.

❑ **प्रश्नकर्ता :** दादा, हे ऐकताना महात्मा गांधींचा मोठेपणा सहज लक्षात येतो. तुम्हाला एकूण किती वर्षांची शिक्षा झाली ?

❑ **दादा :** मला पकडून देणाऱ्यास इंग्रजांनी बक्षीस जाहीर केल्यामुळे नतद्रष्टांच्या तोंडाला पाणी सुटले आणि त्यांनी पोलिसांना गुप्त वार्ता दिली आणि मी पकडला गेलो. शिगावहून मला येरवड्याला नेण्यात आले.

❑ **प्रश्नकर्ता :** तुम्हाला नेमकं कुठं पकडलं ?

❑ **दादा :** गावातच पकडलं. गोटखिंडीचे शंकर

पाटील याला मारल्याबद्दलची आमच्यावर केस दाखल केली. त्यातून आम्ही निर्दोष सुटलो. तरीही आम्हाला स्थानबद्ध करुन पुढे येरवड्याला पाठविण्यात आले. तेथून आम्हा सर्वांना नाशिक जेलमध्ये हलविण्यात आले. तेथील जेल इलेक्ट्रिकल करंट सोडलेल्या तारांनी सुसज्ज असा होता. आणि तेथेही एका स्वतंत्र कक्षात आम्हाला ठेवण्यात आले होते. तेथील पहिल्या कक्षात बंगालचे महान क्रांतिकारक 'निखिल चक्रवर्ती' होते. दुसऱ्या कक्षात संगमनेरचे प्रसिद्ध वकील 'भास्कर दुर्वे' होते. तिसऱ्या कक्षात मी स्वत: तर चौथ्या कक्षामध्ये बिळाशीचे 'गणपतराव पाटील' होते. पागे, एस. एम. जोशी आदि क्रांतिकारक 'अ' वर्गात होते आणि आम्ही सर्व 'ब' वर्गात होतो. १८ डिसेंबर १९४५ साली तेथून माझी सुटका झाली.

❑ **प्रश्नकर्ता :** म्हणजे एकूण तुरुंगवास किती झाला ?

❑ **दादा :** जवळजवळ १४ महिने तुरुंगवास झाला आणि दोन वर्षे मी भूमिगत अवस्थेत होतो. तुरुंगातील सुटकेनंतरही सळसळलेलं माझं रक्त मला गप्प बसू देईना आणि मी वडगांव दारु मुक्ती आंदोलन सुरु केले. मलकापूरपासून सांगलीपर्यंत वारणेच्या दोन्ही तीरावरील दारुचे गुत्ते उधळून लावणे, दारु पिणाऱ्यांना ठोकणे, गाढवावरुन त्यांची धिंड काढणे आदि कार्यक्रम सुरु केले. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे महात्मा जोतिबा फुल्यांच्या विचारांचा पगडा माझ्यावर असल्यामुळे आणि महात्मा गांधींनी आवाहन केल्याप्रमाणे मी सामुदायिक लग्ने लावून देण्याची पद्धत आरंभली. केवळ एकमेकांना हार घालून पति-पत्नींचा स्वीकार करायला लावणं अर्थात साधे पद्धतीने म्हणजे गांधी पद्धतीने लग्ने लावली. मी स्वत: 'पौरोहित्य' करीत होतो. पारंपारिक, खर्चिक पद्धतीला पूर्णत: फाटा दिला.

❑ **प्रश्नकर्ता :** म्हणजे याचा अर्थ असा दादा की, आपलं कार्य केवळ स्वातंत्र्य मिळविण्यापुरतं मर्यादित नव्हतं तर त्याही पुढे जाऊन स्वतंत्र भारताचं प्रबोधनही करणं वगैरे..... ?

❑ **दादा :** हो. महात्मा जोतिबा फुल्यांचं चरित्र वाचून आम्ही भारावून गेलो होतो. एक स्त्री शिकली की सर्व कुटुंब शिकतं आणि कुटुंबामुळे समाज शिक्षित होतो. या विचारापासूनच प्रेरणा घेऊनच कर्मवीर भाऊराव पाटलांनी डोंगर कपाऱ्यात रयत शिक्षण संस्थेचे कार्य नेऊन पोहोचवलं. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज तर आमचे प्रेरणास्थान होते. विठ्ठल रामजी शिंदे, विदर्भातील पंजाबराव देशमुख अशा महान लोकांच्याकडून आम्हाला प्रेरणा मिळत होती.

❑ **प्रश्नकर्ता :** दादा, ज्यादिवशी स्वातंत्र्य मिळालं त्यादिवशी आपण कुठे होता ?

❑ **दादा :** त्यादिवशी मी सातारा येथे होतो. मी सातारा जिल्हा कॉंग्रेस कमिटीचा ऑफिस सेक्रेटरी होतो. रामानंद भारती अध्यक्ष होते. वसंतदादा पाटील आणि किसनवीर हे सेक्रेटरी होते. आम्ही भावविवश होऊन सातारच्या अजिंक्यताऱ्यावर पोहोचलो. कारण कोंडणा जिंकल्यावर जशी विजयाची वार्ता गंजी पेटवून राजमाता जिजाबाईंनी कळविली होती तशी गंजी रात्री १२ वाजून १ मिनिटाने पेटवून आम्ही स्वातंत्र्याचा आनंद व्यक्त केला.

❑ **प्रश्नकर्ता :** दादा, सध्या आपला दिनक्रम कसा आहे ?

❑ **दादा :** सध्या मी विवंचनाविरहित आहे आणि या वयातही मी कुठल्याही संकटाची पर्वा करीत नाही. शाळा-महाविद्यालयापासून व्याख्यानाद्वारे मी समाज प्रबोधन करीत असतो आणि माझे विचार परखडपणे मांडत असतो. आजच्या युवकांना काही बौद्धिक देण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

❑ **प्रश्नकर्ता :** दादा, आपण मघाशी म्हणालात, तशी पूर्वी माणसं वेगळी होती आणि

आता...?

❑ **दादा :** आज परिस्थिती अशी आहे की, कोणी-कोणाशी खरं बोलत नाही. आजची समाज व्यवस्था असत्यावर आधारित आहे. अलीकडेच कोल्हापुरातील एका व्याख्यानामध्ये मीही माझी खंत जाहीरपणे व्यक्त केली. आजच्या भारताचे 'सत्यमेव जयते' हे ब्रीद नसून 'सत्य एकमेव जळते' असे आहे. स्वार्थ आणि पैसा याभोवती दुनिया फिरते आहे. एका मराठी कवीने म्हटल्याप्रमाणे म्हणावेसे वाटते....

'उद्धवा, अजब तुझे सरकार !
लहरी राजा, प्रजा आंधळी, अधांतरी दरबार,
लबाड जोडिती इमले गाड्या,
गुणवंतांना मात्र झोपड्या
पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा, वेश्येला मणिहार!
अजब तुझे सरकार '

# आत्महुती देणारा कार्यकर्ता हवा !

श्री. रंगरावदादा

**जातीयवादी, फुटीरता, प्रांतीयवाद यापासून देश रक्षणासाठी तो एक संथ ठेवण्यासाठी आत्माहती देणारा सर्वस्वपणास लावणारा कार्यकर्ता तयार होण्याची आवश्यकता.**

आजच्या परिस्थितीत थातूर मातूर बोलून समाजकारण व राजकारण करणाऱ्या कार्यकर्त्यांपासून देशाचे भले होणार नाही. तर कार्यकर्ता हा निर्भिड, बुद्धिमान व कर्तृत्ववान असण्याची आवश्यकता आहे.

आजचे कार्यकर्ते सत्ता व प्रतिष्ठेच्या भोवतीच फिरत असून कार्य करण्यासाठीचे व्रतापासून वंचित होऊ लागले आहेत. सत्तेबरोबर भ्रष्टाचार व पैसा मिळण्याकडेच त्याचा कल जनतेचा कार्यकर्त्यांवरील विश्वास नाहीसा होऊ लागला आहे.

आजच्या कार्यकर्त्यांबद्दल बोलायचे तर, खऱ्या अर्थाने आज कार्यकर्ता राहिलेला नाही. राजकारणात व्यक्ती आणि समाज यांचे संबंध साधणारे सेवाभावी कार्यकर्ते न होत तर विविधपक्षात राहून व्यक्ती व प्रतिष्ठाद्वारे स्वार्थ व संधी साधून स्वत:चे भले साधणारे लुचे कार्यकर्ते दिसून येतात.

(संदर्भ : **दै. अग्रदूत,** दि. ७/१२/१९८४)

# देशातील भ्रष्टाचारनष्ट करणेस स्वातंत्र्य सैनिकांना संधी द्या

## श्री. रंगरावदादा पाटील

**१९४६ साली महात्मा गांधींनी काँग्रेस संघटनेचे विसर्जन करा असा सल्ला दिला होता. पण स्वार्थी मंडळींनी तो मानला नाही. सत्तेत भागिदारी मिळावी म्हणून प्रत्येकाने प्रयत्न सुरु ठेवले. त्यामुळे काँग्रेस संघटनेत स्वार्थी आणि विलासी लोकांचाच भरणा अधिक झाला. स्वातंत्र्यासाठी भारावून गेलेली आणि करु किंवा मरु अशी प्रतिज्ञा करुन संघटनेत काम करणारी मंडळी बाजूला फेकली गेली. स्वराज्याचे सुराज्य बनवू पाहणारी गरीबांच्या हितासाठी स्वराज्य असे स्वप्न बाळगणारी सारी मंडळी आज आपल्या आयुष्यातील शेवटच्या पर्वात वावरत आहेत. त्या सर्व स्वातंत्र्य सैनिकांना एकवेळ विविध संस्थांमधून कामाची संधी द्यावी. भ्रष्टाचार निर्मूलन पथके स्थापून त्या सर्व पथकातून स्वातंत्र्य सैनिकांची नियुक्ती करावी. कदाचित देशतील भ्रष्टाचार नष्ट करणेसाठी हा नवा प्रयोग निश्चितच उपयोगी पडेल.**

इंग्रजी सत्ता नष्ट करणेसाठी ज्यावेळी चळवळ सुरु होती, त्यावेळी अनेक तरुण मंडळी पेटलेल्या मनाने त्या वादळात स्वत:ला झोकून देत होती. करु किंवा मरु हेच एकमेव ध्येय त्यांचे होते. कोणताही स्वार्थी हेतू चळवळ करणाऱ्या तरुणांच्या मनात नव्हती. म्हणूनच जनतेचा पाठिंबा त्या काळात मिळाला. इंग्रजी पोलिसांनी चळवळ्यांना तुरुंगात डांबण्याचा सपाटा चालू ठेवला, पण जनतेच्या सहकार्यामुळे अनेक तरुण भूमिगत रहाण्यात यशस्वी ठरले.

स्वातंत्र्य मिळाले, मिळालेले स्वातंत्र्य गरीबांसाठी राबविले जाईल अशी कल्पना होती. त्यामुळेच त्या काळी सामान्य जनतेचा फार मोठा पाठिंबा मिळाला.

चळवळ चालू असताना हिंसा न करता चळवळीत भाग घेऊन काही मंडळी सत्तेत भागिदारी मिळविण्याचा प्रयत्न करीत होती. तीच मंडळी पुढे यशस्वी झाली. स्वराज्य मिळाल्यानंतर १९५२ साली झालेल्या पहिल्या निवडणुकीत संघर्षात नसलेल्या अनेक स्वार्थी मंडळींना तिकीटे मिळाली आणि अशीच मंडळी निवडून येऊन सत्तेत वाटेकरी बनली. ज्या उदात्त भावनेने स्वराज्य मिळवले ती भावनाच नष्ट झाली. काँग्रेसची लढावू संघटना नष्ट झाली आणि संघटनेत स्वार्थी आणि मतलबी लोकांचा भरणा झाला. स्वराज्याचे सुराज्य बनले नाही. समाजवादी अर्थरचना बाजूला राहिली आणि त्यामुळेच काँग्रेस संघटनेतून अनेक मंडळी बाहेर पडली.

१९४६ साली म. गांधींनी काँग्रेस विसर्जित करा असा सल्ला दिला होता. तो राज्यकर्त्यांनी मानला नाही. गांधींची तत्त्वे बाजूला सारुन, तत्त्वाला मूठमाती देणारेच सत्ता काबीज करुन बसले. डाव्या विचारांची एक संघ फळी देशात निर्माण व्हायला हवी होती. परंतु विविध पक्षांची घरटी बांधून स्वत:च्या मोठेपणासाठी विविध झेंडे निर्माण केले. त्यामुळे विरोधीपक्षही देशात मजबूत बनला नाही.

**सर्वत्र पिछेहाट**

समाजवादी विचारांच्या मंडळींनी काँग्रेसला

विरोध करणेस प्रारंभ केला. न्याय, हक्कासाठी चळवळ सुरु झाली. मोर्चे काढून जनतेचा रोष प्रगट होऊ लागला. पण सत्ताधारी काँग्रेस पक्षातील मंडळींनीच गुंडांना हाती धरुन राजकारणात दहशत सुरु केली. गुन्हेगारी करणारी अनेक मंडळी स्थानिक राजकारणात घुसली. काँग्रेस पक्षात भीतीचे वातावरण तयार करणेत आले. चळवळ करणाऱ्या सच्च्या स्वातंत्र्य सैनिकांना गुंडाकरवी गोळ्या घालण्यात आल्या. त्यामुळे विरोधी पक्षातील ओघ आपोआप काँग्रेस पक्षाकडे वळू लागला. सत्तेखेरीज जनता येणार नाही ही भावना निर्माण झाली आणि सत्तेसाठी वाटमारी करणाऱ्या मंडळींच्या हातात सारा समाज सापडला.

सत्ताधाऱ्यांची तोंड पूजा सुरु झाली. जनतेची सेवा बंद पडली आणि सत्ताधाऱ्यांची पूजा स्वातंत्र्याच्या काळात सुरु झाली. अनेक स्वातंत्र्य सैनिक यासर्व घाणेरड्या राजकारणामुळे दूर दूर फेकले गेले. गरीबांच्यासाठी स्वराज्य ही कल्पनाच नष्ट झाली. अनेक बोगस स्वातंत्र्य सैनिक स्वार्थी हेतूने पुढे आले. सत्ताधाऱ्यांनी त्यांना जवळ करुन राजकीय भ्रष्टाचार सुरु केला. चळवळीत नसणारे अनेक आमदार स्वातंत्र्याच्या काळात निवडून आले आणि त्यामुळे सर्वत्र भ्रष्टाचार सुरु झाला.

सन १९५२ च्या निवडणूकीत ८० टक्के जागा स्वातंत्र्य सैनिकांना द्या अशी सूचना रंगराव दादांनी ना. वि. स. पागे यांचेकडे केली होती. ८० टक्के स्वातंत्र्य सैनिक जर पहिल्याच निवडणुकीत निवडून दिले असते तर त्यांच्या दबावामुळे राजकारणाला एक वेगळे वळण लागले असते. दुर्दैवाने तसे घडले नाही. म्हणूनच स्वार्थी आणि भ्रष्टाचारी लोकांचा भरणा राजकारणात झाला. जनहितापेक्षा स्वहित साधणारे अनेक आमदार, खासदार आणि मंत्री स्वराज्यात पुढे आले. मोठे बनले आणि गरीब जनता मात्र उपेक्षित बनली.

**प्रामाणिकांना संधी द्या**

स्वराज्य मिळून पाच तपे झाली, तरी स्वराज्याचे सुराज्य अद्यापि झालेले नाही. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी खेदाने एक कटू सत्य देशाला सांगितले आहे. ते म्हणाले, ''राजकारणात चांगली माणसे भाग घेत नाहीत. चांगल्या माणसांनी पुढे येण्याची गरज आहे.'' देशातील आजची परिस्थिती बदलण्यासाठी भ्रष्टाचार समूळ नष्ट करणेसाठी नव्याने प्रयत्न करणेची गरज आहे. भ्रष्टाचार समूळ नष्ट करणेसाठी पुन्हा एकदा खऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना विविध सरकारी कमिट्यांवर नियुक्त करुन समाजाची पुनर्रचना करणेची गरज आहे. आजही अनेक स्वातंत्र्य सैनिक वय होऊनही मनाने तरुण आहेत. त्यांचा उपयोग करुन घेतला पाहिजे. केवळ पेन्शन मिळविण्यासाठी एकत्र येणारे स्वातंत्र्य सैनिक देशाचे भले करणार नाहीत. सच्चे स्वातंत्र्य सैनिक स्वाभिमानामुळे आजही दूर राहिले आहेत. अशा सर्व स्वातंत्र्य सैनिकांची वैयक्तिक चौकशी करुन योग्य आणि भारावलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना शोधून काढून शासनाने एक प्रयोग म्हणून भ्रष्टाचार निपटून काढणेसाठी त्यांचा उपयोग करुन घ्यावा.

(संदर्भ : **दै. अग्रदूत,** दि. १/८/१९८५)

# देशात स्वराज्याची गंगा आली पण....

**श्री. रंगरावदादा**

स्वातंत्र्याची चळवळ संपली अन् सत्तेचे राजकारण चालू झाले. संधीसाधू माणसं राजकारणात आली आणि त्यांनी सत्ता संपत्ती मिळविली. आमदार झाली. नामदार झाली. मंत्री झाली. गटाचे-तटाचे राजकारण चालू झाले आणि खरा क्रांतिकारक उपेक्षित, वंचित राहिला. त्यांचे प्रश्न सुटले नाहीत.

**संघटना बळकट हवी**

राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण या त्रिसूत्रीच्या आधारे स्वराज्याचे सुराज्य व्हावयास हवे हो, पण ते तसे झाले नाही. स्वराज्याची गंगा आली आणि त्यात चोर, बदमाषांचीही भरती झाली. क्रांती व उत्क्रांती या दोन्हींचा अर्थ बदल असा एकच असला तरी क्रांतिकारक उपक्रांतीच्या मागे लागले. त्यामुळे प्रश्न सुटले नाहीत. स्वराज्याचे सुराज्य झाले नाही. समाजाच्या, सरकारच्या विरोधात जो झगड़तो तोच खरा क्रांतिकारक. संधीसाधू माणसं सत्तेच्या खुर्चीच्या भोवती घोटाळलेले, त्यामुळे स्वातंत्र्याचा इतिहास निर्माण करणारी माणसं बाहेर फेकली जातात. अनादिकाळापासून ही गोष्ट चालू आहे. कौरव पांडवांच्या युद्धाचा इतिहास तरी काय आहे ? स्वातंत्र्य सैनिकांनी आपले प्रश्न संघर्ष करुन सोडवावयाचे असतील तर संघटना बळकट केली पाहिजे. आज आपली संघटना बळकट केली पाहिजे. आज आपली संघटना बळकट दिसत नाही. राज्य सरकारची पेन्शन घेणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांनी दरमहा १० रुपये व केंद्र सरकारची पेन्शन घेणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांनी दरमहा २५ रुपये संघटनेला वर्गणी दिली पाहिजे. संघटना बळकट झाली तर स्वातंत्र्य सैनिकांचे प्रश्न सुटतील.

**देशभक्तांची दारु दुकाने**

देशाचे भवितव्य आज अंधकारमय आहे. स्वातंत्र्य सैनिकांनी लढाऊपणे उभे राहून देशाचे स्वातंत्र्यासाठी प्राण पणाला लावले पाहिजे. धंदेवाईक राजकारण्यांचा वर्ग सत्तेवर आला आहे. अनेक देशभक्तांनी दारुची दुकाने चालू केली आहेत. हे सारे बदलण्याचे काम तुम्हा स्वातंत्र्य सैनिकांचे आहे.

नेत्यांची मर्जी सांभाळली जाते. लाळघोटपणा करणार नाही. स्वातंत्र्य सैनिकांनी सुद्धा पेन्शनसाठी लाचारी पत्करु नये. तमासगीर कलावंताना महाराष्ट्र शासन पेन्शन देते, मग स्वातंत्र्य सैनिकांना का देऊ नये. स्वातंत्र्य सैनिकांवर अन्याय का करते ?

स्वातंत्र्य सैनिकांसाठी खासदारकीची, आमदारकीची व पंचायत समितीची, जिल्हा परिषदेची ग्रामपंचायतीची जिल्ह्याच्या, तालुक्याच्या, गावच्या ठिकाणी जागा राखून ठेवल्या पाहिजेत असे सांगून क्रांतिवीर रंगरावदादा पाटील म्हणाले, निवडणूकीत दारुची बॅरले, नोटांची पुडकी आणि बोकडांचे बळी देण्याचे अलीकडे प्रस्थ वाढले आहे हे थांबले पाहिजे.

आमदार निवासात दारुच्या बाटल्या, नको ते धंदे चालू असतात. म. गांधींच्या नावावर सत्यमेव जयतेच्या नावावर हे चालू आहे हा आमचा आदर्श आहे? सर्व स्वातंत्र्य सैनिक एकत्र येऊन क्रांतीचा झेंडा पाहातात घेतल्याशिवाय स्वराज्याचे सुराज्य होणार नाही.

(संदर्भ : **दै. ललकार,** दि. १९/९/१९९०)

# प्रतिष्ठेसाठी स्वाभिमानशून्य माणसे तयार होतात

श्री. रंगरावदादा पाटील

**स्वातंत्र्योत्तर काळात लाचारी वाढली असून शिस्त लयास गेली आहे. पैशाने मतेच काय, पण आमदार-खासदारदेखील विकत घेता येतात व केवळ सत्ता, संपत्ती प्रतिष्ठेसाठी स्वाभिमानशून्य माणसे तयार होतात ही देशाची खरी शोकांतिका असल्याची परखड खंत.**

हुतात्मा स्मारकांची काही ठिकाणही अवस्था पाहिली असता हुतात्मा स्मारकात दारु अड्डे व नको त्या कामासाठी स्मारकाचा वापर केला जातो. स्मारकातील पंखे गायब होतात हे पाहिल्यावर शरमेने मान खाली घालावी लागते. काही ठिकाणी या स्मारकाचा वापर चांगला होतो. या ठिकाणीही अत्यंत चांगल्या प्रकारे वापर होतो ही समाधानाची बाब असून स्वातंत्र्य प्राप्तीसाठी ज्यांनी घरदाराची पर्वा केली नाही, त्याग केला, त्या लोकांची अवस्था काय ज्यांचा चळवळीशी संबंध नाही, ते ज्या काळात गुन्हेगार म्हणून विविध शिक्षा भोगत होते, अशांनी सन्मानपत्रके मिळवली तर काही ठिकाणी रेल्वे व एस. टी. पासचा दुरुपयोग करणारे काही स्वातंत्र्य सैनिक असून अशांना शासकीय अधिकारी पाठीशी घालतात हे कटू सत्य असून वस्तुस्थिती नाकारणे शहाणपणाचे नाही.

आज सत्तारुढ पक्षाबरोबरच विरोधी पक्षातही भ्रष्टाचार माजला असून जेथे खाऊ तेथे खाऊ हे खाऊगिरीचे समीकरण सर्वत्र सुरु आहे. याचा आदर्श कोणता नव्या पिढीने घ्यायचा.

(संदर्भ : **दै. पुढारी,** दि. ३१/१/१९९४)

# उसातून कापलेल्या रकमा गरिबाकरता वापराव्यात

श्री. रंगरावदादा पाटील

खऱ्या समाजवादासाठी ज्यांच्याकडे जास्त आहे ते घेऊन ज्यांना अजिबात नाही अशांना दिले तरच समाजवाद लौकर येईल. सह. साखर कारखान्यांनी ५० टनापर्यंत काहीच कपात करु नये. मात्र त्या पुढील उत्पादन काढणाऱ्या शेतकऱ्याकडून काही प्रमाणात विकास निधी घेऊन त्या त्या भागातील लोकोपयोगी कामे जरुर करावीत. बांधलेल्या इमारती अथवा अन्य योजना मात्र शेतकऱ्यांच्या मालकीच्या असाव्यात. त्या कुणीतरी साखर सम्राटांच्या नातेवाईकांच्या मालकीच्या असू नयेत. शासनाकडून विकास कामाला आर्थिक मदत मिळत नाही. अशावेळी साखर कारखान्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्याच पुढाकाराने लोकोपयोगी कामे करुन भावी पिढीचे कल्याण करण्याची गरज आहे. चांगल्या कामासाठी बड्या शेतकऱ्यांच्याकडून घेतलेले पैसे प्रामाणिकपणे वापरले तर थोड्या प्रमाणात समाजवादाच्या जवळ जाता येईल.

(संदर्भ : **दै. अग्रदूत,** दि. २४/१०/१९८८)

# राज्यकर्त्यांचे भाट भ्रष्टाचार करतात व त्याच पैशावर टगे पुढारी जगतात

श्री. रंगरावदादा पाटील

**स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय एकात्मेसाठी माणसाची मने बांधली जात होती. देशातील अज्ञान आणि दारिद्र्य नष्ट करुन सामान्य जनतेला सुखाने जगता यावे म्हणून आमच्यासारख्या हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी जिवाची तमा न बाळगता, जातपात न पाहता, पक्ष गट न करता स्वातंत्र्यासाठी कष्ट घेतले. आमच्या स्वप्नातला भारत फार वेगळा होता. आज भारताचे चित्र पार बदलून गेल्याचे दु:ख आम्हा सर्व स्वातंत्र्य सैनिकांना होत आहे.**

स्वातंत्र्यपूर्व काळात कोणताही राजकीय वाद नव्हता. प्रस्थापित समाज व्यवस्था बदलणेचा प्रयत्न प्रत्येक माणूस करीत होता. आज सरकार चालविणारी माणसे स्वच्छ आहेत कां ? याचा शोध घ्यावा लागतो. मनाने शुद्ध नसलेली दुष्ट हेतू मनात ठेवून सरकारात गेलेली माणसे भ्रष्टाचार करु लागतात. सुरुवातीस गरज म्हणून किंवा राजकारण करण्यासाठी पैसे मिळवू लागतात आणि पुढे तीच सवय लागून प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचार सुरु होतो. सत्तास्थानावर असलेली माणसेदेखील पार बिघडून जातात. राज्यकर्त्यांची भाटगिरी करणारे चमचे समाजात नंगानाच घालू लागतात आणि जमेल तिथे प्रचंड भ्रष्टाचार करुन कोट्यावधी रुपये मिळवितात. त्याच पैशावर टगे पुढारी राजकारण करु लागतात. पतिव्रता असलेल्या स्त्रीलादेखील या भ्रष्ट समाजव्यवस्थेत व्याभिचारी बनावे लागते. त्याखेरीज त्या साध्वीला जीवन जगता येत नाही इतकी वाईट समाजव्यवस्था आज बनली आहे.

**दारु गाळणारे पुढारी आणि पिणारे अनुयायी**

गेल्या ५२ वर्षाच्या स्वातंत्र्याच्या काळात सहकारी क्षेत्रात औद्योगिक प्रगती घडली पण सच्चा माणूस घडविण्यासाठी गांधीवाद सांगणाऱ्या पुढाऱ्यांनी काहीच प्रयत्न केलेले नाहीत. शेतकऱ्यांचा ऊस गाळून मळीपासून दारु बनवून तीच दारु राजरोसपणे जनतेला पाजण्याचा उद्योग सर्वत्र सुरु आहे. दारु गाळणारे नेते आणि दारु पिणारे अनुयायी ज्या राष्ट्रात दिसतात ते राष्ट्र स्वाभिमानी होणार नाही. राष्ट्रीय एकात्मता टिकणार नाही. जातीय दंगली थांबणार नाहीत आणि भ्रष्टाचारी संपत्ती मिळून पुढारीपण करण्याचे काळे व्यवसायदेखील कमी होणार नाहीत.

देशातील आजचे चित्र पाहिले की, संताप येतो आणि सारी समाजव्यवस्था मोडून-तोडून त्याचे तुकडे करुन आमच्या स्वप्नातला नवा भारत घडविण्याकरता उरलेले आयुष्य वेचावे लागते.

(संदर्भ : **दै. अग्रदूत,** दि. १३/१२/१९८४)

# देशाच्या रक्षणासाठी त्याग व बलिदान करण्यास सज्ज रहा

१९४२ चलेजाव चळवळीला ५८ वर्षे झाली. ज्या हेतुसाठी आम्ही स्वराज्य मिळवलं तो हेतु साध्य झाला ? जातीचं श्रेष्ठत्व सुरु आहे. माणूस माणुसकी म्हणून राहिली आहे का ? सहकाऱ्यांच्या माध्यमातून पैसे खाणाऱ्यांची टोळी सुरु झाली आहे. आपण धर्म जातीचे गुलाम झालो आहोत. धर्माच्या नावानं विभाजन सुरु आहे. जो भानगडी करतो तो पुढारी होतो. सेवा, त्याग, निष्ठा याने सत्ता खुर्चीसाठी गिळंकृत केली आहे. हे जोपर्यंत नष्ट होत नाही, तोपर्यंत देश एक संघ राहणार नाही. म्हणून स्वातंत्र्य सैनिकांनी आता आंदोलन करण्याची वेळ आली आहे. आता त्यागाला सिद्ध राहा. सहकारी संस्था वाढल्या, दारुचे कारखाने वाढले. सरकार परवाने देत आहे, विरोध कोणी करु शकत नाही. हे संस्कार मुलांच्यामध्ये झाल्यामुळे मुले व्यसनाधीन झाली. व्यसनासाठी बापाचे खून करु लागली. याला स्वातंत्र्य सैनिकांनीच पायबंद घातला पाहिजे.

कर्मवीर ''भाऊराव पाटील यांचे शिक्षणाचे कार्य पवित्र व शुद्ध होते. आता शिक्षणाचा बाजार झाला आहे. यातही भ्रष्टाचार चालू आहे. शिक्षणातून सुसंस्कार मिळत नाहीत. शिक्षणातून स्वत: स्वावलंबी बनून जगता येत नाही. आपली मने शुद्ध केली पाहिजेत. मुलं सशक्त, धाडसी, देशप्रेमी, नीती, चारित्र्यशील व प्रामाणिक झाली पाहिजेत. हे काम शिक्षकांबरोबर पालकांचेही आहे.

८ ऑगस्ट १९४२ पासून ब्रिटीशांचा हुकूम मानणार नाही. अन्याय झाला की, धावून जात होतो. आता अन्यायाला साथ देणारे निर्माण झाले. स्वार्थ आला, प्रेम नष्ट झाले. माणसात माणूसपण नाही. दारुबंदीसाठी अहोरात्र जनजागृती केली. आत सर्रास दारुची दुकाने झाली. नीती, चारित्र्य नष्ट झाले. मुला-मुलींचे खून पडताहेत. म्हणून विद्यार्थ्यांनी क्रांतिकारकांचा इतिहासाचा अभ्यास करावा. म. गांधींचा आदर्श ठेवावा. तरच आपलं भावी जीवन सुखी जाईल.

स्वातंत्र्याचं स्मरण, त्यासाठी केलेला त्याग, बलिदान म्हणून आज १९४२ चा सुवर्णमहोत्सव साजरा करीत आहोत. आज देशाची स्थिती शोचनीय आहे. वेदना होतात. बाबू गेनू, भगतसिंग इ. नी बलिदान केलं. आता ही पाळी आली आहे. देशात शांतता सुख नाही. देश गहाण ठेवला आहे. ८० टक्के कर्ज भागविण्याची पाळी जनतेवर आली आहे. भ्रष्टाचाराचा व देशद्रोहाचा नि:पात केला पाहिजे. पोलिसांचा धाक राहिला नाही. मुली शाळेत पाठवायच्या का नाहीत ? असा प्रश्न उभा राहिला आहे. स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास वाचा आणि देशाचे रक्षण करा.


(संदर्भ : **दै. नवसंदेश,** दि. २८/१/१९९२)

# श्री. रंगराव विठ्ठलराव पाटील जीवनपट

| | |
|---|---|
| २५ डिसेंबर १९१९ | जन्म |
| १९२५ ते १९३१ | प्राथमिक शिक्षण, शिगाव |
| १९३१ ते १९३६ | मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण रयत शिक्षण संस्था, सातारा |
| १९३७ ते १९४८ पर्यंत | सत्यशोधक चळवळीत सहभाग काँग्रेस पक्षाच्या राजकीय चळवळीत भाग घेऊन काम केले. |
| २४ ऑगस्ट १९४२ | अंकलखोप येथे सत्याग्रह केला. |
| सन १९४२ | चलेजाव चळवळीत सक्रीय भाग घेऊन क्रांतिसिंह नाना पाटील, स्वामी रामानंद भारती, श्री. वसंतदादा पाटील, पांडू मास्तर, बर्डे गुरुजी, माधवराव बागल, यशवंतराव चव्हाण, किसनवीर यांच्यासमवेत काम केले आणि चळवळ नेटाने पुढे चालविली. |
| सन १९४२ | चळवळीत अडीचवर्षे भूमिगत. |
| १९४३ | अटक. मुदतीमध्ये सरकारने सर्व इस्टेट जप्त केली. मृत अगर जिवंत पकडून देणाऱ्यास बक्षिस लावले. नंतर सरकारने पकडले. १४ महिने येरवडा, नाशिक येथे स्थानबद्ध करुन ठेवले होते. |
| १९४६ | मध्ये जेलमधून सुटका |
| १९४६ | मध्ये सातारा जिल्हा काँग्रेस कार्यकारिणीवर वाळवा तालुका प्रतिनिधी म्हणून निवड झाली. त्यानंतर सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीचा ऑनररी सेक्रेटरी म्हणून दोन वर्षे काम केले. |
| १२ मार्च १९४७ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलीशी हुंडा न घेता विवाह केला. शुभविवाह. सौ. कल्पनादेवी रंगराव पाटील यांच्याशी विवाहाप्रसंगी श्री. शंकरराव मोरे, श्री. केशवराव जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, स्वामी रामानंद भारती यांच्या प्रमुख उपस्थितीत साध्या पद्धतीने ''गांधी लग्न'' झाले. |
| १५ डिसेंबर १९४५ | नाशिक जेलमधून सुटका. ५००/- रुपयांचे पकडण्यासाठी बक्षिस लावले होते. सोलापूर अधिवेधशनात सहभाग. महात्मा गांधींच्या वधानंतर काँग्रेसमध्ये जो |

| | |
|---|---|
| | घटनात्मक बदल झाला. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षामध्ये प्रवेश. |
| | दे. भ. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, र. के. खाडीलकर, तुळशीदास जाधव, भाई माधवराव बागल, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या समवेत शेतकरी कामगार पक्षाचे काम केले. |
| सन १९४९ | सातारा जिल्हा स्कूल बोर्डावर शेतकरी कामगार पक्षातर्फे निवडून आल्यानंतर तेथे ३ ते ४ वर्षे लोकहिताची कामे करुन भ्रष्टाचार निपटून काढला. मलकापूर ते सांगली, वारणा काठ येथे दारुबंदी आंदोलन सुरु केले. |
| सन १९५४ | सहकारी चळवळीत सक्रीय सहभाग.' शिगाव विकास सोसायटीचे चेअरमन म्हणून उत्तम काम केले. या काळात सोसायटीची ऑफिस इमारत व दोन गोडावून बांधून पूर्ण ककेली. सोसायटी सतत 'अ' वर्गात होती. |
| सन १९५७ | संयुक्त महाराष्ट्र आंदोलन सक्रीय सहभाग. |
| सन १९५६ ते ५८ | तालुका सुपरवायझर म्हणून काम केले. |
| | जिल्हा को-ऑप. बोर्डचे संचालक म्हणूनही काम केले. रयत शिक्षण संस्थेच्या वाळवा तालुक्यात माध्यमिक शिक्षण संस्था काढण्यासाठी कर्मवीर आण्णांचे समवेत फिरुन १५-२० हायस्कूल काढण्याची जोडणी केली. त्या संस्था सध्या चांगल्याप्रमारे चालल्या असून त्यामुळे ग्रामीण भागातील मुला-मुलींच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था झाली आहे. |
| सन १९६५ | अन्नधान्य आंदोलन केले. |
| सन १९७३ | स्वातंत्र्य सैनिकांचे अधिवेशन नवी दिल्लीमध्ये झाले. त्यामध्ये सक्रीय सहभाग घेतला. |
| | महाराष्ट्राच्या राजकारणावर पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याशी दोनवेळा चर्चा केली. वारणा सह. साखर कारखान्याच्या उभारणीत प्रथमपासून सक्रीय सहभाग घेऊन काम केले. इस्लामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संचालक आणि चार वर्षे सभापती म्हणून काम केले. तदर्थ समिती, वाळवा या संस्थेत उपाध्यक्ष म्हणून पाच वर्षे काम केले आहे. |
| २५ डिसेंबर २००० | ८० वर्षे पूर्ण. |

# क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील गौरवसमिती, कोल्हापूर



## क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांना गौरव समितीच्यावतीने अर्पण केलेले

## ।। गौरवपत्र ।।

क्रांतिवीर रंगरावदादा पाटील या थोर स्वातंत्र्य सैनिकाला गौरवपत्र अर्पण करताना गौरव समितीला विशेष आनंद व अभिमान वाटत आहे.

भारतीय स्वातंत्र्ययुद्धात ज्या थोर विभूतींना आपले सर्वस्व अर्पण करुन भारत देशाची इंग्रजांच्या गुलामीतून मुक्तता करुन देशवासीयांना गौरवस्पद जीवन प्राप्त करुन दिले अशा महान विभूतींपैकी एक असा क्रांतिवीर रंगरावदादा पाटील यांचा उल्लेख कृतज्ञतापूर्वक केला पाहिजे.

क्रांतिवीर रंगरावदादांचा जन्म २५ डिसेंबर १९१९ रोजी अंकलखोप येथे झाला. शिगाव ता. वाळवा, जि. सांगली येथे आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करुन रयत शिक्षण संस्था सातारा येथे माध्यमिक शिक्षण घेऊन ते मॅट्रिक झाले. त्यानंतर सन १९३७ पासून १९४८ पर्यंत काँग्रेस पक्षाच्या राजकीय चळवळीत भाग घेऊन देशकार्याची धुरा समर्थपणे वाहिली.

सन १९४२ च्या 'चलेजाव' चळवळीत स्वत:ला त्यांनी झोकून दिले. या चळवळीत त्यांनी क्रांतिसिंह नाना पाटील, माननीय पांडु मास्तर, बर्डे गुरुजी, भाई माधवरावजी बागल, आदरणीय यशवंतराव चव्हाण यांच्यासमवेत काम करुन स्वातंत्र्याची चळवळ नेटाने चालविली.

१९४२ च्या चळवळीत क्रांतिवीर रंगरावदादा अडीच वर्षे भूमिगत राहून देशकार्य करीत होते. या काळात सरकारने त्यांची सर्व इस्टेट जप्त केली आणि त्यांना जिवंत वा मृत पकडून देणारास बक्षीस देण्याची घोषणा केली. नंतर त्यांना पकडून येरवडा व नंतर नाशिकच्या कारागृहात ठेवण्यात आले. १४ महिन्यांच्या कारावसानंतर सन १९४६ मध्ये त्यांची कारावासातून सुटका करण्यात आली.

सन १९४६ मध्ये सातारा जिल्हा काँग्रेस कार्यकारिणीवर वाळवा तालुका प्रतिनिधी म्हणून निवड झाली. त्यानंतर सातारा जिल्हा काँग्रेस कमेटीचा ऑनररी सेक्रेटरी या नात्याने त्यांनी दीडदोन वर्षे काम केले.

सन १९४८ मध्ये महात्मा गांधी यांच्या हत्त्येनंतर काँग्रेस पक्षात घटनात्मक बदल झाले. त्यामुळे रंगरावदादांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. दे. भ. केशवराव जेधे, श्री. शंकरराव मोरे, श्री. भाऊसाहेब राऊत, श्री. र. के. खाडीलकर, श्री. तुळशीदास जाधव, भाई माधवराव बागल, क्रांतिसूर्य नाना पाटील अशा शेतकरी कामगार पक्षाच्या मान्यवरांसमवेत दादांनी पक्षकार्य जोमाने केले.

मा. रंगरावदादांनी सन १९४७ साली हुंडा न घेता गांधी विवाह करुन समाजापुढे स्वत:चे आदर्श उदाहरण ठेवले. सन १९४९ साली सातारा जिल्हा स्कूल बोर्डावर शेतकरी कामगार पक्षातर्फे निवडून गेल्यावर पुढील तीन चार वर्षे दादांनी लोकहिताची कामे तर केलीच पण त्याचबरोबर भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. त्याचबरोबर निकोप व व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा ध्यास मनाशी बाळगून मलकापूर ते सांगली व वारणा काठ अशा मोठ्या प्रदेशात दारुबंदी आंदोलन सुरु केले.

सन १९५४ पासून सहकारी चळवळीत क्रियाशीलपणे सहभागी होऊन विधायक कार्यास प्रारंभ केला. शिगाव येथील वि. का. स. सोसायटीचे चेअरमन म्हणून २०-२५ वर्षे काम केले. या काळात सोसायटीसाठी ऑफिसची इमारत व दोन गोदामांचे काम पूर्ण केले. सोसायटी सतत 'अ' वर्गात आहे याचे श्रेय मा. रंगरावदादांना द्यावे लागेल.

सन १९५६ ते ५८ या काळात दादांनी तालुका सुपरवायझिंग युनियनचे चेअरमन म्हणून काम केले व याचमुदतीत जिल्हा सहकारी बोर्डाचे संचालक म्हणूनही काम पाहिले. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांचा अमृततुल्य सहवास रंगरावदादांना लाभला असून वाळवा तालुक्यात माध्यमिक शिक्षण संस्थांच्या स्थापनेसाठी रंगरावदादा कर्मवीरांबरोबर कार्यरत राहिले आहेत. वाळवा तालुक्यातील १५-२० माध्यमिक शाळांची उभारणी करुन तालुक्यातील नव्या पिढीला ज्ञागंगेचे पवित्र जल उपलब्ध करुन देण्यातील दादांचा सहभाग उल्लेखनीय व गौरवास पात्र आहे.

सन १९७३ साली दिल्ली येथे स्वातंत्र्य सैनिकांचे अधिवेशन झाले. त्यामध्ये सक्रीय सहभागी होऊन दादांनी दोन वेळा माजी पंतप्रधान कै. इंदिराजी गांधी यांच्याशी महाराष्ट्राचे राजकारण व समाजकारण याबाबत चर्चा केली. वारणा सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीत रंगरावदादा सक्रीय सहभागी झाले होते. इस्लामपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये सात वर्षे सभासद या नात्याने त्यांनी काम केले असून सभापती या पदावर चार वर्षे काम केले. तदर्थ समिती वाळवा या संस्थेत उपाध्यक्ष या पदावर त्यांनी पाच वर्षे काम केले आहे.

महात्मा गांधींच्या खुनानंतर रयत शिक्षण संस्थेवर जातीयवादाचा आरोप करुन तत्कालीन मुख्यमंत्री ना. खेर यांनी संस्थेची ग्रँट तहकूब केली. त्यामुळे संस्थाचालक, नोकर, शिक्षक यांच्यावर मोठे गंडातर आले. यावेळी संस्थेवरील संकट दूर करण्यासाठी जी थोर कार्यकर्ती माणसे पुढे सरसावली त्यामध्ये क्रांतिवीर रंगरावदादाही एक होते. या कार्यकर्त्यांनी २७ नोव्हेंबर १९४८ रोजी कर्मवीरांना एक लाख रुपयांची थैली अर्पण करुन रयत शिक्षण संस्थेच्या कार्याला हातभार लावला.

महाराष्ट्र शासनाने मा. रंगरावदादा यांची स्वातंत्र्यसैनिक गौरव समितीवर अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती. सध्या सांगली जिल्हा स्वातंत्र्य सैनिक सन्मान समिती या संघटनेचे ते अध्यक्ष आहेत. आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींच्या राजकीय धोरणांना पाठिंबा देऊन, शे. का. पक्षाचा राजीनामा देऊन इंदिरा काँग्रेसच्या स्थापनेपासून कार्यकर्त्यांच्या भूमिकेतून पक्षकार्य त्यांनी केले आहे. या काळात विधानसभा व लोकसभेच्या दोन निवडणुकात सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यात पक्षाचा प्रचार करण्याचे कार्य अत्यंत तडफदारपणे रंगरावदादांनी केले आहे. इंदिरा गांधी यांच्या वीस कलमी आर्थिक कार्यक्रमांचे ते खंदे पुरस्कर्ते आहेत.

मा. रंगरावदादांचा ध्येयवादीपणा, त्यांची स्वातंत्र्यनिष्ठा, त्यांचे देशप्रेम, त्यांची गोरगरीब व अज्ञानी

देशबांधवाबद्दलची तळमळ, त्यांचा विधायक कार्यातील सहभाग व त्यांनी क्रियाशील जीवनाचा समाजापुढे ठेवलेला आदर्श या सर्व गुणसमुच्चयाविषयी शब्दातून केलेले वर्णन हे अपुरे ठरणारे आहे. त्यांचा स्वभाव निर्भय आहे. स्वातंत्र्ययुद्धात त्यांनी केलेली साहसकार्ये रोमांचित करणारी आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्तेपासून चार हात दूर राहून त्यांनी आपल्या निष्काम कर्मयोगावरील दृढविश्वास व्यक्त केला आहे. समाजपुरुषाची एकनिष्ठ भक्ती हेच त्यांनी मुक्तीचे अंतिम साधन मानले आहे.

मा. रंगरावदादा पक्षीय राजकारणापेक्षा समाजसुधारणेच्या कार्याला अधिक मान देतात. भारतातील विषमता व अज्ञान यांनी व्यथित होऊन ते कार्यरत होतात. या मार्गातील अडथळ्यांशी त्यांनी कठोर होऊन खडतर संघर्ष केला आहे.

या संघर्षाच्या ज्वालांनी त्यांच्या पितृहृदयाला असह्य वेदनांनी भाजून काढले आहे. पण रंगरावदादांनी घेतलेला वसा कधी टाकला नाही. १९७२ साली शे. का. पक्षातर्फे तत्कालीन सत्तारुढ सरकारविरुद्ध महागाई विरोधी मोर्चा वाळवा तालुक्याच्या मामलेदार कचेरीवर त्यांनी नेला होता. याप्रसंगी शांततेने चाललेला मोर्च्यावर नृशंस अत्याचारी पोलिसांनी बेछूट गोळीबार केला आणि रंगरावदादांच्या राजेंद्र नावाच्या पुत्राला हौतात्म्य प्राप्त झाले. कालपुरुषाने सुखी संसाराच्या ताटात वाढलेला हा कडू घास कर्तव्य कठोर होऊन दादांनी गिळला. त्यांचे हृदय विदीर्ण झाले. पण मन समाज पुरुषाशी एकनिष्ठच राहिले. हुतात्मा राजेंद्रने आपल्या पित्याच्या श्रेष्ठतेची साक्ष मरण पत्करुन दिली.

आज वयाची ऐंशी वर्षे पूर्ण करुनही ते स्वस्थ बसण्यात धन्यता मानत नाही. अनेक समाजपयोगी संस्थांचा कारभार ते सहभागी होऊन मार्गी लावत आहेत. अशा या त्यागी, कर्मयोगी, विरागी, व्यक्तिमत्त्वाचा आम्ही गौरव करीत असून त्यांना असेच विधायक कार्य करण्यास दीर्घ आयुष्य व उत्तम आरोग्य लाभो अशी शुभेच्छा व्यक्त करीत आहोत.

मा. रंगरावदादा आपण शतायुषी व्हा हीच आजची कामना. जीवेत शरदः शतम् !!

### पदाधिकारी आणि सर्व सदस्य

## क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील गौरवसमिती, कोल्हापूर

# कृतिशील जीवनाला पुरोगामी विचारांचे अधिष्ठान असलेले क्रांतीवीर रंगरावदादा

**श्री. ग. प्र. प्रधान,** जेष्ठ विचारवंत.

स्वातंत्र्य संग्रामामुळेच आधुनिक भारताचे जीवन उज्ज्वल झाले आहे. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढताना असंख्य स्वातंत्र्य सैनिकांनी अपार त्याग केला. काहीजण हुतात्मे झाले. काहींनी दीर्घ मुदतीचा कारावास सोसला. या क्रांतिकारकांचा वारसा स्वातंत्र्य लढ्याच्या अखेरच्या पर्वात १९४२ च्या चलेजाव आंदोलनात ज्यांनी चालविला त्यांच्यापैकी आमचे रंगरावदादा पाटील एक तेजस्वी नेते आहेत. त्यांनी ज्या हिरिरीने स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील प्रतिसरकार उभारण्यासाठी ते ज्या शौर्याने लढले त्यामुळेच जनता त्यांना आजही क्रांतिवीर म्हणून ओळखते.

त्यावेळच्या सातारा जिल्ह्यातील (आणि आजच्या सांगली जिल्ह्यातील) अंकलखोप या लहानशा गावी शेतकरी कुटुंबात रंगरावांचा जन्म झाला. शाळेत असताना पोहणे, मल्लखांब आदी व्यायाम करीत त्यांनी जे शरीर कमावले त्याचप्रमाणे त्यांच्या मनावर त्यांच्या शिक्षकांनी देशभक्तीचे संस्कारही केले. सातारा जिल्ह्यात सत्यशोधक चळवळीमुळे महात्मा फुले यांचा सामाजिक समतेचा विचार लहान लहान गावापर्यंतही पोचला होता. रंगराव हे कर्मवीर आण्णांनी चालविलेल्या बोर्डींगमध्ये राहून हायस्कूलचे शिक्षण घेत होते. त्यावेळी त्यांनी स्वावलंबनाचे जे धडे गिरविले, अभ्यास करतानाच नवे विचार जेआत्मसात केले, त्यामुळेच त्यांच्या ध्येयवादी व्यक्तीमत्त्वाची घडण झाली. १९३० आणि १९३२ सालच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेल्या यशवंतराव चव्हाण, राघुआण्णा लिमये, बर्डे मास्तर आदी तरुणांच्या कार्याबद्दल रंगरावांना आकर्षण वाटू लागले. हायस्कूल विद्यार्थी असतानाच मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढण्याचा निर्धार त्यांनी केला. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरु झाले आणि स्वातंत्र्य लढा समीप आल्याची जाणीव तरुणांना झाली. रंगरावांनी त्यावेळी देशभक्तीची जी भाषणे ऐकली, जे वाचन केले, त्यामुळेच त्यांचे विचार सुस्पष्ट झाले आणि मन खंबीर झाले.

८ ऑगस्ट १९४२ ला मुंबईला अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनात 'चले जाव' ब्रिटीशांनी भारत

सोडून चालते व्हावे हा ठराव पास झाला आणि महात्मा गांधींनी स्वातंत्र्य लढ्याचे रणशिंग फुकले. 'करेंगे या मरेंगे' हा संदेश त्यांनी देशाला दिला. आम्हा तरुणांच्या मनाला एक नवे चैतन्य लाभले आणि 'शिंग फुंकिले रणी, वाजतात चौघडे सज्ज व्हा उठा उठा, सैन्य चालले पुढे' असे म्हणत आम्ही अनेकांनी स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला झोकून दिले. रंगराव पाटील आणि त्यांचे सहकारी अशा देशभक्तीने पेटून उठलेल्या तरुणांमध्ये आघाडीवर होते. रंगरावदादा केवळ भावनेच्या वेगात चळवळीत पडलेले नव्हते. त्यांच्या कृतीला विचारांचे अधिष्ठान होते. ते आपल्या मित्रांना म्हणाले, '८ ऑगस्टचा ठराव हा खरा क्रांतिकारक आहे. त्यामध्ये केवळ इंग्रजांना भारतातून जायला सांगितले नाही. उद्याचे स्वराज्य हे शेतात घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांसाठी, कारखान्यात कष्ट करणाऱ्या कामगारांसाठी असेल असे स्पष्ट म्हटले आहे. ८ ऑगस्टला मध्यरात्री ब्रिटीश सरकारने महात्मा गांधी, पं. नेहरू आदी नेत्यांना अटक केल्यावर देशभर असंतोषाचा भडका उडाला. पोलिसांनी केलेला लाठीमार, सोडलेला अश्रुधूर, लष्कराचा गोळीबार यांना न भिता जनता पेटून उठली. सातारा जिल्ह्यातील नेत्यांनी चळवळींची आखणी फार काळजीपूर्वक केली. १९४२ च्या ऑगस्ट महिन्यात सरकारी कचेऱ्यांवर जे मोर्चे गेले, त्यांच्यावर भीषण गोळीबार झाला आणि आघाडीचे शूरवीर हुतात्मे झाले. यामुळे लोक भ्याले नाहीत उलट असंख्य तरुण चळवळीकडे ओढले गेले.

रंगरावदादांनी प्रथम २४ ऑगस्टला अंकलखोपला सत्याग्रह केला आणि नंतर ही दीर्घ काळाची लढाई आहे, हे ओळखून क्रांतिसिंह नाना पाटील, स्वामी रामानंद भारती, वसंतदादा पाटील, बर्डे गुरुजी, किसनवीर आदींच्या समवेत भूमिगत राहून क्रांतिकार्य करावयास सुरुवात केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचा अवलंब करुन रंगराव आणि त्यांचे सहकारी यांनी सातारा-सांगली भागातील ब्रिटिशांचे राज्य खिळखिळे केले. जनतेने त्यांना उत्स्फूर्त पाठींबा दिला. स्त्रियांनी या लढणाऱ्या विरांच्यावर आईची, बहिणीची माया करुन त्यांना जेवू खावू घातले. थोड्याच काळात ठिकठिकाणी शस्त्रांचीही जमवाजमव झाली आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकार स्थापन झाले. १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात देशभराच्या लढ्यामध्ये सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकार हे सर्वोच्च शिखर होते. कारण ते लोकराज्य होते. रंगराव पाटलांच्यासारख्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेवून सावकारी नष्ट केली, दरोडेखोरांना पकडून शिक्षा केल्या, न्याय-पंचायतही स्थापन केल्या, स्वराज्य हे कष्टकऱ्यांचे राज्य असेल ही कल्पना या लोकराज्यात खरी ठरली. जी. डी. लाड, नाथा लाड, वडगावचे मोहिते, किसनवीर, पांडू मास्तर यांच्यासमवेत रंगरावदादा तडफेने काम करीत होते. रंगरावदादांच्या जीवनातील हे मंतरलेले दिवस होते. जीवावर उदार

होवून ते आणि त्यांचे सहकारी लढले आणि ब्रिटिश राज्याचा पायाच ढासळला. अडीच वर्षे भूमिगत होवून कार्य करताना रंगरावदादांच्या घरादारावर जप्ती आली. त्यांना पकडण्यासाठी सरकारने बक्षीसही लावले आणि अखेर त्यांना अटक झाली. १४ महिने येरवडा आणि नाशिक तुरुंगात काढल्यावर रंगरावदादांची १९४६ साली सुटका झाली. सुटकेनंतर क्रांतिवीर म्हणून लोकांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. त्यानंतर रंगरावदादा धडाधडीने राजकीय कार्य करु लागले. हुंडा न घेता दुर्बल घटकातील मुलीशी त्यांनी लग्न केले. त्यांच्या गांधी लग्नसोहळ्याला हजर राहून त्यांना आशिर्वाद द्यायला दे. भ. केशवराव जेधे, क्रांतिसिंह नाना पाटील आदी नेते आले होते.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. आम्हा सर्व स्वातंत्र्य सैनिकांचे एक स्वप्न साकार झाले. त्याचवेळी हे स्वातंत्र्य म्हणजे श्रमिकांचे, शेतकऱ्यांचे, कामगारांचे राज्य हे नवे ध्येय केशवराव जेधे, शंकरराव मोरे या नेत्यांनी बहुजन समाजातील ग्रामीण भागातील तरुणांच्यापुढे ठेवले. ध्येयवादी वृत्तीचे आणि लढाऊ बाण्याचे रंगराव या विचारांकडे ओढले गेले आणि त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. शे. का. पक्षातर्फे ते सातारा जिल्हा स्कूल बोर्डावर निवडून गेले. शिक्षण प्रसाराला चालना देताना त्यांनी भ्रष्टाचार निपटून काढला. कर्मवीर आण्णांच्या संस्थेत ते एकेकाळी राहिले, शिकले आता ते आण्णांचे विश्वासू सहकारी झाले. सातारा-सांगली भागात खेडे गावी पन्नास हायस्कूल स्थापन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला.

शे. का. पक्षाचे झुंजार नेते म्हणून रंगरावदादा महाराष्ट्रात ओळखू लागले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात रंगरावदादा आघाडीवर होते. बेळगावच्या दाजिबा देसाईंचा त्यांच्यावर फार मोठा विश्वास होता. रंगरावदादा, वाय. सी. पाटील यांच्यामुळे इस्लामपूर, अष्टे, खानापूर आदी तालुक्यात संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला धार आली. महाराष्ट्रावरील अन्यायाच्या निर्धाराने प्रतिकार करताना रंगरावदादा स्वातंत्र्य चळवळीतील आवेशानेच लढले.

रंगरावदादा कधी प्रलोभनाला बळी पडले नाहीत. ते सत्तेपुढे वाकले नाहीत. त्यांनी सत्ताधाऱ्यांची कधी खुशामत केली नाही. त्यांचे सडेतोड बोलणे काही पुढाऱ्यांना मानवत नसे. परंतु इष्ट असेल तेच बोलणार हा रंगरावदादांचा बाणा होता. तोच त्यांनी आयुष्यभर जपला. वारणा सहकारी साखर कारखान्यांच्या उभारणीच्यावेळी तात्यासाहेब कोरे यांच्यासमवेत रंगरावदादांनी सुरुवातीपासून अथक परिश्रम केले. त्यांच्यासारख्या कार्यकर्त्यांच्यामुळेच वारणा खोऱ्यातील शेतकऱ्यांचे जीवन बदलले. त्यांचा सर्वांगीण विकास झाला.

रंगरावदादांनी इस्लामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि सभापती म्हणून चार वर्षे

काम केले.

१९७२ साली इस्लामपूरला शे. का. पक्षातर्फे महागाई विरोधी मोर्चा निघाला होता. दादांचा मुलगा राजेंद्र हा मोर्चात आघाडीवर होता. पोलिसांच्या बेछूट गोळीबारात राजेंद्र मरण पावला. दादांच्यावर मोठा आघात झाला. पण अतुल मानसिक धैर्याने त्यांनी या आपत्तीवर मात केली.

रंगरावदादांनी भारतातील स्वातंत्र्य सैनिकांच्या संघटनेत स्वाभिमानी वृत्ती ठेवून मोलाचे कार्य केले. स्वातंत्र्य सैनिकांना त्यांच्या कर्तव्याचीही जाणीव दिली. सत्तेच्या राजकारणापेक्षा समाजोपयोगी कामामध्ये आणि विशेषत: शैक्षणिक कार्यामध्ये त्यांचे मन रमले. त्यांचे काका कै. व्ही. टी. पाटील यांनी कोल्हापूरला ताराराणी विद्यापीठ स्थापन केले. त्यांच्या सर्व शिक्षण संस्थांना रंगरावदादांचा मोठा आधार आहे. शिक्षण हा समाज जीवनाचा पाया आहे असे रंगरावदादा सतत आग्रहाने सांगतात. उत्कट देशभक्ती, शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे ही मनाची ओढ आणि सामाजिक समतेचा आग्रह हे रंगरावदादा पाटलांच्या व्यक्तिमत्त्वाचे मुख्य पैल आहेत. ते आता ८० वर्षाचे झाले. माझ्यासारख्या त्यांच्या समवयस्क मित्राला त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आदर आणि अभिमान वाटतो.

रंगरावदादा पाटील यांना प्रदीर्घ आयुष्य आणि आरोग्य लाभो, आपल्या देशाच्या आणि समाजाच्या भविष्याचे जे चित्र त्यांनी तरुणपणी मनाशी रेखाटले, ते चित्र प्रत्यक्षात आलेले पाहण्याचे भाग्य त्यांना लाभो आणि कार्यकर्त्यांना त्यांचे मार्गदर्शन अक्षय मिळो, हीच सदिच्छा !!!

“स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय एकात्मतेसाठी माणसांची मने बांधली जात होती. देशातील अज्ञान आणि दारिद्र्य नष्ट करुन सामान्य जनतेला सुखाने जगता यावे म्हणून आमच्यासारख्या हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी जिवाची तमा न बाळगता, जातपात न पाहता, पक्ष गट न करता स्वातंत्र्यासाठी कष्ट घेतले. आमच्या स्वप्नातला भारत फार वेगळा होता. आज भारताचे चित्र पार बदलून गेल्याचे दुःख आम्हा सर्व स्वातंत्र्य सैनिकांना होत आहे. आता २१ व्या शतकातील नवा भारत घडविण्याची जबाबदारी उगवत्या पिढीवर आहे.”

— क्रांतिवीर श्री. रंगरावदादा पाटील
दिनांक: २५ डिसेंबर २०००
८१ वा वाढदिवस

